

# मन पाखरू पाखरू

निर्मलकुमार फडकुले

# मन पाखरू पाखरू



## डॉ. निर्मलकुमार फडकुले यांचे साहित्य

• लोकहितवादी : काल आणि कर्तृत्व • साहित्यवेध • संतकवी तुकाराम : एक चिंतन
• काही रंग काही रेषा • हिरव्या वाटा • आनंदाची डहाळी
• संत चोखामेळा व समकालीन संतांच्या रचना • जगायचं कशासाठी ? • रंग एकेकाचे
• संतसहवास • संतांचिया भेटी • अमृतकण कोवळे • संतवीणेचा झंकार
• समाजपरिवर्तनाची चळवळः काल आणि आज • सुखाचा परिमळ • प्रिय आणि अप्रिय
• संत तुकारामांचा जीवनविचार • चिंतनाच्या वाटा • साहित्यातील प्रकाशधारा
• मन पाखरू पाखरू

## संपादित

• ज्ञानेश्वरी अध्याय पहिला • चिपळूणकरांचे तीन निबंध • प्रबोधनातील पाऊलखुणा
• निवडक लोकहितवादी • यात्रिक • रत्नकरण्ड श्रावकाचार • कल्लोळ अमृताचे



# मन पाखरू पाखरू

निर्मलकुमार फडकुले

सुविद्या
प्रकाशन

मन पाखरू पाखरू
निर्मलकुमार फडकुले
Mana Pakharoo Pakharoo
By Nirmalkumar Phadkule

© निर्मलकुमार फडकुले

'विवेक'
विद्यानगर, उत्तर सदर बझार,
सोलापूर-४१३ ००३

प्रथमावृत्ती :
जुलै २००१

मुखपृष्ठ :
शिरीष घाटे

अक्षर जुळणी :
जयंती पेपर्स अॅन्ड प्रिंटर्स
३७४, उ. कसबा, सोलापूर.

मुद्रक :
विनंद ऑफसेट,
टिळक चौक, सोलापूर.

मुखपृष्ठ छपाई :
मॉडर्न ऑफसेट,
सोलापूर.

मूल्य :
१२० रुपये

रसिकहो व मराठी साहित्य प्रेमी स्नेहजनहो ,

माझे वडील प्रा.डॉ. निर्मलकुमार फडकुले यांचे साहित्य मी ई-साहित्य प्रतिष्ठान तर्फे आपणासाठी प्रकाशित करीत आहे. २८ जुलै २०२० या त्यांच्या चौदाव्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या साहित्याचे प्रकाशन व्हावे व ते जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचवावे हा उद्देश आहे.

पेशाने मराठीचे प्राध्यापक,अत्यंत हळवे व जीवनावर मनापासून प्रेम करणारे असे माझे वडील. केवळ साहित्यिकच नव्हे तर ते प्रख्यात वक्ते देखील होते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील गावांमध्ये त्यांनी प्रबोधनाचे कार्य केले .संत साहित्याचा त्यांचा गाढा अभ्यास होता. त्यांनी आकाशवाणी पुणे, सांगली, सोलापूर यावरून संतांच्या विविध अभंगांचे निरूपण केले आहे आजही ते आकाशवाणी वरून प्रसारित होत आहे. ते सर्व प्रसारित कार्यक्रम आपल्या भेटीस इ-साहित्य प्रतिष्ठान मार्फत आणणार आहोत. विविध शासकीय व विद्यापीठीय समित्या, अभ्यास मंडळे , बालभारती यांच्या माध्यमातून त्यांनी खूप मोलाचे कार्य केले आहे. अग्रगण्य वृत्तपत्रातून व नियतकालिकांमधून ४०-४५ वर्षांहून अधिक काळ त्यांनी लेखन केले तेही पुस्तक रूपात प्रसिद्ध झाले . त्यांची काही व्याख्याने देखील रसिकांच्या भेटीस आणणार आहोत. त्यांच्या स्वभावाचे विविध पैलू त्यांच्या साहित्यातून उलगडत जातील व खास करून जीवनाविषयक दृष्टिकोन त्यांच्या ललित लेखनातून आपणास समजेल. देश-परदेशातील असंख्य रसिकांनी त्यांच्या सर्व साहित्याची पुनर्प्रकाशनाची मागणी केली व ती आता पूर्ण होत आहे याचा मला आनंद आहे. या प्रकाशनाला ई साहित्यने केलेल्या सहकार्यासाठी त्यांचा मी आभारी आहे.

अजित नि. फडकुले, सोलापूर
ajitphadkule@hotmail.com
९४२२४६३६४२

’ मन पाखरू पाखरू’ हे प्रा. डॉ. निर्मलकुमार फडकुले लिखित पुस्तक ‘सुविद्या प्रकाशन’ यांनी २००१ साली प्रकाशित केले. त्या पुस्तकाचे सर्वाधिकार लेखकाचे चिरंजीव व वारस श्री अजित फडकुले यांच्याकडे आहेत.

त्यांनी ई साहित्य प्रतिष्ठानला याचे ई पुस्तक बनवून विनामूल्य वितरित करण्याचे कायदेशीर अधिकार दिले आहेत. त्यानुसार आम्ही आमच्या वाचकांना ते पुस्तक विनामूल्य देत असून त्यांनी ते आपल्या ओळखीच्या वाचकांत विनामूल्य वितरित करावे ही विनंती करत आहोत.

या परवानगीसाठी आम्ही

श्री अजित फडकुले :-9422463642

ajitphadkule@hotmail.com

यांचे आभारी आहोत.

ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com
www.esahity.com
www.esahity.in

# मन पाखरू पाखरू

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : श्री. अजित फडकुले यांना फ़ोन किंवा मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

## असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.

## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाचे चिरंजीव व वारस श्री. अजित फडकुले यांचेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (तुरुंगवास व दंड) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

ई प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

प्रकाशन : २८ जुलै २०२०

(स्व. श्री. निर्मलकुमार फडकुले स्मृतीदिन)

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी- घेणे आवश्यकआहे.

## पुस्तकं वाचून कोणाला शहाणपण येतं का?

हो! आम्ही म्हणतो हो. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

अनुभवाहून मोठा गुरू नाही. कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. काही प्राण्यांना त्यांचे जन्मदाते थोडं शिक्षण देतात. बाकीचे प्राणी अनुभव घेत घेत शिकतात. फक्त मानवच असा प्राणी आहे ज्याला पुर्वीच्या पिढीतल्या माणसांचे अनुभवही शिकवतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

**अनुभव पुस्तक असतात आणि पुस्तक अनुभवच असते.**

**वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे**.

www.esahity.in आणि www.esahity.com

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वत:ही लिहायला हवं.



अजित आणि भारती

व

विवेक आणि सुनीता

यांना शुभेच्छापूर्वक.

आहे हे वाचकांनी ठरवायचं आहे. लेखन वाचताना त्यांच्या मुद्रेवर प्रसन्नतेची रेषा उमटली की लेखकाला समाधान वाटतं. आमच्याही आयुष्यातल्या रंगरेषांचं चित्र इथं चित्रित झालं आहे असं त्यांना वाटणं हेच लेखकाचं यश. लेखक आणि वाचक एकमेकांना या पद्धतीनं भेटावेत. पण यासाठी लेखकाला अधिक तप करावं लागतं. तो यशस्वी नसला तरी चालेल. पण तो जीवनानुभवांच्या क्षेत्रात तपस्वी असणं आवश्यक आहे.

ललितगद्य या साहित्यप्रकाराच्या कक्षा आता विस्तारत चालल्या आहेत. कृत्रिम तंत्राच्या सांकेतिक चौकटी बाजूला सारून हा वाङ्मयप्रकार गद्यकाव्य, लघुनिबंध, व्यक्तिचित्र, चिंतनात्मक लेख यांच्याशी जवळीक करीत आहे. अनुभवाचे कोणतेही धागे घ्यावेत आणि त्यांना आपल्या चिंतनाचे, भावनेचे रंग देऊन त्यातून एखादं वस्त्र विणावं असं या ललित गद्याचं स्वरूप बनलं आहे. आयुष्याच्या वाटेनं चालताना मनुष्य कधी उन्हानं काळवंडतो, कधी सावलीत सुखावतो. कधी एखादं उदात्त ध्येय दृष्टीसमोर ठेवून त्यागातलं, बलिदानातलं सुख अनुभवतो. कधी क्षुद्र स्वार्थाच्या भोवती प्रदिक्षणा घालतो. जीवानाचं हे रूप आणि विद्रूप माझ्या ललितलेखांतून रंगवण्याचा मी प्रयत्न केला आहे. खरं तर माझ्या लेखनाबद्दल मी काही बोलू नये. पण काहीतरी 'मनोगत' लिहा हा प्रकाशक मित्राचा आग्रह असल्यामुळं हे काही शब्द लिहिले.

सुविद्या प्रकाशनाचे संचालक आणि माझे मित्र श्री. बाबूराव मैंदर्गीकर यांच्या स्नेहभावानं हे सारे लेख एकत्रित करून त्यांच्या स्वाधीन केले. एकदा पुस्तक प्रकाशित झालं की त्यावर वाचकांची मालकी असते. 'इदं न मम' या अलिप्त भावानं लेखकानं पुढं वागावं. वाचकांनी आता या पुस्तकाचं स्वागत त्यांच्या इच्छेप्रमाणं करावं. मुखपृष्ठावरील कलात्मक चित्राबद्दल श्री. शिरीष घाटे आणि प्रकाशनाबद्दल श्री. बाबूराव मैंदर्गीकर यांचे मनःपूर्वक आभार.

**निर्मलकुमार फडकुले**

# अनुक्रम


१. मन पाखरू पाखरू ! / १

२. आती क्या खंडाला ? /१०

३. नाटक /१५

४. कुठे आहे देव ? /२१

५. आपलं घर /२७

६. मृत्यूची भेट /३३

७. एका गुलाबपुष्पाचा सुगंध /४१

८. विठ्ठलाशी वाद आणि संवाद /४७

९. तुकोबा आणि मी /५४

१०. पुरोगामी की प्रतिगामी ? /६०

११. हे आमचे लोकप्रतिनिधी ! /६६

१२. आपण कुठे जाणार ? / ७२

१३. वक्ता आणि श्रोता /७७

१४. ते वक्ते ! ती व्याख्यानं ! /८३

१५. माणसा, तू असा कसा ? /८९

१६. पुन्हा भेटू, जय हिंद ! /९५

१७. अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य /१०१

१८. माझिये जातीचा मज भेटो ..... /१०६

१९. माझं बरं चाललं आहे ! / १११


२०. धरिला पंढरीचा चोर /११७

२१. माझा देश - माझी मायभूमी /१२३

२२. माझ्या व्याख्यानाचे आख्यान / १३०

२३. हसत हसत जगा / १३९

२४. हे पिकल्या पानांनो ! /१४७



# मन पाखरू पाखरू !

मनाचा पक्षी आपले पंख पसरून विचारांच्या अंतराळात अतिवेगानं झेपावत असतो. अनेक कवींनी मनाच्या वेगाबद्दल वेगवेगळ्या रीतींनी लिहिलं आहे. शेक्सपीअरनं म्हटलं आहे,

'पक्षी जितका उंच उडू शकतो त्याच्यापेक्षा जर मनाचं उंच उड्डाण होत नसेल तर ते क्षुद्र आणि हिणकस समजावं.' मनाची भरारी किती वेगवान आणि किती उंच असू शकते हे आपण आपल्या अनुभवावरून ओळखायचं आहे. मन आहे म्हणूनच तुम्ही आम्ही सुखदुःखांचा अनुभव घेऊ शकतो. मनाच्या दृष्टीलाच सुंदरता आणि कुरूपता जाणवते. दारिद्र्यात पिचत पडलेला, खोल दुःखात बुडालेला संवेद्य मनाचा माणूस मनानं कल्पना करू शकतो की, हे दारिद्र्य ओसरून जाईल. ही सारी दुःखं आणि यातना संपून जातील. नंदनवनात कल्पवृक्षाच्या सावलीत सुवर्णपात्रातून मी अमृताचं पान करू शकेन. मन नावाच्या पक्ष्याच्या भरारीचं हे फलित नव्हे काय ? मन दुःखही देतं, तापदायकही होतं. पण हे मनाचं पाखरू आपल्याला प्रिय असतं. हा विचार मनात येण्याचं कारण असं घडलं.

मानसशास्त्र परिषदेत एक व्याख्यान देण्याचं मला संयोजकाकडून आमंत्रण मिळालं तेव्हा मी आश्चर्यचकित झालो. माझा मानसशास्त्राचा अभ्यास नाही. ज्यांनी या विषयावर अनेक वर्षे वाचन, चिंतन व लेखन केलं आहे अशा अभ्यासकांच्या मेळाव्यात मला बोलावणं हा एक विनोदच नव्हे का ? मी तसं बोलून दाखवलं तेव्हा संयोजक म्हणाले, 'तुम्ही मानवी मनाच्या चित्रविचित्र व्यापारावर प्रकाश टाकू शकाल असा आम्हाला विश्वास वाटतो. 'मन' याच विषयावर तुम्ही विचार व्यक्त करावेत अशी विनंती आहे.' मी हसून म्हणालो, 'मला या विषयावर बोलायला लावण्याचं तुमच्या मनातच आलेलं दिसतंय. तुमचं मन मी मोडणार नाही. पण मी मनापासून बोलेन. या विषयावर आता मनमानी करायला हरकत नाही. माझं भाषण ऐकल्यावर श्रोत्यांच्या मनांत माझ्याविषयी काय काय येईल याची मनातल्या मनात मी कल्पना करू शकतो.' संयोजक

मनःपूर्वक आभार मानून निघून गेले. मी मात्र अस्वस्थ झालो, मनोविज्ञान जाणणाऱ्यांच्या समूहात मनाचे व्यापार मी काय सांगणार ?

मन हे खरं तर अमूर्त आहे. चंचल आहे. एखाद्या नाठाळ घोड्यासारखं आहे. त्याला लगाम घालण्याचा प्रयत्न करणाऱ्या स्वाराला ते केव्हा आणि कसं आपल्या पाठीवरून फेकून देईल ते सांगता येत नाही. मनाबद्दल निश्चितपणानं सांगता येत नाही एवढंच सांगता येणं शक्य आहे. मनाला कोणतीही उपमा दिली तरी त्या उपमेपेक्षा हे उपमेय अधिक बलिष्ठ आहे. विजेसारखं चंचल असलेलं हे मन विजेपेक्षाही अधिक वेगानं कुठंही संचार करू शकतं. एका कवीनं विनोदानं म्हटलं आहे,

'मन हे नपुंसक असल्यामुळं मी विश्वासानं ते माझ्या प्रियेकडं पाठवलं. पण तिला सोडायला आता ते तयारच नाही. तिथंच रममाण झालं. बोलावलं तरी ते परत येत नाही.' एक विचारवंत म्हणतो, 'मनावर नियंत्रण ठेवा. जर ते तुमचे नोकर बनले नाही तर तुम्हालाच त्याची चाकरी करावी लागेल.' मनावर नियंत्रण ठेवा' हा ठरीव ठशाचा उपदेश प्राचीन काळापासून साधुसंत करीत आले आहेत. उपदेश करणाऱ्यालाही ते जमलेलं नाही. ऐकणाऱ्यालाही ते शक्य नाही. अर्जुनानं श्रीकृष्णाला असाच प्रश्न विचारला होता. 'कस आवरावं हे मन ? वाऱ्याची मोट जशी बांधता येत नाही तसं हे मनही कधी बांधलं जात नाही. मनाला बांध मी कसा घालायचा ?' श्रीकृष्ण म्हणाला, 'अभ्यासानं ते साध्य होईल.' श्रीकृष्णाच्या उत्तरात तथ्य असेल. पण मनाला आपल्या इच्छेप्रमाणं वाकवणं क्वचितच कोणाला शक्य होऊ शकेल.

अदृश्य आणि अमूर्त असलेलं मन प्रत्येकाला एखाद्या कळसूत्री बाहुलीप्रमाणं नाचवीत राहतं आणि प्रत्येक जण मनाच्या तालावर नाचत राहातो. हजारो वर्षांची तपश्चर्या करणाऱ्या विश्वामित्राचं सुदृढ मन मेनकेच्या एका कटाक्षानं विचलित झालं. तिच्याभोवती ते पिंगा घालू लागलं. मनाच्या घरट्यातला वैराग्याचा पक्षी क्षणार्धात उडून गेला. घरटं उद्ध्वस्त झालं. मनातच एक प्रशस्त रंगमहाल उभा राहिला. विश्वामित्राच्या गळ्यातल्या रुद्राक्षाच्या माळा गळून गेल्या. आता त्याच्या गळ्यात मेनकेच्या सुकुमार बाहूंचा प्रेमपाश पडला. इंद्रपदापेक्षा ही चंद्रवदना त्याला प्रिय वाटली. शिशिर संपला. आणि विश्वामित्र नावाच्या एका वठलेल्या झाडाला अचानक प्रणयवसंताची पालवी फुटली. हा चमत्कार कुणी घडवला ?

कंदमुळं प्रिय असलेल्या विश्वामित्रानं आता अधरांच्या चषकांतून अमृताचं पान धुंदपणानं करायला सुरुवात केली. या चमत्काराचं श्रेय त्याच्या मनाकडं जातं. हेच मन आधी कठोर तपस्येत गुंतलं आणि तेच मेनकेच्या सौंदर्यात व तारुण्यात गुरफटून गेलं. कुणी म्हणतात विश्वामित्राच्या मनानं त्याचा अधःपात केला. पण रसिकांच्या मनाची साक्ष काढली तर नेमकं उलट उत्तर येईल.

मन हे एक प्रेक्षणीय पण अनाकलनीय असं अजब पदार्थवस्तु संग्रहालय आहे. चित्रविचित्र चिजांनी ठासून भरलेलं असं म्युझियम जगाच्या पाठीवर कुठंच नाही. सूक्ष्मदर्शक यंत्रानं आपण आपलं मन तपासून पाहायला लागलो तर त्यात काय काय दिसेल ? मला इथं लिओ टॉलस्टॉयच्या 'ॲना कॅरेनिना' या कादंबरीची आठवण होते. टॉलस्टॉयनं तिच्या गुंतागुंतीच्या मनाचा बारीक शोध आपल्या पुस्तकातून घेतला आहे. शरीरवासनेच्या आकर्षणात ती इतकी गुंतून पडते की तिला आपल्या भोवतालचे पाश प्रयत्न करूनही दूर करता येत नाहीत. वासनेच्या गाळात ती फसत जाते. सत् आणि असत् यांचा विवेक करणारी बुद्धी क्षीण होऊ लागते. वासनेच्या पुराबरोबर वाहवत गेलेली ही मूळची सत्प्रवृत्त नायिका वेळ निघून गेल्यानंतर विचार करू लागते. वासनेचे ढग विरून गेलेले असतात. भानावर आलेल्या तिच्या मनात आपल्या अधःपाताचा चित्रपट स्पष्ट दिसू लागतो. ती अधिकच अस्वस्थ होते. जागं झालेलं मन तिला दंश करीत राहातं. आत्महत्येच्या वाटेनं ती मग चालत राहाते. मनाची विलक्षण कुतरओढ सहन करणाऱ्या ॲनाचं चित्र लेखकानं असं रंगवलं आहे की, जणु तिचं मनच त्यानं काही काळ दत्तक घेतलं होतं. लेखक-कवी जेव्हा आपल्या मनानं लिहितात तेव्हाच त्याचं साहित्य वाचकांच्या मनाला भिडतं. ते जेव्हा लेखणीनं लिहितात आणि पांढऱ्यावर काळं करतात तेव्हा ते सारं लिखित पार पुसून जातं. आजपर्यंत कमी वाङ्मय निर्माण झालं नाही. शेकडो लेखक लिहितात. एखादा मात्र माणसाचं मन ओळखतो. मनाच्या खोल कुहरात आपल्या प्रतिभेच्या प्रकाशात डोकावून पाहातो. आणि जे आपल्या मनाला भावतं त्याचं चित्र शब्दांतून रेखाटतो. गायकाच्या कंठातून सूर निघतात. पण त्या सुरांची बीजं त्याच्या मनातच अंकुरलेली असतात. साहित्य-संगीत-अभिनय-नृत्य या साऱ्या ललित कलांची अभिव्यक्ती समर्थपणे व्हायला मनाचीच प्रेरणा आवश्यक असते.

एका लोकप्रिय ऐतिहासिक नाटकाचा प्रयोग पाहायला मी गेलो होतो.

संभाजीची भूमिका एक अग्रगण्य नट करीत होता. तो आपले संवाद नेहमीप्रमाणं सुस्पष्ट आवाजात भावानुकूल पद्धतीनं म्हणत होता, अभिनयही व्यवस्थित करीत होता. त्याची ही भूमिका मी तीन चार वेळां पाहिली होती. पण आज मात्र त्याचा अभिनय मला पूर्वीइतका जिवंत आणि प्रत्ययकारी वाटला नाही. तो सरावानं काम करीत होता. पण त्या कामात तो स्वतः रंगलेला नव्हता. नाटक संपल्यावर रंगपटात जाऊन मी त्याला म्हणालो, 'संभाजी महाराज, आज मला तुम्ही खरे संभाजी वाटलाच नाही. तुमचे संवाद तुम्ही बोलत नव्हता. नाटककार तुमच्या तोंडून ते बोलावून घेत होता. याचा बोलविता धनी वेगळाच आहे हे जाणवत होतं. अभिनयात देखील रस नव्हता. मी म्हणतो ते खरं आहे ना ? '

त्या नटाच्या मुद्रेवर खिन्नतेची झाक आली. ओशाळलेल्या स्वरात तो म्हणाला, 'तुमचं म्हणणं बरोबर आहे. आज मी संभाजीची केवळ नक्कल केली. मी संभाजी होऊ शकलो नाही. नटाला ज्या प्रमाणात भूमिकेशी समरस व्हावं लागतं त्या प्रमाणात आज मी समरस झालो नाही. पाठ असलेले संवाद म्हणून दाखवले आणि यांत्रिक अभिनय केला हे खरं आहे. आज माझं मन थाऱ्यावर नव्हतं. जिच्या पत्राची मी उत्सुकतेनं वाट पहात होतो. तिचं पत्र संध्याकाळी माझ्या हाती पडलं. त्यात तिनं दुसऱ्याच कुणाबरोबर तरी लग्न करीत असल्याचं कळवलं आहे. माझ्या मनाला फारच मोठा धक्का बसला. मी संभाजी आज रंगवू शकलो नाही. जखमी झालेल्या मनानं मला संभाजीचं व्यक्तित्व उभं करणं अशक्य होतं.' त्याचे डोळे पाणावले होते. या मनःस्थितीत कितीही कुशल कलावंत आपल्या कलाविष्काराला योग्य तो न्याय देऊ शकणार नाही.

न दिसणारं मन हेच माणसाचं मर्मस्थान असतं. 'मन करा रे प्रसन्न। सकळ सिद्धीचे कारण' याचा अर्थ हाच आहे. रणांगणावर लढणारा सैनिक शस्त्रानं लढतो हे बाह्यतः खरं असतं. पण त्याच्या अंतर्मनात लढण्याची ऊर्मी नसेल तर त्याचा लढा निरर्थक आहे. अर्जुनासारखा सर्वश्रेष्ठ योद्धा कुरुक्षेत्रावर आपलं धनुष्य खाली ठेवतो आणि श्रीकृष्णाला 'आपण लढणार नाही' असं निर्धारानं सांगतो. तेव्हाची त्याची मानसिकता हा एका नाट्याचा विषय आहे, वीरवृत्ती आणि करुणावृत्ती याचं एक अटीतटीचं द्वंद्व अर्जुनाच्या मनात उभं राहिलं. त्याची वीरता निघून गेली. करुणा विजयी झाली. हीच मानसिक अवस्था टिकून राहिली असती तर हस्तिनापूरचं सिंहासन दुर्योधनाच्याच हाती राहिलं असतं. ज्ञानेश्वरांनी अर्जुनाच्या

मनाच्या कुरुक्षेत्रावर जो विलक्षण संघर्ष झाला त्याचं चित्र ज्ञानेश्वरीत काढलं आहे. ते म्हणतात,

तेथ मनी गजबज जाहली । आणि आपैसी कृपा आली ।
तेणे अपमाने निघाली । वीरवृत्ती ।
जिया उत्तमे कुळीचिया होती । आणि गुणलावण्य आथी ।
तिया आणिकीते न साहती । सुतेजपणे ।
नविये आवडीचेनि भरे । कामुकु निजवनिता विसरे ।
की तपोबळे ऋद्धी । पातलिया भ्रंशे बुद्धी ।
मग तया विरक्ततासिद्धी । आठवेना ।।
तैसे अर्जुना तेथ जाहले । असते पुरुषत्व गेले ।
जे अंतःकरण दिधले । कारुण्यासी ।।

वीरवृत्तीचा अपमान झाला. कारण अर्जुनाच्या मनाचा ताबा करुणेनं घेतल्यामुळं वीरतेला आपली सवत सहन झाली नाही. ती स्वाभिमानानं बाहेर पडली. अर्जुन हतबल झाला. याचं वर्णन ज्ञानेश्वरांनी केलं आहे. अर्जुनाची मानसिक विकलता हाच गीतेचा प्रेरक विषय आहे. रणभूमीवर त्याचं मन दयेनं व्यापून गेलं म्हणजे सारंच युद्ध संपलं. अशावेळी अर्जुनाच्या मनाचे गतिशून्य बनलेले घोडे- श्रीकृष्ण नावाच्या सारथ्याला गतिमान करावे लागले. वीरत्वाच्या तेजस्वी विचारानं पुन्हा अर्जुनाचं मन उद्दीपित झालं आणि त्याच्या धनुष्यातून सुटलेला प्रत्येक बाण मनाच्या वेगानं कौरव सैन्याचा भेद करू लागला.

खरं तर मनाच्या या विचित्र खेळाचा आपण फारच थोडा विचार केलेला असतो. आपलं मन तरी आपल्याला कुठं समजतं ? आपल्याला इतकंच कळतं की मनाचे सगळे आदेश निमूटपणानं पाळावेत. सेनापतीच्या आदेशाचं सैनिकानं फक्त मान तुकवून पालन करायचं असतं. प्रतिप्रश्न विचारायचा नसतो. त्याप्रमाणं मन नावाचा रिंगमास्टर जीवनाच्या सर्कशीत माणसाकडून हवी ती कामं केवळ इशाऱ्यावर करवून घेत असतो. मी मनाला 'रिंगमास्टर' म्हणालो. पण नेपोलियननं मनाला 'महान शक्ती' म्हटलं आहे. - "There are but two powers in the world. The sword and the mind. In the long run the sword is always beaten by the mind." स्वतः नेपोलियनला याचा अनुभव आला होता. त्याच्या हातातली तलवार हरली. तलवारीचं बळ कमी पडलं. या फ्रेंच वीराला इंग्रजांनी

एल्बा बेटात स्थानबद्ध करून ठेवलं. तुरुंगाच्या कोठडीत तो तासन्‌तास येरझारा घालायचा. त्याच्या मनाचे डोळे त्या तुरुंगाची दगडी भिंत फोडून दूरवरचं भूतकाळातलं दृश्य न्याहाळायचे. ते मन म्हणायचं,

'या एल्बा बेटात कैदी होण्यापूर्वी तू सम्राट होतास. तुझ्या तलवारीपुढं जग थरथर कापत होतं. माणसं पायावर लोटांगणं घेत होती. आज माझं मन पराभवाच्या जखमेनं घायाळ झालं आहे. आता मरण येईल तर बरं होईल.' नेपोलियनच्या मनातली वादळं पेलायला आणि समूर्त करायला समर्थ लेखकाची लेखणी हवी. पण कोणत्याही प्रतिभावंताला मानवी मनाचे चित्रविचित्र खेळ समग्रपणे दाखवता येणार नाहीत. मनाचा डोह खोल असतो. त्यातल्या काळ्याशार पाण्यातले लहान मोठे तरंग दिसत नाहीत. मनाच्या पाखराला कोणत्याच आकाशाच्या भिंती अडवू शकत नाहीत. त्याच्या भराऱ्या अनिर्बंध असतात.

बालकांचं मन प्रौढांना कळत नाही. ते आपल्या मोजमापानं बालमनाची मोजणी करण्याचा वेडा प्रयत्न करतात. एखाद्या खेळण्यासाठी रुसलेल्या रडणाऱ्या बालकाचं समाधान कोणत्या शब्दांत करावं याचा पोच विद्वानांना देखील असत नाही. एकदा एका चारपाच वर्षाच्या मुलानं वडिलांच्या वहीवर पेन्सिलीनं आडव्या तिडव्या रेघोट्या काढल्या. आपण हत्तीचं चित्र काढलं आहे ते पाहिल्यावर वडील आपल्याला शाबासकी देतील, आपलं कौतुक करतील असं त्याला वाटलं. त्यानं ते चित्र वडिलांना दाखवलं. ते सद्‌गृहस्थ संतापले. कारण त्यांच्या वहीचं एक पान वेड्यावाकड्या रेघांनी चिताडलं होतं. त्यांनी त्या लहान मुलाला रागाच्या भरात दोन थपडा मारल्या. त्याच्या अंगावर हे पितृदेव जोरानं गुरगुरले. ते मूल स्फुंदून स्फुंदून रडू लागलं. आपली काय चूक झाली हेच त्याला कळेना. चित्र काढण्याची त्याच्या मनातली इच्छा या क्रूर प्रकारामुळं दडपली गेली. वडिलांबरोबर मनमोकळेपणानं ते मूल बोलेनासं झालं. एका फुलत असलेल्या कोवळ्या मनावर आघात झाला होता.

आपल्या अपत्यांची मनं न कळणारे असंख्य पालक आहेत. वर ते फुशारकीनं सांगतात, 'आमच्या बाळ्याला मी अशा धाकात ठेवलं आहे की काय बिशाद! तो वर तोंड करू बोलेल! मुलांचे कधी लाड करू नयेत. लाड झाले की ते आपल्या मानगुटीवर बसतात. बायका-मुलांचे लाड करणं हा गाढवपणा आहे.' प्रौढ झालेल्या, जीवनाचा अनुभव घेतलेल्या या लोकांची मनं किती अज्ञानी,

किती क्षुद्र राहिलेली असतात हे पाहून आपलं मन दुःखी होतं. बालमनाला फुलवण्यासाठी मनाचा हळुवारपणा, वात्सल्य आणि खेळकरपणा, विनोदबुद्धी आवश्यक असते. मुलांचं पालन-पोषण म्हणजे त्याचं मन आनंदित करणं. मनाची वाढ झाल्याशिवाय शरीर आणि बुद्धी यांचाही विकास होऊ शकत नाही हे या 'प्रेमळ आईबापांना कोणी सांगायचं ?' चार मुलांचे बाप झालेल्या पोक्त माणसांनाही आपल्या पत्नीचं मन कधी समजून घेता येत नाही. तिच्या अंगावर दोन दागिने घातले आणि दोन-चार साड्या फेकल्या की यशस्वी प्रपंचाचा मार्ग आपल्याला सापडला अशी धन्यता यांना वाटते. अशाच एका पोक्त गृहस्थाला पत्नीचं मन पतीनं समजून घेतलं पाहिजे असं मी सांगितलं तेव्हा त्यांची मनःस्थिती बिघडली. ते क्षुब्ध स्वरात मला म्हणाले,

'हे तुमचं नवं मानसशास्त्र मला शिकवू नका. बायको म्हणजे बायको ! तिला डोक्यावर बसवून घेणं, तिचं मन समजून घेणं, असला बायलेपणा आमच्या घराण्यात नाही. हे चाळे तुम्ही पुरोगामी मंडळींनी करावेत, बायकोनं बस म्हटलं की बसावं आणि उठ म्हटलं की उठावं.'

हे 'पोक्त' विचार ऐकून मी त्यांना मनातल्या मनात बऱ्याच न सांगण्यासारख्या शिव्या दिल्या. हे म्हणे यशस्वी कुटुंबकर्ते ! प्रपंच म्हणजे दोन वेळां चरणं आणि मुलाबाळांना जन्म देणं हे यांचं मौलिक जीवनविषयक तत्त्वज्ञान होतं. शरीराभोवती घुटमळणाऱ्या या पामरांना मनाचे रागरंग कसे कळणार ? परमेश्वर त्यांचं रक्षण करो ! लहान मुलांबरोबर त्यांची बालगाणी गाताना आपल्या मनाभोवती पडलेले प्रौढपणाचे विळखे सैल होतात.

एकदा एका प्राथमिक शाळेच्या वार्षिक समारंभाला प्रमुख पाहुणा म्हणून मी गेलो होतो. शिशु वर्गापासून तिसरी-चौथीपर्यंतची दीडदोनशे मुलंमुली त्या शाळेत होती. आता या मुलांच्या समोर मी भाषण कसले करणार ? छोट्या छोट्या मुलांसमोर एखाद्या गंभीर विषयावर भाषण करणे हा भयानक फौजदारी गुन्हा समजावा. मी त्या मुलांत मिसळलो. त्यांना म्हणालो, 'आपण एक मजेदार गाणं गाऊ या. नंतर थोडं खेळू. मग बक्षीस समारंभ.' मुलामुलींनी टाळ्या पिटीत स्वतःभोवती गिरक्या घेत गाणं म्हणायला सुरुवात केली. आकाशात उडणाऱ्या एका पाखरानं आपल्या तळहातावरचे दाणे टिपून घ्यावेत आणि ते त्यानं खाऊन भुर्रकन उडून जावं हा त्या गाण्याचा भावार्थ होता. पाखरांशी बोलताना या बालकांची

मनं प्रफुल्लित झाली होती. ती गात होती. नाचत होती. बागडत होती. माझंही मन आता त्या बालमनाच्या वातावरणात रमून गेलं. मी देखील जणू एक बालक बनलो. बालमनाचा ताजेपणा आणि निष्पापपणा पाहून माझ्या मनावरचं विवंचनांचं ओझं केव्हा गळून पडलं ते मला कळलंच नाही.

रवींद्रनाथ टागोरांसारख्या एखाद्या कवीची कविता वाचताना जणू त्याचं मनच रसिकांशी मोकळेपणानं बोलू लागतं. उत्तम काव्य हा जागृत व उत्तम मनाचा हुंकार असतो. मन जागं झालं की मग प्रतिभेलाही जाग येते. खळखळून हसणं हा प्रसन्न मनाचा आणि हुंदके देऊन रडणं हा शोकाकुल अंतःकरणाचा आविष्कार असतो. ज्याला स्वतःचं मन कळतं त्याला इतरांचंही मन सहानुभूतीनं समजून घेता आलं पाहिजे. अशी समज असलेली माणसं ज्ञानवंत असतात. भगवान बुद्ध आणि महावीर लोकमन समजून घेणारे धर्मपुरुष होते. त्यामुळं लोकांचं दुःख निरसून टाकण्यासाठी त्यांनी लोकमानसाच्या तारा छेडल्या. आणि त्यातून एक वेगळं संगीत निर्माण केलं. श्रीकृष्ण तर गायीगुरांचं, सामान्य स्त्री-पुरुषांचं मन जाणत होता. त्यानं अर्जुनालाही जाणलं आणि दुर्योधनालाही ओळखलं. हा मनकवडेपणा नेतृत्व करणाऱ्या नेत्याला आवश्यक असतो. लोकमनाची स्पंदनं ज्याला कळत नाहीत तो लोकनेता होऊ शकणार नाही. वृद्ध आईबापांचं मन तरुण मुलांना कळत नाही. रुग्णाचं मन अनेक डॉक्टरांना समजत नाही. ते शरीर तपासतात पण त्याच्या दुखऱ्या मनावर फुंकर घालण्याचा विचारही त्यांच्या चित्तात येत नाही. फी मिळाली की त्यांचं मन संतुष्ट होतं. मन अस्वस्थ असेल, ते चिंतेनं ग्रासलेलं असेल, वेदनेनं ठणकत असेल तर अशा व्यक्तीला एखादं आनंदगीत रुचणार नाही. प्रथम त्याला निश्चिंत केलं पाहिजे.

'मनसि च परितुष्टे कः अर्थवानं कः दरिद्रः' तुष्ट आणि तृप्त मन असेल तर श्रीमंती काय आणि गरिबी काय कशाचीच किंमत वाटत नाही. संपत्तीच्या शय्येवर लोळणारे कित्येक लक्ष्मीचे लाल काळजीमुळे रात्र रात्र झोपू शकत नाहीत. शेवटी "A sound mind in a sound body" हे वचन अर्थपूर्ण वाटतं.

मनाविषयी किती सांगावं ? जगातल्या साऱ्या साहित्यकृती मानवी मनाचेच विविध व्यापार चित्रित करतात. मनात स्वर्गही नांदतो आणि मनात नरकही निर्माण होतो. मन स्वैर सोडलं की ते भरकटत जातं. आणि बांधून टाकलं तर अधिकच भरकटतं. म्हणून मनरूपी घोड्याचा लगाम जाणीवपूर्वक आपल्या हातात ठेवला

पाहिजे. मन बधीर होणं हा मात्र जगातला एक भयानक दुर्धर रोग आहे. एका कवीनं 'माझ्या मना बन दगड !' असं म्हटलं आहे. पण मन निर्जीव होणं, दगडाप्रमाणं संवेदनाहीन होणं ही भयंकर आपत्ती आहे. आपल्या मनोदेवतेला प्रार्थना करताना म्हणावं, 'माझ्या मना जिवंत हो. जागृत हो. फुलांचा गंध आणि मुलांचा खोडकरपणा टिपून घेण्याचा छंद तुला लागू दे. अन्यायानं तू पेटून उठावंस. अशावेळी तुझ्या हातांना अन्यायाचा कोथळा बाहेर काढणारी वाघनखं फुटावीत. दुःखितांच्या डोळ्यांतले अश्रू टिपण्याची वत्सलता तुझ्यात यावी. माझ्या मना तूच सर्वार्थानं जिवंत असावंस. यापेक्षा अधिक काय बोलायचं ?

मानसशास्त्र परिषदेतलं माझं भाषण त्या पंडितांना कसं वाटलं कुणास ठाऊक ? पंडितांचं मन कुणाला कळलं आहे ?

■■■

# आती क्या खंडाला ?

गेल्या आठवड्यात एका महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या बक्षीस समारंभाला प्रमुख पाहुणा या नात्याने गेलो होतो. भव्य मंडप उभारलेला होता. हजार दीड हजार विद्यार्थी उपस्थित होते. प्राचार्यांनी अहवालवाचन सुरू केले. त्याबरोबर कुणीतरी फटाकड्यांची माळ पेटवून ती व्यासपीठाच्या दिशेने फेकली. तिकडे दुर्लक्ष करून आपले अहवालवाचन प्राचार्यांनी सुरूच ठेवले. फटाक्यांचे स्फोट, विद्यार्थ्यांचा आरडाओरडा, प्राचार्यांच्या विरुद्ध घोषणा आणि अहवालवाचन ही कामे एकाच वेळी चाललेली होती.

माझ्या शेजारी बसलेल्या उपप्राचार्यांकडे मी प्रश्नार्थक दृष्टीने पाहिले. ते महाशय म्हणाले, 'मुलं एन्जॉय करताहेत, चालायचंच ? असल्या गोष्टींची आम्हाला सवय झाली आहे.' इतके म्हणून उपप्राचार्य जणू काहीच घडले नाही अशा आविर्भावाने बसून राहिले. प्राचार्यांचे वाचन संथगतीने चालू होते. या स्वैर बनलेल्या विद्यार्थी समूहासमोर आपल्याला भाषण करायचे आहे या कल्पनेने माझ्या अंगावर काटा आला. प्राध्यापक वर्ग तटस्थपणे हे विलोभनीय दृश्य पहात होता. विद्यार्थ्यांच्या बेशिस्त, असंस्कृत वर्तनाला कुणीही आक्षेप घेतला नाही. मधून मधून ते 'सभ्य' विद्यार्थी मंडपात येणाऱ्या जाणाऱ्या विद्यार्थिनींची आपापल्या मगदुराप्रमाणे टिंगल-टवाळी करीत होते. त्यालाही कुणी हरकत घेत नव्हते. एका महाविद्यालयातले हे 'सुसंस्कृत' आणि 'अभिरुचीपूर्ण शैक्षणिक वातावरण' पाहून मी चकित झालो.

अहवालवाचनानंतर प्राचार्य महोदय खाली बसले. कपाळावरचा घाम त्यांनी टिपला. प्यालाभर पाणी पिऊन ते मला म्हणाले, 'सॉरी सर ! गॅदरिंगचा मूड असल्यामुळं स्टुडंटस् एन्जॉय करीत आहेत. आपण त्यांना तेवढं फ्रीडम् दिलं पाहिजे. आफ्टर ऑल् दे आर यंग पीपल्.'

मी काहीच बोललो नाही. प्राचार्यांचे विचार ऐकून मला आश्चर्य वाटले. 'यंग पीपल्' या पद्धतीने एन्जॉय करीत आहेत आणि प्राचार्य त्यांचे समर्थन करीत आहेत हे मला धक्कादायक वाटले. पुढे बक्षीस समारंभ सुरू झाला. एखादी

विद्यार्थिनी बक्षीस घेण्यासाठी व्यासपीठाकडे येऊ लागली की, तिची अशिष्ट शब्दांनी संभावना करायची, एखाद्या नटीचे नाव घेऊन तिला हाक मारायची असे विकृत चाळे चाललेले होते. पण प्राचार्यांच्या दृष्टीने ही केवळ एन्जॉयमेंट होती. विद्यार्थ्यांची रसिकता अनेक पातळीवरून प्रकट होत होती. मला मात्र शरमेने मान खाली घालावी असे वाटत होते. बक्षीस समारंभाचा 'प्रेक्षणीय' सोहळा पार पडल्यानंतर मी बोलायला उभा राहिलो. विद्यार्थ्यांच्या अतिरेकी आणि उन्मादी वर्तनामुळे त्यांच्यासमोर आपण काहीही बोलू नये असे मला तीव्रतेने वाटत होते. पण काहीतरी बोलणे अपरिहार्य होते. मी भाषणाला सुरुवात केली.

'मित्रहो, (ओ ऽ ऽ काय म्हणता ?) मी तुमच्याशी संवाद करायला आलो आहे. वस्तुतः आपल्या पवित्र आनंदात व्यत्यय आणण्याची माझी इच्छा नाही. आपण एका नामांकित कॉलजचे रसिक आणि सुसंस्कृत विद्यार्थी आहात हे आत्तापर्यंत आपण केलेल्या वर्तनावरून मला कळलेलं आहे. आपल्या भगिनी पारितोषिके स्वीकारायला व्यासपीठाकडे येत असता ज्यांनी त्यांना खडे मारले, त्यांना सिनेनट्यांच्या नावांनी संबोधले, ज्यांनी निरनिराळ्या प्राण्यांचा आवाज काढून आपला यथायोग्य परिचय करून दिला त्या सर्वांचं जाहीर अभिनंदन करण्यासाठी मी उभा आहे. (सभेत शांतता पसरली.) आपल्या बहिणींची चावटपणानं हेटाळणी करण्यात ज्यांना पराक्रम वाटला त्या मर्द विद्यार्थ्यांनी उठून उभं राहावं. त्यांचं पवित्र दर्शन घेण्याची माझी इच्छा आहे. आपल्या सहाध्यायिनी भगिनींची कुचेष्टा करून आपण फार मोठा विनोद केला असं तुम्हाला वाटत असेल तर मी आपल्याला सांगतो की आपण संस्कृतीचं आणि सभ्यतेचं वस्त्रहरण करीत आहात. महाविद्यालयातल्या विद्यार्थ्यांची ही प्रगती मला कौतुकास्पद वाटते. अशीच आपली वाटचाल होत राहिली तर दुःशासनाच्या मालिकेत आपल्याला मानाचं स्थान मिळू शकेल. आपण विद्यार्थिनींवर कागदी बाण मारून 'आती क्या खंडाला?' अशी प्रेमळ विचारणा करीत होता. कुठल्यातरी सिनेगीताच्या उडाणटप्पू ओळीचं आपण केलेलं पाठांतर आपल्या विद्वत्तेवर प्रकाश पाडून गेलं. मित्रहो, आपली मर्दुमकी मी मघापासून पाहात होतो. आपल्या प्राचार्यांच्या दृष्टिकोनातून ती 'एन्जॉयमेंट' होती. हे ऐकल्यावर तर आपल्या उज्ज्वल भवितव्याबद्दल मला शंका उरली नाही. फुले, सावरकर, आंबेडकर हे समाजसुधारणेच्या विचारांनी भारलेले वेडे लोक होते. तुमच्यासारखं शहाणपण त्यांच्यात नव्हतं. तुम्ही करीत असलेलं कार्य कितीतरी मोलाचं असून ते नवा इतिहास घडवणारं ठरणार आहे.

एक वेडा सुभाषचंद्र बोस म्हणाला, 'चलो दिल्ली.' तुम्ही एकमेकांना विचारित आहात 'आती क्या खंडाला ?' सुभाषचंद्र देशाची चिंता करीत होते. त्यांना दुसरा उद्योगच नव्हता. म्हणे, 'कदम कदम बढाये जा' 'तुम मुझे खून दो, मै तुम्हे आजादी दूँगा' करायची काय ती आजादी ? 'चोली के पीछे क्या है ?' या चिंतेनं तुम्ही रात्रंदिवस चिंतित आहात. आणि हा कोणी देशभक्त 'स्वातंत्र्यासाठी रक्त द्या, असं सांगत आहे. आम्हाला फक्त ओरडण्याचं, खिदळण्याचं, प्राचार्य आणि प्राध्यापक यांची असभ्य चेष्टा करण्याचं, पोरींची छेडछाड करण्याचं आणि बीअरच्या बाटल्या ढोसण्याचं स्वातंत्र्य पाहिजे. रक्त कसलं सांडता ? बिअर सांडा. एका दमात एक बाटली रिचवण्याचा स्टॅमिना मिळवा. देशासाठी रक्त सांडण्यात अर्थ नाही. आपल्या पराक्रमाचं आणि मर्दपणाचं प्रतीक म्हणजे बीअरची बाटली हेच आहे. काही मूर्ख लोक लिहिण्या-वाचण्यात, संशोधन करण्यात, एखाद्या विषयाचा खोल अभ्यास करण्यात आयुष्य उधळून टाकतात. असले ढिसाळ आदर्श समोर ठेवू नका. भरपूर खा. त्यापेक्षाही भरपूर प्या. गुटखा आणि गर्द यांची लज्जत चाखा. शुद्धीवर राहण्यापेक्षा बेशुद्धीचा आनंद काही और असतो. म्हाताऱ्या आई-बापांना सांगा, 'तुम्ही आता जुने झालात. खांद्यावर पताका घेऊन 'ग्यानबा तुकाराम' म्हणत पंढरीच्या वारीला काय जात होता ! असला अविचार आम्ही करणार नाही. आम्ही नवयुगाचे घटक आहोत. एखाद्या पॉश क्लबमध्ये जाऊन रमी खेळण्यात आणि सिगरेटचा धूर सोडण्यात जो 'मॉडर्नपणा' आहे, त्याचे आम्ही भोक्ते आहोत. तुमची पंढरीची वारी असेल पण आमची ही दररोजची वारी चुकणार नाही.

मित्रहो, मी तुमचेच विचार बोलून दाखवीत आहे. थोड्या वेळापूर्वी प्राचार्यांचा एकही शब्द ऐकून न घेता तुम्ही त्यांच्या अपमान केलात. पण हे चांगलं झालं. पुन्हा एकदा तुमचं अभिनंदन करतो. 'मातृदेवो भव !' 'पितृदेवो भव !' 'आचार्यदेवो भव !' ही सगळी वचनं म्हणजे भंकस आहे की नाही ? जन्म दिला म्हणून आईबापांना काय जन्मभर वंदन करायचं ? अरे त्यांनी त्यांचं कर्तव्य केलं. उगीचंच आई आणि बाप हा भोळसट श्रद्धेचा विषय करून ठेवला आहे ! तसंच गुरूलाही ब्रह्मा आणि विष्णू म्हटलं आहे ! आपल्याला ही जुनाट झालेली मूल्ये फेकून द्यायची आहेत ! आपल्याला स्वातंत्र्य पाहिजे आहे ते दिसेल त्या पोरीला 'आती क्या खंडाला ?' हे विचारण्याचं. स्त्री हा खरे तर मनोरंजनाचा विषय आहे. हे लक्षात घेऊन आपण या संमेलनात मनसोक्त रंजन करून घेतलंत याचं मला

समाधान वाटलं. स्त्री म्हणे देवता असते ! ती म्हणे अनंतकाळाची माता असते ! गडकरी नावाचा एक वेडा नाटककार तर, 'स्त्री ही परमेश्वराची मूर्ती आहे' असं सांगून गेला. तांबे नावाचा एका कवी लिहून गेला की, 'भयचकित नमावे तुज रमणी' उगीच या कवींनी आणि नाटककरांनी हे भ्रमिष्टपणानं लिहून ठेवलं आहे. त्याचा विचार करू नका. स्त्री हे रंजनाचं एक साधन हेच तुम्ही चित्रपटांतून, टीं. व्ही. वरून आणि बारमधून शिकत आलात तेच बरोबर आहे. समाजात सर्वत्र हेच दृश्य दिसत असताना वास्तव नाकारून उगीच भंपक आदर्शाच्या मागे धावण्यात काय अर्थ आहे ?

आपले आदर्श रावण, दुःशासन वगैरे महापुरुष ठरलेले आहेत. एकटी दुकटी मुलगी गाठून तिला छेडणं ही प्राथमिक गोष्ट झाली. आता आणखी प्रगतीच्या पायऱ्या ओलांडल्या पाहिजेत. नाहीतर कॉलेजात येऊन आपण काय मिळवलं ? इथं चांगली तयारी केली तर भविष्यकाळाची काही तरतूद होईल हे अनुभव तुम्हाला विधिमंडळ आणि लोकसभेत काम करताना उपयोगी पडतील. यासाठी ब्ल्यू फिल्मस् पाहाण्याचा व्यासंग भक्तिभावानं वाढवावा. तुमच्या कॉलेजच्या ग्रंथालयात हजारो ग्रंथ आहेत असं आताच वाचल्या गेलेल्या अहवालावरून मला समजलं. पण आपण तरुण मंडळी ग्रंथालयाकडं साधा दृष्टीक्षेपही करीत नाही याचं कौतुक वाटलं. वाचन लेखनाच्या मोहात पडू नका. पुस्तक वाचण्यात कसलं शौर्य आहे ? आपण परीक्षेत सहीसलामत पास होता ते काय पुस्तकांचा अभ्यास करून ? अभ्यास करून कुणीही पास होऊ शकेल. त्यात साहस नाही. बुद्धीचं कौशल्य नाही. सामूहिक कॉपी करायला संघटनेची शक्ती उभी करावी लागते. तो सुपरवायझर कॉपी करू देत नसेल तर त्याचं दुष्ट कारस्थान संघटितपणानं हाणून पाडलं पाहिजे. कॉलेजच्या या सुंदर वातावरणात रुक्ष अभ्यास करण्यात वेळ घालवण्याइतके आपण अरसिक नाही. आपल्याला तर ही तटस्थपणानं बसलेली प्राध्यापक मंडळी मनातून फार घाबरतात. ही खरोखरच अभिमानास्पद घटना आहे. या समारंभाच्या सुरुवातीला दोन विद्यार्थीनींनी सरस्वतीची प्रार्थना म्हटली. पण शाळा कॉलेजात सरस्वती-स्तवन कशासाठी करायचं ? कोणे एके काळी ते ठीक होतं. आता सरस्वतीचा आणि विद्यालयाचा काय संबंध उरला आहे ? खरं तर 'आती क्या खंडाला ?' हे सांस्कृतिक महत्त्वाचं गीत इथं सादर झालं असतं तर मला आनंद वाटला असता. आमच्या तरुण पिढीच्या ओठावर हेच 'राष्ट्रगीत' असावं असं म्हटलं तर ते चुकेल काय ? ते 'जनगणमन...' विसरून जा. खरं

सांगायचं तर विसरलोच आहोत. एकदा एका कॉलेज युवकाला राष्ट्रगीतातल्या एका ओळीचा अर्थ विचारण्याची मी चूक केली होती. माणिकचंद गुटखा चघळीत तो बहादूर युवक मला म्हणाला

'अंकल, हे नॅशनल साँग मी कधी लक्षपूर्वक ऐकलं नाही. त्याचा पोएट कोण हेही मला माहीत नाहीत. हे साँग सुरू झालं म्हणजे सर्वांबरोबर मीही उठून उभा राहातो ट्रॅडिशन म्हणून ! हां तुम्ही मला एखाद्या फिल्मी साँगबद्दल विचारा. मी तुम्हाला त्याबद्दल इन्फर्मेशन देऊ शकेन.

त्या तरुणाची मराठी भाषा बरीच 'अिम्प्रूव्ह' झाली होती. ज्ञानेश्वर तुकारामाच्या भाषेला त्यानं पॉलीश करून तिला जो इंग्रजी ढंग दिला होता त्यावरून त्याचं मातृभाषेवर किती फॅन्टॅस्टिक प्रेम आहे हे माझ्या लक्षात आलं. 'मित्रहो, मी आपला फार वेळ घेतला. पण आपल्यासारख्या यंग जनरेशनमधील मित्रांशी थोडा वेळ संवाद करू शकलो याबद्दल आनंद वाटला. मी आपली रजा घेतो.'

माझं ते भाषण विद्यार्थ्यांनी खाली मान घालून शांतपणानं ऐकून घेतलं. बेशिस्त विद्यार्थ्यांच्या या मेळाव्यासमोर काय आणि कसं बोलावं हा प्रश्न पडला होता. उपरोध , उपहास, विडंबन, कोपरखळ्या आणि अनेक चिमटे यांनी भरलेलं हे भाषण विद्यार्थ्यांना अस्वस्थ करून गेलं हे मी पाहिलं, मी स्वतः अस्वस्थ झालो होतो. त्यांना दंश करीत मधून मधून फुंकर घालीत एका वैचारिक अस्वस्थतेकडं घेऊन जायचं हे ठरवूनच काहीशा स्वतंत्र मनस्थितीत ते भाषण मी केलं.

एक विद्यार्थी व्यासपीठावर आला आणि माइकसमोर उभं राहून मला उद्देशून म्हणाला, 'सर, आम्हाला क्षमा करा. आम्ही चुकत होतो, आमच्याकडून या भगिनी वर्गाचाही अपमान झाला. आमच्या वागण्या बोलण्यावर तुम्ही सारखे प्रहार केले. आमच्या चुका आमच्या पदरात घातल्या. आम्ही यापुढं संयमानं वागू. भारताचे सुपुत्र होता आलं नाही तरी आम्ही त्याचे कुपुत्र होणार नाही, एवढं आश्वासन देतो. असभ्य गोंधळ करणाऱ्या विद्यार्थ्यांत मीही एक होतो. त्यांच्या वतीनं आपली माफी मागतो.' टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. त्या विद्यार्थ्याच्या खांद्यावर मी आनंदानं थोपटून त्याला म्हणालो, 'आनंदानं जगा पण त्या आनंदाला विवेकाचं अधिष्ठान द्या. म्हणजे तुम्हालाही 'विवेकानंद' होता येईल. 'आती क्या खंडाला ?' असं म्हणायला माझा विरोध नाही पण हे खऱ्या प्रेमानं आणि शुद्ध रसिकतेनं म्हणा. हे कुणाला, केव्हा व कसं म्हणायचं याचं उचित भान ठेवून म्हणा'.

■■■

# नाटक

शाळा-कॉलेजात विद्यार्थी असताना मी काही नाटकांतून विनोदी भूमिका केल्या आणि उत्तम अभिनयाबद्दल बक्षीसे मिळवली. हे ऐकून तुम्हाला आश्चर्य वाटेल पण ही एक शंभर टक्के सत्यकथा आहे. हायस्कूलमध्ये असतानाच मी दोन नाटकेही लिहिली होती. (मराठी रंगभूमीच्या सुदैवाने या दोन्ही नाटकांच्या प्रती कुठे तरी हरवल्या. आणि रंगभूमीवरील एक गंडांतर टळले !) ही नाटके आम्ही काही मित्रांनी शालेय रंगभूमीवर आणली होती. माझे मित्र मला 'नाटककार' म्हणू लागले. एक-दोन शिक्षकांनीही माझ्या नाटकांची प्रशंसा केली होती. त्या काळात मी गडकरी आणि अत्रे यांच्या मांडीला मांडी लावून बसलो आहे अशी स्वप्ने पडत असत. (स्वप्ने कधी खरी होतात का ? पण निदान इतर काही होण्यापेक्षा आपण नाटककार व्हावे ही इच्छा मात्र मी करीत होतो.) मराठीतली बहुतेक प्रसिद्ध नाटके मी वाचून काढली. गडकऱ्यांच्या 'राजसंन्यास' या नाटकातली पानेच्या पाने त्या काळात मला तोंडपाठ होती. कॉलेजच्या पहिल्या दुसऱ्या वर्षात गडकरी आणि अत्रे हे माझे आदर्श लेखक होते. इतके की कुणीतरी अत्र्यांच्या नाटकांवर टीका केली की मी जणू माझ्यावरच हल्ला झाला आहे अशा अभिनिवेशाने त्याची टीका खोडून काढीत असे. खांडेकर आणि फडके हे देखील माझे आवडते आदर्श लेखक होते. पण गडकऱ्यांच्या काव्यमय भाषेने मात्र मला वेड लावले होते. इतर कुठल्या वेडापेक्षा भाषेचे वेड बरे असते असे म्हणायला हरकत नाही. नाहीतर कॉलेजातल्या विद्यार्थ्यांना कोणकोणते वेड लागते हे शहाण्या लोकांना माहीत आहे.

नाटकांचे वेड मला जन्मभर पुरले. गडकरी, खाडिलकर वरेरकर, अत्रे, आणि शिरवाडकर यांच्या नाट्यप्रतिभेने तमाम मराठी रसिकांप्रमाणे मी देखील स्तिमित झालो आहे. काय असेल ते असो, एखादे तरी नाटक लिहिल्याशिवाय लेखक म्हणून परिपूर्णता आली असे मी मानीत नाही. नाट्यलेखनाच्या मोहात भले-भले लेखक फसले आहेत. नाटककार म्हणून खांडेकरांची अवस्था काय

झाली हे आपल्याला माहीत आहेच. फडक्यांचेही हात या बाबतीत होरपळले होते. फार काय श्री. म. माटे यांनी देखील एक नाटक लिहिले होते. ते कधीच रंगभूमीपर्यंत येऊ शकले नाही. आज मी विचार करतो की नाटकांचे एवढे वेड लेखक-कवींना का असावे ? याचे कारण नाटककार म्हणवून घेण्यात एक आगळी नशा आहे. आपण लिहिलेले नाटक रंगभूमीवर जिवंत होत आहे आणि प्रेक्षक त्या नाट्यानुभवाने प्रसन्न होत आहेत; हशा आणि टाळ्यांची बरसात होत आहे हे पाहून लेखकाचा अहंकार कुरवाळला जातो. कथा-कादंबरीचेही कोड-कौतुक होते. पण एकाच वेळी शेकडो प्रेक्षक आपल्या नाट्यशक्तीने प्रभावित झाले आहेत हे पाहाण्याची सुवर्णसंधी केवळ नाटककारालाच मिळते.

नाट्याचार्य खाडिलकर आपले नाट्यप्रयोग बारकाईने पाहत असत. रांगेत शेवटच्या खुर्चीवर बसून आणि तोंडात पानाचा विडा ठेवून निर्विकारपणे ते प्रयोग पाहात असत. त्यांच्या मुद्रेवर उत्सुकता, आनंद, दुःख, संताप असा कोणताही भाव प्रकट होत नसे. एकदा शेजारी बसलेल्या प्रेक्षकाला या घटनेचे आश्चर्य वाटून त्याने खाडिलकरांना विचारले, 'अहो, तुम्हाला नाटकातलं काही कळतं का ? आम्ही हसतो, टाळ्या वाजवतो. तुम्ही अगदी मक्खपणे बसून आहात. नाटकाचा आपल्याला आस्वाद घेता येत नसेल तर कशाला पैसे खर्च करून येता ?' खाडिलकर म्हणाले, 'तुम्हाला नाटक कितपत कळतं हे पाहायला मी येतो. माझं नाव कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर.' प्रश्नकर्ता ओशाळला. एक श्रेष्ठ नाटककार आपल्या शेजारी आहे आणि आपण त्याला ओळखू शकलो नाही याबद्दल त्याने क्षमा मागितली.

पण कित्येक नाटककार प्रेक्षकात बसून आपले नाटक पाहाण्याचा धीर करीत नाहीत. एकदा एक नाटककार प्रेक्षकात बसून त्यांच्या प्रतिक्रिया आजमावीत होता. नाटक भिकार होते. पहिला अंक संपूर्णपणे कोसळला. लेखकाच्या नावे सोलापुरी शिव्यांची काही प्रेक्षकांनी आतषबाजी सुरू केली. तो महान नाटककार कसाबसा थिएटरातून बाहेर पडला. त्याला कोणीही ओळखीत नव्हते. तो जो नाटकगृहातून पळाला तो आत्तापर्यंत पुन्हा तिकडे फिरकला नाही. ही देखील एक 'सत्यकथा' आहे.

दयानंद कॉलेजात बी. ए. च्या वर्गात विद्यार्थी असताना मी आचार्य अत्र्यांच्या 'साष्टांग नमस्कार' या नाटकात स्नेहसंमेलनाच्या वेळी कवी भद्रायूची

भूमिका केली होती. माझे भद्रायूचे सोंग प्रेक्षकांना आवडले. पुढे कित्येक दिवस कॉलेजातले विद्यार्थी-विद्यार्थिनी 'कविराज' म्हणून माझा उल्लेख करीत असत. एकही कविता न लिहिता एका नाटकाने मला कवी 'बनवले.' हा अत्र्यांच्या प्रतिभेचा चमत्कार म्हणावा लागेल. नाटक लिहिणे आणि नाटकांत भूमिका करणे ह्या खरोखरच अविस्मरणीय गोष्टी आहेत. एका नाटकात भूमिका करताना मी तोंडात सिगरेट धरून ती पेटवली होती. कुठल्या तरी नटाचे ते अनुकरण असावे. मला कल्पना नव्हती. पण प्रेक्षकांत माझे वडील मुलाचे कौतुक पाहाण्यासाठी बसले होते. मी घरी आल्यावर त्या सिगरेटचा मला चांगलाच चटका बसला. सिगरेटच्या धुराने डोळ्यांतून पाणी येते म्हणतात. पण त्यादिवशी वडिलांचे शब्द ऐकून माझ्या डोळ्यांतून पाणी आले. हा मात्र अभिनय नव्हता.

'आता शिक्षण सोडून तुम्ही एखाद्या नाटककंपनीत जायला हरकत नाही. नाटकीपणाचे चाळे थांबवा. आणि तुम्हाला परीक्षेला नेमलेल्या 'मृच्छकटिकम्' या नाटकाचा, नीट अभ्यास करा. नाटकं करण्यापेक्षा नाटकं वाचलेली चांगली.' वडिलांचा राग इतक्याच मर्यादित शब्दांतून व्यक्त झाला. हे माझे भाग्य ! माझ्या एका मित्राने नाटकात स्त्रीभूमिका केली म्हणून त्याच्या वडिलांनी त्याच्या दोन्ही गालांवर जे रंगकाम करून ठेवले होते ते मला अजून आठवते. 'अरे, पुरुषासारखा पुरुष असून लुगडं नेसून स्टेजवर नाचतोस ! आपल्या सात पिढ्यांत जे घडलं नव्हतं ते तू करून दाखवलंस ' आणि असे म्हणून त्यांनी एक वीररसात्मक नाटक घरात करून दाखवले. माझ्या संगतीने आपला मुलगा बिघडला असा निष्कर्ष काढून त्यांनी मलाही नाट्यपूर्ण भाषेत दोन-चार शिव्या हासडल्या. दुसऱ्या दिवशी मित्राची समजूत घालताना मी म्हणालो,

'अरे, कलेच्या प्रेमासाठी कलावंताला छळ सहन करावा लागतो. आज छळणारे लोक उद्या तुझा नटसम्राट म्हणून गौरव करतील. काट्याकुट्यांतून गेल्याशिवाय कीर्तीच्या फुलांचे हार मिळत नाहीत.' माझ्या ह्या नाटकी भाषेने त्याचे कितपत समाधान झाले कुणास ठाऊक ? पण पुन्हा त्याने नाटकात काम केले नाही.

नाटक पाहाण्याचे मला अजूनही आकर्षण वाटते. नाटकांतल्या पात्रांची सुखदुःखे मला खरी वाटतात. 'नाटक म्हणजे जे खरे नाही ते' अशी नाटकाची व्याख्या केली जाते. पण व्यापक अर्थाने विचार केला तर या जीवनातले रसरंग

घेऊनच नाटक रंगभूमीवर उभे राहाते. 'राजसंन्यासा'तला पश्चात्तापाने पोळून निघालेला संभाजी मला कधीच खोटा वाटत नाही. शत्रूने त्याला कपटाने पकडून त्याचा असह्य छळ करीत त्याला ठार मारले तेव्हा त्या वीराच्या मनात जे भावविचार उचंबळून येत असतील ते गडकऱ्यांनी किती समर्थपणे त्याच्या संभाषणातून साकार केले आहेत. मृत्यूच्या काळ्याकुट्ट छायेत संभाजी राजांच्या डोळ्यांसमोर गतायुष्य उभे राहिले असेल. आपले तीर्थरूप छत्रपती शिवाजी आणि आपण अशी तुलना त्यांनी मनातल्या मनात केली असेल. 'राजसंन्यास' हे गडकऱ्यांचे नाटक अपुरेच राहिले. पण संभाजीची त्यात साकारलेली प्रतिमा नाट्यात्मक परिणामाच्या दृष्टीने मला परिपूर्ण वाटते. हे नाटक गडकऱ्यांनी शिवछत्रपतींच्या चितेवर उडी घेणाऱ्या आणि प्राणार्पण करणाऱ्या त्यांच्या इमानी कुत्र्याला अर्पण केले आहे. माणसाचे इमान आणि कुत्र्याचे इमान यातला फरक आपल्याला माहीत असतो. नाटक मला लुटुपुटीचे वाटत नाही. वास्तव जीवनाचाच तो आविष्कार असतो.

गडकऱ्यांच्या 'पुण्यप्रभाव' नाटकाचा प्रयोग एका गावात झाला त्यावेळची गोष्ट. खलनायक नायिकेचा छळ करीत आहे हे दृश्य दुष्टाची भूमिका करणाऱ्या नटाने फार परिणामकारकपणे वठवले. आपल्या डोळ्यांदेखत एका निष्पाप स्त्रीचा छळ होत आहे हे एका प्रेक्षकाला सहन झाले नाही. तो आपल्या खुर्चीवरून ओरडला, 'नीच माणसा, थांब तुझ्या नरडीचा घोटच घेतो. मघापासून पाहातो आहे त्या पतिव्रतेला सारखा छळत आहेस. तुला जन्माची अद्दल घडवतो' आणि एवढे म्हणूनच तो थांबला नाहीतर हातवारे करीत, शिव्या देत तो सरळ रंगभूमीवर आला. त्याचा तो अवतार पाहून नाटकातला खलनायक मागच्या मागे पळून गेला. ती पतिव्रता मात्र या नवीन आलेल्या नायकावर ओरडून म्हणाली,

'अहो, हे सगळं नाटक चाललंय हे तुम्हाला कळत नाही का ? तो माझा कसला छळ करणार आहे ? मी स्त्रीपार्ट करणारा पुरुषच आहे.' या नाट्यमय प्रकाराला प्रेक्षक खळखळून हसले. नाटक हे केवळ नाटक असते याचे वैचारिक भान सुटले म्हणजे असा अनवस्था प्रसंग उद्‌भवतो. दारूबाजाची भूमिका करताना ती दारूच्या थेंबालाही स्पर्श न करता वठवता आली पाहिजे. खरोखरच यथेच्छ मद्यपान करून रंगभूमीवर आलेल्या नटाला ती नीट साकार करता येणार नाही. येथे वास्तवतेचा आग्रह धरण्याचे कारण नाही. वास्तवाची जाणीव करून देणे हे नाटकाचे कार्य असते. खून, मारामाऱ्या, शृंगारदृश्ये जर शंभर टक्के 'वास्तव' पद्धतीने

रंगभूमीवर आली तर अनर्थ होईल हे पुष्कळांच्या लक्षात येत नाही. एकदा कोण्या एका नटाने शृंगारदृश्य वास्तव करण्याचा अतिरेकी प्रयत्न केला. परिणाम इतकाच झाला की, नायिकेची पाच बोटे नायकाच्या गालावर उमटली. शृंगार संपून वीर आणि करुण आणि नंतर हास्य या रसांचा साक्षात्कार प्रेक्षकांना झाला.

हा गमतीदार प्रसंग मी प्रत्यक्ष पाहिला आहे. नाटक फारसे चांगले नव्हते. पण त्या दिवशीचा प्रयोग शृंगारदृश्यात वास्तवतेचे रंग भरण्याच्या प्रयत्नांमुळे रंगला. अखेर पडदा टाकावा लागला. आणि प्रेक्षकांच्या तिकीटांचे पैसे परत करावे लागले. नाटक वाचणे आणि पाहणे यात कितीतरी अंतर असते. फार पूर्वी शालेय वयातच मी 'विकारविलसित' हे नाटक वाचले होते. योगायोगाने त्याचा प्रयोगही पाहाण्याची संधी मिळाली. त्यातली नानासाहेब फाटक यांची चंद्रसेनाची भूमिका पाहाताना मी त्या नाटकाचा एक घटकच बनलो होतो. नानासाहेब फाटकांचा तो प्रत्ययकारी जिवंत अभिनय मला विसरणे शक्य नाही. हॅम्लेटचे आगरकरांनी केलेले हे भाषांतरित नाटक आहे. भाषांतरात लेखकाला फारसा रंग भरता आला नाही. पण फाटकांनी मात्र आपल्या एकट्याच्या अभिनयसामर्थ्यावर ते नाटक पेलून धरले होते. त्यांच्या संवादाची फेक विलक्षण होती. वेगवेगळ्या भावनांचा सूक्ष्म खेळ त्यांच्या मुद्रेवर सहजपणे प्रकट व्हायचा. शाळकरी वयात पाहिलेले हे नाटक आजही लक्षात राहावे याचा अर्थ नाटक हे मुख्यतः दर्शन व श्रवण यासाठी असते. वाचताना ते कित्येक वेळां फिकट वाटते.

आज मागे वळून पाहाताना मी पाहिलेली असंख्य नाटके आठवतात. कितीतरी श्रेष्ठ नटांचा रंगाविष्कार रंगभूमीवर पाहून मी कृतार्थ झालो आहे. बालगंधर्व मला फारसे भावले नाहीत. कारण ते साठीच्या घरात आल्यानंतर मी काही वेळां त्यांना रंगभूमीवर पाहिले. त्यांच्या कंठातील स्वरमाधुरी कायम होती. पण त्यांच्या व्यक्तिमत्वातले मोहकपण काळाने बरचसे पुसून टाकले होते. भामिनी आणि रुक्मिणी यांचे सुंदर दर्शन याच कलावंताने एकेकाळी घडवले होते यावर विश्वास बसत नव्हता. बालगंधर्वांच्या जीवनाचेही नियतीने पुढे करुण रसात्मक नाटकात रूपांतर केले. प्रचंड लोकप्रियतेच्या हिंदोळ्यावर बसून झोके घेणाऱ्या आणि लक्षावधी रसिकांच्या पदरात वर्षानुवर्षे आनंदाचे, उत्साहाचे सुगंधी क्षण टाकणाऱ्या या असामान्य गायक नटाच्या आयुष्याचे पुढे जे करुण आणि दारुण नाटक झाले ते न पाहाण्यासारखे होते. हजारो रुपयांची अत्तरे ज्याने आपल्या षोकापायी रंगभूमीवर

उधळली त्याला म्हातारपणी पुण्याहून मुंबईला रेडिओ केंद्रावर गायला जाण्यासाठी तिकिटापुरते पैसे मिळू नयेत या परमेश्वरी नाटकाचा मला अजून बोध होत नाही. बालगंधर्वांच्या जीवनात प्रारब्धाने जितके चमत्कारनाट्य निर्माण केले तितके कोणत्याही नाटकात पाहायला मिळणे कठीण आहे. पण बालगंधर्व हे मराठी रंगभूमीच्या आकाशात उगवलेले विलक्षण मोहक इंद्रधनुष्य होते. कदाचित परमेश्वराला सुद्धा पुन्हा बालगंधर्व घडवता येणार नाही.

नाटकांसंबंधी विचार करता करता मी नियती माणसाच्या जीवनात जे नाटक निर्माण करते त्या विषयापर्यंत येऊन पोहोचलो आहे. तुमचे आमचे आयुष्य सुद्धा एक विविध रसात्मक नाटकच नव्हे काय ? तो सूत्रधार कोणत्या भूमिकेचा मेकअप् करवून आपल्याला जगाच्या रंगभूमीवर ढकलून देईल हे काही सांगता येत नाही. लेखकांनी लिहिलेली नाटके तीन तासात संपतात. त्यात सुसंगती असते. त्याला विशिष्ट तंत्र असते. पण माणसाच्या आयुष्याच्या नाटकात मात्र कोणतेही प्रसंग कसेही घडतात. सुसंगतीचे तर नावही नसते. परिस्थितीच्या कशाही लाटा उचंबळतात. राजा होण्याची ज्याची योग्यता असते तो या नाटकात हुजऱ्या बनतो. आणि हुजऱ्याचीही लायकी नसलेला सिंहासनावर चढून बसतो. ज्ञानवंत भणंगासारखा भटकत राहातो. त्याच्या फाटक्या झोळीत फारसे काही पडत नाही. मूर्खांना मात्र लक्ष्मी वरमाला घालते.

जीवनाचे नाटक इतके विचित्र, विलक्षण आणि विसंगत असते की त्या नाटकावर कोणताही समीक्षक समीक्षा करू शकत नाही. कारण परमेश्वर नावाच्या लहरी नाटककाराने नाट्यशास्त्राचे सारे नियम धुडकावून ते वाटेल तसे लिहिलेले असते. एखाद्या म्हाताऱ्याला म्हातारपणाच्या यातना देत देत हा नाटककार त्याला तसाच जिवंत ठेवतो. तो मरण मागत असतानाही त्याला तळमळत ठेवतो आणि एखाद्या उमलत्या तरुणाच्या किंवा तरुणीच्या जीवनाची कळी अचानकपणे खुडून टाकण्याचा निर्दयपणा करतो. याला काय म्हणावे ? एखाद्याचे नाटक पहिल्या प्रवेशातच संपते. आणि दुसऱ्या एखाद्याच्या नाटकावर काही केल्या पडदा पडत नाही. आता या नाटककाराला नाटकाचे शास्त्र कोणी कसे समजावून सांगायचे ? आपण आपले नाटक मनापासून पहावे आणि रंगवावे हेच बरे ! कोणती का भूमिका मिळेना ती इमानेइतबारे वठवण्याचा प्रयत्न करणे एवढेच आपल्या हाती आहे.

■■■

# कुठे आहे देव ?

गावाबाहेरच्या पन्नास-साठ झोपड्यांना भरदुपारी एकाएकी आग लागली. वारा वेगाने वाहात होता. आग विझवण्यासाठी जवळपास कुठेही पाणी मिळण्याची शक्यता नव्हती. झोपड्यात राहाणारे बहुतेक पुरुष दूर कुठेतरी रस्ता तयार करण्यासाठी खडी फोडीत होते. बायकापोरांनी आरडा-ओरडा केला. कुणी गाडग्या-मडक्यातले पाणी आगीवर टाकले. पण त्या भडकलेल्या वणव्यात सर्व झोपड्यांची राखरांगोळी झाली. गरीब माणसे होते नव्हते ते गमावून मोकळ्या आकाशाखाली कपाळावर हात लावून बसली. आता पुन्हा झोपडी उभी करणं फारच कठीण होतं.

सर्वस्व हरवून बसलेल्या एका म्हाताऱ्याला प्रश्न विचारण्यात आला, 'बाबा, ही आग कशी लागली ?'

म्हाताऱ्याने अगतिकपणे आकाशाकडे बोट दाखवले. आणि डोळे पुसत तो म्हणाला, 'त्याची इच्छा ! देवाच्या मनात आलं म्हणजे झालं ! आपुन मानसं काय करणार ? झोपडी बांधनारा तोच आणि जाळनारा तोच. काय करील ते खरं ! रातच्याला आग लागली असती तर मानसंबी जळाली असती. पन त्याची दया म्हणून दिवसा-ढवळ्या आगीत चीजवस्तू जळाली.' जळून गेलेल्या झोपडीकडे म्हातारा व्याकुळ डोळ्यांनी पाहात होता. मधून मधून रडत होता. कपाळावर हात मारून 'देवा, तुझी मर्जी !' असं म्हणून स्वतःचं समाधान करून घेत होता.

या लोकांचे पुनर्वसन कसे करायचे हा प्रश्न होता. निढळाचा घाम गाळून जे किडुक-मिडुक मिळवलं त्याची डोळ्यांदेखत राखरांगोळी झाली. आता हे लोक कुठे जाणार ? कोणाच्या पुढे त्यांनी आपला हात पसरायचा ? मुलाबाळांसह कुठल्यातरी इमारतीच्या वळचणीला आसरा घेण्याशिवाय त्यांना गत्यंतर नव्हते. कदाचित गावचे दोनचार पुढारी मदत देण्याच्या घोषणा करतील. त्यांचे फोटो वृत्तपत्रात येतील. आणि दोन दिवसांतच सारे काही शांत होईल. घोषणेतले शब्द

केव्हाच हवेत विरून गेलेले असतील. रस्त्यावर निराधार पडलेल्या या पाच-पन्नास कुटुंबांचे काय होणार ? याचे उत्तर मात्र देता येत नाही. त्या असहाय्य दुःखी म्हाताऱ्याच्या शब्दांत सांगायचे तर 'देवाची इच्छा' इतकेच म्हणता येईल. पण त्या देवाची इच्छा झोपड्या जाळून गरीबांचे फाटके-तुटके संसार उद्ध्वस्त करावेत अशी का होती ? काही प्रश्नांना उत्तरे नसतात. देवाला प्रश्न विचारण्यात तर काहीच अर्थ नसतो. देव कुणाच्या मुखात अमृताचा थेंब टाकील आणि कुणाच्या पदरात निखारे टाकील हे कुणालाच खरे तर देवाला सुद्धा सांगता येणार नाही.

आता दुसरे दृश्य.

गावातल्या एका मद्यविक्रीच्या दुकानासमोर बँड वाजत होता. त्या दुकानाला जोडून एक वातानुकूलित मद्यालय होते. आज तेथे विशेषच झगझगाट होता. त्या दुकानाचा आणि बारचा वाढदिवस साजरा होत होता. गावातले प्रतिष्ठित पुढारी समोरच्या मंडपात व्यासपीठावर ऐटीने बसले होते. रसिकांची चांगलीच उपस्थिती होती. कदाचित त्यांच्या 'रसपानाची' व्यवस्था करण्यात आली असावी. समारंभाला सुरुवात झाली. बार-मालकाच्या गळ्यात अभिनंदनाचे अनेक हार पडत होते. त्याचा व्यवसाय उत्तम चालावा म्हणून शुभेच्छा दिल्या जात होत्या. रसिकांचे आभार मानताना मद्यालयाचे संचालक म्हणाले,

'रसिक मित्रहो, देवाच्या दयेने आपली अधिकाधिक सेवा करण्याची मला संधी मिळत आहे याचा आनंद वाटतो. मागील वर्षापेक्षा यावर्षी आमच्या मालाचा खप अडीचपटीनं वाढला. सुसंस्कृत रसिकांची संख्या या गावात वाढत्या प्रमाणात आहे. आपली गैरसोय होऊ नये म्हणून आम्ही फॉरेनचा माल आता उपलब्ध करून देत आहोत. आपल्या पदरात आनंदाचे आणि उन्मादाचे क्षण जास्तीत जास्त पडावेत या एकाच इच्छेने आम्ही गेली पाच वर्षे प्रयत्नशील आहोत. गावातल्या नामवंत पुढाऱ्यांचा पाठिंबा नसता तर ही प्रगती झाली नसती. अलीकडे तर कॉलेजातले तरुण विद्यार्थीही आमची सेवा गोड करून घेत आहेत. तरुणांच्या रक्तात जोश आल्याशिवाय देशाचा विकास होणार नाही. इथे म्हाताऱ्यांच्या थकलेल्या हाडात नवचैतन्याचं संगीत निर्माण होऊन त्यांना आपलं हरवलेलं तारुण्य सापडतं. माणसांना धुंदीत जगायला प्रेरणा देणं हे आमचं कर्तव्य आहे. यावर्षी दारूबंदी मंत्री आमच्या बारला शुभेच्छा देऊन गेले. जाताना आनंदातिशयानं त्यांची पावलं सरळ पडत नव्हती. त्यांनी वेळोवेळी मदत केली म्हणून आमचा हा

'अमृतबार' आज आपल्या नगराचं भूषण होऊन बसला आहे. शेवटी माझ्यासारखा सामान्य माणूस काय करणार ? त्या परमेश्वराचे आशीर्वाद पाहिजेत. त्याचे आशीर्वाद आणि आपलं सर्वाचं सहकार्य यांच्या बळावर जनसेवा करीत आहोत.'

रसिकांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला. अध्यक्ष महाराजांना नीट उठता येत नव्हते. त्यांना तत्परतेने हात देऊन मालकांनी उभे केले. तेव्हा उठता उठता अध्यक्षांनी ऑर्डर सोडली, 'माल चांगला आहे. घरी पाठवून द्या.' मालकही खूष झाले. 'आपल्याच हस्ते याचं आम्हाला उद्घाटन करायचं आहे.' समारंभ यशस्वी झाला. मध्यरात्र होईपर्यंत 'रसिक' आनंद घेत होते. दुपारी गावाबाहेरच्या झोपड्या जळून गेल्या. आणि रात्री मद्यालयाच्या वाढदिवस-सोहळ्यात लोक रंगून गेले होते. देवाच्या इच्छेने झोपड्या पेटल्या असे त्या गरीब म्हाताऱ्याने म्हटले होते. आणि देवदयेने आपला व्यवसाय उत्कृष्ट चालला आहे असे बारच्या संचालकाला वाटत होते. बिचाऱ्या देवाला काय वाटत होते हे मात्र कळायला मार्ग नाही.

आणखी एक देखावा.

नगराध्यक्ष दे. भ. पोपटलालशेठ असेंब्लीच्या निवडणुकीला उभे राहाणार होते. आजच्या सुमुहूर्तावर ते उमेदवारीचा अर्ज भरणार होते. त्यांच्या बंगल्यासमोर हजारो लोक 'शेठ पोपटलाल झिंदाबाद' अशा घोषणा देत होते. अनेकांच्या हातात शेठजींच्या नावाचे फलक होते. मिरवणुकीने जाऊन आपला अर्ज त्यांना कचेरीत सादर करायचा होता. त्या प्रचंड गर्दीवरून शेठजींची लोकप्रियता लक्षात येत होती. आता काही विरोधक नेहमीप्रमाणे कुत्सित टीका करीत होते. मिरवणुकीसाठी आणि घोषणा देण्यासाठी लोक भाड्याने आणले आहेत अशी शेरेबाजी करीत होते. विरोधकांच्या तोंडाला कोण हात लावणार ? वर्षानुवर्षे लोकसेवा केल्यामुळे पोपटलाल लोकप्रिय झाले होते. आता दोनचार जुगाराचे अड्डे ते चालवीत असतीलही. पण एवढ्या किरकोळ गोष्टीमुळे त्यांच्यावर विरोधकांनी टीका करण्यात काय अर्थ आहे बरे ? गांधीजयंतीला ते दरवर्षी हजारो गोरगरीबांना अन्नदान करीत असत. वस्त्रदान करीत असत. 'वैष्णव जन तो तेणे कहिए' हे गांधीजींचं आवडतं भजन म्हणत असत. काळाबाजार वगैरे गोष्टी व्यापारात थोड्याफार चालायच्याच. त्यात अनैतिक काय आहे ?' 'जोडोनिया धन उत्तम वेव्हारे' असे तुकाराम महाराजांनीच सांगितले नाही का ? व्यवहारात कौशल्य असावेच लागते. राजकारण हा तर बुद्धि-कौशल्याचाच भाग आहे. जयललिता आणि लालूप्रसाद यांचे आदर्श

समोर ठेवूनच वाटचाल केली पाहिजे. विरोधकांची तोंडे सुद्धा कशी बंद करायची ते पोपटशेठ जाणून होते. आत्ता याक्षणी ते आपल्या देवघरात देवासमोर हात जोडून उभे होते. दोनचार पंडित त्यांना मंत्र म्हणून आशीर्वाद देत होते. मंत्रपठण संपल्यावर त्यांनी डोळे उघडले. आणि ते प्रार्थना करू लागले,

'जय देवराया, भगवंता, जगच्चालका, तुझ्या कृपेने ही निवडणूक जिंकून दे. मी तुझ्यासाठी सोन्याचा देव्हारा तयार करीन. एक भव्य मंदिर बांधेन. सांजसकाळ तुझी आरती होईल. माझ्या पदरात तुझ्या कृपेमुळं पक्षाचं तिकीट स्वस्तात पडलं. पाच लाख रुपये देऊन दिल्लीहून तिकीट विकत आणलं. खरं तर तुझ्या आशीर्वादानंच ते मिळालं. निवडून आल्यावर मला मंत्री कर. नगरपालिकेतल्या कामाचा मला अनुभव आहेच. तसाच कारभार मी करीन. तुझा आशीर्वाद असल्यावर विरोधकांना कोण विचारतो ?' प्रार्थना करता करता नगराध्यक्ष पोपटलाल भक्तिभावाने गहिवरून आले होते. याच देवाने त्यांना नगराध्यक्षाच्या खुर्चीवर पाच वर्षे बसवले होते. त्याच्या कृपेने पाच वर्षे सुखा-समाधानात गेली. लाखो रुपयांची जकात न देता माल आणता आला. सार्वजनिक बांधकामांनी हात दिला. देवाची आरती त्यांनी कधी चुकवली नाही. देव प्रसन्न असल्यावर लोक प्रसन्न करून घ्यायला किती वेळ लागणार ?

सध्या देवाच्या दर्शनालासुद्धा पैसे मोजावे लागतात. नाहीतर दोनचार तास रांगेत तिष्ठत राहावे लागते. देवदर्शन देखील देवाच्या दयेवर किंवा खरं सांगायचं तर पुजाऱ्याच्या किंवा देवळातल्या रखवालदाराच्या मर्जीवर अवलंबून असते. एकदा दुपारच्या वेळेला मंदिरात दर्शनासाठी मी गेलो होतो. तिथला पुजारी म्हणाला, 'महानुभाव, अब दरसन नही मिलेगा. जगन्नाथजी सो गये है।' बाप रे ! प्रत्यक्ष भगवान झोपी गेल्यावर जगाचे काय होणार ? मी परत निघालो तेव्हा देवाला ताब्यात ठेवलेला तो पुजारी मला म्हणाला, 'पच्चीस रुपये देना. भगवानजी को जगाता हूँ।' आपल्या नावावर पुजारी खंडणी वसूल करतात हे देवाला बहुधा कळले नसेल. देव आहे तिथेच आहे. पण त्याच्या नावावर पैसे मिळवणारे लोक मात्र गबर होऊन बसले आहेत. या लोकांना देव कसलीही शिक्षा करीत नाही. पण गरीबांच्या मात्र तो झोपड्या जाळतो. भ्रष्ट धंदे करणाऱ्यांना अभय देतो. सज्जनांना वनवासात ठेवतो. आणि दुर्जनांना सत्तेच्या आसनावर बसवतो. अनेकांनी त्याला सांगितले, 'देवा, चिमण्यांची घरटी उद्ध्वस्त करू नकोस. आयत्या पिठावर चढलेले

नागोबा आपले विषारी फूत्कार सगळीकडे टाकून वातावरण विषारी बनवीत असताना तू स्वस्थ राहाशील तर तुझ्यावर विश्वास कोण ठेवील ? तान्हया बाळाला दुधाचा घोट मिळत नाही आणि गुंडपुंडांच्या हवेल्यात दुधातुपाची चंगळ वाढली आहे. अरे हाच का तुझा न्याय ? तू तर दुबळ्यांना दूर लोटतोस आणि माजलेल्या बलदंडांना जवळ घेतोस. असे असेल तर देवा तुझ्यातलं देवत्व संपलं असे का म्हणू नये ? जे घडतं ते तुझ्या इच्छेनं घडून येतं यावर विश्वास ठेवायला आम्ही तयार नाही. तू देवळात आहेस की एखाद्या मशिदीत अथवा चर्चमध्ये आहेस हे कुणालाच नीटसे माहीत नाही. खरे तर तू आहेस की नाहीस याबद्दलही कुणी छातीवर हात ठेवून सांगू शकत नाही.

झोपडी जळाल्याचे दुःख करणारा म्हातारा, मद्यविक्रीचा धंदा किफायतशीर होतो म्हणून देवाविषयी कृतज्ञता व्यक्त करणारा बारचा मालक आणि निवडणुकीत आपल्याला निवडून आणून मंत्री कर अशी प्रार्थना करणारा देवपूजक नगरशेठ सर्वांनीच देव गृहीत धरला आहे. आपल्या सुखःदुखांची जबाबदारी देवावर आहे अशी या लोकांची श्रद्धा आहे. बिचारा देव ! तो झोपड्याही जाळीत नाही, कुणाला महाल बांधायला मदत करीत नाही. निवडणुकीचं तिकीट मिळवून देत नाही. तो काहीच करीत नाही. या देशाची फाळणी होऊन हजारो निरपराध लोकांना, स्त्रियांना आणि लहान मुलांना आपले रक्त सांडावे लागले. लक्षावधी लोकांना घरेदारे सोडावी लागली. दुसऱ्या गावात वणवण भटकावे लागले. हिंसेच्या नदीतून लाल रक्त वाहत होते. हा क्रूर खेळ कोणाचा ? देवाचा की माणसांचा ? दुसऱ्या महायुद्धात लाखो ज्यू लोकांना-यात कोवळी बालके होती, म्हातारे-कोतारे होते, तरुण-तरुणी होत्या- गॅसचेंबरमध्ये बेदरकारपणे जाळून टाकले गेले. ही देवाची प्रेरणा होती काय ? हिरोशिमा-नागसाकीत सात-आठ लाख लोक बेचिराख झाले. देव असेल तर तो अशावेळी स्वस्थ बसला नसता. आणि जर तो हे सारे पाहात स्वस्थपणे भक्ताकडून नैवेद्य वसूल करीत असेल तर त्याला देव कोण म्हणणार आहे ? अन्याय आणि अत्याचार यांचं थैमान जगात सर्वत्र चालू आहे. हिंसेच्या जात्यात दररोज हजारो लोक भरडले जात आहेत. देवाला ही बातमी अद्यापी कळलेली दिसत नाही. आजच काय पण केव्हाही प्रकट होऊन त्याने अन्याय थांबवला आहे आणि न्यायाची गुढी उभारली आहे असं उदाहरण सापडत नाही. सोमनाथाचे मंदिर अनेक वेळा उद्ध्वस्त झाले. मूर्तीची मोडतोड करण्यात आली. पण दुष्टांचे हात परमेश्वराने

कधीच धरले नाहीत. स्वतःच्या मूर्तीचेही रक्षण त्याने केल्याचे इतिहासात नमूद नाही. उगीच कीर्तनकारांनी आणि पुराणिकांनी देव दुष्टांचा संहारकर्ता आहे, तोच सज्जनांचा रक्षणकर्ता आहे, असं कंठरवानं सांगितलं म्हणजे भोळ्या भाबड्या भयभीत लोकांना थोडा दिलासा मिळतो. 'आले देवाजीच्या मना, तेथे कोणाचे चालेना' अशा समजुतीने लोक स्वस्थ राहातात. देवाचा काल्पनिक आधार सुष्टाप्रमाणे दुष्टालाही घेता येतो. नाहीतरी या श्रद्धेवरच माणूस विसंबून राहातो. पण हा देव आहे तरी कुठे ?

रवींद्रनाथ टागोरांची एक सुंदर कविता आहे. तिचा भावानुवाद मी गद्यातून सांगतो. कवी म्हणतो,-

'रेशमी वस्त्र परिधान करून आणि हातात फुले घेऊन तू कुठे निघाला आहेस ? मंदिरात तुला देव भेटणार नाही. तिथे पाषाणाची मूर्ती आहे. आणि दक्षिणा घेण्यासाठी पुजारी आहेत. असाच पुढे चल. शेतकरी शेत नांगरीत आहे. त्याच्या अंगाखांद्यावरून घाम निथळत आहे. तुझं रेशमी वस्त्र मातीनं मळलं तरी चालेल. तू त्या शेतात जा. शेतकऱ्याच्या घामात आणि कष्टात तो परमेश्वर तुला दिसू शकेल. नीट पाहिलंस तर साऱ्या सृष्टीतच तुला त्याचं दर्शन घडेल.'

हे काव्य मी विसरू शकत नाही. माणसाच्या माणुसकीतच परमेश्वरी अस्तित्वाचं संगीत फुललेलं आहे. राजांच्या महालात किंवा भ्रष्टाचारी, अन्यायी लोकांच्या माड्या-हवेल्यात देव राहात नाही. तो महात्म्यांच्या स्वप्नांत आहे. निष्पाप बालकांच्या स्मितात आहे. माणुसकीच्या देव्हाऱ्यातच देव नांदत असतो. माणसातच त्याची मूर्ती आणि कीर्ती आकार घेऊ शकते. माझ्या मते देव कुठे आहे ? या प्रश्नापेक्षा; देव कुठे नाही ? हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. तो आकाशाच्या निळाईत आहे. वाऱ्याने सळसळणाऱ्या पानांच्या हिरवाईत तो सामावला आहे. पाखरांच्या पंखांत आहे. रुग्णांची सेवा करणाऱ्या वत्सल सेवकांच्या अंतःकरणात आहे. दुसऱ्याच्या दुःखानं दुःखी झालेल्या माणसाच्या अश्रूत आहे. यापेक्षा अधिक काय सांगावे ?

■■■

# आपलं घर

दंडकारण्यात एक झोपडी बांधून राम, सीता आणि लक्ष्मण राहात होते. राजप्रासादात वाढलेले हे तिघेही रानातल्या झोपडीत सुखाने कसे राहिले असतील हा प्रश्न कधी कधी समोर उभा राहातो. खरे तर ते वनवासात जेवढे आनंदी जीवन जगले तेवढे समाधान राजवाड्यात त्यांना कधीच मिळाले नाही. वनवास देखील सुखाचा वाटतो प्रिय व्यक्तीचा सहवास असेल तर, आणि उंची महालदेखील कुणी जीवाभावाचे नसेल तर भकास वाटतो, उदास वाटतो. लहानशा घरट्यात पाखरे मजेत राहातात. पण त्यांना सोन्याच्या पिंजऱ्यात ठेवले तरी ती दुःखी होतात. आपले स्वाभाविक गाणे विसरून जातात. घरट्यात प्रेमाची उब असते. पिंजऱ्यात कितीही स्वादिष्ट फळे मिळाली तरी पक्षी मनमोकळेपणाने कलरव करू शकत नाहीत. रामसीतेचेच उदाहरण घ्या ना ! ते एकमेकांशी जो प्रेमळ संवाद करीत तो रात्र संपली तरी विराम पावत नसे. अंधाऱ्या, भयाण अरण्याच्या वातावरणात कुठल्यातरी झाडाखाली बांधलेल्या पर्णकुटीतल्या कित्येक रात्री रामसीतेच्या जीवनात अमर होऊन गेल्या. सुख कुठे मिळते या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण आहे. स्नेहशून्य महालात पुढे रामचंद्राला सीतेच्या प्रेममय सहवासाची आठवण होऊ लागली आणि त्याच्या आयुष्याची रात्र संपता संपेना. अखेर सुखासमाधानाचे हे गणित फार विचित्र आहे. हेच खरे.

घर वनातले असो की जनातले असो ते प्रेमाच्या बळावरच उभे राहाते. प्रेमाचा स्पर्श नसेल तर प्रासाद बंदीशाळेसारखा वाटतो. आपुलकीचा आणि प्रीतीचा गंध असेल तर कारागृह देखील आनंदाचे माहेरघर होते.

काही दिवसांपूर्वी दिल्लीला एका उंची हॉटेलात राहण्याचा योग आला. तेथे सर्व सुखसोयी होत्या. ज्या प्रशस्त खोलीत-खोलीत म्हणणे चुकीचे ठरेल-ज्या दालनात किंवा निवासकक्षात माझी व्यवस्था केली होती ते अत्यंत शोभिवंत होते. फरशीवर गालिचा अंथरलेला होता. मऊमऊ गाद्यांचा सोफासेट होता. वर्तुळाकार टेबल आणि त्याभोवती मांडून ठेवलेल्या खुर्च्या यांमुळे तो कक्ष अधिकच खुलून दिसत होता. टेबलावर ठेवलेले पुष्पपात्र सुंदर आकाराचे होते. त्या पात्रातली विविध

रंगांची आणि गंधांची टपोरी फुले वातावरणात सुगंध उधळीत होती. वेटरने चहाची किटली मेजावर ठेवली. आणि अदबीने 'गुड मॉर्निंग सर !' असे म्हणून तो निघून गेला. त्या वातानुकूलित हॉटेलाची माझ्या दोन खोल्यांच्या घराशी कोणत्याही अर्थाने तुलना होणे शक्यच नव्हते. पण तरीही ते हॉटेल मला स्नेहशून्य वाटले. घराचे घरपण हॉटेलात नव्हते. वाफाळलेला चहा स्वादिष्ट होता पण त्याला 'घरगुती' चव नव्हती. घरातल्या सामान्य कपबशीतून घेतलेल्या चहाची रुची आगळी होती. इथला चहा श्रीमंती होता पण त्यात आपुलकीचा गंध मिसळलेला नव्हता. पंचवीस रुपये कप या दराने मिळणारा तो चहा बाह्य वैभवाचे प्रतीक होता. त्या पंचवीस रुपयातच वेटरची नम्रता आणि त्याचे औपचारिक हास्य मी विकत घेतले होते. जे विकत घ्यावे लागते त्यातून आत्मीयतेचा आनंद कसा मिळणार ?

खरे तर पंचतारांकित हॉटेल आणि एखादी धर्मशाळा यांच्यात तत्वतः काहीच फरक नाही. या दोन्ही ठिकाणांना 'घर' ही संज्ञा आपण देऊ शकणार नाही. कितीही उंची हॉटेल असले, केवढाही प्रशस्त डाकबंगला असला तरी तो मनात घर करीत नाही. तो फक्त डोळ्यांना दिपवतो. तो कधी मैत्रीच्या सुरात आपल्याशी बोलत नाही. सगळ्या सुविधा असूनसुद्धा त्यांचा चेहरा अनोळखी, परकेपणाचा वाटतो. त्यात राहिलो तरी घरची आठवण मनाला एक सुखद वेदना देत असते.

'आपलं घर' या शब्दांत एक जादू आहे. मग आपले घर एखादी 'पर्णकुटी' असेल किंवा एखादा 'प्रासाद' असेल. पण ते घर 'आपले' असले पाहिजे. घर बांधण्यासाठी काय काय लागते हे बिल्डर्स सांगतील. आपल्या हातात ते हिशेबाचा कागद ठेवतील. कोणत्या मोजमापाचे घर पाहिजे याची चौकशी करतील. कारण त्यांच्या व्यवहारी दृष्टीने घर म्हणजे एक विशिष्ट आकार असलेले विशिष्ट मोजमापाचे राहाण्याचे ठिकाण. वाळू, सिमेंट, लाकूड, लोखंड यांच्यातून घर तयार होते अशी त्यांची पक्की समजूत असते. घर म्हणजे त्यांच्या मते एक 'बांधकाम' असते.

पण माझी घराची कल्पना वेगळी आहे. अव्यवहारी आहे. जिथे आपुलकी आणि प्रेम आहे, जिथे प्रसन्न हास्यविनोद आहे, जिथं बालकाच्या हसण्याखिदळण्याचा आवाज ऐकू येतो, जिथे सुगृहिणीच्या कंकणांचा किणकिणाट कानावर पडतो, जिथे संध्याकाळी देवापुढे नंदादीप लावला जातो आणि ज्ञानेश्वरीतली एखादी ओवी किंवा तुकोबाचा एखादा अभंग कापऱ्या, थरथरत्या आवाजात गुणगुणला जातो त्याला मी घर म्हणतो.

अलीकडे घराचे घरपण झपाट्याने ओसरून जात आहे. देवमूर्तीच नाही तर नंदादीप कुठून असणार ? ज्ञानेश्वरी आणि तुकोबाची गाथा असण्याऐवजी आता फिल्मी मॅगेझिन्स् कपाटात भक्तिभावाने ठेवली जातात. अभंग लिहिणारी जनाबाई आता कोणाच्या खिजगणतीत नाही. पण माधुरी दीक्षितची रंगीत छबी भिंतीवर लटकलेली नसेल तर ते घर जुनाट ठरण्याचा संभव आहे. माझ्या मते आपले घर ही बालपणातली क्रीडाभूमी असावी. तारुण्यात ती रंगभूमी बनावी. प्रौढावस्थेत ती कर्मभूमी असावी. आणि म्हातारपणी ती आधारभूमी राहावी.

आपल्या घरात आपला स्वर मुक्त असावा. आपल्या श्वासोच्छ्वासात मोकळेपणा असावा. ज्या घरात मी कधी खळखळून हसलो नाही, माझ्या मुलानातवांना अंगाखांद्यावर खेळवले नाही. बायकोची कधी चेष्टा केली नाही, तिला कधी चिडवले-रडवले नाही आणि तिच्या गालावरून कधी प्रेमभावनेचे मोरपीस फिरवले नाही, जिथे मी कधी व्यथित अश्रू गाळले नाहीत, जिथल्या खिडक्यांतून येणारा मोकळा वारा माझे अश्रू पुसून गेला नाही ते माझे घर असणे शक्यच नाही. घरात सगळे 'घरगुती' असावे. बाजारातून आणलेला ब्रेड आणि हॉटेलातून आणलेली भाजी आपल्या घरात बसून खाणारे लोक पाहिले म्हणजे मला आश्चर्याचा धक्का बसतो.

एका सद्गृहस्थांच्या घरी मी त्यांच्या आमंत्रणावरून जेवायला गेलो होतो. त्या गृहस्थाने उंची हॉटेलातून पुरी भाजी आणि मसालाभात मागवला होता. जवळच्या दुकानातून श्रीखंड आणवले होते. चटणी आणि लोणचे बाहेरचेच होते. आणि मला आग्रह करून पतीपत्नी वाढीत होते. जेथे आपण जेवायला जातो तेथे अन्नासंबंधी प्रतिकूल शेरे मारू नयेत हा शिष्टाचाराचा भाग आहे. पण मला राहवले नाही. मी म्हणालो,

'इतके सगळे खाद्यपदार्थ बाजारातून रेडीमेड आणलेत. त्यापेक्षा वहिनीच्या हातची पिठले-भाकरी मला अधिक आवडली असती. स्वैपाकाला कदाचित वेळ नसेल किंवा वहिनांची प्रकृती बरी नसेल तर मी हे समजू शकतो. पण तशी काही स्थिती दिसत नाही. बाजारच्या पक्वान्नापेक्षा घरचं साधं अन्न माझ्या ताटात असतं तर अधिक आनंद वाटला असता.' माझे हे स्पष्ट बोलणे कदाचित औचित्याला विसंगत ठरले असेल पण यजमानाने अतिथीला आपल्या घरी आपल्या हाताने केलेला एखादा तरी पदार्थ आपुलकीने वाढावा असे मला वाटते. घरातल्या कर्त्या

पुरुषानेही गृहिणीला पाककृत्यात जमेल तितकी मदत करायला काय हरकत आहे ?

मी विद्यार्थी असताना कॉलेजच्या हॉस्टेलवर रहात असे. माझा रूम पार्टनर - खोली सोबती स्टोव्हवर चहा बनवायचा. कधी साखर कमी असायची, कधी दूध अधिक व्हायचे, केव्हातरी चहा बासुंदीपेक्षाही गोड लागायचा. चहा बिघडवायला माझाही हातभार लागलेला असायचा. पण त्या काळी प्रसिद्ध असलेल्या लकी रेस्टॉरन्टमधील इराणी चहापेक्षाही आम्ही केलेला चहा विशेष लज्जतदार वाटायचा. आज कधी कधी तो माझा मित्र मला भेटतो तेव्हा त्यावेळच्या चहाची आठवण आम्ही एकमेकांना सांगतो. ती चव अजून जिभेवर रेंगाळत आहे.

आपुलकीची चव वेगळीच असते. आत्मीय भावनेचा सुगंध कोणत्याही अत्तराला येऊ शकत नाही. मी गावाला निघालो की माझी आई न विसरता हातावर चमचाभर दही द्यायची. ते आंबट दही चाखून तिच्याच पदराला हात पुसण्याची मला सवय होती. हातावर ठेवलेल्या त्या दह्याचे आंबट गोडपण इतकी वर्षे उलटली तरी अजूनही तिळमात्र कमी झाले नाही. दह्याचा विशिष्ट वास अजून दरवळत आहे. आईच्या डोळ्यांतले प्रेमाश्रू आणि तिच्या आवाजातले वात्सल्य अजून मला सोबत करीत आहे. हे चमचाभर आंबट-गोड दही कोणत्या तरी पंचतारांकित हॉटेलात मिळू शकेल काय ? तिथे दही मिळत नाही. तिथे कर्डसची प्लेट मिळते. प्लॅस्टिकचा चमचा मिळतो. आपुलकीचे अश्रू बाजारातल्या कोणत्याही दुकानात मिळू शकत नाहीत.

ही माझी आई देवाचे एक स्तोत्र दररोज संध्याकाळी नियमाने म्हणायची. स्तोत्रातले शब्द शुद्ध म्हणणे तिला शक्य नसायचे. तिच्या अशुद्ध उच्चारांवर मी कितीतरी वेळा टीकाटिप्पणी केली होती. तेच स्तोत्र अनेकांच्या तोंडून शुद्ध शब्दोच्चारात मी बऱ्याच वेळा ऐकले आहे. पण आईच्या अशुद्ध उच्चारात जे सौंदर्य होते, जी उत्कटता होती आणि जो भाबडेपणा होता तो मात्र मला कुठेच आढळला नाही. आता त्या स्तोत्राची एक कॅसेट बाजारात मिळते. सुरेल, लयबद्ध स्वरातली ती कॅसेट ते यांत्रिक गाणे माझ्या हृदयाला भिडू शकत नाही. माझ्या घरातला माझ्या आईचा भक्तिरसात भिजलेला तो भावपूर्ण स्वर आठवला की मी पुन्हा लहान होतो. वाढलेल्या वयाचे कवच गळून पडते, आणि मन आनंदाने व दुःखाने दाटून येते.

'आपले घर' हा भावनेचा विषय आहे. किती बाय कितीची खोली हा

विचार तिथे नसतो. दहा बाय बाराच्या खोलीत बसून साऱ्या विश्वाबरोबर संवाद करता येतो. घर ही संज्ञा जेवढी व्यापक करता येईल तेवढी ती होऊ शकते. ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे 'हे विश्वचि माझे घर.' 'यत्र विश्वं भवत्येक नीडम्' सारे विश्व हे एक घरटे आहे. जे विश्वाला आपले घर मानू शकतात त्यांच्या महात्मतेबद्दल आपण काय बोलावे ? 'वसुधैव कुटुंबकम्' ही ज्याची वृत्ती बनली त्याच्या घराचा प्रश्न कायमचा सुटला. एका भक्ताने देवाला विचारले, 'देवा, तुमचं घर कुठं आहे ? तुम्ही कुठं राहाता ?' देव हसला आणि म्हणाला, 'भक्ताच्या हृदयात मी राहातो. त्यासारखं दुसरं सुंदर घर नाही. क्षीरसागरातही केव्हा केव्हा राहातो. कैलासावरही माझं वास्तव्य असतं. पण माझं कायमचं घर भक्ताच्या अंतःकरणातच आहे. मी देवळात नाही. तिथं पुजाऱ्यांच्या कैदेत राहावं लागतं. माझा नैवेद्य खाऊन तुंदिलतनु बनलेले पुजारी मला उपाशी ठेवतात. त्यामुळं देऊळ कितीही विशाल आणि वैभवशाली असलं तरी भक्ताच्या हृदयातच मला शांती मिळते. कारण तिथे आपुलकी आहे, जिव्हाळा आहे. भक्त हा माझा सखा आहे. त्याचं मन हेच माझं खरं घर आहे.'

मी एकदम आध्यात्मिक तत्त्वज्ञानाच्या दालनात कसा प्रवेश केला तेच मला कळले नाही. माझ्या घरापासून परमेश्वराच्या घरापर्यंत हा प्रवास फार वेगानं झाला. पण इतक्या लवकर मला देवाघरी जायचें नाही. आपण आपल्याच घराचा विचार करू. घरात प्रवेश केल्याबरोबर आपल्या अदृश्य हातांनी घर आपल्याला कुरवाळीत आहे असे वाटले पाहिजे.

मी माझ्या बिल्डर मित्रांना प्रश्न विचारतो, 'असं घर तुम्ही आम्हाला बांधून द्याल का ? जे घर आमच्याबरोबर हसते, जिवाभावाने बोलते, दुःखाच्या वेळी धीर देते असं घर द्याल का बांधून ? तुमचे स्क्वेअरफीट, कन्स्ट्रक्शन कॉस्ट, हॉल, बेडरूम आणि किचन ही तुमची भाषा आम्हाला कळत नाही. असं घर बांधा की जे आम्हाला जवळ घेईल आणि ज्याला आम्ही बिलगून राहू.' घराशी आपल्या भावना निगडित असतात.

माझा एक मित्र मुंबईत एक बडा ऑफिसर आहे. त्याला राहाण्यासाठी त्याच्या कंपनीने एक आलिशान फ्लॅट दिला आहे. श्रीमंती थाटाच्या या फ्लॅटशी तो अजून समरस झालेला नाही. सुटी मिळाली की कोकणातल्या आपल्या गावाकडे तो धावत जातो. त्या लहानशा गावात त्याचे एक छोटेखानी घर आहे. या

वडिलार्जित घराच्या भिंती आता मोडकळीला आल्या आहेत. घरावरचं छप्पर यथातथाच आहे. दोन खोल्या, समोरची ओसरी आणि ओसरीला लागून असलेल्या लहानखुऱ्या जमिनीवरची चारसहा नारळी-पोफळीची झाडे. यापलीकडे काहीच नाही. पण या घरात मात्र तो अत्यंत आनंदात असतो. मुंबईचा फ्लॅट त्याला आवडत नाही. तो म्हणतो, 'आईपेक्षा दाई दिसायला देखणी असली म्हणून ती आई कशी होणार ?' त्याचे हे भावोद्‌गार मला आवडतात. कोकणातले आपले घर त्याला सर्वार्थाने जिवंत वाटते. कुटुंबातले अगदी जवळचे माणूस जशी ओढ लावते तसेच त्याला त्या घरासंबंधी वाटते. तो म्हणाला, 'याच घरानं माझं खोडकर बाल्य डोळे भरून पाहिलं. या घरात मी खेळलो, बागडलो. या घराने माझ्या पाठीवर कितीतरी वेळां थोपटून दुःखाच्या प्रसंगी धीर दिला. मी निवृत्त झालो की मुंबईत राहाणार नाही. मुंबईत लाखो माणसं आहेत. पण माणुसकी कुठं आहे ? ती मला या गावाने दिली, या घरानं मला घडवलं. इथं रहायला आल्यावर खिडकीतून पलीकडे दिसणाऱ्या उचंबळत्या सागराचं मनसोक्त दर्शन घेत बसेन. या माझ्या नारळी-पोफळींच्या सावलीत एखादी प्रेमकविता गुणगुणत राहीन. मुंबईच्या फ्लॅटमध्ये मला प्रेमाची कविता आठवतच नाही.' त्याच्या शब्दांतला व्याकुळपणा मला जाणवतो.

आपल्या घरावर प्रेम करणारी माणसं मला आवडतात. इमर्सन या तत्त्वचिंतक लेखकाने म्हटले आहे, 'नेव्हर ट्रस्ट हिम हू डज्‌ नॉट लाइक हिज होम.' ज्याला आपले स्वतःचे घर आवडत नाही त्याच्यावर कधीही विश्वास ठेवू नका. आपले घर असावे, कुणाच्या तरी हृदयात आपण आपले घर बांधावे, आपल्याही हृदयात कोणीतरी घर करावे. बस्स्‌ ! घरासंबंधी आणखी काय लिहावे ?

■■■

# मृत्यूची भेट

केव्हातरी येणाऱ्या मरणाच्या धास्तीनं जिवंतपणीच काही माणसं मरगळून गेलेली असतात. 'Cowards die many times before their death' असं शेक्सपिअरनं म्हटलं आहे. जीवनाचा आस्वाद घेण्यापेक्षा मृत्यूच्या भीतीनं अर्धमेली झालेली माणसं पुष्कळ आहेत.त्यांचं आयुष्य काळवंडून जातं.

माझ्या ओळखीचे एक गृहस्थ इतके भित्रे आहेत की, रस्त्यानं एखादी प्रेतयात्रा चाललेली दिसली तर डोळे मिटून घेतात आणि रामनामाचा जप करू लागतात. मला हसू येतं. मी त्यांना म्हणतो, 'तुम्ही डोळे मिटून घेतले म्हणून मृत्यू काही तुमच्याकडं डोळेझाक करणार नाही. त्याची भेदक दृष्टी सर्वांवर आहे. चुकवू म्हटलं तरी ज्याला चुकूनही चुकवता येत नाही, त्या मृत्यूकडं निर्भयपणानं पाहाता आलं पाहिजे.'

मृत्यूमध्ये अस्वाभाविक काहीच नाही. खरं तर सर्वच प्राणी आपल्या जीवाला जीवापाड जपतात. मरणापासून प्रत्येकजण दूर पळत असतो हे सयुक्तिकच आहे. पण जीवनाइतकंच मरणही नैसर्गिक आहे हे समजून घेणं आवश्यक आहे. जीवनाची वाट मृत्यूच्या वाटेला जाऊन मिळते. यातलं अपरिहार्यपण लक्षात घेतलं पाहिजे. एकाने कोर्टातच आरोपीच्या पिंजऱ्यात बसकण मारून हंबरडा फोडला. न्यायाधीशानं त्याला फाशीची शिक्षा सुनावली होती. कित्येक कोवळ्या बालकांचे खून करताना या खुनी नराधमाला दयेचा पाझर फुटला नव्हता. एक-दोघांना त्यानं अंगावर रॉकेल टाकून पेटवून दिलं होतं. त्यांच्या किंकाळ्या तो थंडपणानं ऐकत होता. पण आता आपलं मरण पुढ्यात पाहताना हा क्रूर कुख्यात गुंड शिक्षा ऐकल्याबरोबर लटपटून गेला. तो स्वतःला शूर समजत होता. मरणाची सावली अंगावर पडताच त्याचं सारं शौर्य-धैर्य गळून गेलं. अनेकांना ठार करणाऱ्या गुंडाला मृत्यूची इतकी भीती का वाटावी?

असल्या 'शूर वीरांपेक्षा' काही सामान्य माणसं मृत्यूचा शांतपणानं स्वीकार करतात. दुर्धर रोगानं पछाडलेल्या एका रोग्यानं म्हटलं होतं, 'मी फार थोड्या

दिवसांचा सोबती आहे. पण परमेश्वरानं मला चाळीस वर्षे जगण्याची संधी दिली. जीवनातली सुख-दुःखं मला समजली. जगात दुःखं पुष्कळ असली तरी जग सुंदर आहे. मी नसेन तेव्हा ही फुलं फुलत राहतील, गाण्याचे सूर असतील. जीवनाचा मी शांतपणानं निरोप घेणार आहे.' त्याच्या बोलण्यात विषण्णता आणि प्रसन्नता यांची सरमिसळ झाली होती. मृत्यूची भीती मात्र त्याला वाटत नव्हती. फाशीची शिक्षा ऐकल्याबरोबर लोळागोळा होऊन गेलेल्या त्या खुनी दरोडेखोराच्या पार्श्वभूमीवर हा मृत्यूशय्येवरील रुग्ण कितीतरी धीर वीर वाटतो. जसं जीवन स्वीकारलं तसंच मरणही स्वीकारावं, ही त्या रुग्णाची भूमिका होती. जीवन-मरणाकडं इतक्या समदृष्टीनं पाहाण्याची शक्ती वेदान्त पचवलेल्या विद्वानांतही आढळत नाही.

ज्ञानेश्वरांनी एकविसाव्या वर्षी समाधी घेतली म्हणतात. किती सुंदर अन्वर्थक नाव आहे ! जीवनाचा निरोप घेताना या महात्म्याच्या मनात दुःखाची, खिन्नतेची यत्किंचितही लाट उठलेली नसेल. ज्ञानेश्वर शांत, स्थिर, समाधानी आणि प्रसन्न होते. त्यांचे गुरू आणि वडील भाऊ निवृत्तीनाथ मनातून गलबलले होते. त्यांचे डोळे अश्रूंनी ओथंबलेले होते. बहीण मुक्ता स्फुंदत होती. नामदेव हुंदके देत होते. पण ज्ञानेश्वर आत्मानंदात निमग्न होते. ऐन तारुण्यात आपलं जीवन विसर्जित करून टाकणाऱ्या या ज्ञानियाच्या राजाला मृत्यूची भीती वाटणं शक्यच नव्हतं. मृत्यूच या संतासमोर विनम्र झाला असेल. इतिहासात धीरोदात्त व्यक्तींच्या मृत्यूची वर्णनं आढळतात. भीष्माचा मृत्यू, श्रीकृष्णाचा मृत्यू हे तर प्रसिद्धच आहेत. पण स्वातंत्र्यासाठी लढता लढता धारातीर्थी देह ठेवणारे कित्येक शूर वीर झाले आहेत. भेकडाच्या पाठीमागं मृत्यू धावत जातो. त्या भेकडाची मग पळता भुई थोडी होते. मृत्यू आपल्या भक्ष्याला खेळवीत खेळवीत मारतो. पण पराक्रमी व्यक्तींच्या पुढे तो मान खाली घालून उभा राहातो. एखाद्या आज्ञांकित दासाप्रमाणं त्यांच्याशी तो वागतो. कवी कुंजविहारी यांची 'भेटेन नऊ महिन्यांनी' ही कविता अनेकांच्या स्मरणात असेल. मृत्यूदंडाची शिक्षा झालेला एक स्वातंत्र्यभक्त तरुण आपल्या आईचा अखेरचा निरोप घेताना नऊ महिन्यांनी मी पुनश्च भेटेन, म्हणतो. ही करुणोदात्त कविता वाचताना मृत्यूला आव्हान देणाऱ्या निर्भय वृत्तीचं दर्शन घडतं. खोलवर विचार केला तर मरणाला भिणं निरर्थक आहे, हे ध्यानात येतं.

मृत्यू पक्षपाती नाही, तो सर्वांना समान वागणूक देतो यात शंका नाही.

राजाधिराजालाही उचलून नेतो. भणंग भिकाऱ्यालाही त्याच पद्धतीनं वागवतो. त्याच्या समोर ज्ञानी आणि अज्ञानी, वृद्ध आणि तरुण सारे सारखेच. समर्थ रामदासांनी मृत्यूच्या या निपक्षपाती वृत्तीचं वर्णन केलं आहे. ते म्हणतात.

मृत्यू न म्हणे बलाढ्य । मृत्यू न म्हणे धनाढ्य ।
मृत्यू न म्हणे आढ्य । सर्वगुणे ॥
मृत्यू न म्हणे हा गोसावी । मृत्यू न म्हणे हा तपस्वी ।
मृत्यू न म्हणे हा मनस्वी । उदासीन ॥
मृत्याभेणे पळो जाता । तरी मृत्यू सोडीना सर्वथा ।
मृत्यास न ये चुकविता । काही केल्या ॥

मरण अटळ असतं हे सांगायला संत-महंतांची किंवा ज्ञानवंतांची आवश्यकता नाही. जन्माला आलेला एक दिवस मृत्यूच्या दाढेत रगडला जाणार, हा ठरून गेलेला निसर्गनियम आहे. पण तरीही मृत्यू म्हटलं की त्याचं माणसांना भय वाटत राहातं. झाडाला पालवी फुटते. कोवळी पानं फुटतात. वाळलेली पाने गळून पडतात. ही सारी प्रक्रिया थांबू शकत नाही. थांबली तर अनर्थ होईल. प्रतिक्षणी काळाचं चक्र फिरतच असतं. उगवणं आणि मावळणं, भरती आणि ओहोटी,ऋतूचं येण-जाणं नियमित चालू आहे. कुठल्यातरी अज्ञात शक्तीच्या प्रेरणेनं सृष्टिचक्र फिरत असलं पाहिजे. साऱ्यांच्याच वाटचालीत कुठेतरी मरणाचा टप्पा येतो. प्रवास संपवणं भाग पडतं. जीवनाच्या संगतीत रमलेल्या माणसाला मरणाची कल्पनाही सहन होत नाही. ती धक्कादायक वाटावी असंच मरणाचं दर्शन असेल. त्याच्या संदर्भात अनेक तत्त्वचिंतकांनी, कवींनी आणि शास्त्रज्ञांनी अनेक प्रकारचे विचार प्रकट केले आहेत. कवी गोविंद यांनी तर मृत्यूचं स्वागत करताना म्हटलं आहे, 'सुंदर मी होणार ! जुने पंख आणि पिसारा गळून पडेल. मला नवे पंख मिळतील. आकाशात आनंद भरारी घेईन.' जर्मन कवी गटे हा तर मरणाच्या क्षणी 'अधिक प्रकाश-नवा प्रकाश' असं म्हणत होता. मृत्यू हा आपला सखा आहे. त्याला आपण आनंदभरानं भेटू, असेही उद्गार काही कवींनी काढले आहेत. मृत्यू हे नवजीवनाचं प्रवेशद्वार आहे ही भूमिका काही संतांनी घेतलेली दिसते. मृत्यूच नसेल तर जगण्यातला रस संपला. कंटाळवाण्या जीवनाला मिळालेला सुंदर पूर्णविराम म्हणजे मृत्यू असंही म्हणता येईल. तर मग त्याची भीती का वाटावी ? याचं कारण मरणाच्या अंधाऱ्या खोल पोकळीत काय आहे, हे अजूनपर्यंत

कोणी सांगू शकला नाही. जीवनाचं स्वरूप कळतं, त्याची सुखदुःखं अनुभवता येतात. पण मृत्यू हा केवळ कल्पनेचा विषय आहे. त्याचा अनुभव घेणारा माणूस अनुभवाचं कथन करू शकत नाही. एका दीर्घ, खोल, भयाण आणि दुर्लंघ्य अंधारातला कधीच न संपणारा रटाळ प्रवास हीच सामान्य माणसाची मृत्यूविषयक धारणा असते. म्हणूनच माणूस जीवनाला उत्कटतेनं बिलगून राहातो. त्याला ओढून नेणारा यमदूत हा त्याच्या भीतीचा आणि तिरस्काराचा विषय ठरावा, यात आश्चर्य नाही.

उमर खय्यामच्या कवितेत मरणाचा विचार कित्येक ठिकाणी डोकावतो. या अज्ञात शक्तीचं गूढ त्यालाही उलगडता येत नाही. तो इतकंच म्हणतो की, 'माझ्या संमतीशिवाय मला इथं पाठवलं कोणी ? आणि मला न विचारता असंच कोणीतरी घेऊन जाणार ही कल्पनाही मला सहन होत नाही. जाऊ द्या ! व्यर्थ विचार करण्यापेक्षा साकी, या रिकाम्या प्याल्यात आणखी मदिरा ओत.' मनाला क्लेशदायक वाटणारे प्रश्न मद्याच्या कैफात विसरता येतात. उमर खय्यामसारखा विचारवंत मदिरेच्या मिठीत राहाणं पसंत करतो. कारण विचारवंतांच्या मनाला शल्यासारखे खुपणारे प्रश्न अशावेळी बोथट होतात. म्हणून तो आवाहन करतो, 'उठ साकी, दे भरूनि वारूणीचा एक प्याला.'

अमरत्वाचं वर्णन करणारे श्लोक वाचताना मनाला थोडा धीर येतो. कारण त्यात शरीराचा मृत्यू सांगितला असला तरी आत्म्याच्या चिरंजीवित्वाचं आणि सामर्थ्याचं गुणगान केलं आहे. जन्मलेल्या प्रत्येक प्राण्याला मरण आहे हे सिद्ध झालं आहे. पण मरणाऱ्याला पुन्हा जन्म आहे हे निश्चित करण्यासाठी विश्वसनीय आधार कुठे आहे ? मृत्यू हा अनुभव आहे तर पुनर्जन्म ही कल्पना आहे. जुनी वस्त्रं फेकून द्यावीत आणि नवी धारण करावीत, त्याप्रमाणं आत्मा जुनी शरीरवस्त्रं टाकून देतो, नव्या वस्त्रांचा स्वीकार करतो हे तत्त्वज्ञान. ते कितपत सत्य आहे, याबद्दल मात्र शंकाच आहे, हे काहीही असो. मृत्यूच्या छायेत जीवन आणि जीवनाच्या छायेत मरण हा सृष्टीचा खेळ जितका सनातन तितकाच सुंदर आहे हे खरं ! मरण नसतं तर जीवन शिळपट वाटलं असतं, दुर्दैव इतकचं की, मृत्यू कोणालाही केव्हाही आपल्या लहरीप्रमाणं ग्रासू शकतो. तो टपोरी फुलं चुरगाळतो, दगडधोंडे मात्र शाबूत ठेवतो. ज्ञानेश्वरांनी म्हटलं आहे,

'आईच्या गर्भातल्या बालकालासुद्धा हा मृत्यू सहजपणे ओढून नेतो, असं

त्याचं सामर्थ्य आहे.' समर्थांनी न्यायाचा आणि औचित्याचा प्रथम विचार केला पाहिजे. पण मरणाच्या राज्यात नियमापेक्षा लहरी वृत्तीला अधिकस्थान आहे. ज्ञानेश्वरांसारखा युगपुरुष एकविशीत संपतो आणि अनेक भ्रष्ट, हिंसाचारी, विकृत वृत्तीची माणसं दीर्घायुषी होतात. याचा अर्थ मृत्यू निष्पक्षपाती निदान या बाबतीत तरी नाही. तोही लहरीच आहे. कोणाला कोणत्या पद्धतीनं उचलून नेईल हे सांगता येत नाही. जमिनीवर किंवा पाण्यात मृत्यू कोणालाही भेटू शकतो. इतकी सर्वगामी आणि सर्वशक्तिमान असलेली मृत्यू नावाची शक्ती अज्ञेय आहे. तिचं रहस्य कोणी जाणू शकला नाही. म्हणूनच 'स्मरण असावे मरणाचे' असं संत म्हणतात. आपला शेवटचा दिवस गोड व्हावा, हे तुकोबांचं वचन खरं करायचं तर मरणाची जाणीव मनुष्यानं ठेवली पाहिजे. जाणीव ठेवणं वेगळं. आणि सतत मरणाचीच जपमाळ घेऊन बसणं वेगळं. सारखी सारखी मरणाची आठवण मनात घोळत ठेवणं ही एक प्रकारची विकृती आहे असं मला वाटतं. अनेक प्रवचनकार-कीर्तनकार 'आजचा दिवस तेवढा खरा. उद्याचं काही खरं नाही' असं सांगून लोकमनात वैराग्याची भावना पेरण्याचा प्रयत्न करतात. वर्तमानकाळ तेवढा आपल्या मालकीचा. भविष्यकाळावर मात्र आपली सत्ता नाही, असं मानण्यात एक प्रकारचा निराशावाद आहे. व्यक्तीलासुद्धा आपल्या जीवनाची आखणी करताना भविष्यातली दहा-वीस वर्षे गृहीत धरावी लागतात. राष्ट्रजीवनाच्या उभारणीसाठी तर पुढील पन्नास वर्षांचा कानोसा घ्यावा लागतो. योजना तयार कराव्या लागतात. नवजीवनासाठी पाया खणावा लागतो. मृत्यूचं तुणतुणं सतत वाजवीत बसण्यात काय अर्थ आहे ? तो येणार म्हणून आम्ही भविष्याची स्वप्नं रंगवायची नाहीत काय ? स्वप्नं पाहायला अवसर नसेल तर नवरचना होऊच शकणार नाही. एका असामान्य गायकाचं एक फुफ्फुस निकामी झालं होतं. त्याला पुढं गायकाचं जीवन व्यतीत करणं अशक्य होतं. पण आपल्या मनातले आणि हृदयातले मधुर सूर घेऊन भविष्याकडं चालत राहायचं आहे, हे उत्कट स्वप्न त्यानं मनोमन रंगवलं. त्याच्या मनातलं गाणं मृत्यूच्या भीतीनं त्यानं हरवू दिलं नाही. तो गातच राहिला. सामान्य माणसांच्या मनात देखील त्यांची स्वतःची स्वप्नं असतात. ती साकार करण्यासाठी त्यांची धडपड चालू असते. निर्मितीशील धडपड म्हणजेच जीवन ! निष्क्रियता म्हणजे मरण.

नव्वद वर्षांचे एक म्हातारे गृहस्थ चिनी लिपी आणि भाषा शिकू लागले. ही चित्रलिपी अत्यंत अवघड असते. आठ-दहा वर्षे त्यात घालवावी लागतात.

कुणीतरी त्या गृहस्थाला म्हटलं, 'आज तुम्ही नव्वदी पार केली आहे. आता पैलतीर जवळ आलं आहे, आज आहात, उद्या नाही. अशा अवस्थेत चिनी लिपी शिकता आहात याचं आश्चर्य वाटतं. निदान दहा वर्षं तुम्हाला परिश्रम करावे लागतील. मृत्यू तर जवळच उभा आहे.' ते गृहस्थ हसले आणि म्हणाले, 'चिनी लिपी पूर्णपणे येईपर्यंत मरणाचा विचार करायला मला वेळ नाही. माझ्या समोर जे उद्दिष्ट आहे ते मी गाठणारच आहे. मृत्यूची परवानगी घेऊन जीवनात काय करायचं ते ठरवणं हा वेडेपणा आहे. मी माझ्या उद्योगात रममाण झालो असताना मला स्पर्श करण्याची त्याची हिंमत नाही. and miles to go before I Sleep मला चालायचं आहे. अजून पुष्कळ शिकायचं आहे, अजून मला जगायचं आहे.

हा विलक्षण चिवट आशावाद आणि आत्मविश्वास मृत्यूवर देखील विजय मिळवू शकतो. मरणाला पराभूत करून जीवन विजयोत्सव साजरा करू शकतं. मृत्यू कितीही अटळ असला तरी त्याच्या भयानं माझी आजची आणि उद्याची स्वप्नं मी काळवंडू देणार नाही, असं माणसानं मानलं पाहिजे. जीवन क्षणिक आहे, कःपदार्थ आहे, निरर्थक आहे म्हणून जीवनाच्या मोहात गुंतून पडू नये हे पुन्हा पुन्हा आळवलं जाणारं नीरस गीत फारसं मनावर घेऊ नये. जीवित जर असार आणि आभासात्मक असतं, तर राम, कृष्ण, बुद्ध, महावीर या सर्व युगपुरुषांनी जीवन घडवण्याचा आणि त्याला सुंदर आकार देण्याचा प्रयत्न केला नसता. लहानशा मुंगीच्या जीवनालाही अर्थ आहे, अस्तित्व आहे. आपण तर माणसं आहोत. आयुष्याच्या विशाल पटावर नवनवीन स्वप्नांच्या रम्याकृती रेखाटण्यासाठी आपल्या हातात कर्तृत्वाची कुंचली आहे. आमच्या हिशेबी जीवन नगण्य नाही. जीवनाच्या मस्तीत वावरत असताना कितीतरी सुख-दुःखात्मक गोष्टींचा रसिकतेनं आस्वाद घेता येतो.

आता या क्षणी मी लिहीत बसलो असताना माझ्या भोवताली दोन निरागस बालकांचा हवाहवासा वाटणारा दंगा चालला आहे. त्यांच्या स्वैर आणि स्वच्छंद बागडण्यात जीवनाचं रहस्य प्रकट होत आहे. ही बालकं मधूनच हसतात, मधूनच रडतात आणि गालावरून ओघळणारे अश्रू पुसण्याच्या आतच त्यांच्या मुद्रेवर खट्याळ हसू उमलून येत आहे. ही मुलं जीवनाच्या स्वरूपावर आशावादी भाष्य करीत आहेत असं मला वाटतं. गंभीर मुद्रा धारण केलेल्या एखाद्या पंडिताच्या किंवा संन्याशाच्या विरक्तीपूर्ण भाष्यापेक्षा बालकांचं नाचणं-बागडणं अधिक

अर्थपूर्ण आहे असं मला वाटतं. खोडकर, निष्पाप बालकांच्या सहवासात असताना मरणाचं स्मरण कसलं करायचं ? जीवनाचं गाणं गायचं सोडून, मरणाचं रडगाणं आठवणाऱ्याला काय म्हणायचं ? छे छे ! हा एक गंभीर गुन्हा ठरेल.आता पावसाची भुरभुर सुरू झाली. समोरच्या खिडकीतून वाऱ्याची थंडगार झुळुक माझ्यापर्यंत येते आणि माझ्याशी आपल्या भाषेत बोलू लागते. पावसाचे थेंब अंगावर घ्यावेत. अंगणात बागडावं, उड्या माराव्यात असं मला तीव्रतेनं वाटतं. पण माझं प्रौढपण आणि व्यवहारी शहाणपण आड येतं. साठी उलटल्यावर पोरासारखी दंगामस्ती कशी करायची ? पण ही बालकं मात्र खुशाल पावसाशी सलगी करीत आहेत. वाऱ्याशी खेळत आहेत यांच्या जगण्यात उत्साह आणि आनंद भरभरून ओसंडत आहे. हे जीवनाचं दर्शन कसं सुंदर आहे.

कुठल्याशा कवीनं लिहिलेली एक कविता या क्षणी मला आठवते. जीवनाच्या रसतेचं आणि सुगंधाचं त्यानं त्यात वर्णन केलेलं आहे. कवितेच्या शेवटी तो म्हणतो, 'घ्यावा जन्म पुनः पुन्हा स्फुरविती बालार्क पुष्पे मुले' - उगवणारा सूर्य, फुलं आणि मुलं पाहिली की पुन्हा पुन्हा जन्म आणि जीवनाचा उत्सव डोळे भरून पाहावा, उत्सवात हरवून जावं. मला वाटतं हेच खरं ज्ञान. जन्म हे एक टोक आहे. मरण हे दुसरं. पण दोन टोकांतलं केवढं तरी जीवन आपल्याला आवाहन करतं. जगत असताना मृत्यूच्या टोकावर लक्ष केंद्रित करून प्रत्येक पाऊल उचलणं शहाणपणाचं नाही. मृत्यूला भिऊ नये, पण पावलोपावली त्याचा धाक बाळगून त्याची काळी सावली आयुष्यावर पडू देऊ नये. कदाचित तत्त्वचिंतकांना, गंभीर वृत्तीच्या पंडितांना माझं मत पटणार नाही. ते मला भाबडा आणि बालिश म्हणतील. म्हणू द्या ! माझं म्हणणं चुकीचं आहे असं मुळीच वाटत नाही.

कोणी काही म्हटलं तरी अनंत रंगांनी, रूपांनी नादनिनादांनी, गंधांनी आणि अनंत सुरांनी जीवन ओथंबलेलं आहे. मृत्यू कितीही समर्थ असला तरी अथांग आकाशाची निळाई त्याला नष्ट करता आलेली नाही. दररोज फुलांचं निर्माल्य होत आहे. पण काळाला हसत दररोज असंख्य कळ्या फुलत आहेत. दिवस कदाचित रुक्ष असेल. पण त्याच्या पाठोपाठ येणारी रात्र स्वप्नांचा सुगंध घेऊन येते. म्हणूनच केशवसुतांनी म्हटलं आहे,

दिवस जगाला देव दिसे परि गद्यच त्याच्या वदनी
रात्र राक्षसी भासतसे परि गाते सुंदर गाणी'

दिवसाचा प्रकाश आणि रात्रीचा अंधार या दोघांच्या मिश्रणातून जीवनसंगती उत्पन्न होते. 'Let us learn to live for we must die alone' हे वचन विचार करायला लावणारं आहे.

या जीवितावर निर्भरशील वृत्तीनं कसं प्रेम करावं हे ज्याला मनःपूर्वक कळलं आहे, तो मृत्यूकडेही काव्यात्म दृष्टीनं पाहू शकेल. दुःखं अनंत आहोत, असह्य आहेत. पण ती स्वीकारणारा मी त्यांच्यापेक्षाही मोठा आहे. दुःख पचवून हसत राहीन. हा आग्रह का धरू नये ? मरण कल्पनेभोवती का प्रदक्षिणा घालायची ? कवी बोरकरांनी प्रश्न विचारला आहे.

एक दिवस केव्हा तरी हो असे मरायाचे -
म्हणून काय त्याच भयाने रोज जगायाचे ?

कित्येक तत्त्वेवेत्ते मृत्यूचं उद्‌गान करतात. जीवनाची महती वाटण्याऐवजी जीवनाची भीती बाळगायची आणि मरणाची भलावण करीत राहायचं हे प्रकार आम्हाला मान्य होणार नाहीत. आम्ही सामान्य माणसं जीवनाच्या गळ्यात गळा घालतो आणि कष्ट करून आनंदाचा मळा पिकवण्याचा प्रयत्न करतो. अहो, तत्त्ववेत्यांनो, मृत्यू आम्ही गृहीत धरला असला तरी त्याचं स्मरण, चिंतन आणि पूजन आम्हाला करायचं नाही. आम्ही आमच्या नादात चालत राहाणार आहोत. 'शंभर शरदऋतू जगा' हा आनंदवादी आदेश आम्हाला शिरोधार्य आहे. आयुष्याच्या खेळात हारजीत ठरलेलीच आहे. हरून देखील जिंकण्यासाठी धडपड करायची आहे.

केव्हातरी मृत्यूची भेट होणारच आहे. त्याच्याशी हस्तांदोलन करून त्याच्या पाठीवर थाप मारून म्हणू, 'चल दोस्ता, अरे मी काही पळून जाणार नाही. इतके दिवस माझ्या हातात सख्या-सोबत्यांचे, मुला-बाळांचे प्रेमळ हात होते. त्या हातांची ऊब पुष्कळ घेतली. आता तुझा थंड हातदेखील मला सुसह्य वाटेल. तू मला अंधाराच्या वाटेनं अज्ञाताकडं घेऊन जाणार आहेस. पण मला भीती वाटणार नाही. कारण तुझा हात माझ्या हातात आहे.' कुणी सांगावं ? माझ्या बोलण्यानं मूर्तिमंत मृत्यूही हसेल आणि म्हणेल, 'असंख्य लोक मला भेटतात. मी त्यांना भेटतो. पण एवढ्या आपुलकीनं कोणी भेटत बोलत नाही. तुझी भेट झाली. बरं वाटलं.'

■■■

# एका गुलाबपुष्पाचा सुगंध

पंडित जवाहरलाल नेहरूंच्या मृत्यूला आता पस्तीस वर्षे उलटून गेली. आजच्या तरुण पिढीला नेहरू हे नाव माहीत आहे पण त्यांच्या राजबिंड्या व्यक्तित्वाची आणि व्यापक कर्तृत्वाची फारशी कल्पना नाही. गांधी आणि नेहरू यांचा केवळ भारतावरच नव्हे तर साऱ्या जगावर प्रभाव पडलेला होता. म. गांधींबद्दल तर आईन्स्टाइन या शास्त्रज्ञाने म्हटले की, 'हा विलक्षण माणूस या जगात होऊन गेला यावर येणाऱ्या पिढीचा विश्वास बसणंदेखील कठीण आहे.

पंडित नेहरूंच्या संदर्भात अनेक विचारवंतांनी आणि कवींनी जे गौरवोद्गार काढले ते थोड्याफार अशाच आशयाचे आहेत. रवींद्रनाथ टागोर यांनी 'पं. जवाहरलाल म्हणजे ऋतुराज वसंत आहे' असे म्हटले होते. वसंत ऋतु हा सृष्टीच्या रंगरूपात नवसौंदर्याची निर्मिती करतो. वातावरणात प्रसन्नता आणतो. सृष्टीला तारुण्य देतो. तरुण-तरुणींच्या मनात प्रणयाची बीजे पेरतो. शृंगारभावनेला सुगंध देतो. पंडित नेहरूंचे व्यक्तिमत्त्व वसंताप्रमाणेच बहारदार होते. आजपर्यंत भारताला लाभलेल्या महनीय नेत्यांत पंडितजींचे रूप अधिक दर्शनीय होते यात शंका नाही. उघड्या मोटारीतून हा हसतमुख, उमदा, देखणा राजबिंडा नेता निघाला की रस्त्याच्या दोन्ही बाजूला जमलेली जनता उच्च स्वरात आनंदाने त्याचा जयघोष करीत असे. त्यावेळी त्यांच्या गुलाबी मुखावरची छटा अधिकच गुलाबी होत असे. आपल्या जाकिटावर किंवा शर्टावर एक सुंदर गुलाबाचं फूल त्यांनी लावलेलं असायचं. त्या फुलाशी स्पर्धा करणारे त्यांचे सौंदर्य साऱ्यांनाच प्रसन्न करीत होते. निसर्गाकडून त्यांना मिळालेली ही रूपसंपदा हे देखील त्यांच्या लोकप्रियतेचे एक कारण होते. रवींद्रांच्या कविमनाला नेहरूंच्या संदर्भात सुचलेला 'ऋतुराज' हा शब्द यथोचित आहे असेच म्हणता येईल. देशाच्या नेत्याचे मूल्यमापन त्याच्या बाह्यरंगावरून किंवा रूपावरून करू नये हे मला कळते. पण एखाद्या नेत्याच्या लोकप्रियतेला त्याचे दर्शनी व्यक्तिमत्वही काही अंशी कारणीभूत होते हे मान्य केले पाहिजे.

राजकारणाच्या उग्र आणि उष्ण हवेतही पंडितजींनी आपल्या काव्यात्म मनोवृत्तीचे गुलाबपुष्प सदैव ताजे टवटवीत ठेवले हे विशेष आहे. त्यांची मन:प्रकृती कवीची होती. ते बुद्धिवादी असले तरी रुक्षता, तर्ककर्कशता आणि नीरस गंभीरता त्यांच्या ठायी नव्हती. दिलखुलास हास्य, आणि प्रसन्न मुद्रा यामुळे ते आपल्या विरोधकांनाही सहज जिंकू शकत. राजकारणाच्या बाजारात आंबलेले, चिंबलेले, शिळपट बनलेले बहुसंख्य चेहरे भेटतात. पण पंडितजींच्या चेहऱ्यावर निरुत्साहीपणाचा, रुक्षतेचा गंज कधी चढला असेल असे वाटत नाही. त्यांच्या साहित्यातही उत्साहाचे आणि आशावादाचे वारे वाहाताना दिसतात. स्वातंत्र्याच्या संग्रामात सर्वस्व झोकून देणाऱ्या या नेत्याला लेखनवाचनाची मात्र बलवत्तर ओढ होती. त्यामुळेच त्यांच्या हातून महत्त्वपूर्ण लेखन होऊ शकले.

आता असे वाटते की ते राजकारणात पडले नसते तर आज श्रेष्ठ साहित्यिकांच्या पंक्तीत नेहरू या नावाभोवती प्रकाशाचे एक वलय निर्माण झाले असते. साहित्यिक, कवी, कलावंत यांच्यावर त्यांचे विशेष प्रेम असायचे. बर्ट्रांड रसेल, जॉर्ज बर्नार्ड शॉ, चार्ली चॅप्लीन यांच्याशी त्यांची मैत्री होती. इंग्रजीतलं आर्ष साहित्य त्यांनी झपाटून वाचलं होतं. हिंदी आणि उर्दूतल्या अनेक कवी - लेखकांशी ते साहित्य आणि संस्कृती यांच्या संदर्भात मनमोकळेपणाने चर्चा करीत असत. एकदा ते प्रवासाला निघाले असताना विमानतळावर त्यांना आठवण झाली की आपण काल रात्री वाचत असलेलं 'मृच्छकटिक' नाटकाचं पुस्तक आणायला विसरलो. पंतप्रधान नेहरूंनी सेक्रेटरीला आपल्या निवासस्थानी पाठवून ते पुस्तक मागवून घेतले आणि मग विमानप्रवासात ते संस्कृत नाटक त्यांनी रस घेऊन वाचून काढलं. पंडितजींच्या रक्तातच कलारसिकता होती. एखाद्या कोमलार्त गीताचे सूर कानावर आले की ते सैरभैर होत असत. एकदा आदिवासींच्या नृत्यात तसा पेहराव करून ते नाचले होते.

बालकांच्या मेळाव्यात त्यांचं हरवलेलं बाल्य त्यांना परत भेटायचं आणि मग त्या मुलांत मूल होऊन ते हसायचे, खेळायचे. प्रौढपणातही आपलं शैशव जपणारी बालसुलभ प्रवृत्ती या रसिकात नांदत होती. मुलांत मूल होणं आणि फुलांत फूल होणं हे निरागस मानसिक प्रकृतीचे आविष्कार असतात. हसऱ्या, खेळकर बालकांच्या मेळाव्यात त्यांच्या मनातल्या साऱ्या विवंचना वितळून जायच्या. राजकारणातले कडवट प्रश्न त्यावेळी दूर जायचे. मुलंही चाचा नेहरूंच्या सहवासात

रममाण व्हायची. वाढलेल्या वयाचा पण वृत्तीने बाल असलेला हा चाचा आपल्या खेळण्यात सहभागी करून घेताना मुलांना आनंद वाटायचा.

पंडितजी सौंदर्याचे पुजारी होते. निसर्गसौंदर्याची त्यांना विलक्षण मोहिनी होती. हिमालयाची हिमशुभ्र शिखरे पाहाताना ते देहभान विसरून जात. कदाचित ती उत्तुंग शिखरे त्यांच्या महत्त्वाकांक्षेला आणि सौंदर्यप्रेमाला उत्कट आवाहन करीत असतील. माणसाने उंच उंच जाण्याचा ध्यास धरावा. गगनाला माथा भिडवण्याची बलोद्धत वृत्ती गिरिशिखरांसारखीच त्याच्यात असावी असाही विचार त्यांच्या मनात येत असेल. डेरेदार वृक्ष पाहिला की ते त्याच्या खोडावरून हळुवारपणे हात फिरवीत, जीवनाच्या भूमीत माणसानं या वृक्षासारखंच दृढपणानं रुजावं अशी भावना कदाचित त्यावेळी त्यांच्या मनात उचंबळत असेल. पण डोंगर, पर्वत, अनंत लाटांनी उचंबळणारा सागर, डोंगरावरून दिसणारं अफाट निळं आकाश, भरारणारा वारा आणि चित्रविचित्र सुखदुःखांनी ओथंबलेलं हे मानवी जीवन त्यांना सर्वार्थानं प्रिय वाटायचं. तसे ते नास्तिक होते. रूढ अर्थानं त्यांनी देव मानला नाही. पण गंगानदीवर मात्र या अज्ञेयवादी विद्वानाचं विलक्षण प्रेम होतं. ते म्हणतात,

'अलाहाबाद जवळून वाहात जाणाऱ्या गंगा व यमुना नद्यांशी लहानपणापासूनच मी मनाने बांधला गेलो आहे. जसा जसा मी मोठा होत गेलो तसतसे हे बंधनही अधिकाधिक दृढ होत गेले, जसे जसे ऋतू बदलत जातात तसतसे गंगायमुनेचे रूप आणि वृत्ती बदलत जातात. ही त्यांची बदलती रूपे मी मनात कोरून ठेवली आहेत. अनेक वेळा या रूपांच्या पलीकडे जाऊन या नद्यांची गाणी मी ऐकली आहेत. त्यांच्या अनादी प्रवाहाबरोबर वाहात आलेल्या कथांचे मी श्रवण केले आहे. या नद्यांची प्राचीन परंपरा, त्यांचा इतिहास व पुराणातून त्यासंबंधी असलेले उल्लेख यांच्यावर मी कितीतरी विचार केला आहे. या नद्या विशेषतः गंगा ही सर्व अर्थांनी भारताची नदी आहे. भारतीय जनतेचे गंगेवर आत्यंतिक प्रेम आहे. गंगा नदीच्या भोवती भरतवंशाची अनेक संस्मरणे गुंफलेली आहेत. भारताच्या आशा-आकांक्षा, जय-पराजय यांची गंगा ही साक्षीदार आहे. भारतमातेच्या विजयाची गाणी तिने ऐकली आणि पराभवाचा आक्रोशही तिने केला आहे. गंगा ही भारताच्या प्राचीनतम संस्कृतीचे व जीवनप्रवाहाचे प्रतीक आहे. वर्तमानकाळातून वाहात वाहात भविष्याच्या महान सागरात एकरूप होणाऱ्या भारताच्या भूतकाळाचे गंगा हे मला प्रतीक वाटते, भव्य स्मारक वाटते.'

पंडितजींच्या मृत्यूपत्रातला हा काव्यमय परिच्छेद वाचताना त्यातल्या भावपूर्ण विचाराने कोणाचेही मन रोमांचित होईल. गंगा नदीचे स्मरण झाल्याबरोबर त्यांच्या मनात उमटलेले भावतरंग किती उत्कट, किती खोल आणि किती उदात्त आहेत याची कल्पना येते. आता कोण म्हणेल त्यांना नास्तिक ? गंगा यमुनेवर प्रेम करणारा माणूस भक्त असतो, कवी असतो. कवितेवरून आठवण झाली, रॉबर्ट फ्रॉस्ट नावाच्या एका कवीच्या चार ओळी पंडितजींनी आपल्या अक्षरात लिहून आपल्या टेबलावर तो कागद काचेखाली जपून ठेवला होता. आजही 'तीनमूर्ती' या त्यांच्या पूर्वीच्या निवासस्थानी त्यांच्या अभ्यासिकेत या काव्यपंक्तीचा कागद पाहायला मिळतो. रॉबर्ट फ्रॉस्टच्या कवितेचे सूर पंडितजींच्या मनाला भावले. खरे तर त्या कवितेतून त्यांचंच जीवनगाणं प्रकट झालं आहे.

'हे उद्यान सौंदर्यानं आणि हिरव्यागार चैतन्यानं कसं बहरलेलं आहे, असं वाटतं की इथंच थांबावं, या सौंदर्याचा आस्वाद घ्यावा पण अजून कितीतरी आश्वासनांची पूर्ती करण्यासाठी मला पुष्कळ चालायचं आहे. इथं थांबून चालणार नाही. अखेरची विश्रांती घेण्यापूर्वी मला अजून कित्येक मैल - दूरपर्यंत चालत राहिलं पाहिजे' जणू पंडितजींच्या ध्येयवादी, समाजनिष्ठ मनाचे हे उद्‌गार कवीने इथे शब्दांकित केले आहेत. अहमदनगरच्या तुरुंगात बंदिस्त असताना त्यांनी कालिदासाचं 'शाकुंतल' आणि बाणाची 'कादंबरी' वाचनासाठी मुद्दाम मागवून घेतली होती. कालिदास आणि शेक्सपिअर, रसेल आणि शॉ यांच्या साहित्यावर कविमनाचा रसिकच आषक होऊ शकतो. नगरच्या त्या किल्ल्यात स्थानबद्ध असताना ते फुटबॉलचा खेळ खेळायचे. आणि साहित्याच्या चिंतन-लेखनात मग्न होऊन जायचे. कारागृहात डांबलेल्या या कवीचा आत्मा आणि प्रतिभा मात्र सर्वस्वी मुक्त होती. कवी आणि देशभक्त यांच्या आत्म्यांना कोंडून ठेवणारा तुरुंग अद्यापी जन्माला यायचा आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी सुद्धा पायात बेड्या असताना अंधारकोठडीच्या भिंतीवर शृंगारिक काव्य लिहिलं होतं. टिळकांचं 'गीतारहस्य' मंडालेच्या तुरुंगातच जन्माला आलं. टिळक, सावरकर आणि नेहरू या देशभक्तांच्या हृदयात उचंबळणारी प्रतिभाशक्ती तुरुंगाच्या भिंती फोडून बाहेर पडण्याइतकी समर्थ होती यात शंका नाही.

पं. नेहरू इतिहासाचे अभ्यासक होते. भारताच्या इतिहासाचे त्यांना आकर्षण होते. 'भारताचा शोध' हा त्यांचा ग्रंथ प्रत्येकाने वाचला पाहिजे. 'जागतिक

इतिहासाचे ओझरते दर्शन' हा ग्रंथही मी कित्येक दिवस वाचत होतो. त्यांचे 'आत्मकथन' ही दोनतीन वेळा वाचले. नेहरूंची इंग्रजी भाषाशैली मला रेशीमकाठी वाटली. त्यांच्या भाषेला एक स्वाभाविक खळाळ आहे. शैलीदार लेखकांच्या मालिकेत नेहरूंचे नाव आवर्जून घ्यावे लागेल. हिंदीपेक्षा ते इंग्रजी अधिक चांगले बोलत. त्यांची कित्येक हिंदी-इंग्रजी भाषणे मी ऐकली. गांधीजींच्या मृत्यूनंतर रेडिओवरून शोकाकुल मनःस्थितीत राष्ट्राला उद्देशून केलेलं त्यांचं हिंदी-इंग्रजी भाषण मी अजून विसरू शकत नाही. नेहरूंच्या व्याकुळ आवाजात मिसळलेल्या त्यांच्या दुःखी विचारांना जे अनुरूप शब्दांचे कोंभ फुटले ते त्या भाषणातून दिसत होते. तसे त्यांचे वक्तृत्व फार प्रभावी नव्हते. वक्तृत्वाच्या संदर्भात आज अटलबिहारी वाजपेयी हे नाव जसे सर्वोच्च आहे तशी उंची पंडितजींच्या वक्तृत्वाला नव्हती हे खरे. पण आंतरिक तळमळीने, वैचारिक अभिनिवेशाने भारलेले आणि भरलेले त्यांचे शब्द कोणतीही सभा जिंकायला पुरेसे होते. १९५२ साली फर्ग्युसन कॉलेजच्या मैदानावर मी त्यांचे नर्मविनोदाने भिजलेले एक उत्कृष्ट व्याख्यान ऐकले होते. भाषणाच्या सुरुवातीलाच ते म्हणाले,

'मै असली पंडित नही हूँ। मै तो नकली पंडित हूँ। लोग मुझे प्यारसे पंडित कहते है तो मुझे बडी हँसी आती है।' असे म्हणून त्या सभेत ते खळखळून हसले. श्रोतेही प्रसन्न झाले आणि मग आपल्या विरोधी पक्षांना रेशमी चिमटे काढीत उपहासपूर्ण शैलीत ते बोलत राहिले. त्यांच्या भाषणाचा माझ्यावर साहजिकच परिणाम झाला. दुसऱ्याच दिवशी फर्ग्युसनच्या लायब्ररीत जाऊन मी त्यांचे आत्मचरित्र मिळवले आणि आम्ही दोन-तीन मित्रांनी त्याचे सामुदायिक वाचन केले. राजकीय नेता म्हणून इतिहास त्यांचे जे काही मूल्यांकन करील ते करील. पण आंतरराष्ट्रीय कीर्तीचा आणि संबंध जगावर प्रभाव पाडणारा आमचा हा पंतप्रधान आहे याचा मला कोण अभिमान वाटायचा ? नेहरूंवर कुणी प्रतिकूल टीका टिप्पणी केली की मला संताप यायचा. विद्यार्थी जीवनातले ते दिवस विभूतिपूजनाचे होते. एखाद्या व्यक्तीला विभूती मानणारी भावुक मनोवृत्ती तरुणवयात असते. तशी ती असावी. पण हळूहळू ती ओसरून भाविकतेची जागा चिकित्सेने घेतली पाहिजे. पण आजही पंडितजींच्या व्यक्तित्वाचे माझ्या मनाला असलेले आकर्षण फारसे कमी झाले नाही. रसिकराज नेहरू मला नेहमीच भावतात. कवी प्रदीप यांच्या 'ए मेरे वतनके लोगो, जरा आँखोमे भरलो पानी-' हे गीत ऐकताना त्यांच्या डोळ्यांत

अश्रू उभे राहिले. देशाची फाळणी झाल्यानंतर दुसऱ्या की तिसऱ्या दिवशी पाकिस्तानातून दिल्लीला आलेल्या आगगाडीच्या प्रत्येक डब्यात निरपराधी रक्ताचे थारोळे साचले होते. स्त्री-पुरुषांची प्रेते पडली होती. निष्पाप बालकांनाही भोसकण्यात आले होते. हे दृश्य पाहिल्यावर पंतप्रधान नेहरूंना हुंदके आवरता आले नाहीत. त्यांच्या शेरवानीवरील गुलाबाचे फूल अश्रूंनी भिजून कोमेजून गेले होते. हे नेहरू मला अजून आवडतात. राजकारण वाहून जाते. जुने पुराणे होते. पण कवीच्या डोळ्यांतले अश्रू आणि त्याने लिहिलेले साहित्य मात्र सदैव जिवंत राहाते. पंडितजी काळाच्या पडद्याआड गेले पण आपल्या मृत्यूपत्रात त्यांनी म्हटले आहे.

'माझ्या देहाच्या रक्षेचा जो अधिकांश भाग राहील त्याचे विसर्जन इथल्या शेतातून करावे. ती रक्षा विखरून पसरून टाकावी म्हणजे माझी राख भारताच्या धरतीशी, तेथील धूलिकणांशी जाऊन मिसळेल आणि भारताचा एक बेमालूम भाग बनून त्याच्याशी एकजीव होऊन राहील.' यावर काय भाष्य करायचे ? भारतभूमीशी पं. नेहरू आता कायमचे एकरस, एकजीव झाले आहेत.

■■■

# विठ्ठलाशी वाद आणि संवाद

हे पंढरीच्या विठ्ठला, तू भक्तांशी प्रेमसंवाद करतोस त्यांच्या संकटांचं निवारण करतोस अशी तुझी ख्याती मी पुष्कळ ऐकली आहे. चंद्रभागेच्या तीरी वाळवंटावर 'सुंभाचा कडदोरा आणि रकट्याची लंगोटी' नेसून नामदेव कीर्तन करू लागला म्हणजे तू त्या कीर्तनात आनंदभरानं नाचत होतास असं मी ऐकलं आहे. नामानं आणलेला नैवेद्य तू आवडीनं खात होतास आणि त्याच्याशी गुजगोष्टी करीत होतास अशी आख्यायिका सांगितली जाते. ज्ञानेश्वरांपासून तुकारामांपर्यंत आणि पुढे झालेल्या अनेक भक्तांपर्यंत सर्वांनी तुझ्या वासल्याची, तुझ्या ठायी असलेल्या प्रीतीची आणि शांतीची स्तुतिस्तोत्रं गायिली आहेत. तूच म्हणे चोखामेळ्याच्या झोपडीत जाऊन दहीभात खाल्लास. तूच जनाबाईचं दळण दळण्यात मदत करीत होतास. तुकोबांच्या अभंगांच्या वह्या इंद्रायणी नदीत दुष्टांनी बुडवल्या पण तूच ती अभंगांची गाथा जशीच्या तशी तुकोबांच्या हाती स्वहस्ते आणून दिलीस. भक्त आणि परमेश्वर यांच्यातला प्रेमसंबंध किती दृढ आणि उत्कट असतो याचं दर्शन विठ्ठला, तूच घडवलंस. जगाचा स्वामी असून तू भक्तांची चाकरी करतोस. तिन्ही लोक ज्याच्या उदरात सामावले आहेत तो परमात्मा भक्तानं आज्ञा केली म्हणून त्यानं फेकलेल्या विटेवर युगे अठ्ठावीस तिष्ठत राहातो हा केवढा चमत्कार आहे. स्वतः जगजेठी परमेश्वर पुंडलिकाच्या भेटीला येतो आणि त्याची वाट पाहात प्रसन्नतेनं थांबतो याचा अर्थ भक्त हा स्वामी आणि देव हा सेवक आहेत असाच होतो ना ? भक्तांची सेवा विश्वचालकानं करावी हे दृश्य पाहून कुणाच्याही डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहतील असंच नाही का ?

पंढरीच्या विठ्ठला, तू म्हणजे श्रीकृष्णाचं बालरूप आहेस. तुझं दर्शन घेतलं की गोकुळातल्या तुझ्या अनेक लीला दृष्टीसमोर येतात. दह्यादुधांची चोरी हा तर तुझा नित्याचा छंद होता. गोकुळात असं घर नसेल की जिथं तू सवंगड्यांसमवेत चोरून लोणी खाल्लं नाहीस. थोडा मोठा झालास आणि मग गोपिकांची वात्रटपणानं चेष्टामस्करी करू लागलास, बासरीतल्या गोड सुरात त्याना गुंतवून ठेवू लागलास.

तुझ्या मुरलीनं राधेची तहानभूक हरली. प्रपंचाची हौस विरली. तुझ्या गुणरूपात मुरून जाण्याची इच्छा तिच्या अंगांगांत भरली. मुरलीच्या व्याकुळ, प्रणयी आलापांनी सारं गोकुळ तू वेडं केलंस. भले भले शहाणे पाहता पाहता तुझ्यासाठी वेडे झाले. परमेश्वराचं वेड लागावं यासारखी दुसरी शहाणपणाची गोष्ट कोणती ? शेकडो वर्षं, हजारो वर्षं तुझ्या दर्शनासाठी भाविकांची पाउलं पंढरीकडं वळतात ते उगीच नाही. विठ्ठला, तुझ्यात वेड लावण्याचं जबरदस्त मोहन आहे यात शंका नाही. संत जनाबाईनं तर

पंढरीच्या पेठे मांडियेले पाल। मनगटावर तेल घाला तुम्ही।
जनी म्हणे देवा मी झाले येसवा। निघाले केशवा घर तुझे॥

तिचे हे उद्‌गार भलतेच धिटाईचे, काहीसे अविनयाचेही आहेत. पण तुझं वेड लागल्यावर भक्त सारे शिष्टाचार विसरून जातो. मीरेच्या पायातली घुंगुरं तुझ्याच प्रेमानं नाचत होती. तिच्या हातातल्या एकतारीवर तुझ्याच प्रीतीचं गीत वाजत होतं. विवाहित असलेली ही राजघराण्यातली राजकन्या पतीला सोडून रात्रंदिवस तुझंच ध्यान करीत होती. आपल्या घराण्याच्या प्रतिष्ठेची तमा न बाळगता तुझी मूर्ती हृदयात धारण करून तिनं साऱ्या मेवाड प्रांतात आपल्या गीतातून भक्तिप्रेमाच्या अमृतधारांचा वर्षाव केला. 'मी श्याम विकत घेतला आहे. काळा असो की गोरा असो त्याच्यासाठी मी आयुष्याचं मोल दिलं आहे.' असं ती म्हणत होती. तुझी पूजा करतानाच केव्हातरी तुझ्या रूपात ती विलीन झाली. हे विठ्ठला, भक्तवत्सला, देवकी आणि यशोदेच्या नंदना, राधेच्या आणि मीरेच्या वल्लभा, द्रौपदीच्या बांधवा, अर्जुनाच्या सख्या, तुझ्या भोवती असंख्य स्त्री-पुरुष का प्रदक्षिणा घालतात ? त्यातून त्यांच्या पदरात काय पडतं ? रुक्मिणीच्या विठ्ठला, चंद्रभागा कधी कधी आटते पण तुझ्या विषयीच्या प्रेमाची भक्तांच्या मनातली चंद्रभागा मात्र कधीच आटली नाही. तिचा ओघ अखंड चालू आहे.

हे पंढरीच्या दैवता, मेघश्याम विठ्ठला, तुझ्या क्षणमात्राच्या दर्शनासाठी लक्षावधी लोक तहानभूक विसरून रांगेत उभे असतात. परवा शंभरी जवळ आलेला एक जराजीर्ण म्हातारा काठी टेकीत टेकीत तुझ्यासमोर उभा राहिला. त्यानं आपलं मस्तक तुझ्या पायावर ठेवलं आणि मग तो आनंदानं रडू लागला. त्याला मी कारण विचारलं तेव्हा तो म्हणाला, 'पंधरा दिवस चालत चालत ह्या इट्टलाच्या पायावर डोस्कं ठेवायला आलो. त्याचे पाय दिसले. माजं जगनं सफळ झालं. आता कवा

बी मरणानं मला बोलवावं. इट्टलाच्या दरसनानं धा हत्तीचं बळं माज्यात आलंय. 'मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास । कठीण वज्रासी भेदू ऐसे ॥' असं तुकोबांनीच म्हणलंय. आता कळिकाळाची डर नाही.' त्याचे हे उद्‌गार ऐकून मी अंतर्बाह्य रोमांचित झालो. मृत्यूपूर्वी तुझं जीवनदायी दर्शन व्हावं म्हणून तो पार खचलेला, सुरकुतलेला म्हातारा शेकडो मैलांवरून चालत येतो काय आणि तुझं दर्शन झाल्याबरोबर मूर्तिमंत मरणाला आव्हान देतो काय ? सारंच आश्चर्यकारक आहे. विठ्ठला, तुझी कृपा असेल तर वाळवंटातही नंदनवनाचं हिरवं गार वैभव फुलेल. तुझी इच्छा असली तर हे लक्ष्मीच्या नारायणा, पार वठून गेलेल्या खोडाला देखील कोवळी पानं फुटतील अशा अर्थाचं एक सुभाषित मी वाचलं आहे. आज त्या म्हाताऱ्याचा आनंद आणि उत्साह पाहून हे सुभाषित मला आठवलं. कसलं सामर्थ्य तुझ्यात आहे ? बुद्धिवादानं हे कोडं काही उलगडत नाही. तुझ्या नादी लागलेल्या किती भक्त कवींचा उल्लेख करू ? ज्या चोखामेळ्यानं तुझ्या मंदिरात कधीही पाऊल टाकलं नव्हतं आणि जो तुला जन्मात कधी प्रत्यक्ष पाहू शकला नाही तो तुला आपल्या हृदयाच्या डोळ्यांनी पाहून म्हणतो,

लावण्याचा गाभा त्रैलोक्याची शोभा । विटेवरी उभा पंढरीये ॥
पाउले गोजिरी श्रीमुख शोभले । ध्यान मिरवले भिमातीरी ॥
वैजयंती माळा किरीट कुंडले । परिधान केले पीत वस्त्र ॥
चोखा म्हणे ऐसा लावण्यपुतळा । तो आम्ही देखिला दृष्टीभरी ॥

भक्तांच्या दृष्टीनंच तू लावण्याचा पुतळा आहेस. काही भक्तांना तू माऊली वाटतोस काहींना तू शीतळ साउली वाटतोस. तुकोबांच्या अभंगांतही 'केव्हा भेटसी केशवा ?' अशी आर्त हाक आहे. सावतामाळी तर 'कांदा मुळा भाजी, अवघी विठाबाई माझी' असं म्हणून तुझ्या नावानं भावभक्तीचा मळा फुलवतो. गोराकुंभाराची गाडगीमडकी तुझ्याच भजनाच्या रंगात आकार घेतात. सोनार, शिंपी, माळी, न्हावी, परीट, शेतकरी आणि कष्टकरी सर्व जातीतल्या सामान्यातल्या सामान्य माणसालाही तुझा छंद लागतो. तू श्रीमंतांचा आणि सरंजामदारांचा देव होण्यात धन्यता मानीत नाहीस. श्रमिकांच्या निढळाचा घाम तुझ्या पायावर सांडला की तुझा खरा अभिषेक होतो. तुझे भक्त नुसते टाळमृदंगात रंगत नाहीत. तुझे गोड नाव घेताना त्यांचे हात शेतात खपत असतात. कारखान्यात काम करीत असतात. मनात तुझी मूर्ती ठेवून कष्ट करणारी असंख्य जनता तुलाच देव मानते. 'विठ्ठला',

'गोविंदा' हा मंत्र म्हणत म्हणत आपल्या आयुष्याची वाट ते चालत असतात. तू भांडवलवाल्यांचा देव नाहीस. सामान्यांच्या जीवनात आनंदाचा मळा पिकवणारा त्यांचा देवाधिदेव आहेस.

विठ्ठला, तुझ्या प्रेरणेनं ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी' महाराष्ट्राच्या भूमीत उदयाला आली. या कल्पलतेला आलेल्या अगणित फुलांचा सुगंध गेली सातशे वर्षं मराठी मन आणि मराठी संस्कृती संपन्न करीत आहे. भागवतधर्माचं मंदिर तुझ्यामुळं उभं राहिलं. पाया ज्ञानेश्वरानं रचला तर तुकोबा या मंदिराचा कळस झाला. तुझ्या भक्तीचे वीणाझंकार भारतातल्या सर्व भाषांत पसरले आहेत. भिन्न भिन्न भाषेचे आणि प्रदेशाचे लोक तुझ्या दर्शनासाठी पंढरीत येतात. इथल्या बाजारपेठेत त्यांना आध्यात्मिक आनंद विनामूल्य मिळतो. या अमोल आनंदाच्या वातावरणात या लक्षावधी भक्तांचं अंतःकरण तृप्त होतं. या भक्तीच्या मळ्याला कोणतंही कुंपण नाही. ज्या तुझ्या पायावर ज्ञानेश्वराचं मस्तक टेकलं त्याच पायावर आजचा एखादा चोखामेळा आणि सोयराबाई आपलं मस्तक टेकवते. विठ्ठला, तुझे पाय सर्वांचेच आहेत. समतेच्या आणि ममतेच्या या पायावर नवा समाज उभा राहू शकेल अशी आशा करू का ?

पंढरीच्या विठ्ठला, आज तुझ्याशी मला नुसता संवाद करायचा नाही. थोडा वादविवादही करायचा आहे. माझंही एक गाऱ्हाणं आहे. तुझ्या नुसत्या दर्शनानं मी संतुष्ट होणार नाही. कारण माझ्या ठिकाणी भाबड्या मूर्तिपूजकाची भाविकता नाही. तू सर्वसमर्थ आहेस आणि अन्यायाचं निराकरण करून न्यायाची गुढी तू उभी करतोस ही पोथ्या-पुराणातली वचनं मी वाचली आहेत. हरिदास पुराणिकांच्या तोंडून पुष्कळ वेळां ऐकली आहेत. पुराणकथांत आता मी रममाण होऊ शकत नाही. आजचं भयानक वास्तवजीवन तू तटस्थपणानं पाहात कां उभा आहेस ? हिंसा आणि रक्तपात, जाळपोळ, बलात्कार, प्रचंड भ्रष्टाचार, धर्माच्या नावाखाली निरपराध लोकांचे जीव घेण्याची दुष्ट प्रवृत्ती यांचा नंगा नाच आमच्या देशात, साऱ्या जगात चालू आहे. तो अलिप्तपणानं तू केवळ पाहात राहाणार आहेस काय ? ज्या जगात तुझ्यासारखा प्रेमस्वरूप परमेश्वर आहे त्या जगाला अनिवार हिंसेच्या वणव्यात होरपळून निघावं लागत आहे. जनाबाईची प्रार्थना ऐकून तू वैकुंठातून धावत येतोस. आज अन्यायाच्या चरकात पिळल्या जाणाऱ्या गरीब जनतेच्या किंकाळ्या तुला ऐकू येत नाहीत असं म्हणावं काय ? आता आमचा अंत पाहू

नकोस. काहीतरी रोकडी प्रचीती दाखव. तूच कुरुक्षेत्रावर अर्जुनाला सांगितलं होतंस.

'साधूंच्या रक्षणासाठी आणि दुर्जनांच्या निर्मूलनासाठी, धर्माचा प्रकाश पसरवण्यासाठी मी प्रत्येक युगात जन्म घेईन. जेव्हा जेव्हा अधर्माचा, अनीतीचा अतिरेक होतो तेव्हा तेव्हा मी जन्म घेऊन जगाची घडी व्यवस्थित बसवीन.' या प्रतिज्ञेची तुला पुन्हा पुन्हा आठवण करून द्यावी लागणार आहे का ? तू सर्व पाहू शकतोस, सर्वकाही जाणू शकतोस. ज्ञान आणि सामर्थ्य यांचं तर तू उगमस्थान आहेस. असं असताना या देशातली बेबंदशाही वाढत चालली आहे. आजचा माणूस सर्व पवित्र मूल्यं बेदरकारपणे पायाखाली तुडवीत आहे. माणुसकी दुर्मिळ झाली, पावलोपावली राक्षसी वृत्तीचं दर्शन मात्र घडत चाललं आहे, अनेक देवस्थानांना बाजाराचं रूप आलं आहे. देवाच्या दर्शनालाही पैसा मोजावा लागतो. काही तीर्थक्षेत्रात देवदर्शनही काळ्या बाजारात विकलं जातं. पाचशे रुपयांची नोट पुजाऱ्याच्या हातावर ठेवली की देवदर्शनाचं पुण्य पदरात बांधून घेता येतं. याचा अर्थ पैशाच्या बळावर देवाचीही खरेदी करता येते. विठ्ठला, तुला हे सांगताना मला दुःख होतं. समाजजीवनात आलेली ही अभद्रता, हा किळसवाणेपणा दूर करणं तुझ्याच हाती आहे. तुझं सौम्य आणि सुंदर रूप सोडून तू आता उग्र हो. रुद्र हो. ते सुदर्शन चक्र हातात घे. आणि ज्यांचे हात निष्पाप मानवी रक्तात बरबटलेले आहेत त्यांची पापी मस्तकं छेदून टाक. दुष्टांचा नाश करण्यासाठी तुझीच दैवी शक्ती आजच्या जगाला आवश्यक आहे. पुंडलिकानं दिलेल्या विटेवर आता स्वस्थ उभा राहू नकोस.

सज्जनांच्या प्रतिपालका, दुर्जनांच्या विध्वंसका, कालच्या महाभारतात द्रौपदीला भर दरबारात विवस्त्र करण्याचा नीच प्रयत्न करणाऱ्या दुःशासनाची छाती भीमानं तुझ्याच प्रेरणेनं गदाप्रहारानं फोडली. त्याचा पातकी हात तुझ्याच इच्छेनं त्यानं मुळापासून उखडून टाकला. धर्माचं राज्य तुझ्या वरदानानं प्रस्थापित झालं. आजही तुला हेच कार्य करावं लागणार आहे. अनेक दुर्योधन आणि दुःशासन यांचा निःपात करण्यासाठी हे कृष्णविठ्ठला, पुन्हा हातात सुदर्शनचक्र घे. अनेक रावणांच्या वधासाठी रामस्वरूप असलेल्या विठ्ठला, धनुष्यबाण हाती घे. हिरण्यकश्यपूचे पोट फाडण्यासाठी नरसिंहाचा पुन्हा अवतार घे. आपल्या देशाच्या सीमेवर अनेक हिरण्यकश्यपू टपून बसले आहेत. इथल्या संस्कृतीचं विच्छेदन

करण्यासाठी राक्षसी सेना सीमेवर गोळा होत आहेत. आणि देशातच काही घरभेदे, अंतर्गत शत्रू भ्रष्टाचारी मार्गाचा अवलंब करून गरीब जनतेचं शोषण आणि भक्षण करीत आहेत. कित्येक मंत्री आणि अधिकारी एअरकंडिशण्ड गाड्यांतून कर्तव्यभ्रष्ट होऊन ख्याली खुशालीनं हिंडत आहेत. सत्ता आणि संपत्ती यांच्या नशेनं मस्तवाल झालेल्या आणि जनतेच्या पैशावर चरत राहिलेल्या या लांडग्यांच्या टाळक्यावर लगुडप्रहार करणारा तुझा दैवी हातच आता या देशाला वाचवू शकेल. आरतीपासून महापूजेपर्यंतचे ते सोहळे आता काही दिवस थांबले तरी चालतील. पुन्हा एकदा न्यायी मूल्यांचा ध्वज या आमच्या देशात फडकत ठेव. हे मागणं आम्ही तुझ्याकडं मागायचं नाही तर कोणाकडं हात पसरायचा ? तूच आमची भाषा समजू शकतोस. भक्त कबीरानं म्हटलं आहे 'मुंगीच्या पायातल्या नुपूरांचा आवाजदेखील तुला सहज ऐकू येतो. जनतेच्या आक्रंदनाचे सूर तुझ्या कानापर्यंत निश्चित पोहचत असतील. आता तटस्थपणा सोडून दे. श्रीरामाचा बाण, श्रीकृष्णाचं चक्र, भीमाची गदा, साधूंच्या तपाचं तेज, सूर्याच्या ठायी असलेली आग याचं रसायन करून हे विठ्ठला तू दुष्टत्वावर आणि अनीतीवर विजेच्या वेगानं तुटून पडावंस.

माझं एकच स्वप्न आहे ते केवळ तूच आपल्या अलौकिक सामर्थ्यानं साकार करू शकतोस. या भूमीवर शांती आणि प्रेम यांचे मळे फुलावेत. शौर्य-धैर्याची कुंपणं मळ्याभोवती संरक्षणासाठी असावीत. बालकांच्या गालावर कोवळं स्मित विलसत राहावं, त्यांना पोटभर दूध मिळावं. केवळ कुपोषणामुळं आपल्या देशात लक्षावधी बालकांना उपासमार, रोगटपणा आणि मृत्यू यांचा विळखा पडतो. लक्षावधी बालकांना शाळेचा उंबरठाहीं दिसत नाही. पुढे जन्मभर कशीबशी ती जगत असतात. बालवर्गात जायलाही त्यांना संधी मिळत नाही. आणि शिक्षणासाठी परदेशात कित्येक भाग्यवान मुलं जाऊ शकतात. ही भयानक विषमता, अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, नोकरी सर्वच बाबतीत पाहिल्यानंतर मन उद्विग्न होतं. उष्ट्या पत्रावळी गोळा करणारी, फेकून दिलेली, शिळे, बुरसटलेले खाद्यपदार्थ मिळवण्यासाठी भांडणारी भुके कंगाल मुलं आणि माणसं जेव्हा दिसतात तेव्हा रंजल्या गांजल्यांना परमेश्वर पोटाशी का धरीत नाही असा प्रश्न पडतो. याहून पुढचा प्रश्न म्हणजे विठ्ठला, नारायणा, तू खरोखरच आस्तित्वात आहेस का ईश्वर हा केवळ मानवी बुद्धीचा विलास आहे ? तू अस्तित्वात आहेस असं आमच्या श्रद्धाळू मनाला वाटतं. तुझ्या अस्तित्वाच्या काही सुंदर पाउलखुणा आम्हाला पाहायला

मिळतात. सागरावर उंचबळणाऱ्या प्रत्येक लाटेत तुझंच चैतन्यरूप सामावलेलं आहे. तूच आहेस फुलातला सुगंध. तूच गातोस जीवनाचं गीत हिरव्यागार सळसळत्या पानांतून. ज्ञानेश्वराच्या मुखमंडलावर तुझंच हास्य आहे. तुकोबांच्या प्रत्येक अभंगातून तूच दर्शन देतोस. तू नसतास तर ही फुलं फुलली असती का ? ही मुलं हसली खिदळली असती कां ? हे अथांग आकाश निळंभोर राहिलं असतं का ? नद्या वाहिल्या असत्या काय ? हे प्रश्न कदाचित नास्तिकांना भोळसटपणाचे वाटतील. नास्तिकांच्याही बुद्धीला तूच आकार देतोस असं आस्तिक म्हणतात. मी कधी कधी तुझ्याबद्दल शंकित होतो. आहेस की नाहीस या शब्दांची माळ जपत बसतो. पण हजारो वर्षांपासून माणूस तुझी वेगवेगळी रूपं चित्रित करून मनःशांतीसाठी तुझ्या चरणांवर मस्तक ठेवीत आला आहे. अनेक ज्ञानवंतांनी, आचार्यांनी, तत्त्ववेत्त्यांनी, साधुसंतांनी तुझंच ध्यान केलं आहे. तू आहेस म्हणूनच तुला उत्कटतेनं सांगतो की हे समाजजीवन शुद्ध आणि स्वच्छ करण्याची बुद्धी आम्हाला दे. सारं काही तूच करावंस असं आमचं म्हणणं नाही. हे विठ्ठला,

प्रामाणिक कष्ट करणारे मजबूत हात दे. दृष्टीत नवी नवी स्वप्नं दे. आजचं अन्यायी, विषमतेवर पोसलेलं अभद्र जग आम्हाला बदलायचं आहे. म्हणूनच विठ्ठला, तुझ्यातल्या देवत्वाची ज्योत आम्हा सामान्य माणासांच्या अंतःकरणात तेवत ठेव. खरं सांगू ? विठ्ठल विठ्ठल असं चिंतन करताना आम्हालाही विठ्ठल व्हायचं आहे. यापेक्षा अधिक सांगत नाही. काही उणं अधिक बोललोही असेन. बोलण्याचा प्रसंग येतो म्हणूनच बोलणं भाग आहे. आता काहीतरी रोकडा अनुभव आम्हाला दे.

■■■

# तुकोबा आणि मी

संत तुकोबांचे अभंग वाचताना ते आपल्याशी बोलत आहेत असा अनेकांना भास होतो. खरे तर हा भास नसतो. ते एक वास्तव असते. कवी आपल्या काव्यातून वाचकांशी सतत संवाद करीत असतो. चित्रकाराची कुंचलीही बोलकी असते, त्याने रेखाटलेली चित्रे, त्यातले रंग रसिकांना भेटून आपले मनोगत सांगत असतात. संगीतकार आपल्या स्वरातून मनातली भावनिक खळबळ व्यक्त करतो. नर्तकीच्या पायातली घुंगुरेदेखील आपले भाव प्रेक्षकांपर्यंत पोहोचवतात. वेलीवरची फुले बोलतात. सागरावरच्या लाटाही खळखळून हसतात. आणि आपली उचंबळती भावना प्रकट करतात. आकाशातली नक्षत्रे, उगवत असलेला सूर्य, स्वैर वाहाणारा वारा सारेच बोलत असतात. यात चमत्कार वगैरे काही नाही. ऐकायला कान आणि विशेषतः मन असावे लागते. तुकारामबीजेच्या दिवशी मी गाथा उघडून त्यातले अभंग वाचू लागलो. अभंगातून तुकोबा मनसोक्त बोलले आहेत. काही कडू तर काही गोड. आपल्या घरातल्या वडीलधाऱ्या माणसाने प्रेमाने, वात्सल्याने आणि क्वचित रागावून बोलावे आणि पुन्हा पाठीवरून मायेने हात फिरवावा तसे तुकोबांचे बोलणे आहे. प्रत्येक अभंगातून ते आपल्याशी बोलत राहिले आहेत. एक अभंग मी वाचत होतो,

जाऊनिया तीर्था काय तुवा केले ।
चर्म प्रक्षाळिले वरी वरी ॥
अंतरीचे शुद्ध कासयाने झाले ।
भूषण त्वा केले आपण या ॥
वृंदावन फळ घोळिले साकरा ।
भीतरील थारा मोडेचिना ॥
तुका म्हणे नाही शांति क्षमा दया ।
तोवरि कासया फुंदा तुम्ही ॥

हा अभंग वाचताना एकाएकी खोलीत प्रकाशाचा एक किरण आला. आणि

त्यातून स्वतः तुकाराम महाराज हसत हसत अवतीर्ण झाले. मला म्हणाले, 'मी वैकुंठवासी असलो तरी या जगात काय काय चालले आहे ते पाहाण्यासाठी असा मधून मधून येतो. तू माझा अभंग मोठ्याने वाचत होतास तो कानावर आला. म्हटले चला एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर कुणीतरी आपला अभंग म्हणत आहे तर त्याची भेट घेऊ.'

तुकोबा प्रसन्न दिसत होते. हातात वीणा होती. वैकुंठातही त्यांनी आपल्या वेषभूषेत काहीच फरक केला नव्हता. मी त्यांना म्हणालो, 'महाराज, एकविसाव्या शतकाचा आपण उल्लेख केला. आता हे जग मॉडर्न झालं आहे. तुमची ही जुन्या काळातली वेषभूषा या नव्या काळाशी विसंगत आहे. एखाद्या ऑफिसात तुम्ही गेलात तर तिथला प्यून तुम्हाला आत येऊ देणार नाही. सध्या माणसं सुटाबुटात असतात. बुटाला पॉलीश असतं. पँटला इस्त्री असते. कपड्यांवर सेंटचा फवारा मारलेला असतो. लोक मोटरसायकलवरून फिरतात. इंपोर्टेड सिगरेटचा धूर सोडतात. आता ते तुमची मराठी भाषा बोलत नाहीत. देहूची भाषा सध्या महाराष्ट्रात चालत नाही. इंग्लंड-अमेरिकेतली साहेबी भाषा आणि साहेबी रीती-रिवाज हे आजच्या मॉडर्न युगाचं लक्षण आहे. सध्या आईला कोणी आई म्हणत नाही. सगळा मम्मी-डॅडीचा कारभार आहे. तरी बरं अजून तुम्ही आमची फाइव्ह-स्टार हॉटेलं पाहिली नाहीत. तिथलं वातावरण कसं पॉश असतं. पॉश माणसं - पॉश भाषा.'

तुकाराम महाराज खळखळून हसले, 'पांडुरंग-पांडुरंग' असा उद्‌गार त्यांनी काढला. आणि मला म्हणाले,

'अरे वेड्या, पँट आणि कोट हे शिंप्याचं कौशल्य. कपड्यांना केलेली इस्त्री ही परटाची कमाई. हे कपडे घालणाऱ्या माणसाचं काय ? सेंटचा फवारा मारला म्हणजे कपडे सुवासिक होतात. घाणीनं बरबटलेलं मन स्वच्छ होतं का ? 'नाही निर्मळ जीवन काय करील साबण ?' बुटाला पॉलीश असेल पण मनाला पॉलीश नसेल तर माणूस म्हणजे सुटाबुटातलं जनावर नव्हे का ? 'तुका म्हणे ऐशा नरा, मोजूनि माराव्या पैजारा' आईची भाषा सोडून लंडनच्या बाईची किंवा दाईची भाषा तुम्ही डोक्यावर घेतली म्हणून काय झालं ? भाव चांगला नसेल तर अलंकारिक भाषेला काय अर्थ ? या बाबतीत माझी आणि तुमच्या शेक्सपिअरची पुष्कळ चर्चा झाली आहे. बाह्य गोष्टींना तुम्ही महत्त्व देता. अंतरंग मात्र विसरून

जाता. शरीर पोसण्यासाठी पक्वान्नं खाता आणि आत्म्याला मात्र उपवाशी ठेवता. हे तुमचं मॉडर्न युग ! इंग्लड-अमेरिकेचं आंधळं अनुकरण करता. अरे, ज्यांचं अनुकरण करावं अशी आकाशाएवढी माणसं आमच्या देशात कितीतरी होऊन गेली. मी जिथं स्वतःला 'अणुरणिया थोकडा। तुका आकाशाएवढा।' असं म्हणतो तिथं ज्ञानोबाला, नामदेवाला, शिवाजी महाराजांना आणि पूर्वी होऊन गेलेल्या रामकृष्णांना कशाची उपमा देऊ ? हिमालयाएवढी उंची असलेली आणि गंगाजळासारखी स्वच्छ माणसं या आमच्या भारतदेशात झाली. त्यांना विसरू नका. तुमचा तो कोण क्लिंटन का फ्लिंटन त्याचा आदर्श समोर ठेवणार का ? वैकुंठात आम्हाला जगातल्या सगळ्या बातम्या कळतात. क्लिंटनचं वागणं आम्हाला मुळीच आवडलं नाही. 'नाठाळाचे काठी देऊ माथा।' 'पराविया नारी रखुमाई समान। हे गेले नेमून ठायीचे चि।' आमच्या देशात देखील परस्त्रीचा अभिलाष धरून तिच्यावर अनैतिक व्यवहार लादणारे दुष्ट लोक थोडे नाहीत. अशा नराधमांचे तोंड फोडले पाहिजे. देव्हाऱ्यावर विंचू आला तर प्रथम त्याला पायताणाने ठेचले पाहिजे. अधमासी तो अधम लावून दिला पाहिजे. नारू झाला तर तिथं कापूर लावून काय होणार ? तिथं बिब्बा घातला पाहिजे.'

तुकाराम महाराज संतापाने बोलत होते. पण हा एका संताला आलेला संताप होता. संतांचा संताप हा देखील जगाचे कल्याण करू शकतो. दुष्टाचा संताप मात्र सर्वनाश घडवून आणतो. तुकोबांनी राजनीती आणि सामाजिक नीती लोककल्याणकारी असावी, हा भाव स्पष्ट केला. मी मंत्रमुग्ध होऊन ऐकत होतो. संतवाणी कानावर पडत होती. स्वार्थी आणि ढोंगी लोकांचे अलंकारिक मुलायम शब्दसुद्धा किळसवाणे वाटतात. पण तुकोबांच्या संतप्त आणि धारदार शब्दांतून त्यांचे निर्मळ अंतःकरण प्रकट होत होतं, मी तुकोबांना एक प्रश्न विचारला, ''महाराज, आपण कित्येक वेळा अनूपार्लमेंटरी बोलता असा आपल्यावर काही 'सोज्ज्वळ' मंडळी आक्षेप घेतात. उदाहरणार्थ 'तुका म्हणे त्याचे हाणोनी फोडा थोबाड', 'जळो त्याचे तोंड। काय त्यांसी रांड प्रसविली।' हे आणि अशाप्रकारचे शब्द सभ्यतेच्या व्याकरणात बसत नाहीत. आपण सौम्य बोलत नाही. एखाद्या वेळी शिवीदेखील देता. हे योग्य नाही. ही पार्लमेंटरी भाषा नाही. असं काही टीकाकारांचं म्हणणं आहे. याबाबतीत आपली भूमिका काय आहे ?'' तुकोबांनी आपल्या गळ्यातली वीणा खाली ठेवली. ते पुन्हा उद्गारले, 'पांडुरंग-पांडुरंग'

आणि हसत हसत म्हणाले, ''पार्लमेंटरी भाषेबद्दल काय बोलणार ? तुमच्या पार्लमेंटमध्ये काय चालतं ते तुम्हाला माहीत नाही. मारामारी, गुद्दागुद्दी, खुर्च्यांची आणि माईकची फेकाफेक, कोणालाही बोलू न देणे, सभापतीच्या अंगावर धावून जाणे हे जर सर्व 'पार्लमेंटरी' असेल तर माझी भाषा 'अनूपार्लमेंटरी' आहे असे म्हणण्याचा टीकाकारांना काय अधिकार आहे''

'आम्हां हे कौतुक जगा द्यावी नीत। करावे फजित चुकती ते।'

जे अनीतीने वागतात त्यांना धडा शिकवण्यासाठी भाषा देखील त्यांना समजेल अशीच योजावी लागते. पोटातला रोग बरा व्हावा म्हणून मी कडूनिंबाचं औषध देतो तिथे साखरेचा उपयोग नाही. भला भेटला तर कासेची लंगोटीदेखील त्याला मी देईन. पण दुष्ट भेटला तर त्याचा कपाळमोक्षच केला पाहिजे. सज्जनांचं रक्षण आणि दुर्जनांचं निर्दालन ही खरी नीती आहे. गायीगुरांच्या चाऱ्यात घोटाळे करून स्वतःची तुंबडी भरणारे गुंड आणि पुंड हेच तुमच्या पार्लमेंटचे सभासद असतात ना ? वैकुंठात आम्हाला सर्व कळतं. 'झाडू संतांचे मारग' हे आमचं ब्रीद आहे. याचसाठी आम्ही वैकुंठवासी इथं येतो. आडरानात भरलेलं जग स्वच्छ करायचं असेल तर भाषा आणि कृती दोन्ही कणखर पाहिजे. आम्ही व्याकरणापेक्षा अंतःकरणाला महत्त्व देतो. 'अंतरी निर्मळ वाचेचा रसाळ। त्याचे गळा माळ असो नसो।' अरे शिवप्रभूंच्या राज्यात गुंडपुंड तडीपार झाले होते. तोंडे लपवून बसले होते. आता तुमच्या राज्यात - तुम्ही याला डेमॉक्रसी म्हणता ना. ह्या डेमॉक्रसीत गुंडांची भरती झाली आहे. तुम्ही जाळपोळ करता, बॉम्बस्फोटात माणसे मारता, दलितांची कत्तल करता, लाच खाऊन गबर होता. आणि त्याला तुम्ही डेमॉक्रसी म्हणता. तुमची डिक्शनरी बदलली आहे. द्रौपदीचा पदर ओढणाऱ्या दुःशासनाला भीमाने शिवी दिली तर ती तुम्हाला 'अनूपार्लमेंटरी' वाटते. पदर ओढणे मात्र 'पार्लमेंटरी' असते ! 'पांडुरंग-पांडुरंग', बरं झालं मी लवकर वैकुंठाला गेलो. त्या चांगदेवाप्रमाणं मला चौदाशे वर्षे विठ्ठलाने इथं ठेवलं नाही ही त्याची कृपा आहे. पण वैकुंठात देखील तुमच्या इथल्या करणीमुळं आम्ही अस्वस्थ असतो. 'बुडता हे जन न देखवे डोळां। म्हणुनी येतो कळवळा फार।'

तुकोबांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. आपल्या धोतराने त्यांनी ते अश्रू टिपले. त्यांच्या बोलण्यातली तीव्र तळमळ माझ्याही मनाला भिडत होती. 'तुका म्हणे तोचि संत। सोशी जगाचे आघात। जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती। देह

कष्टविती उपकारे।' हेच खरे ! या महापुरुषाने लोककल्याण हेच आपले एकमेव ध्येय ठेवले होते. कर्मठांनी आणि अज्ञानी लोकांनी तुकोबांचा केवढा असह्य छळ केला. त्यांच्या अभंगांच्या वह्या इंद्रायणी नदीत बुडवून टाकण्याचे महान सांस्कृतिक कार्य दुष्टांनी केले. पण त्यांनाही तुकोबांनी क्षमा केली. क्षमा हे वीराचे भूषण असते. तुकोबा 'मऊ मेणाहूनी आम्ही विष्णुदास। फोडू कळिकाळाचे शिर।' या कोटीतले होते. मी त्यांना प्रश्न विचारला, 'महाराज, आपले अभंग नदीत बुडवण्यात आले तेव्हा आपल्याला काय वाटले ? प्रत्येक अभंगात आपली मूर्ती आहे. आपले अभंग हे जिवंत हृदयाचे हुंकार आहेत. आपल्या आत्म्याचा सुगंध या काव्यातून येतो. मराठी भाषा आपल्यामुळे श्रीमंत झाली. मराठी साहित्याचा कळस म्हणजे आपली अभंगवाणी आहे. जो अभंग वाचावा तो काळजात खोल जाऊन बसतो. आमचे अलीकडचे काही कवी चार तुटक्या शब्दांची कशीतरी जुळवाजुळव करतात आणि आपण महाकाव्य लिहिलं अशी शेखी मिरवतात. ढोंगी साधूबद्दल आपण म्हटलं आहे, गाजराची पुंगी तैसे झाले नवे जोगी। काय करोनि पठन केली अहंता जतन। अल्प असे ज्ञान अंगी ताठा अभिमान। हे वर्णन कवींना आणि लेखकांनाही जसंच्या तसं लागू पडतं. आपण महाकवी आहात. आम्ही अतिसामान्य लेखक. आपल्यापुढे आम्ही म्हणजे गजराजापुढे एखाद्या मशकासारखे आहोत.'

तुकोबांच्या दृष्टीपुढे अभंगांच्या वह्या नदीत बुडवण्याचा तो प्रसंग उभा राहिला. या संतकवीने आपल्या आयुष्याचा, साऱ्या तपस्येचा अर्क काढून अंतःकरणातल्या अश्रूंनी लिहिलेली महनीय कविता काही क्षुद्रात्मे बुडवून टाकताहेत ही घटना तुकोबांना मरणापेक्षा अधिक दुःसह वाटली. ते म्हणाले, 'मी जणू माझे प्राण त्या दुरात्म्यांच्या हातात दिले. त्यांना म्हणालो, तो जगच्चालक पांडुरंग माझ्या मनात आहे. कवीचं काव्य जाळलं तरी जळत नाही, बुडवलं तरी बुडत नाही. माझ्या काव्यात प्रत्यक्ष विठ्ठल आहे. जो विठ्ठल तुम्हाला तारतो त्याला तुम्ही बुडवायला निघालात. धन्य आहे तुमची ! उद्याचं जग तुकोबाचे अभंग गात राहील. अभंग बुडवणाऱ्याचं नाव मात्र शिल्लक राहणार नाही. तुम्ही बुडवणारे लोक एकदिवस माझे अभंग मस्तकावर घेऊन नाचणार आहात. वेड्यांनो, हे अभंग तुकोबांचे नाहीत ते साक्षात विठ्ठलाचे आहेत. मी फक्त लिहीत होतो 'बोलाविता धणी वेगळाचि.' अरे, 'धन्याचा हा माल मी तो हमाल भारवाही.' त्या परमेश्वरानं

माझ्या मनात झरा ठेवला कवित्वाचा. 'तुका म्हणे झरा आहे मूळचाचि खरा।' आज तू इथं माझी अभंगगाथा वाचत आहेस याचा मला आनंद वाटला. लक्षात घ्या, कविता कोणत्याही युगातली असो, कवी कोणत्याही काळातला असो, त्याचे शब्द जनकल्याणाच्या ऊर्मीतून उचंबळून आले असतील तर तो कवी आणि ती कविता अमर असते. ती दररोज आणि दरक्षणी नवीनच असते. वैकुंठात देखील मी ज्ञानदेवाची कविता गातो. नामदेवाची गातो. आमच्या साऱ्या ओव्या अभंगांच्या पाठीशी तो पांडुरंग उभा आहे. आम्हाला कोणाची भीती नाही. परमेश्वराने सांगितले, आम्ही लिहीत गेलो, आम्ही गात राहिलो. तुम्हीही जनताजनार्दनाची सेवा करा. बहुजनांच्या हितासाठी लिहा. मानपानासाठी अडून बसू नका. एक परमेश्वर आपल्याजवळ असला की जगातले सारे मानपान तुच्छ आहेत. तुम्ही साहित्यिक मंडळी पुरस्कार आणि पारितोषिकं मिळवण्यासाठी किती लटपटी करता, किती वशिले लावता, किती गाढवांचे पाय धरता हे पाहिल्यावर मला दुःख वाटते. आणखी काय सांगू ?'

तुकोबांच्या रूपाने 'आनंदाचा डोह' माझ्या घरी आला होता. त्यांना मी शेवटचा प्रश्न विचारला, 'महाराज, आम्हां पामरांसाठी संदेश द्या. आम्ही कोणत्या देवाला शरण जावे ते सांगा.' तुकोबा आपल्या अत्यंत मधुर स्वरात अभंग गाऊ लागले. ते म्हणाले,

'तुझे आहे तुजपाशी। परि तू जागा चुकलासी ॥<br>
देव आहे अंतर्यामी। व्यर्थ हिंडे तीर्थग्रामी।<br>
तीर्थी धोंडा आणि पाणी। देव रोकडा सज्जनी।

रंजल्या-गांजल्यांना पोटाशी धर. भुकेल्यांस अन्न दे. रोगपीडिताला औषध दे. जात-वर्ण आणि पंथ विसरून जा. 'भेदाभेदभ्रम अमंगळ' हाच माझा संदेश. 'आम्ही जातो अपुल्या गावा।' संतश्रेष्ठ तुकाराम वैकुंठाला गेले. पण मला अभाग्याला भेट देऊन भाग्यवंत करून गेले. मी प्रत्यक्ष तुकारामाला पाहिले. त्यांच्याशी बोललो. आणखी काय हवे आहे ?

■■■

# पुरोगामी की प्रतिगामी ?

मी एका चर्चासत्रासाठी मुंबईला गेलो होतो. मधल्या वेळेत भोजनाची व्यवस्था तेथीलच एका सुशोभित दालनात करण्यात आली होती. बुफे पद्धतीचे भोजन होते. शाकाहारी आणि मांसाहारी विविध पदार्थ ठेवण्यात आले होते. मी शाकाहारी पदार्थ एका थाळीत लागतील तेवढे घेतले आणि उभ्यानेच खायला सुरुवात केली.

माझ्या थाळीतले पदार्थ पाहून एकाने चिंतातूर स्वरात मला विचारले, 'चिकन का घेतलं नाही ? फारच टेस्टी झालं आहे. फिश् देखील रुचकर आहे. असलं रिच् फुड सोडून तुम्ही हे गवती पदार्थ काय खात बसलात ? आणू का थोडं चिकन तुम्हाला ?' मी त्याला म्हणालो, 'कोंबडी आणि मासा हे माझ्या खाण्याचे पदार्थ नव्हेत. मी पूर्ण शाकाहारी आहे.' माझ्या बोलण्याचे त्याला फारच आश्चर्य वाटले. तो म्हणाला, 'आत्ताच्या चर्चासत्रात तुम्ही कितीतरी पुरोगामी विचार मांडले. जेवणात तुम्ही इतके प्रतिगामी असाल असं मात्र मला वाटलं नव्हतं. आपण आधुनिक जगाचे घटक आहोत. खाण्यापिण्यात देखील आपण आधुनिक आणि पुरोगामी असलं पाहिजे. तुमचे विचार प्रगतिवादी आहेत पण आचारात इतका मागासलेपणा कसा ? चर्चासत्रातले बहुतेक सदस्य नॉनव्हेज् आवडीनं खातात. आपण बहुमताचा मान राखावा.' मला त्या 'पुरोगामी' गृहस्थाच्या युक्तिवादाचे हसू आले. बहुमताचा मान ठेवावा हा त्याचा विचार शिष्टाचाराच्या दृष्टीने ठीक असला तरी आपल्या अंतःकरणप्रवृत्तीला पटत नसेल तर तो स्वीकारणे कितपत योग्य आहे ? 'सत्य असत्यासी मन केले ग्वाही मानियेले नाही बहुमता' हा तुकोबांचा अभंग मला आठवला. स्वतंत्र विचारशक्ती नसलेले लोक प्रवाह - पतित असतात.

चिकन् आणि फिश् खाण्यात आधुनिकता कसली आहे ? प्राचीन काळापासून माणसे मांसाहार करीत आली आहेत. अगदी पुराणकाळात तर कच्चे मांस खात असत. आता एखाद्या एअरकंडिशंड् हॉटेलात सुबक डिशमध्ये ठेवलेले विविध मांसयुक्त पदार्थ काट्या-चमचाने तोडून खाल्ले म्हणजे मनुष्य आधुनिक

ठरतो असे मानायचे काय ? आधुनिक आणि प्राचीन किंवा पुढारलेला आणि मागासलेला हे शब्द सध्या आपण गाफीलपणाने वापरतो असे माझे मत आहे. कुंकू लावणे मागासलेपणाचे पण लिपूस्टिक लावणे मात्र अत्यंत पुरोगामीपणाचे असते असेही एक 'अपौरुषेय' मत आहे. साडी नेसणे खेडवळपणाचे ठरते पण चाळीस पन्नास वर्षांच्या तुंदिलतनू बाईने फ्रॉक घातला की ती एकदम पुढारलेली आणि आधुनिक ठरते हा काय चमत्कार आहे ? खरे तर जे आवडेल ते नेसावे. जे रुचेल ते खावे. जे पचेल तेच खावे. खाण्याला आणि नेसण्यालाही सांस्कृतिक पार्श्वभूमी असते. हा प्रश्न बहुमताचा नाही. आपल्या मताबद्दल आपण किती जागरूक आणि आग्रही आहोत याचा आहे. इंग्लंड, अमेरिकेचे तंतोतंत अनुकरण करणे म्हणजे 'मॉडर्न' असणे असे ज्यांना वाटते, त्यांना एखादी मॉडर्न शिवी देण्याशिवाय गत्यंतर नाही. कारण यांच्या डोक्यात 'माडर्न'आणि 'एन्शंट' या संज्ञांचा गोंधळ झालेला असतो. शाकाहारी माणूस कोणत्या अर्थाने प्रतिगामी ठरतो हे मला कळत नाही. माझ्या शेजारी भोजनाला बसलेला सुटाबुटातला माणूस चिकनसूप ओरपीत असेल तर मी माझ्या ताटातल्या ताकाच्या कढीचे भुरके तितक्याच आवडीने घेऊ शकतो. यात पुरोगामी आणि प्रतिगामी काय आहे ?

ते गृहस्थ मला पुन्हा सल्ला देऊ लागले, 'अहो, उद्या तुम्ही फॉरेन कंट्रीला गेलात तर तुमची अडचण होईल. 'जसा देश तसा वेष' या म्हणीप्रमाणं पाश्चात्य देशात पाश्चात्य पद्धतीचं अन्न घेतलं पाहिजे. तिथं, शाकाहाराचा आग्रह धरलात तर उपवास करावा लागेल.' हा सल्ला देखील निरर्थक होता. युरोप अमेरिकेत शुद्ध शाकाहारी लोक पुष्कळ प्रमाणात आहेत. मांसाहारापेक्षा शाकाहारच प्रकृतीला अधिक पोषक असतो ही जाणीव जगात सर्वत्र वाढत्या प्रमाणात आहे. आरोग्याच्या दृष्टीने शाकाहार अधिक श्रेयस्कर असतो असे विचार अनेक डॉक्टरांनी व्यक्त केले आहेत. सावरकरांनी म्हटले होते, 'काय खावे आणि कसे खावे हा प्रश्न धर्मशास्त्राचा नसून वैद्यकशास्त्राचा आहे.' त्यांचे मत सयुक्तिक आहे यात शंका नाही. पण धर्मशास्त्र वैद्यकशास्त्राप्रमाणे मर्यादित विचार करीत नाही. धर्माच्या दृष्टीने मांसाहार निषिद्ध मानला जातो. मला येथे धर्म आणि वैद्यक या संबंधात बोलायचे नाही. मांसाशन करण्यात पुरोगामीपणा आहे हा विचार कसा हास्यास्पद आहे इतकेच मी सांगू इच्छितो. भूतदया आणि माणुसकी यांच्या दृष्टीने पाहिल्यास मांसाशन कधीच समर्थनीय ठरत नाही.

एकदा एका गृहस्थाने बोकड कापण्याचे दृश्य पाहिले. त्या प्राण्याचा अंतकाळचा तो अत्यंत केविलवाणा आक्रोश आणि त्याची तडफड पाहून तो अतिशय अस्वस्थ झाला. रक्ताच्या थारोळ्यात असह्य वेदनेने तळमळणाऱ्या त्या मुक्या जिवाच्या डोळ्यांतली अगतिक भावना जणू त्याला विचारीत होती,

'माझा प्राण घेऊन तू आपल्या जिवाची चैन करणार. माझं मांस खाऊन तू आपलं मांस वाढवणार हीच का तुझी माणुसकी ?' त्या सद्‌गृहस्थाच्या डोक्यातून तो जीवघेणा देखावा जाईना. कुणाच्या तरी मृत्यूतून आपण आपलं जीवन फुलवावं, कुणाला तरी ठार करून त्याच्या मांसावर आपण चरत रहावं ही कल्पना त्याला सारखी टोचत राहिली. मांसाचे निरनिराळे रुचकर पदार्थ त्याला प्रिय होते. शाकाहारी मित्रांची त्याने कित्येक वेळा गवत खाणारे प्राणी म्हणून चेष्टा केली होती. मर्दाचा आहार सुद्धा मर्दपणाचा असावा हा त्याचा युक्तिवाद असायचा. पण ते दृश्य पाहिल्यानंतर त्याच्यात परिवर्तन झाले. सध्या तो शाकाहाराचा कट्टर पुरस्कर्ता बनला आहे. पण त्यामुळे तो पुरोगामी की प्रतिगामी अथवा आधुनिक की मागासलेला असला वाद करण्यात अर्थ नाही. शाकाहार करणारी सारीच माणसे दयाळू आणि धर्मनिष्ठ असतात असाही गैरसमज करून घेण्याचे कारण नाही. धार्मिक समजले जाणारे कित्येक व्यापारी आणि भांडवलवाले आपल्या ग्राहकांच्या गळ्यावरून सुरी फिरवून त्यांचे कसे 'अहिंसक शोषण' करतात हे सर्वांनाच माहीत आहे. 'मुखमे राम और बगलमे छुरी' हा धर्म मानणारे धार्मिक जगात कमी नाहीत. मला चिकनचा प्रेमळ आग्रह करणारे ते हितचिंतक सामिष आहार करताना वाइनचाही रसास्वाद घेत होते. याचा अर्थ ते फारच पुरोगामी व मॉडर्न होते. मी 'ऑर्थाडॉक्स' विचाराचा आहे असा त्यांनी माझ्यावर शिक्का मारलाच होता. दुपारच्या भोजनानंतर पुन्हा चर्चासत्राला सुरवात झाली. पुरोगामी आचार-विचारांचे अभ्यासक चिंतनासाठी मधून-मधून डोळे मिटत होते. चर्चा करतानाही त्यांचे शब्दोच्चार अडखळत होत आहेत असा मला भास झाला. कदाचित 'पुरोगामी विचारवंतांची' ती बोलण्याची पद्धती असावी.

सध्या पार्टीतले मद्यपान अत्यंत प्रतिष्ठितपणाचे मानले जाते. ज्या पार्टीत मदिरेच्या प्याल्यांचा किणकिणाट ऐकू येत नाही ती पार्टी अगदीच कोरडी, नीरस आणि मागासलेली समजायला हरकत नाही अशी परिस्थिती आहे. एका पार्टीत एका लेखकाचे अभिनंदन करण्यात आले. त्याच्या पुस्तकाला कसला तरी पुरस्कार

मिळाला होता. अभिनंदनाचा पुष्पगुच्छ स्वीकारताना त्याने पेयाला मात्र नम्रतापूर्वक नकार दिला. तेव्हा एक सोशलवर्कर म्हणाले, 'लेखक असून तुम्ही ड्रिंक्स् घेत नाही ही नवलाची गोष्ट आहे. पेय हे तर प्रतिभेला पोषक असते. त्याशिवाय तुम्हाला कल्पना कशा सुचणार ? जुन्या काळापासून कवी आणि कलावंत मदिरेचे भोक्ते आहेत. ही प्राचीन, पवित्र परंपरा तुम्ही मोडू नये. अहो, उमरखय्यामच्या प्रतिभेला मद्याच्या जादूने भरती येत होती. कालिदासाच्या मेघदूतात सुद्धा मदिरेचा रोमँटिक उल्लेख आहे. 'घ्या एक घोट या वारूणीचा आणि मग बघा तुमच्या लेखणीला आणि वाणीला कसं नवं तारुण्य लाभेल.' उगीच का तुमचे केशवसुत म्हणाले, 'काठोकाठ भरू द्या प्याला.' प्याला भरल्याशिवाय कलावंताची तहान भागत नाही.' तो लेखक बिचारा संकोचला. 'मला क्षमा करा' असे म्हणून लिंबूसरबताचा प्याला त्याने तोंडाला लावला. पार्टीचे संयोजक निराशेने म्हणाले, 'त्यांना अद्यापी पार्टीच्या मॅनर्स माहीत नाहीत. पूअर मॅन !'

खरे तर पिणे ही देखील प्राचीन काळापासून चालत आलेली गोष्ट आहे. फरक एवढाच झाला की आता दारूची बाटली आकर्षक स्वरूपात उच्चभ्रू लोकांच्या दिवाणखान्यात येऊन प्रतिष्ठित झाली. नाटक चित्रपटातल्या अनेक दृश्यांत, दूरदर्शनवरील कथाचित्रात तिला गौरवाचे स्थान मिळाले आहे. आधुनिक पॉश राहणीचे एक अविभाज्य अंग म्हणून दारूला (चुकलो ! दारू हा फारच ढोबळ शब्द झाला. मॉडर्न शब्द म्हणजे ड्रिंक्स् हाच योग्य आहे. भाषादेखील पुरोगामी असावी. रेवडी म्हणण्यापेक्षा चॉकलेट म्हणणे चांगले नव्हे का ?) मान्यता आहे. मद्य नाकारणारा आज खेडवळ किंवा मागासलेला ठरावा हा काळाचा महिमा आहे. ते घेणारा मात्र सुसंस्कृत मानला जावा हा विनोदच आहे. मद्याच्या संदर्भात मला नैतिक किंवा धार्मिक दृष्टिकोनातून काही बोलायचं नाही. संयमाने आणि रसिकतेने मद्याचा आनंद घेणारे रसज्ञ मी पाहिले आहेत आणि बेसुमार पिऊन शिवीगाळ करणारे दारुडेही आपल्याला पाहायला मिळतात. हा त्यांच्या वृत्तीतला फरक आहे. यात पुरोगामित्व किंवा प्रतिगामित्व असे काहीही नाही.

जीवन आनंदासाठी आहे. जीवनाचा उपभोग हळुवारपणे, रसदृष्टीने आणि सुसंस्कृतपणे घेता यावा. खाण्यात आणि पिण्यातही संयम नसेल तर आनंदाला आपण वंचित होऊ हा विचार महत्त्वाचा आहे. पौर्वात्य आणि पाश्चिमात्य दृष्टिकोनातले अंतर लक्षात घेतले पाहिजे. पु. ल. देशपांडे एकदा म्हणाले,

'पाश्चिमात्यांची द्राक्ष संस्कृती आहे. आपली मात्र रुद्राक्ष संस्कृती आहे.'

पुरोगामी आणि प्रतिगामी हे शब्द राजकारणात, समाजकारणात आणि अन्य क्षेत्रांतही सध्या सर्रासपणे वापरले जातात. पुरोगामी या शब्दाला बंडखोरीचा अर्थ चिकटला आहे. जुनाट आचार-विचारांच्या विरुद्ध बंड करून उठतो तो पुरोगामी म्हणजे पुढे जाणारा आणि जुन्या रूढींचे समर्थन करून परंपरेला हट्टाने चिकटून राहाणारा प्रतिगामी म्हणजे मागे जाणारा असे स्थूल अर्थ आहेत. साऱ्याच जुन्या संकेतांवर उतावीळपणे तुटून पडण्यात शौर्य भासले तरी सत् आणि असत् यांची पारख न करणारी विवेकबुद्धी नसते. जे जे जुने असेल ते ते जाळून टाका, हे विधान नाट्यमय वाटले तरी फसवे आहे. जुन्यातला सत्वार्थ घेऊनच नवे उगवत असते. परंपरेभोवती डोळ्यांना झापडे लावून घाण्याच्या बैलाप्रमाणे फिरणारी प्रवृत्ती ही मात्र प्रतिगामी असते. परिवर्तन आणि परंपरा यांचा समन्वय साधता आला पाहिजे. दुर्दैवाने दोन्ही टोके आवेशाने ओढली जातात आणि त्यातून वितंडवाद मात्र निर्माण होतात. खाण्या-पिण्याच्या गोष्टीबद्दल अखेर प्रत्येकाला आपल्या अभिरुचीप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य आहे.

मला कॉलेजात शिकवणारे बहुतेक प्राध्यापक सुटाबुटातले होते. टाय लावलेला असायचा. उत्तम शिवलेल्या सुटातली ही प्रोफेसर मंडळी रूबाबदार दिसायची. पण आम्हाला तत्त्वज्ञान हा विषय शिकवणारे एक प्राध्यापक गबाळ्या वेषात वावरायचे. पायात जाड वहाणा, इस्त्री न केलेला सदरा आणि सुरकुत्या पडलेले धोतर हा त्यांचा वेष असायचा! डोक्याचा गोटा केलेला. हे ध्यान पाहाताच पहिल्या दिवशी आम्ही विद्यार्थी कुचेष्टेने हसलो. त्यांची टर उडवली. विद्यार्थ्यांच्या मल्लीनाथीकडे दुर्लक्ष करून ते शिकवू लागले. विषयाचा उत्तम व्यासंग, भाषेवर प्रभुत्व, विचार व्यक्त करण्याची आकर्षक शैली, चांगली विनोदबुद्धी ही या माणसाची वैशिष्ट्ये आमच्या लक्षात आली. पोषाखावरून आम्ही त्यांना खेडवळ, मागासलेला समजण्याची चूक केली होती. एकदा त्यांना याबाबत विचारले असता ते हसून म्हणाले,

'माय डियर स्टुडण्टस्, जो पोषाख मला सोयीचा वाटतो तो करण्याचं स्वातंत्र्य मला आहे. माझा भारतीय पोषाख तुम्हाला खेडवळपणाचा वाटतो आणि पाश्चात्य ड्रेस मात्र अप-टु-डेट वाटतो. जे जे पाश्चात्य ते ते आधुनिक आणि जे जे पौर्वात्य ते सारं गावंढळपणाचं हे तार्किकदृष्ट्या किती चुकीचं आहे यावर नीट

विचार करा. अखेर खाण्या- पिण्याच्या पद्धती, पदार्थ, कपडेलत्ते यावरून माणूस प्रगतिवादी की प्रतिगामी हे ठरवणं उथळपणाचं आहे. मी स्वतः ईश्वर मानीत नाही. म्हणून मी पुरोगामी आणि बंडखोर आहे असा दावा कधीच करणार नाही. कारण ईश्वर न मानणारी हजारो वर्षांची एक परंपरा आपल्या देशातही आहे. ईश्वर मानणाऱ्याला मी अज्ञानी मानणार नाही. प्रत्येकाचा बौद्धिक पिंड आणि मनःप्रकृती काही संस्कारांनी, विचारांनी तयार झालेली असते. दृष्टिकोन भिन्न असतात. प्रत्येकाची प्रकृती एक असत नाही. हे एकदा लक्षात घेतलं की मग 'मनःपूतं समाचरेत्' असं म्हणायला हरकत नाही. केस ठेवणारा पुरोगामी आणि डोक्याचा गोटा करणारा प्रतिगामी किंवा सनातनी या समजुती निरर्थक आहेत.'

पंचतारांकित हॉटेलात बसून मद्याचे घोट घेणारा सुसंस्कृत आणि चाळीतल्या खोलीत हातभट्टी ढोसणारा असंस्कृत असे म्हणण्यात काय अर्थ आहे ? परंपरा आणि परिवर्तन, प्रगती आणि परागती यांची चिकित्सा कित्येक वेळा आपण अगदीच उथळ निकषांच्या आधाराने करतो. डोक्यावरचे केस वाढवणे प्राचीनही आहे आणि आधुनिकही आहे. हीच गोष्ट पूर्ण मुंडन करण्याच्या बाबतीतही लागू पडते. असो. मुंबईतल्या त्या चर्चासत्रात काही अभ्यासकांनी मला विचारदृष्ट्या पुरोगामी पण आचारांच्या बाबतीत प्रतिगामी ठरवले हे पाहून गंमत वाटली.

■■■

# हे आमचे लोकप्रतिनिधी !

आमच्या देशाच्या लोकसभेचे 'दर्शन' काहीवेळा 'दूरदर्शनवरून' येथे घडते. एखाद्या म्युनिसिपालिटीच्या बैठकीपेक्षा लोकसभा वेगळी नसते हे पाहून लोकशाही आणि लोकसभा यासंबंधी मनात जे भ्रम होते ते सगळे वितळून गेले. भारतासारख्या खंडतुल्य देशातली ही मध्यवर्ती सर्वोच्च संस्था आतून इतकी किडलेली दिसावी याचा खेद वाटला. कोणीही आपले विचार व्यक्त करायला उठला की विरोधी पक्षाचे प्रतिनिधी आरडाओरडा करून त्याच्या बोलण्यात अडथळे निर्माण करण्याचे पवित्र कार्य करीत होते. सभापतींनी काकुळतीला येऊन सदस्यांना शांत राहाण्याचे शेकडो वेळा आवाहन केले तरी शूरवीर लोकप्रतिनिधी त्याकडे निष्ठेने दुर्लक्ष करीत असत. सभापती नावाच्या प्राण्याची मला दया आली. सभापती होणे ही योगी माणसालाच जमणारी गोष्ट आहे. त्यांचे नावही 'बालयोगी' असेच होते. या बालकाचे कोण ऐकणार ?

लोकशाहीत कोणी कोणाचे ऐकत नसते. वाटेल ते बडबडण्याचे, मोठमोठ्याने निरर्थक घोषणा देण्याचे, एकमेकांच्या अंगावर धावून जाण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य म्हणजे लोकशाही ! ही लोकशाही प्रस्थापित व्हावी म्हणून तर लोकमान्य टिळक, महात्मा गांधी आणि सुभाषचंद्र बोस यांनी आमरण प्रयत्न केले. आता लोकसभेतली सदस्यांची 'सुसंस्कृत' कृती पाहाताना आणि त्यांची 'विचारसंपन्न' भाषणे ऐकताना टिळक-गांधी-बोस यांच्या आत्म्यांना परम आनंदाचे भरते येत असेल काय ? काही चमत्कार झाला असता आणि गांधीजी जर लोकसभेत अवतीर्ण झाले असते तर आपले अहिंसेचे व्रत विसरून कित्येक खासदारांना त्यांनी हातातल्या काठीचा प्रसाद दिला असता. पंडित नेहरू असते तर त्यांची गुलाबी मुद्रा अधिकच लालबुंद झाली असती. 'ये क्या तमाशा चल रहा है ?' अशी विचारणा करून या लोकशाहीच्या शिल्पकाराने पश्चात्ताप व्यक्त केला असता.

लोकसभेला बाजाराचे स्वरूप प्राप्त व्हावे याचा अर्थ आमची लोकशाही कुठे चालली आहे हेच यावरून लक्षात येते. लक्षावधी - नव्हे कोट्यवधी लोकांची

भाबडी समजूत अशी आहे की लोकसभेत उच्च वैचारिक पातळीवरून देशभक्तीने प्रेरित झालेल्या लोकप्रतिनिधींची लोकांच्या सुखदुःखांसंबंधी चर्चा होत असते. लोकसभेत सारे विचारवंत आणि लोकांची सेवा करण्यातच रात्रंदिवस मग्न असलेले कार्यकर्ते असतील. पण ही भयानक गैरसमजूत आहे हे आता वेळोवेळी सिद्ध झाले आहे. स्वातंत्र्य आणि लोकशाही हे शब्द गेल्या पन्नास वर्षांत आपला अर्थ आणि आत्मा गमावून बसले आहेत. लोकप्रतिनिधी म्हणून 'येन केन प्रकारेण' निवडून आलेल्या कित्येक खासदारांनी आणि आमदारांनी व मंत्र्यांनी आपल्या कर्तृत्वाचे दिवे पाजळून काय उजेड पाडला ते आता सर्वांना समजू लागले आहे.

अरेरे ! होत्याचे नव्हते झाले. चोरांच्या हातातच जामदारखान्याच्या किल्ल्या जाव्यात तसा प्रकार घडावा ही या देशाची भीषण शोकांतिका आहे. दहा-वीस रुपये लाच घेणाऱ्या सामान्य माणसाला तुरुंगात जागा मिळते पण शेकडो कोटी रुपयांचा निर्लज्जपणे, बेधडकपणे भ्रष्टाचार करणारे तथाकथित पुढारी मात्र आपल्या एअरकंडिशण्ड बंगल्यात सुखेनैव आराम करू शकतात, विमानाने देशपरदेशात भ्रमंती करतात, पंचतारांकित हॉटेलात वास्तव्य करतात. आणि आपल्या भुक्कड भाषणाच्या शेवटी 'जय हिंद' म्हणून फसवी घोषणा करतात. यांच्यावर कोट्यवधी रुपयांच्या अपहाराचे स्पष्ट आरोप असूनसुद्धा कोणतीही शक्ती यांना अडवू शकत नाही. सत्तेच्या बळावर आणि संपत्तीच्या सामर्थ्यावर जर हे आपल्याला पाहिजे तसा न्याय मिळवू शकत असतील तर मग या देशात गांधींनी रामराज्याची केलेली घोषणा साकार झाली असे समजायचे काय ?

परवा लोकसभेतली भाषणे ऐकत असताना दोन-चार चांगले अपवाद सोडून दिले तर बाकी सर्वांची भाषणे प्रतिपक्षांवर भुंकण्यासारखी झाली. सारा जन्म जातीपातीच्या क्षुद्र राजकारणात काढलेल्या तथाकथित नेत्यांनी आपण धर्मनिरपेक्ष-सेक्युलर विचारांचे पुरस्कर्ते आहोत असे गर्जून म्हणावे यापेक्षा दुसरा विनोद कोणता ? एखाद्या वेश्येने पातिव्रत्यावर प्रवचन करावे, दरोडेखोराने साधूची भगवी वस्त्रे परिधान करावीत. दारूचे घोट घेत घेत मद्यपान कसे अनैतिक आहे यावर बोलावे, सैतानाने बायबलचा आधार घ्यावा म्हणजे ज्याप्रमाणे आपली मती गुंग होऊन जाते तशी अनुभूती कित्येकांची भाषणे ऐकताना आली. एखादे सरकार पडले काय किंवा टिकले काय यापेक्षा लोकशाही मूल्यांचे प्रथम संरक्षण झाले पाहिजे आणि आपल्या देशाच्या प्रतिमेला आपल्या वर्तनाने तडा जाऊ नये याची

काटेकोर दक्षता घेतली पाहिजे. पण बेताल बडबड, खोटेनाटे आरोप आणि प्रत्यारोप, प्रचंड गोंधळ व आरडाओरडा, सभापतीची अगतिकता हे चित्र भारतीय लोकसभेचे आहे याचा मला, खरेतर सर्वांनाच जबरदस्त धक्का बसला. सहिष्णुता, लोकतंत्र, विचारस्वातंत्र्य हे शब्द आता शब्दकोशातच पाहावेत. दैनंदिन जीवनाशी त्यांचा काही संबंध उरलेला नाही. लोकसभेतले वादविवाद (बेशिस्त आरडाओरडा) दूरदर्शनवरून सर्वजण पहात होते. माझी सहा वर्षांची नात मला म्हणाली, 'हे लोक सारखा दंगा का करतात ? यांच्या ओरडण्यापेक्षा एखादा सिनेमा टी.व्ही. वर लावा.'

मी हसलो. मनात म्हणालो, 'सिनेमा नेहमीच पाहातो. पण असला तमाशा पाहाण्याची मिळालेली दुर्मिळ संधी कशाला दवडायची ?' अनेक स्वैपाकी एकत्र आले म्हणजे स्वयंपाक निश्चितपणे बिघडतो. कारण प्रत्येक स्वैपाकी स्वतःला निष्णात बल्लवाचार्य समजतो. तसे आमच्या लोकसभेत आचार्य लालूप्रसाद आहेत, प्रज्ञावंत मुलायमसिंग आहेत. महापंडिता मायावती आहे. कितीजणांची नावे घ्यावीत ? प्रत्येक स्वैपाकी दुसऱ्यापेक्षा अधिक कुशल आहे. लोकसभेतले हे दर्शन देशाच्या भवितव्याच्या दृष्टीने किती सूचक आहे हे सांगायला नको ! लोकसभेत आपण सर्वांच्या साक्षीने जे विधान करतो त्याच्या बरोबर उलट वर्तन काही तासांनीच जाणीवपूर्वक करायचे आणि हेच आमचे राजकारण आहे असे म्हणून असत्याला राजकारणाचा मुलामा द्यायचा याचा अर्थ काय ? मायावतीच्या बोलण्यात आणि वागण्यात इतका मायावीपणा असावा ? प्रेमात आणि राजकारणात सगळेच क्षम्य असते. पण लोकसभेत असत्याला क्षमा असू नये. तिथेही असत्याला रान मोकळे झाले तर 'सत्यमेव जयते' या शब्दांचे वस्त्रहरण होऊ लागेल. तसे आता झालेच आहे. सत्तेच्या डबक्यातच जगू शकणारे क्षुद्र मासे काय काय प्रकार करू शकतात याचे अनुभव या देशाला आले आहेत. उत्तरप्रदेशातल्या विधानसभेत तर रस्त्यावर गुंडांची मारामारी व्हावी त्याप्रमाणे हातात खुर्च्या आणि समोरचे माइक घेऊन भल्याभल्या आमदारांनी आपल्या अंगभूत शौर्याचे जे अभूतपूर्व प्रदर्शन करून लोकशाही मूल्यांचे पावित्र्य राखले ती एक उज्ज्वल घटना आहे. एक नवी ऐतिहासिक परंपरा सुरू करण्याचे श्रेय मुलायमसिंग आणि कल्याणसिंग व मायावती यांच्या नेतृत्वाखालील उत्तरप्रदेशाकडे जाते. प्रत्येक विधानसभेत गोंधळ आणि गडबड, घोषणाबाजी, सभात्याग आणि प्रसंगविशेषी ठोसाठोशी, एकमेकांचे कपडे

फाडणे - वगैरे 'रचानात्मक' कामे होत असतात. सभापतीचा राजदंड पळवण्याचे पराक्रम कित्येक ठिकाणी घडले आहेत. तामीळनाडूत तर विधानसभेत एका मंत्र्यांच्या नाकावर जोरदार ठोसा मारून त्याला रक्तबंबाळ करण्याची पौरुषपूर्ण कृती घडली. महाराष्ट्र विधानसभेत गोंधळाशिवाय दुसरे काय होते ते कळत नाही. विधानसभा आणि लोकसभा म्हणजे दंगेधोपे करण्याची अधिकृत ठिकाणे अशी व्याख्या शाळेत शिकवली तर ती योग्यच ठरेल. वयाने वाढलेले (बुद्धीच्या बाबतीत काय बोलावे ?) हे लोकप्रतिनिधी पोरासोरांसारखे पोरकटपणाने का वागतात ? यांच्या बौद्धिक आरोग्याची जाहीर चौकशी करणारी एखादी यंत्रणा या देशात लवकरच उभी करावी लागेल. सभापतींच्या अंगावर पेपरवेट भिरकावण्याचे प्रकार मी वर्तमानपत्रात वाचले होते. हा प्रकार पूर्वी आमच्या महाराष्ट्र विधानसभेतच घडला आहे. आता तर प्रत्येक अधिवेशनात मारामारीच्या टोकापर्यंत आम्ही निवडून दिलेले सदस्य सहजपणे जातात. हे पाहून आमची लोकशाही उत्तरोत्तर परिपक्व होत चालली आहे याची जाणीव होते.

मी शाळेत विद्यार्थी असताना वर्गात कुठल्यातरी कारणावरून थोडा गोंधळ झाला. एक विद्यार्थी दुसऱ्याच्या अंगावर धावून गेला. आमचे शिक्षक ताबडतोब कडाडले. 'हा शाळेचा वर्ग आहे. म्युनिसिपालिटीची सभा नव्हे !' त्यांनी त्या दंगेखोर विद्यार्थ्याच्या कानाखाली आवाज काढला. वर्ग शांत झाला. त्यावेळी मला समजले की म्युनिसिपालिटी म्हणजे दंगेखोर लोक एकत्र येण्याची जागा. म्युनिसिपालिटी म्हणजे केवळ गोंधळ ! आता अनेक नगरपालिका आणि महानगरपालिका यांच्या सभा कशा पद्धतीने चालतात हे पाहाणे मनोरंजक आहे. कोणी महापौराच्या अंगावर चप्पल फेकण्याचा प्रयत्न करतो. कोणी नेम धरून अंडी भिरकावतो. स्वतंत्र आणि सुसंस्कृत देशातले हे लोकशाहीचे 'दर्शन' स्फूर्तिदायक आहे यात शंका नाही. पूर्वी असेंब्लीत आणि पार्लमेंटमध्ये अनेक दृष्टींनी महनीय असलेले मान्यवर नेते असायचे. त्यांची विचारप्रवर्तक भाषणे व्हायची. त्या भाषणांतला युक्तिवाद, जनहिताची तळमळ आणि त्या नेत्यांचे निष्कलंक चारित्र्य व व्यक्तिमत्त्व यामुळे त्यांची भाषणे अविस्मरणीय व्हायची. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार या नात्याने लोकसभेत केलेले भाषण विलक्षण चैतन्यपूर्ण होते. स्वातंत्र्याचा आणि समतेचा हा खंदा पुढारी जेव्हा तळमळीने बोलत होता तेव्हा लोकसभेतील वातावरणात

पूर्ण स्तब्धता होती. टाचणी पडली तरी ऐकू यावी अशी ती शांतता होती. डॉ.आंबेडकरांच्या धीरगंभीर शब्दांत देशभक्ती आणि सामान्य माणसांविषयीची अपार ममता होती. इतिहास घडवणारे ते ऐतिहासिक भाषण होते. ज्यांनी ते प्रत्यक्ष ऐकले त्यांच्या भाग्याचा मला हेवा वाटतो. सामाजिक समतेचा उत्कट पुरस्कार करताना बाबासाहेबांचे शब्द मानवतेच्या प्रेमाने चिंब भिजलेले होते. सदस्यांच्या अंगावर ते शब्द रोमांच उठवीत होते. बुद्धी आणि भावना यांचा सुंदर संगम त्या भाषणात होता. ते आजही वाचताना मला झपाटून टाकते. पंडित नेहरूंची कित्येक रसमय, भावपूर्ण भाषणे लोकसभेने ऐकली आहेत. अनेक पक्षांच्या विचारवंत खासदारांचे विचार या लोकसभेत संयमाने, सहिष्णुतेने पण प्रभावीपणे व्यक्त झाले आहेत. सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष दोघांनाही लोकशाही मूल्यांची चाड होती. बहुसंख्य सदस्य सार्वजनिक जीवनात चारित्र्याला महत्त्व देत होते.

भ्रष्टाचार आणि लाचलुचपत यांची आजच्या सार्वजनिक जीवनात बेसुमार वाढ झालेली दिसते. जितका मोठा भ्रष्टाचार तितका मोठा पुढारी असे समीकरण बनले आहे. जयललिता आणि लालूप्रसाद  हे आजच्या परिस्थितीत आपल्या देशाचे मुकुटमणी आहेत आणि ज्यांना 'यशस्वी राजकारण' करायचे आहे त्यांनी त्यांच्या पायापाशी बसून नम्रतेने धडे गिरवले पाहिजेत. जयललिता मुख्यमंत्री होती तेव्हा मंत्रीमंडळातले तिचे काही सहकारी तिच्या पायावर प्रथम आपले मस्तक टेकवून मग सभेत भाषणे करीत असत. गांधी आणि आंबेडकर यांचे त्यांच्या अनुयायांनी दैवतीकरण केलेले मी समजू शकतो. पण जयललितेला महादेवी समजून तिच्या पायावर डोके ठेवणाऱ्या बिनडोक लोकांना काय म्हणावे तेच कळत नाही. गायी म्हशींच्या खाद्यात प्रचंड घोटाळे करून कोट्यवधी रूपये घशात घालणारा एखादा हरीचा लाल, गरीबांचा मसीहा कसा ठरतो कुणास ठाऊक !

बर्नार्ड शॉ या प्रसिद्ध विचारवंत लेखकाने म्हटले आहे, 'लोकशाहीची निवडणूक म्हणजे बहुसंख्य नालायक लोकांनी निवडून दिलेलीअल्पसंख्य भ्रष्टाचारी लोकसंस्था.' आणखी एका ठिकाणी तो म्हणतो, 'राजे हे जन्मजात राजे नसतात. तर मूर्ख लोकच त्यांना राज्यपदावर बसवितात.' शॉ च्या बोलण्यावर विक्षिप्तपणाचा शिक्का मारण्यात अर्थ नाही. तो खरे बोलतो  म्हणूनच आपल्याला ते विक्षिप्त वाटते. खोटे बोलणे अकृत्रिम वाटावे आणि खरे बोलणे विपर्यस्त वाटावे हा चमत्कार नव्हे का ? निवडणुकीत मते कशी मिळवावीत याचे शास्त्र धूर्त

कारस्थानी लोकांना अवगत असते. आज प्रत्यक्ष प्रभू रामचंद्र निवडणुकीला उभा राहिला तरी रामभक्तांची मते देखील त्याला मिळतील याची शाश्वती नाही. तो अयोध्येतून उभा राहिला तरी एखादा सुखराम या दाशरथी रामाला चारी मुंड्या चीत करू शकेल. रामाचे दिवस केव्हाच संपून गेले. 'ते हि नो दिवसा गताः ।' रामाच्या नशीबात फक्त वनवास आहे. यापेक्षा दुसरे काय म्हणायचे ?

लालबहादूर शास्त्री पर्यंत चारित्र्यसंपन्न नेत्यांची एक परंपरा होती. आता मात्र ती परंपरा संपली आणि 'लालूपरंपरेचा' तेजस्वी सूर्य भारतीय राजकारणात स्वयंतेजाने तळपत आहे. परवा लोकसभेत त्याचे तमासगिराला लाजवील असे ढंगदार बुद्धिहीन वक्तव्य ऐकले तेव्हा खात्री पटली की हा विदूषक आपल्या भारताचा पंतप्रधान होण्याच्या योग्यतेचा आहे. लालू आणि मुलायम असले की लोकशाही सर्वार्थाने यशस्वी झाली असे समजायला हरकत नाही. आमच्या लोकशाहीच्या वृक्षाला लागलेली ही मधुर फळे आहेत. अटलबिहारी वाजपेयी यांना कोण विचारतो ? भ्रष्टाचाराच्या रस्त्यावर एक पाऊलदेखील टाकण्याची लायकी नसलेले वाजपेयी 'स्थिर सरकार' कसे देऊ शकतील ? चाळीस वर्षे लोकसभेचे सदस्य राहूनही या बाबतीत त्यांची तिळमात्रही प्रगती झाली नाही. सत्तेच्या अनेक जागांवर राहूनसुद्धा या माणसाने आपले चारित्र्य अत्यंत स्वच्छ ठेवले. हा याचा अपराध लहानसहान आहे काय ? डोंगराएवढ्या व्यक्तित्वाची ती जयललिता कुठे आणि ते लालू मुलायम कुठे ? त्यांच्यासमोर अटलबिहारी उभे सुद्धा राहू शकत नाहीत. सत्तेच्या सागरात वर्षानुवर्षे राहून कोरडे राहिलेले अटलबिहारी आजच्या जगाला आदर्श वाटू शकत नाहीत. चारित्र्यसंपन्न माणसे राजकारणाच्या बाहेर फेकून दिली पाहिजेत. ती तशी जात नसतील तर त्यांच्या विरुद्ध अविश्वासाचा ठराव आणून त्यांना पदभ्रष्ट केले पाहिजे. बरे झाले ! अटलजी पराभूत झाले. ही लाखाची गोष्ट झाली ! लाखाची नव्हे त्यासाठी शेकडो कोटी किंवा पराकोटीचा व्यवहार धूर्तपणे आणि लोकशाही शिस्तीने करावा लागला तेव्हा कोठे 'अजि सोनियाचा दिन' उगवला असे समाधानाने म्हणता येते.

ते काहीही असो. दिन कोणाचाही उगवो पण लोकशाहीचा दिन मावळू नये यासाठी आमचे लोकप्रतिनिधी प्रयत्नशील असावेत या हेतूनेच हा लेख लिहिला आहे.

■■■

# आपण कुठे जाणार ?

माझ्या शेजारी राहाणारे मराठे मास्तर माझ्याकडून नेलेली वर्तमानपत्रं परत करताना म्हणाले,

'आता उद्यापासून वृत्तपत्रं वाचायची नाहीत असा मी पण केला आहे.' मला आश्चर्य वाटले. सुशिक्षित मनुष्य दररोजची वृत्तपत्रं चाळल्याशिवाय राहात नाही. निदान ठळक मथळ्यांवरून दृष्टी फिरवतो. एखादं स्फुट गंमतीदार विषयावरचं असेल तर मुद्दाम वाचतो. अग्रलेखांकडं तो सहसा वळत नाही. पण सिनेमा नाटकांच्या जाहिराती, क्रिकेट मॅचचा वृत्तांत वाचून काढतो. आमचे एक मित्र तर घटस्फोटाच्या नोटिसा आवर्जून वाचतात. कोणी सिनेमा नटीच्या एखाद्या फोटोसाठी वृत्तपत्राकडं नजर वळवतो. आणि हे मराठे मास्तर मात्र वर्तमानपत्र मुळीच वाचणार नाही असं निर्धारपूर्वक म्हणत आहेत, याचं कारण विचारल्यावर ते म्हणाले,

' अहो, ही वर्तमानपत्रं माझा सारा दिवस बिघडवून टाकतात. एकापेक्षा एक भयानक वार्ता त्यात प्रसिद्ध होतात. आजचीच बातमी पहा. 'मध्यप्रदेशातल्या एका शहरात जीपमधून चाललेल्या काही कॉलेज विद्यार्थ्यांनी रस्त्यात एका विद्यार्थिनीची छेड काढली. ते काहीतरी अश्लील बोलले. असंस्कृत हावभाव त्यांनी केले. ते हसत खिदळत होते. त्यांच्या असभ्य चेष्टांमुळं ती विद्यार्थिनी त्या गुंड विद्यार्थ्यांना चिडून काहीतरी बोलली. जीप पुढे निघून गेली. पण पुन्हा वेगानं मागे आली. त्या तरुण विद्यार्थिनीच्या अंगावरून त्यांनी बेदरकारपणानं गाडी नेली. ती बिचारी रस्त्यावर तडफडून मरण पावली. आमच्या हुशार पोलिस खात्याला अजून ते गुंड विद्यार्थी सापडले नाहीत.'

मराठे मास्तरांच्या डोळ्यांत अश्रू आले होते. त्यांच्या म्हणण्याचा सारांश असा होता की असल्या अत्याचारी प्रवृत्तीच्या गुंडांच्या असंस्कृतपणाच्या वार्ता वाचून आपली मानसिक शांती आपण गमावून बसतो. त्यांचं हे मत सर्वाथानं खरं होतं. हिंसेच्या आणि रक्तपाताच्या, बलात्काराच्या, जाळपोळीच्या, सामुदायिक कत्तलीच्या बातम्यांनी आजची वर्तमानपत्रं भरलेली असतात. खून आणि

आत्महत्या यांची एखादी वार्ता एखाद्या दिवशी वृत्तपात्रांत आली नाही तर तो दिवस सणासुदीचा क्वचित येणारा अपवादात्मक समजावा. काही दिवसांपूर्वी सांगलीच्या भर रस्त्यावर एका तरुणीचा पुन्हा पुन्हा भोसकून क्रूर खून करण्यात आला. ती तरुण मुलगी किंकाळ्या फोडीत आहे आणि स्वतःला तिचा प्रेमिक समजणारा रोगट मेंदूचा तरुण हातातल्या सुरीने तिला अंगभर भोसकीत आहे; हे भयानक दृश्य शेकडो लोकांनी पाहिले. पण एकाही मायेच्या पूताने त्या गुंडाला अडवण्याचं धाडस केलं नाही. ते षंढ लोक थंड डोळ्यांनी एखादे करमणुकीचे दृश्य पहावे त्याप्रमाणे पाहात होते. रक्ताच्या थारोळ्यांत पडलेल्या त्या तरुणीचा रस्त्यातच प्राण गेला. ही बातमी दुसऱ्या दिवशी सर्व वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केली होती. मराठे मास्तर या संदर्भात म्हणाले,

'सकाळचा चहा घेताना या बातमीचा मथळा मी वाचला. चहाचा घोट घशाखाली उतरेना. एक पिसाळलेला गुंड भररस्त्यात स्त्रीवर हल्ला करतो आणि तो देखावा मुर्दाड मनाचे नेभळे लोक शांतपणानं पाहात राहातात. ही घटना मला खुनापेक्षाही अधिक भयानक वाटली. आजच्या युगात संवेदना हरवून बसलेल्या आणि तृतीय पंथी बनलेल्या लोकांची ही कथा वाचल्यानंतर त्या दिवशी मला झोप आली नाही. माझ्यासमोर हे घडलं असतं तर मी असा स्तब्ध राहिलो असतो काय ? निदान जिवाच्या आकांतानं ओरडलो असतो. जिवाची पर्वा न करता त्या खुनी नराधमाचा हात धरण्याचा प्रयत्न केला असता. पण तुमचा आमचा समाज इतका नामर्द, इतका ढिला आणि पौरुषहीन बनलेला असेल तर परमेश्वर सुद्धा त्याच्यात काही परिवर्तन घडवू शकणार नाही.'

मराठे मास्तरांचा प्रत्येक शब्द शंभर टक्के खरा होता. आपला हा भारतीय समाज ठिसूळ बनला आहे. आपणही शस्त्रास्त्रांची, अण्वस्त्रांची निर्मिती करून ठोशाला ठोसा देऊ असं कुणी म्हटलं तरी या समाजाला चळ भरतो, त्याचा थरकाप होतो. शरणागतीची सवय लागलेलं आमचं मुर्दाड रक्त कधीतरी गरम होईल काय ? ज्या देशाच्या भूमीत गीतेसारखा तेजस्वी ग्रंथ निर्माण झाला, पौरुषसंपन्न विचार ज्या जमिनीतून भरघोसपणे उगवले, जिथं कृष्ण, अर्जुन, भीम आणि कर्ण यासारखे शूरवीर उदयाला आले. जिथं अन्यायाचा कोथळा निर्धारानं बाहेर काढणारी शिवछत्रपतीची वाघनखं प्रकट झाली; त्या देशातला समाज आज हतवीर्य बनला आहे. मराठे मास्तर क्षुब्ध होऊन बोलत होते. त्या सात्विक माणसालाही संताप

आला होता. असल्या रोगट बातम्या दररोज वाचण्यापेक्षा वर्तमानपत्रावरच मी बहिष्कार टाकतो असं त्यांनी जाहीर केलं. सध्याच्या वृत्तपत्रांत गुन्हेगारी खून मारामाऱ्या, जाळपोळ आणि स्त्रियांवरचे वाढते अत्याचार या बातम्या अधिक प्रमाणात असतात आणि त्यामुळं वाचकांचा भावनिक क्षोभ होतो. हे त्यांचं म्हणणं बरोबरच होतं. पण 'वृत्तपत्रंच आपण वाचायची नाहीत' हा त्यांचा विचार मात्र अगदीच हास्यास्पद वाटला. मी त्यांना म्हणालो,

'समाजजीवनाचं प्रतिबिंब दाखवणारा आरसा म्हणजे वृत्तपत्र. आता या आरशात हिडिंबा तुम्हाला रंभा-उर्वशीसारखी कशी दिसेल ? बिंब चांगलं असेल तर प्रतिबिंबही स्वच्छ आणि सुंदर उमटेल. किडलेल्या आणि सडलेल्या सामाजिक अवस्थेचं दर्शन प्रामाणिकपणानं हा आरसा घडवतो. आरसा बाजूला सारून समाजस्थिती कशी बदलणार? भयानक बातम्या वाचून तुम्ही अस्वस्थ होता, प्रक्षुब्ध होता. ती तुमच्या जिवंतपणाची खूण आहे. पण असल्या वार्ता वाचून बहुसंख्य लोक दुसऱ्याच क्षणी त्या विसरूनही जातात. दूरवर पेटलेल्या ज्वाला आपल्यापर्यंत येण्याची शक्यता नसेल तर त्यांची चिंता कशाला ? असं म्हणून ते दुर्लक्ष करतात. याचा अर्थ माणसं अद्यापी खऱ्या अर्थानं जवळ आली नाहीत. गुन्हेगारीचं, गुंडपुंडांचं आणि त्यांच्या घृणास्पद कृत्यांचं चित्र तपशीलासह वृत्तपत्रांतून आलंच पाहिजे. कोणत्या जगात आपण जगत आहोत याचं भान सामान्य माणसाला आणून देणं हे वृत्तपत्रांचं कर्तव्यच आहे. पूर्वी धर्म, नीती आणि राज्य यांचा अंकुश माणसांवर होता. त्यामुळं माणूस आपोआपच आखून दिलेल्या रस्त्यानं चालायचा. पण आजच्या प्रगत जगात नानाप्रकारचे रंगीबेरंगी मोह त्याच्या भोवती पिंगा घालीत आहेत. धर्म आणि नीती यांच्या चौकटी शास्त्रज्ञानामुळं मोडकळीला आल्या. राजशक्ती आणि गुंडशक्ती एकमेकांत मिसळून गेली. गुन्हेगारांच्या हातातच सत्तेची सूत्रं आली, तर काय होऊ शकेल याचं चित्र हळूहळू स्पष्ट होऊ लागलं आहे. जन्मभर प्रामाणिकपणानं कष्ट करणाऱ्या, घाम गाळणाऱ्या माणसाला एखाद्या अरुंद खोलीत, फाटक्या सतरंजीवर रात्र काढण्याशिवाय गत्यंतर नसते. हजारो आणि लाखो लोक फूटपाथवर झोपतात. पण हजारो कोटींचा घोटाळा करणाऱ्या राज्यकर्त्यांना तुरुंगाच्या कोठडीत जावे लागले तरी ती कोठडी एअरकंडिशण्ड दिवाणखान्यात आणि मऊमऊ गाद्यागिर्द्यांच्या शयनकक्षात रूपांतरित होते. उपभोगाची एकूण एक साधनं गुन्हेगारांच्या समोर सुसज्ज असतात.

तुरुंगाचे अधिकारी 'जी हुजूर', ' जी महाराज', म्हणत हात जोडून उभे असतात. आणि अट्टल गुन्हेगारांच्या तालावर नाचत असतात. तुरुंगांची पंचतारांकित हॉटेलं होऊ शकली, हा आपल्या लोकशाहीचा प्रताप आहे. ही चित्रं देखील वृत्तपत्रांनी धिटाईनं दाखवली पाहिजेत. वृत्तपत्रांना शिकारी कुत्र्यांची उपमा एका विचारवंतानं दिली. पण भुंकण्या ऐवजी आणि गुन्हेगारीचा पाठलाग करण्याऐवजी हे श्वानराज जर शेपटी हालवीत उभे राहिले तर काय करायचे हा एक बिकट प्रश्न आहे. सुदैवानं अजून आमच्या देशात काही शिकारी कुत्रे त्वेषानं भुंकतात हीच आशेला जागा आहे. वर्तमानपत्रांचं वाचन थांबवणं हा काही शहाणपणाचा मार्ग नव्हे, असं मी मास्तरांना म्हणाल्यावर त्यांना ते पटलं असावं. पण त्यांनी एक नवाच प्रश्न उपस्थित केला. ते म्हणाले,

'वर्तमानपत्रांविषयी तुम्ही म्हणालात ते मी मान्य करतो. आपल्या देशात वृत्तपत्रं न वाचणारा वर्ग बराच मोठा आहे. निरक्षर माणसांची संख्या पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक आहे. सुशिक्षितांतही वैचारिक जागृती फारशी झालेली नाही. त्यामुळं वर्तमानपत्रांचं वाचन पुष्कळच कमी आहे. पण टी.व्ही. मात्र घराघरांत आणि झोपडी-झोपडीपर्यंत गेलेला आहे. त्याचे भयानक परिणाम आता आपल्या देशात जाणवू लागले आहेत. शाळा-कॉलेजातल्या पोरांपोरींवर टी.व्ही.च्या माध्यमातून जे संस्कार होतात, त्याबद्दल मास्तर या नात्यानं मला चिंता वाटू लागली आहे. तुम्ही कदाचित मला म्हणाल, 'जाऊ द्या हो मास्तर, जे व्हायचं असेल ते होईल. आपण कशाला चिंतेत पडायचं ? तुम्हा मास्तर मंडळींना निष्कारण जगाची उठाठेव करण्याची, खोड असते. असं म्हणून तुम्ही माझा उपहासही कराल' पण एकेका चॅनेलवर होणारे एकेक बीभत्स कार्यक्रम पाहिले की हा इडियट बॉक्स फोडून त्याचे तुकडे तुकडे करावेसे वाटतात. हिंस्र रक्तपाती दृश्यांनी भरलेले चित्रपट या टी.व्ही. वर अधिक प्रमाणात दाखवले जातात. सुरामारी, गोळीबार आणि सूडभावनेनं घरंदारंच नव्हे तर माणसं पेटवून दिल्याचे देखावे यांची त्यात रेलचेल असते. स्त्री हा तर उपभोगाचा एक सवंग विषय, असं समजून स्त्रीच्या शरीराचं प्रदर्शन करून सध्याच्या चित्रपटात मांडलेलं असतं. उत्तान अंगप्रदर्शन करून पैसा मिळवण्यात काही गैर आहे असं आजच्या सुशिक्षित नट्यांना वाटत नाही. हीन अभिरुचीची निर्लज्ज दृश्यं चित्रित करण्यासाठी त्या आता बिनधास्तपणे पुढे येतात. आणि या प्रकाराला 'कलाविष्कार', ' कलावंताचं स्वातंत्र्य' असं गोंडस नाव देऊन

आपल्या कृत्याचं समर्थन करतात. असले चित्रपट पाहून शाळकरी पोरांपोरींवर किती विकृत संस्कार होत असतील याची कल्पनाच करता येत नाही. मला तुम्ही कदाचित जुन्या विचाराचा, मास्तर परंपरेतला, मागासलेला म्हणाल. पण तुमचं हे पुढारलेपण मला तरी मान्य नाही. आपण कुठे जाणार?''

मराठे मास्तर प्रामाणिक आवेगाने बोलत होते. त्यांनी व्यक्त केलेल्या विचारात विदारक सत्य होते. मी स्वतःला पुरोगामी समजतो. पण मलादेखील टी.व्ही. वर दाखवण्यात येणारी कित्येक दृश्यं आणि घटना, ओंगळ, बीभत्स आणि कलाहीन वाटतात. 'कलेचं स्वातंत्र्य' हे शब्द तर निरर्थक होऊ लागले आहेत. कपडे काढून नाचण्यात स्वातंत्र्य असेल पण ते 'कलेचं स्वातंत्र्य' कसं ठरतं हे मला कळत नाही. परवा चित्रपटातून भूमिका करणारी एक नटी जाहीर मुलाखतीत म्हणाली,

'कलेसाठी मी काहीही करायला तयार आहे. एखादं कामदृश्य चित्रित करायचं असेल तर त्यासाठी देखील मी पूर्ण सहकार्य देईन. माझ्या दृष्टीनं श्लील आणि अश्लील काहीच नाही.' याचा अर्थ तिची दृष्टी अत्यंत प्रगल्भ झाली आहे. इतकी प्रगल्भ दृष्टी आम्हाला परवडणार नाही. कारण हा दृष्टीकोन एकदा स्वीकारला की मग कौटुंबिक आणि सामाजिक जीवनात उलथापालथ झाल्याशिवाय राहाणार नाही. मराठे मास्तर विचारशील होते. सुसंस्कृत जीवनदृष्टी असलेल्या शिक्षकांत त्यांचं स्थान महत्त्वाचं आहे. विद्यार्थ्यांच्या काही पिढ्या या माणसानं घडवल्या. अशा चांगल्या माणसाचा आज कोंडमारा व्हावा अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. मी निराशावादी नाही. पण आजच्या जीवनात माणसाला अधःपाताकडं घेऊन जाणाऱ्या लाटा सर्वच क्षेत्रांत अधिकाधिक बलवान होत आहेत. आणि तुम्ही आम्ही या लाटांबरोबर कुठेतरी भरकटत चाललो आहोत. कोणत्या किनाऱ्याकडं जायचं हे कळत नाही आणि कळलं तरी तो किनारा गाठता येईल याची शाश्वती उरली नाही. आपण कुठे जाणार या प्रश्नाला मराठे मास्तरांप्रमाणेच माझ्याकडेही उत्तर नाही.

■■■

# वक्ता आणि श्रोता

कित्येक शतकांपूर्वी डेमॉस्थेनिस नावाचा एक प्रभावी वक्ता होऊन गेला. आश्चर्याची गोष्ट अशी की तो तोतरे बोलत असे. त्याच्या बोबडेपणाची सतत चेष्टा व्हायची. आपल्या बोलण्यातला हा दोष काढून टाकण्यासाठी त्याने प्रयत्नांची पराकष्ठा केली. समुद्रकिनाऱ्यावर जाऊन तो उच्च स्वरात बोलत राही. आवाज सुधारावा यासाठी शक्य तितक्या वरच्या पट्टीत भाषण करण्याचा प्रयत्न करी. दररोज एखादं पुस्तक घेऊन ते घरात सर्वांना ऐकू जाईल अशा आवाजात दोन-चार तास वाचत राही. प्रत्येक शब्द सुस्पष्टपणानं उच्चारला जावा अशी दक्षता घेई. हळूहळू त्याच्या शब्दोच्चारातले दोष नाहीसे झाले. वाणी स्वच्छ झाली. आवाजालाही एका प्रकाराची मधुरता आली. अखंड वाचनातून त्यानं भाषा कमावली, विचार मिळवले आणि एक महनीय वक्ता अशी त्याची कीर्ती पसरत राहिली. आपल्या भाषेच्या सामार्थ्याने आणि परिणामकारक शैलीने तो श्रोत्यांना खिळवून टाकीत असे. एकेकाळी तोतरे बोलण्यामुळे उपहासाचा विषय झालेला हा माणूस देशावर आपल्या वक्तृत्वाची जबरदस्त मुद्रा उमटवू शकला याचा अर्थ वक्तृत्व हे प्रयत्नाने कमवता येते. ती ईश्वराची देणगी आहे, ती एक जन्मजात कला आहे असे मानण्यात काही अर्थ नाही. 'छंद लागला टिटवीला, तिने समुद्रही आटवीला.' ध्यास घेतल्याशिवाय आणि कष्ट उपसल्याशिवाय कोणतीच कला आत्मसात करता येत नाही. कसं बोलावं हे देखील मनःपूर्वक शिकावं लागतं. नामवंत वक्त्यांची व्याख्यानं ऐकणं हा देखील अभ्यासाचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. अभ्यासातून कलेची प्रगती होत असते. पेरलेले बीज अंकुरल्यावर त्याला सूर्यप्रकाश आणि खतपाणी मिळाले नाही तर ते सुकून गेल्याशिवाय राहात नाही.

एका चित्रकाराला कुणीतरी विचारले, 'तुमच्या चित्रातली रंगसंगती, रंगवैचित्र्य फारच आकर्षक असतं. हे रंगचातुर्य तुमच्यात कसं आलं ? तुम्ही कोणत्या रंगात कोणता रंग मिसळता ? रंगांचं मिश्रण करताना कोणतं तंत्र

वापरता ?' तो चित्रकार हसला, आणि म्हणाला, 'मी कोणत्याही रंगात कोणताही रंग मिसळतो. पण प्रत्येक रंगात अंतरंग मात्र मिसळतो. अंतरंग नसेल तर केवळ बाह्यरंगानं चित्र सुंदर होत नाही. स्वतः रंगल्याशिवाय कोणत्याच कलेला रंगत येत नाही.' त्या चित्रकारानं कलानिर्मितीतलं चिरंतन सत्य सांगितलं होतं, बोलणं ही देखील एक अशी कला आहे की, ज्यामुळ हजारो लोकांना श्रवणाचा आणि चिंतनाचा आनंद वक्ता देऊ शकतो. पण त्यासाठी त्याचं चिंतन आणि आविष्करण मनःपूर्वक झालं पाहिजे, सभेत बोलत असतानाही कित्येक वक्ते प्रतिपाद्य विषयाशी समरस होत नाहीत. ते प्रदर्शनाच्या मोहात पडतात. जो विषय मांडायचा तो अपुरा राहातो किंवा त्याला केवळ वरवरचा स्पर्श केला जातो. पण जे व्यक्त करायचं आहे ते विचारचित्र अचूक शब्दरंगांनी, एकाग्र मनानं रंगवणारे काही वक्ते मी ऐकले आहेत. महाराष्ट्रातील एक व्यासंगी प्राध्यापक आणि संतवाङ्मयाचे भाष्यकार प्रा.गं. बा. सरदार एकदा मला म्हणाले,

'भाषा हे वक्तृत्वाचं बाह्यांग आहे. विचार हे मात्र अंतरंग असतं. आपलं विचारावर पूर्ण ध्यान असावं. प्रेम असावं. मग त्या विचाराला अनुरूप शब्द आपोआप भेटतात. व्याख्यान दिल्यानंतर आपण काय सांगितलं हे वक्त्याला जसं कळावं तसंच आपण नेमकं काय ऐकलं, भाषणातील मध्यवर्ती विचार कोणता होता हे श्रोत्याला सांगता आलं पाहिजे. शेवटी आपण स्वतःसाठी आणि मुख्यतः आपल्या श्रोत्यांसाठी बोललं पाहिजे. म्हणून मुख्य विचाराचं सूत्र वक्त्याच्या हातून कधीही सुटू नये. सूत्र धरून त्यानं वक्तृत्वाच्या आकाशात लहानमोठ्या भराऱ्या घ्यायला हरकत नाही. पण सूत्र हरवलं तर वक्ता चाचपडत राहातो'

सरदारांची सामाजिक विषयांवरची मी अनेक भाषणं ऐकली. त्यांच्या भाषणात लालित्य असायचं, नादमाधुर्य असायचं, शब्दसौष्ठव जाणवायचं. पण मुख्य विचारांपासून ते कधीच विचलित व्हायचे नाहीत. मधून मधून विषयाला अनुरूप अशी संतांची वचनं मार्मिकपणे उद्धृत करीत. त्यामुळं सरदारांचं भाषण म्हणजे एक वैचारिक मेजवानी असायची. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे आणि प्रा. सरदार याचं वाग्युद्ध कित्येक वर्षांपूर्वी -जवळजवळ पंचेचाळीस वर्षांपूर्वी मी पुण्यात ऐकलं होतं. आज इतक्या वर्षांनीही त्या दोघांच्या भाषणातले विचार आणि त्यांची अभिनिवेशी शैली, त्यांची कित्येक वाक्यं, त्यांनी केलेले विनोद, त्यांचे युक्तिवाद आजही मला आठवतात. यात माझ्या स्मरणशक्तीपेक्षा त्यांच्या भाषण-चातुर्याचा

आणि व्यासंगाचा भाग अधिक आहे. सहस्रबुद्धयांच्या भाषणात आक्रमक आवेश होता, तिखट उपहास होता. सरदारांच्या भाषणात ऋजुता,संयम, संतुलित विचार आणि लालित्य हे गुण होते. पण दोन वेगवेगळे नमुने आम्हा श्रोत्यांना पाहायला आणि ऐकायला मिळाले. बहुतांश श्रोते हे प्राध्यापक, लेखक आणि विद्यापीठीय विद्यार्थी होते. अशा श्रोत्यांसमोर वक्त्याची खरी परीक्षा होते. राजकीय पुढारी श्रोत्यांना खूष करण्यासाठी किंवा त्यांना प्रक्षुब्ध करण्यासाठी नाटकी आवेशाने सभेत आरोळ्या ठोकतात. त्यांच्या प्रत्येक वाक्याला अगदी निरर्थक वाक्यांनाही टाळ्या वाजवणारे आज्ञाधारक श्रोते असतात.(टाळ्या वाजवण्यासाठी त्यांची नियुक्ती झालेली असते) आवेशपूर्ण पण तर्कशून्य बेताल बडबडीला वक्तृत्व समजण्याची चमत्कारिक चूक सध्या केली जाते. ती प्रथम सुधारली पाहिजे. वैचारिक अभिनिवेश स्वागतार्ह असतो. पणं राजकीय व्यासपीठावर जो अभिनिवेश उफाळून येतो तो मात्र वैकारिक असतो. विरोधी पक्षीयांबद्दल आणि विरोधी विचारांबद्दल तुच्छतेने बोलणे, निंदानालस्ती करणे हे वक्तृत्वाच्या चौकटीत कधीच बसत नाही. शब्दांना धार असावी, टोक असावे पण तर्कशुद्ध विचारातूनच असे शब्द निर्माण व्हावेत.

वक्त्याला अनेक प्रकारचे श्रोते भेटतात. भाषण चालू असताना काही श्रोते मधूनच उठून जातात. काही श्रोते सभास्थानाला डुलकी घेण्याची जागा मानतात. कित्येक सभात लहानपोरांचा गोंधळ चालू असतो. ध्वनिक्षेपक बिघडलेला असतो. कुठेतरी दूरवर चालू असलेल्या भजनाचे सूर सभेत ऐकू येत असतात. काही श्रोते जणू वक्त्याची परीक्षा घ्यायलाच आलेले असतात. त्या समुदायात एखादे मूल गळा काढून रडत असते. आणि सभेचे संयोजक पाठीमागून वक्त्याला सुचवीत असतात की, 'लोक करमणुकीच्या कार्यक्रमासाठी आले आहेत. लवकर संपवा.' संयोजकांनीच वक्त्याला विषय दिलेला असतो. 'जातिव्यवस्थेमुळे सामाजिक अभिसरण मंद झाले आहे काय ?' आता असल्या विषयावर त्या गोंधळात वक्ता काय बोलणार ? कपाळ ! गलथान संयोजनाचे फटके बिचाऱ्या वक्त्याला कधी कधी बसतात. एका नामवंत वक्त्याला 'शिक्षण आणि सामाजिक परिवर्तन' या विषयावर बोलण्यासाठी आमंत्रित केले होते. तो सभास्थानी येऊन पाहतो तो इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतचे 'विद्वान श्रोते' दाटीवाटीने

बसले होते. मुख्याध्यापक श्री. शहाणे श्रोतृवर्गाला उद्देशून म्हणाले, 'आपले आजचे वक्ते हे महाराष्ट्रातले, फार काय भारतातले फार मोठे असे नामांकित वक्ते आहेत. त्यांचं भाषण शांतपणानं ऐकून घ्या. कोणी गडबड केली तर माझ्याशी गाठ आहे. हे लक्षात ठेवा.' ते नामांकित वक्ते आपली कुणाशी गाठ आहे हे समजून हसत हसत उभे राहिले. जमलेल्या पोरांना दोन-चार गंमतीदार गोष्टी सांगून त्यांनी पोटभर हसवलं. पोरं अत्यंत खूष झाली. शहाणे यांचा चेहरा मात्र पडला होता. सगळा जन्म पोरांना शिकवण्यात गेलेला असूनही बालमन आणि शिक्षण यांचा काय संबंध असतो हे या 'शहाण्याला' अजून कळले नव्हते. त्यांच्यातच परिवर्तन होण्याची गरज होती. वक्त्याने मात्र श्रोत्यांच्या वयाचा आणि वृत्तीचा विचार करून - आपल्या चतुर वाणीने त्यांचे मनोरंजन केले. 'मुलांत मूल व्हावे' हे शिक्षणातले मुख्य तत्त्व वक्त्यांना माहीत होते. श्रोत्यांची मनःस्थिती, त्यांची आवड-निवड यांचा विचार करावाच लागतो. रसिक श्रोत्यांशिवाय भाषण रंगत नाही. ज्ञानेश्वरांनी या संदर्भात म्हटले आहे,

अहो चंद्रकांतु द्रवता कीर होये। परि ते हातवटी चंद्रि की आहे ॥
तैसा वक्ता तो वक्ताचि नोहे। श्रोतेन विण ॥

चंद्रप्रकाशात चंद्रकांत रत्न पाझरू लागते. पण तो परिणाम चंद्रकिरणांचा असतो. वक्त्याचे वक्तृत्व श्रोत्यांशिवाय फुलू शकत नाही. श्रोताच नसेल तर वक्ता या संज्ञेला काही अर्थ उरत नाही.

एकदा एका कॉलेजच्या स्नेहसंमेलनात मला प्रमुख अतिथी या नात्यानं भाषण करायचं होतं. कार्यक्रमपत्रिकेत माझ्या भाषणाचा विषय लिहिला होता, 'संतांनी मानवतेला काय दिले ?' खरे तर असल्या तात्त्विक विषयावर कॉलेजच्या स्नेहसंमेलनात तरुण विद्यार्थी - विद्यार्थिनींसमोर कुणालाही बोलायला सांगणं हा अप्रयोजकपणा आहे. मी त्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना म्हणालो, ''मित्रहो, मुळीच घाबरू नका. तुमच्यासमोर काहीतरी गंभीर बोलण्याइतका मी अरसिक नाही. 'प्रेम कसे करावे' या विषयावरच तुमच्याशी बोलतो. खरंतर या बाबतीत तुम्ही मला मार्गदर्शन करू शकाल इतका तुमचा अधिकार आहे. कदाचित हे प्राचार्यांना माहीत नसेल, पण या क्षेत्रातली तुमची सिनिऑरिटी मी आनंदानं मान्य करतो.' हे सांगून 'प्रेम हे प्रियकरावरचं असो, प्रेयसीवरचं असो, देवावरचं किंवा देशावरचं असो ते कसं हृदयापासून केलं पाहिजे हे सांगताना प्रेम, शृंगार आणि भक्ती यांची

उदाहरणं दिली. संतांचं प्रेमांचे तत्त्वज्ञान खोडकर आणि खेळकर शैलीत पटवून दिले. पण प्रसंगावधान ओळखून वक्त्यानं बोललं पाहिजे. काही जणांना अश्लील विनोद करण्याची खोड असते. असल्या आचरटपणामुळे आपली लोकप्रियता वाढेल असा त्यांना भ्रम असतो. आपलं विचारदारिद्र्य लपवण्यासाठी अश्लील विनोदाचा आश्रय घेणाऱ्या या लोकांची मला कीव येते.

एकदा एका तथाकथित वक्त्यानं कुठलंतरी अश्लील विधान करून हास्य पिकवण्याचा प्रयत्न केला. सभेला आलेल्या बहुसंख्य स्त्रियांनी 'वॉक आउट' केलं. एका गृहस्थानं वक्त्याला तत्क्षणीच खडसावलं. 'घाणेरड्या कोट्या करून आपल्या गलिच्छ अभिरुचीचं प्रदर्शन करू नका. त्याशिवाय बोलता येत नसेल तर खाली बसा.' या वक्त्यानं तेव्हापासून मौनव्रत धारण केलं आहे. एखादा अशिष्ट शब्द किंवा विधान कोणत्या हेतूनं उच्चारलं गेलं याची श्रोत्यांना कल्पना असते. श्रोते देखील बारा गावचं पाणी प्यालेले असतात. त्यांच्यात रसिकता आणि मर्मज्ञता असते. त्यामुळं चतुर वक्ता प्रथम श्रोत्यांच्या रसज्ञतेचा गौरवपूर्ण उल्लेख करून बोलू लागतो. अहंकारानं आणि आढ्यतेनं बोलणारा व्याख्याता कुणालाच आवडत नाही. 'ज्ञानेश्वरीत' ज्ञानेश्वरांनी श्रोत्यांच्या विद्वत्तेचा, त्यांच्या रसिकतेचा अनेक स्थळी विनम्र उल्लेख केला आहे. ही विनीत वृत्ती वक्त्याच्या संस्कृतीचं दर्शन घडवू शकते. वर्गात शिकवताना देखील विद्यार्थ्यांना कठोर शब्दांनी फटकारण्यापेक्षा त्यांच्या बेशिस्तीला उद्देशून एखादी चतुर कोपरखळी मारली, थोडासा बोचक विनोद केला की वर्ग एकदम शांत होतो. खोडकर विद्यार्थ्याला कोणत्या पद्धतीने मार्गावर आणावे हे अध्यापकाला कळले पाहिजे.

डेमॉस्थेनिसने एकदा राष्ट्रीय संकटाबद्दल सभेत बोलायला सुरुवात केली. बहुसंख्य श्रोत्यांना हा गंभीर विषय नको होता. एखादी मनोरंजक गोष्ट सांगा असा ओरडा ते करू लागले. त्यानं गोष्टीला सुरुवात केली. एकदा एकानं आपलं गाढव दुसऱ्याला विकलं. गाढव दुसऱ्याला विकलं. तो गाढव घेऊन जाऊ लागला. गाढवाबरोबर त्याची सावलीही चालू लागली, तेव्हा विकणाऱ्यानं आक्षेप घेतला की, आपण फक्त गाढव विकलं आहे सावली विकली नाही म्हणून सावली नेता येणार नाही. भांडणाला सुरुवात झाली. अखेर विकणारा, घेणारा आणि ते गाढव या तिघांनाही न्यायालयात जावं लागलं. पण जाऊ द्या ! आपण आपल्या देशाविषयी बोलू. त्याबरोबर श्रोते ओरडून विचारू लागले. गाढवाचं काय झालं ते आम्हाला

सांगा. डेमॉस्थेनिस संतप्त होऊन म्हणाला, 'लोकहो, मी तुमचं अभिनंदन करतो. देशाचं काहीही झालं तरी त्याची तुम्हाला पर्वा नाही. तुमच्यासमोर त्या गाढवाचं पुढं काय झालं ? ही महान समस्या उभी आहे. धन्य धन्य, तुम्ही लोक ! तुमच्यासारखे देशभक्त कुठेही नसतील.' सभेत शांतता पसरली. लोकांना आपली चूक उमगली. राष्ट्रीय संकटाचा एकत्रित विचार करायला लोक प्रवृत्त झाले.

वक्त्यानं लोकरंजनाचं एक साधन बनू नये. त्यानं विचारवंत व्हावं. किंबहुना विचारशील झाल्याशिवाय त्याला खऱ्या अर्थानं वक्तृत्व करता येणार नाही. लोकप्रबोधन हे त्याचं जीवितकार्य बनलं पाहिजे. टिळक आणि सावरकर, विनोबा आणि सानेगुरुजी यांच्यासारखे समाजप्रेमानं, देशभक्तीनं भारलेले वक्ते ही देशाची स्फूर्तिस्थानं असतात. 'तुम मुझे खून दो, मै तुम्हे आजादी दूँगा' या वाक्यात वक्तृत्वाचं नाट्य आहे पण त्यापेक्षाही अधिक राष्ट्रभक्तीचा धगधगता अंगार आहे. सावरकर म्हणाले होते, 'हे मातृभूमी, माझं वक्तृत्व आणि वाग्विभव फार काय जीवनसर्वस्व मी तुला अर्पण केलं आहे.' अशा निष्ठावान वक्तृत्वाची समाजाला कोणत्याही काळात गरज असते.

■■■

# ते वक्ते ! ती व्याख्यानं !

महाराष्ट्राचे भाषाप्रभू कवी आणि नाटककार राम गणेश गडकरी यांच्या वाग्वैभवाबद्दल काय बोलावं ? त्यांनी स्वतःच आपल्या काव्यवाणीबद्दल म्हटलं आहे.

नवशब्दांचे घुंगुर बांधुनि रसवंती माझी
हासत खेळत करि शिणलेली मने पुन्हा ताजी

गडकऱ्यांच्या शब्दांच्या पायांत कल्पनाचमत्कृतीचे आणि नादसौंदर्याचे पैंजण बांधलेले असायचे. त्यांच्या भाषेचा नृत्यविलास अपूर्व होता. पण एखाद्या सभेत बोलायला सांगितले तर मात्र या भाषाकुबेराची अगदीच केविलवाणी अवस्था व्हायची. खाजगी बैठकीतली मैफल आपल्या कोटिबाज अर्थपूर्ण संभाषणाने ते रंगवीत असत. पण व्यासपीठावर मात्र उभे राहाण्याची त्यांना भीती वाटायची. अशावेळी त्यांना नीट शब्द सुचत नसत. याचा अर्थ सभेतील वक्तृत्व ही एक वेगळीच कला आहे. कित्येक लेखक कवींना वक्तृत्व साध्य नसते. जनसमुदायासमोर उभं राहून आपले विचार प्रभावी शैलीत मांडून जनतेला मंत्रमुग्ध करण्यासाठी एक वेगळेच सामर्थ्य आवश्यक असते. लेखणी आणि वाणी या दोन्ही कलांवर सारखंच स्वामित्व असणारे सारस्वत फार थोडे आढळतात.

या बाबतीत स्वातंत्र्यवीर सावरकर, आचार्य अत्रे, प्रा. ना. सी. फडके आणि वि. स. खांडेकर यांचा उल्लेख अटळ आहे. त्यांच्या साहित्यातूनही त्यांच्या ठायी असलेल्या वक्तृत्वगुणांची जाणीव होते. आणि त्यांच्या भाषणांतूनही वाङ्मयगुणांची अनुभूती येत असे. लेखन आणि भाषण यांची जणू एकरूपता झालेली असायची.

सावरकरांचं एकच भाषण तेही त्यांच्या उत्तरवयातलं - म्हातारपणातलं मी ऐकलं. सभास्थानी त्यांना खुर्चीत बसवून आणण्यात आलं. क्षीण झालेल्या सावरकरांच्या वाणीला मात्र वार्धक्याचा स्पर्शही झाला नव्हता. ती तरुण ताजी टवटवीत आणि रसरशीत वाणी श्रोत्यांना रोमांचित करू लागली. काही शब्द

फुलांचे होते. आणि काही शब्द निखाऱ्यांचे होते. कित्येक शब्दांची धग आणि रग मरगळलेल्या मनोवृत्तीला अक्षरशः नवचैतन्य देत होती. सुंदर आणि दाहक वक्तृत्वाचा एक सुखद अनुभव त्यावेळी मी घेतला. आजही ते भाषण मी विसरू शकत नाही. जागवणारे आणि पेटवणारे वक्तृत्व कसे असते याचा तो एक वस्तुपाठ होता.

वक्तृत्व ही कला उपजत असते की ती प्रयत्नानं मिळवता येते यावर वाद होऊ शकेल. सारेचजण बोलतात पण नुसत्या बोलण्याला 'वक्तृत्व' म्हणत नाहीत. व्यवहारातले शब्द मळलेले असतात. त्या शब्दांना घासून पुसून स्वच्छ करून त्यांच्यात भावनेचा प्राण ओतण्याची किमया वक्त्याला करावी लागते. जे शब्द श्रोत्याला हलवतात आणि डुलवतात, जे शब्द ऐकणाऱ्याला अनुभव देतात, क्षुब्ध करतात, मुग्ध करतात त्यांना वक्तृत्व ही संज्ञा देता येते. केवळ वाऱ्यावर उडून जाणाऱ्या शब्दांच्या भुसकटात अर्थ नसतो.वक्त्याने श्रोत्यांच्या काळजाला हात घातला पाहिजे. एखादी ज्योत पेटल्यावर ज्याप्रमाणे आजूबाजूचा अंधार वितळून जातो त्याप्रमाणे शब्दांचा प्रकाश श्रोत्यांच्या मनात पसरला पाहिजे. यासाठी केवळ भाषाप्रभुत्व उपयोगी पडत नाही. ते तर आवश्यक आहे पण विचारांना चालना देणारी भूमिका वक्त्याची असावी लागते. विचार आणि भावना अनुरूप शब्दांतून गुंफण्याची आणि मांडण्याची सृजनशील शक्ती वक्तृत्वाला आवश्यक असते. काहीजणांजवळ विचार असतात. पण ते मांडण्याची शैली नसते. काही वक्ते शैलीदार भाषेत बोलतात पण विचारांचा पत्ता नसतो. स्पर्श, रूप, नाद, रस आणि गंध हे गुण ज्याच्या भाषणात असतात त्याला 'वक्ता दशसहस्रेषु' असं म्हणतात. वक्त्याची महती सांगणारा हा श्लोक अनेकांना पुरेसा माहीत नसतो म्हणून त्याचा उल्लेख करतो.

शतेषु जायते शूरः, सहस्रेषु च पण्डितः ।
वक्ता दशसहस्रेषु, दाता भवति वा न वा ॥

शंभर माणसे घेतली तर त्यांत एखादा शूरवीर असतो. हजारांत एखादा विद्वान असतो. दहाहजार माणसांत एखादा वक्ता असू शकेल पण दानी व्यक्ती मात्र असेल किंवा नसेल. वक्ता शब्दांतून बोलतो पण त्याहीपेक्षा तो अंतःकरणापासून बोलत असेल तरच त्याला श्रोत्यांकडून प्रतिसाद मिळतो. केवळ दळण दळीत बसलेल्या तथाकथित वक्त्याला ज्या टाळ्या मिळतात त्यांचा अर्थ

त्याला समजला पाहिजे. रसग्रहणाच्या टाळ्या आणि कुचेष्टेच्या टाळ्या ओळखता आल्या पाहिजेत. श्रोत्यांची मनःस्थिती, सभागृहातली परिस्थिती आणि वेळेचं अवधान ठेवून बोलण्याची चतुराई ज्याच्याजवळ नसते त्याची अवस्था कठीण होते. काय बोलू नये आणि कुठे बोलू नये हे ज्याला कळत नाही त्याच्या बद्दल काय बोलावे ?

एका शाळेच्या स्नेहसंमेलनात एक नामवंत साहित्यिक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. साहित्यिकांच्या जगात ते मान्यवर होते. पण त्या शालेय विद्यार्थ्यांसमोर त्यांनी 'विद्वत्ताप्रचुर' भाषण करायला सुरुवात केली. दोन-चार मिनिटे पोरांनी शांतपणे ते भाषण सहन केले. नंतर मात्र टाळ्यांचा गजर सुरू झाला. 'पुंडलिक वरदा हरि विठ्ठल' अशा घोषणा ऐकू येऊ लागल्या. पण या प्रतिभावंत साहित्यिकाला शाळेतल्या पोरांचं मन कळलंच नाही. ते महानुभाव पंथाचे साहित्य कोणत्या शतकात लिहिले गेले आणि त्या साहित्याचा समाजमनावर काय परिणाम झाला याची पांडित्यपूर्ण मीमांसा ते करीतच राहिले. पोरांचा गोंधळ गणितश्रेणीने वाढत गेला. संस्थेचे अध्यक्ष आणि मुख्याध्यापक यांचे चेहरे कमालीचे पडले. मधूनच काही शिस्तप्रिय शिक्षक विद्यार्थ्यांना शिक्षा करू लागले. वक्त्याची तर ब्रह्मानंदी टाळी लागली होती. ते महानुभाव पंथाच्या गहन तत्त्वज्ञानातून काही केल्या बाहेर पडेनात. आता एवढ्या मोठ्या साहित्यिकाला आणि विचारवंताला 'भाषण थांबवा' असं सांगण्याचं धैर्य कोण करणार ? मुख्याध्यापक मनातल्या मनात देवाची आळवणी करू लागले. नवस बोलू लागले. अखेर कुणीतरी चातुर्यानं सभामंडपातला विद्युत प्रवाह बंद पाडला. ध्वनिवर्धक रुसल्यामुळं ते महान वक्ते निराशेनं खाली बसले. पण भाषण संपवताना ते म्हणाले 'मित्रहो, आजचं भाषण अर्धवट झालं पुन्हा केव्हातरी येऊन हे भाषण मी निश्चितपणानं पूर्ण करीन असं मी तुम्हाला अभिवचन देतो.' आपलं अभिवचन त्यांनी पूर्ण केलं की नाही हे मला समजलं नाही. औचित्यहीन आणि रटाळ व दीर्घ भाषण करणाऱ्या महनीय साहित्यिकांत ते अग्रगण्य आहेत.

स्थळकाळाचं औचित्य जाणण्याची शक्ती भल्याभल्या लोकांत कित्येक वेळां नसते, याचं आश्चर्य वाटतं. आपलं भाषण सहनशील श्रोत्यांवर लादणं हा एकप्रकारचा भाषिक बलात्कार नव्हे काय ? वक्ता आणि श्रोता यांचे संबंध सौहार्दाचे नसतील तर सभेची आणि वक्त्याची शोकांतिका झाल्याशिवाय राहात नाही. सभेत

दोन-चारच श्रोते मरगळून बसले आहेत, मधून मधून जांभया देत आहेत, केव्हा याचं आख्यान थांबणार आहे असं प्रथम स्वतःशी आणि नंतर दुसऱ्याशी बोलत आहेत अशा वातावरणात वक्ता मात्र कुठल्यातरी सामान्य विचाराचा रवंथ करीत आहे हे दृश्य मी अनेक वेळां पाहिलं आहे. त्याचं भाषण संपल्यावर सर्व श्रोते हर्षभरित होऊन उत्साहाने टाळ्या वाजवतात. शाळा सुटल्याची घंटा झाल्यावर पोरं ज्या आनंदानं बाहेर पडतात तोच आनंद त्यावेळी श्रोत्यांच्या मुद्रेवर दिसतो.

अत्रे-फडके आणि खांडेकर यांची अनेक व्याख्याने मी झपाटून ऐकली. अत्र्यांच्या व्याख्यानात हास्य-विनोदाची वेगवान वावटळ सतत उठायची. श्रोत्यांना खुलवीत खुलवीत आणि कोट्यांची आतषबाजी करीत एखाद्या व्यक्तीची किंवा विचाराची भंबेरी उडवीत त्यांची वात्रट प्रतिभा जो स्वैर धिंगाणा घालायची त्याच्या मागे तपश्चर्येनं कमावलेली प्रतिभा होती. बोलणारा वक्ता (ही द्विरुक्ती मी मुद्दामच करतो) पुष्कळ ऐकलेला म्हणजे बहुश्रुत असावा लागतो. अनेक वक्त्यांच्या वक्तृत्वाची शैली त्याला अभ्यासावी लागते. आणि त्यात स्वतःचं विशिष्ट व्यक्तिमत्त्व मिसळावं लागतं.

प्रत्येक नामवंत गायकाचं गाणं जसं स्वतंत्र आणि वैशिष्ट्यपूर्ण असतं, त्याच्या प्रत्येक सुरात आणि आलापात जसा त्याचा रंग मिसळलेला असतो तसं वक्तृत्वाचंही आहे. वाचन, चिंतन आणि मनन, श्रवण यातून वक्तृत्वाला आकार मिळतो. 'मला वक्ता व्हायचं आहे. कसं वक्तृत्व करायचं ते मला सांगा. मी किती दिवसांत उत्तम बोलू शकेन ?' असले प्रश्न अनेकजण विचारतात. कोणत्याही कलेला अखंड तपस्येची जरूर असते. कलेच्या क्षेत्रात आपण आता परिपूर्ण झालो, जिंकण्यासारखं आता काही उरलं नाही या भ्रमात काही कलावंत असू शकतात. पण तो एक वेडेपणा आहे. कितीही चाललो तरी क्षितिज जसे गाठता येत नाही, ते दूरच राहाते तशीच अवस्था कलेचीही असते. कलेची आराधना अधिकाधिक करण्यात जो आनंद आहे तोच अधिक महत्त्वाचा. मिळालेले पुरस्कार आणि पारितोषिकं गौण असतात. ती पूर्णतेची पावती नसते. पुरस्काराच्या मागे लागणे म्हणजे कलेचा अवमान करणे आहे. 'अहो, मला पदवी द्या. अहो, माझ्या गौरवाची सभा घेऊन एक सन्मानपत्र मला अर्पण करा.' असे म्हणणारे खऱ्या अर्थानं तपस्वी कधीच होत नाहीत. वक्तृत्व हा देखील आराधनेचा विषय आहे. सुसंगत विचार, अर्थानुरूप शब्द, शुद्ध आणि स्पष्ट उच्चारण, बोलण्यातलं माफक नाट्य यांचं

[illegible] वक्त्याच्या [illegible]यार व्हावं लागतं. भाषण संपलं तरी भाषणातली कित्येक विधाने श्रोत्यांच्या मनात रेंगाळत राहिली पाहिजेत. आचार्य अत्रे एका राजकीय भाषणात आवेशानं म्हणाले होते,

"काश्मीरच्या गुलाबाचा गुलकंद आम्ही पाकिस्तानच्या बरणीत कधीच ओतणार नाही. प्रत्येक काश्मिरी गुलाबाला हिन्दुस्थानी सुगंध आहे." हे वाक्य उच्चारल्यावर हजारो श्रोत्यांनी टाळ्यांचा जो कडकडाट केला होता तो आज इतक्या वर्षांनीही माझ्या कानात निनादत आहे. दुसऱ्या एखाद्यानं हे विधान 'काश्मीर हा भारताचाच आहे.' एवढंच केलं असतं पण गुलाब, गुलकंद, सुगंध आणि बरणी या प्रतिमानांचा कल्पकतेनं आधार घेऊन अत्र्यांनी धमाल उडवून दिली. एखाद्याचा निषेध करायचा झाला तर ते 'मी त्याचा निषेध करतो' असले गद्यप्राय विधान करीत नसत. तर 'थूः तुझ्या जिनगानीवर' असे म्हणून ते जो अविर्भाव करीत तोही वक्तृत्वाचा एक घटक असे. माफक हातवारे आणि मुद्राभिनय यालाही वक्तृत्वाच्या क्षेत्रात स्थान आहे. पंडित नेहरू एखाद्या व्यक्तीचा किंवा तिच्या विचारांचा सभेत उपहास करायचा झाला तर स्वरात मिस्किलपणा आणून खांदे उडवीत बोलायचे. खांदे उडवण्याच्या क्रियेमुळं मिस्किलपणात भर पडायची. याच्या उलट गांधीजींचं वक्तृत्व शांत आणि संथ असायचं. गंभीर विचाराला ते साजून दिसायचं. काही वक्ते तारसप्तकातच किंचाळू लागतात. अंग घुसळून ओरडू लागतात. या दंगामस्तीला मी तरी वक्तृत्व म्हणणार नाही.

एक वक्ते मोठ्याने ओरडून म्हणाले, 'समाजवाद म्हणजे काय ? समाजवाद म्हणजे लाडू किंवा जिलबी नव्हे ! मी समाजवादाची व्याख्या करतो-समाजवाद म्हणजे चेष्टा नव्हे !! समाजवाद म्हणजे मस्करी नव्हे !!! समाजवाद म्हणजे समाजवाद आहे !' त्यांची ही अभिनव, विचारप्रवर्तक व्याख्या ऐकून मी पोट धरूधरून हसलो. पण श्रोते मात्र टाळ्या वाजवीत होते. कारण वक्ते महाशय आपण फारच ओजस्वी आणि मौलिक विधान करीत आहोत अशा आविर्भावाने गर्जून बोलले होते. या पुढारी वक्त्याच्या काही चमच्यांनी टाळ्या वाजवल्याबरोबर सर्व सभेने कडकडून टाळी दिली. पुढाऱ्यांच्या मुद्रेवर समाधानाचे हास्य चमकले. अब्राहम लिंकननंतर लोकशाही आणि समाजवाद यांची आपणच मार्मिक व्याख्या केली याची त्यांना धन्यता वाटली.

मराठी कादंबरीच्या क्षेत्रातले 'जादूगार' ना. सी. फडके बहारदार शैलीचे

वक्ते होते. त्यांच्या भाषणातली [illegible]ता [illegible] ी रेखी[illegible] त्यांच्या बोलण्याचे वैशिष्ट्य. मधून मधून चमकदार कि[illegible] लॉजिकसारखा कंटाळवाणा विषय पण त्यात ते असा रंग भरायचे की त्यांच्या तासाला वर्ग पूर्ण भरून जायचा. काहीवेळा मी मुद्दाम त्यांच्या तासाला बसलो होतो. एकदा वर्गात टिपण देताना ते म्हणाले, 'धिस् स्टेटमेंट इज इम्पॉर्टण्ट दोज हू हॅव रेड पेन्सिलस् शुड अंडरलाइन इट, अँड दोज हू हॅव रेड लिप्स् शुड किस् इट्' वर्गात हास्याची लाट उसळली. अत्रे-फडके आणि खांडेकर तिघेही शिक्षक होते. शिक्षकी पेशानेच महाराष्ट्राला अधिक वक्ते दिले. हे विसरता येणार नाही.

मी कितीतरी उत्तमोत्तम व्याख्यानं माझ्या आयुष्यात ऐकली आहेत. गायकाची रंगत चाललेली मैफल आणि वक्त्याचं रंगत चाललेलं व्याख्यान यात अधिक सुंदर कोणतं हे ठरवता येणं कठीण आहे. 'नवा वाणी मुखे मुखे' असं एक वचन आहे. प्रत्येक मुखातली वाणी नवीन असते. याचं काय ऐकायचं ? असं म्हणून ऐकण्याच्या आनंदाला आपण वंचित होऊ नये. तुकारामांचं कीर्तन ऐकणार नाही असं म्हणणारे तुच्छतावादी पंडित तुकोबांच्या वाणीचे भक्त झाले. 'अंतरीचा निर्मळ, वाचेचा रसाळ, त्याचे गळा माळ, असो नसो' हे तुकोबांचे शब्द उत्तम वक्तृत्वाचं लक्षण सांगणारे आहेत. मी शेकडो व्याख्यानं ऐकली. शेकडो वक्त्यांना पाहिलं. त्यांच्या वाणीचं सामर्थ्य अनुभवलं. आनंदाचे हे असंख्य क्षण कसे विसरू ?

■■■

# माणसा तू असा कसा ?

माणूस हा एक अजब प्राणी आहे. त्याला समजून घेणे अत्यंत कठीण किंवा जवळजवळ अशक्यच म्हटले पाहिजे. एका विचारवंताने माणसासंबंधी म्हटले आहे, 'मानव म्हणजे विश्वाचे वाह्यात पोरटे आहे. विसंगतींचे एक गाठोडे आहे.' या मतात निश्चितच तथ्य असले पाहिजे. कारण या सुंदर सृष्टीत माणसाने प्रचंड उलथापालथी करून ठेवलेल्या दिसतात. तो बुद्धिमान आहे. पण लहरी आणि मूर्ख आहे. तो एका हाताने सौंदर्याची निर्मिती करतो आणि दुसऱ्या हाताने त्याचा चोळामोळा करून टाकतो. एकीकडे संतमहात्मे पाहिले म्हणजे त्यांची ईश्वराशी स्पर्धा चालली आहे आणि आपल्याच ठायी तो परमेश्वर आहे हे सिद्ध करण्याची त्यांची धडपड जाणवते. तर दुसरीकडे मानवी रक्ताने आपले हात बरबटून घेण्याची त्याची क्रूर हौस पाहिली म्हणजे तो सैतानाचा जिवलग आहे याची कल्पना येते. हा माणूस कसा आहे हे खरे तर देवालासुद्धा कळलेले नाही. माणसाला निर्माण करण्याचा पश्चात्ताप त्याला निश्चित झाला असेल. देवाने ज्याच्या 'महान' कर्तृत्वापुढे हात जोडावेत असे या माणसाचे एकेक पराक्रम आहेत.

कुणीतरी परमेश्वराला विचारले, 'देवाधिदेवा, तुमची सर्वात सुंदर निर्मिती कोणती ? तुम्ही उत्पन्न केलेली सर्वात कुरुप गोष्ट कोणती ?' विश्वनिर्माता असलेला तो ईश्वर थोडावेळ बुचकळ्यात पडला, आणि नंतर म्हणाला, 'माणूस ही माझी सर्वोत्कृष्ट निर्मिती आहे. या निर्मितीबद्दल मला अभिमान वाटतो. माझ्या कुंचलीतून आकाराला आलेलं हे सर्वात सुंदर चित्र आहे. माझ्याच निर्मितीसमोर मी नतमस्तक होतो. पण माझी अत्यंत वाईट, विकृतीनं भरलेली, मलाच नकोशी झालेली अशी कृती म्हणजे माणूसच ! पृथ्वीवर त्यानं अनंत भानगडी करून ठेवल्या. मी नारळात पाणी निर्माण केलं, त्यानं त्या पाण्याची दारू बनवली. मी त्याला बुद्धी दिली पण त्यानं स्वार्थबुद्धीनं एकमेकांचे गळे कापायला सुरुवात केली. आता माणसांची चिंता करणं मी सोडून दिलं आहे. माणसांपासून माझं रक्षण कसं होईल याची चिंता सध्या मला लागली आहे.' आता या देववाणीवर विश्वास ठेवलाच पाहिजे. मनुष्याने देवालाच 'त्राहि भगवन्' करून सोडलेलं आहे, यात शंका नाही.

खरेच मनुष्याइतका बेभरवशाचा चमत्कारिक प्राणी या भूतलावर दु· नाही. परवा मी एक प्राणीसंग्रहालय पाहाण्यासाठी गेलो होतो. माझ्याबरोबर माझे आठ-दहा मित्र होते. प्रथम माकडांच्या पिंजऱ्याजवळ गेलो. मर्कटलीला चालू होत्या. एकमेकांची शेपटी ओढण्यात आणि दुसऱ्याच्या हातातील खाद्यपदार्थ हिसकावून घेण्यात माकडमंडळी रमलेली होती. माणसं आणि माकडं यांच्यातलं हे विलक्षण साम्य पाहून कुठल्याशा शास्त्रज्ञाने माकड हा माणसाचा पूर्वज आहे हे मत मांडल्याचे आठवले. काही माकडे आमच्याकडे कुतूहलाने पाहात होती. 'माणूस माणूस म्हणतात तो हाच !' असं ती मनात म्हणाली असतील. कुणीतरी त्याला वेडावून दाखवले. त्यानेही दात विचकून प्रत्युत्तर दिले. आम्ही परस्परांना ओळखले. पुढे वाघाच्या पिंजऱ्याजवळ गेलो तेव्हा तो वाघ आपल्या बछड्याला म्हणाला, 'नीट पाहून ठेव. ही माणसांची जात फार बेइमानी असते. कधीही विश्वास ठेवू नकोस. माणसांपासून दूर रहा. आपल्याला भूक लागली तरच आपण सावजावर हल्ला चढवतो. पण माणसाचं तसं नाही. भूक नसली तरी तो कुणावरही हल्ला करतो. गंमत म्हणून प्राण्यांची शिकार करतो. आपण शंभर टक्के वाघ आहोत. पण माणसांत पंचवीस टक्के कोल्हा, पंचवीस टक्के लांडगा, पंचवीस टक्के मस्तवाल रेडा आणखी पंचवीस टक्के इतर प्राणी मिसळून 'माणूस' नावाचं हे एक चमत्कारिक जनावर परमेश्वरानं बनवलं आहे. इतका विश्वासघातकी प्राणी दुसरा नाही. खरं तर यांनाच पिंजऱ्यात ठेवलं पाहिजे. म्हणजे आपण पिंजऱ्याबाहेर उभं राहून त्यांना डिवचलं असतं. आणि यांची गंमत पाहिली असती.' त्या वाघानं आपलं प्रवचन संपवून आमच्याकडे एक रागीट दृष्टीक्षेप करून तो आपल्या बछड्यांशी खेळू लागला. आमच्याकडे पुन्हा पाहायलाही तो तयार नव्हता. आमची तो उपेक्षा करीत होता. त्यानंतर आम्ही खेचर, झेब्रा यांच्या पिंजऱ्याकडे वळलो. पलीकडच्या पिंजऱ्यात काही काळी-पांढरी गाढवेही होती. मधून-मधून ती आपलं 'मधुर गायन' करीत होती. एक गाढव दुसऱ्याला म्हणाले,

'ती पहा माणसं, 'गाढवांचा गोंधळ आणि लाथांचा सुकाळ' अशी म्हण याच लोकांनी तयार केली. पण आपल्या लाथा फारशा उपद्रवी नसतात. आपल्या लाथांमागे काहीतरी कारण असते. पण माणसं ज्या लाथा मारतात त्या पुष्कळवेळा निष्कारण असतात. कारणाशिवाय लाथा झाडणारे हे प्राणी स्वतःला शहाणे समजतात आणि 'गाढव' म्हणून आमची हेटाळणी करतात. माणूसपणापेक्षा

गाढवपणा कितीतरी चांगला. एखाद्याला शिक्षा करायची झाली तर ही माणसं त्याची गाढवावरून धिंड काढतात. कृतघ्न माणसाला गाढवावर बसवणं यासारखी गाढवाची विटंबना ती कोणती ? माणसांची सेवा करूनही गाढवाला अपमानित करणाऱ्या माणसाच्या बुद्धीचं कौतुक केलं पाहिजे. एखाद्याला 'गाढव' म्हणणं हा माणसाचा सन्मान आहे. आमचं राज्य आलं तर आम्ही चांगल्या व्यक्तींचा गौरव करण्यासाठी त्यांना 'गर्दभश्री', 'गर्दभभूषण', 'गर्दभरत्न' अशा पदव्या देऊ. पण इतक्या सन्माननीय पदव्या प्राप्त करून घेण्याची माणसांची योग्यता नाही. कितीही प्रयत्न केला तरी माणूस गाढव होऊ शकणार नाही. कारण गाढवी सद्‌गुण माणसाच्या ठिकाणी येऊ शकणार नाहीत.' त्या गाढवाचं हे विचारप्रवर्तक भाषण इतर गाढवांना आणि आजूबाजूच्या पिंजऱ्यांतल्या प्राण्यांना फारच आवडलं असावं, कारण सर्वांनी आपापल्या आवाजात पसंती दर्शवून त्या गाढववक्त्याचं मनःपूर्वक अभिनंदन केलं. प्राण्यांच्या सृष्टीत माणसाची काय किंमत आहे हे मला कळले. त्या प्राणीसंग्रहालयात बरीच झाडे होती. एका झाडावर बसलेल्या अनेक कावळ्यांची काव काव ऐकू येत होती. माणसांबद्दलच त्यांचाही परिसंवाद चालू असावा. एक काक नेते म्हणाले,

'कावळे बंधू आणि भगिनींनो, माणूस हा आपल्या ओळखीचा प्राणी आहे. आपण त्याला नेहमी पाहतो. पण हा माणूस आपल्याला नीट समजलेला नाही. कावळ्यांवर कुत्सित टीका करणारी ही माणसं कुणाच्याही मर्मावर चोच मारतात. आम्ही मंडळी घाण नाहीशी करतो. पण माणूस मात्र घाणीचे उकिरडे तयार करतो. तो स्वतःला ज्ञानी म्हणवतो पण मृत माणसाच्या अपुऱ्या इच्छा काय आहेत हे समजून घेण्यासाठी माणसं आपल्यालाच काकुळतीनं बोलवतात. पिंडाला कावळा शिवल्याशिवाय अंत्यविधी पूर्ण होत नाही, ही एकच गोष्ट माणसांपेक्षा तुम्ही आम्ही श्रेष्ठ आणि पवित्र आहोत ही सिद्ध करणारी आहे. कावळ्यांवर निष्कारण निंदेची चिखलफेक करणाऱ्या माणूस जातीनं आपल्यातच असलेले कावळे आणि गिधाडे यांना जाणून घ्यावे. या माणसांतही काही महात्मे असतात. आम्ही कावळे शुभशकुनी आहोत हे संत ज्ञानेश्वरांनी सातशे वर्षांपूर्वी ओळखलं होतं. ते म्हणतात, 'उड उड रे काऊ। तुझे सोन्याने मढवीन पाऊ॥' पण माणसांत संत थोडे, ढोंगी बगळेच जास्त असतात. ते आपल्याला अपवित्र मानतात पण तेच अपवित्र आहेत हे लक्षात ठेवा. आजचे प्रवचन संपले.' कावळे महाराजांनी आज्ञा देताच सारी

काकमंडळी काव काव करीत निघून गेली. आम्ही पुढे चाललो. दोनतीन हत्ती झाडाखाली उभे होते. त्यांनी तर आमच्याकडे पाहिलेही नाही. गजराजांनीही आमची उपेक्षाच केली.

पशू आणि पक्षी दोघांनाही माणूस आवडू नये याचं मला आश्चर्य वाटलं. माणसाच्या क्रूरतेविषयी त्यांनी काढलेले काही उद्‌गार साहित्यातही अमर झाले आहेत. रेव्हरंड टिळकांची 'केवढे हे क्रौर्य' ही कविता मला आठवते. कोणा नराधमाने बाण मारल्यामुळे घायाळ झालेली एक पक्षिणी कष्टाने कशीबशी घरट्यापर्यंत येते आणि आपल्या पिलांसाठी आणलेला घास त्यांच्या तोंडी देते. तो शेवटचा घास भरवताना ती म्हणते,

'या मनुष्यजातीला रमवण्यात माझं आयुष्य गेलं. गाणी गाऊन त्यांचं रंजन केलं. त्याची परतफेड माणसानं मला बाण मारून केली आहे. बाळांनो, तुम्हाला अखेरचा घास देण्यासाठी आले. आता तो परमेश्वरच तुमचं रक्षण करील.' पक्षिणीचे प्राण उडून गेले. घरट्यातल्या पिलांनी आक्रोश केला, चौथ्या इयत्तेत असताना ही कविता आम्हाला मास्तरांनी शिकवली. पक्षिणीचा काहीही अपराध नसताना तिचा एका माणसानं जीव घ्यावा या घटनेचा अर्थ तेव्हा मला कळला नव्हता. पण दूध पाजणाऱ्याच्या हाताला कडकडून दंश करण्याची वृत्ती सर्पापेक्षा माणसातच अधिकांशानं आहे हे सत्य हळूहळू उमगलं. ती पक्षिणी मात्र इतकी वर्षे झाली तरी अजून मनाच्या घरट्यातून गेली नाही. तिच्यासारखी निष्पाप मनाची हजारो बालके हिटलर आणि त्याच्या साहाय्यकांनी केवळ ज्यू असल्याच्या कारणावरून गॅस चेंबरमध्ये जाळून मारली. मुलांच्या किंकाळ्या ऐकत असताना मारेकरी हसत होते. नाचत होते. बालकांचे आईबाप ओक्साबोक्शी रडत होते. म्हणून त्यांनाही आगीच्या भट्टीत फेकण्यात येत होते. माणसाचे हे विद्रूप दर्शन पाहून तर परमेश्वरानं जगाकडं पाठ फिरवली नसेल ना ? माणसाच्या संस्कृतीवर आणि स्वभावावर जी विदारक टीका पशुपक्ष्यांनी केली ती बरोबरच होती. अनेक प्रकारच्या विसंगती मानवी स्वभावात रुजून बसल्या आहेत. हाच तो माणूस ज्याने येशूख्रिस्ताच्या हातापायात खिळे ठोकून त्याला क्रूसावर निर्दयपणे मारून टाकले. दयाधर्माची शिकवण देणाऱ्या ख्रिस्ताला मात्र दयामाया न दाखवता सुळी देण्यात यावं ही केवढी भयानक विसंगती आहे. आज माणूस येशूख्रिस्ताची प्रार्थना करीत आहे.त्याच्या नावानं त्यानं कालगणना सुरू केली आहे. ख्रिस्ताच्या चरित्राचा

आणि चारित्र्याचा आज मनुष्य जयजयकार करीत आहे. ईश्वराचा पुत्र आणि प्रेषित म्हणून त्याला पूजीत आहे. ज्या महापुरुषांना जिवंतपणे समाजानं छळलं त्यांचे मृत्यूनंतर मात्र पुतळे उभे करण्यात आले. जिवंत असताना विटंबना करायची आणि मरणानंतर स्तुतिस्तोत्रे गायची ही जगाची रीत म्हणजे मानवी न्यायाचा नमुना आहे.

'बळी तो कान पिळी' हा जंगलचा न्याय म्हणून आपण पशुसृष्टीला हसतो. माणूस आणि पशू यांच्यात माणूस कसा ज्ञानवंत आणि सुसंस्कृत आहे हे सांगत राहातो. पण ज्ञानी समजला जाणारा मनुष्य सत्तेचं सिंहासन मिळावं म्हणून बापाला तुरुंगात डांबून भावांची हत्या करू शकतो. कोणी गारद्यांना सांगून पुतण्याचा खून पाडू शकतो. आजही देशोदेशीच्या राजकारणात कटकारस्थान, घातपात, खूनकत्तली, जाळपोळ याच गोष्टींना मुत्सद्दीपणाचा आणि राजकारणचातुर्याचा मुलामा देण्यात येतो. पशुपक्षी बिचारे ज्ञानहीन असल्यामुळं त्यांची संस्कृती माणसांइतकी प्रगत होऊ शकली नाही. ते भूक लागली तरच खातात. तहान लागली तर पाणी पितात. पण केव्हाही खाणारा आणि कितीही पिणारा, रात्रंदिवस ढोसत बसलेला मनुष्यप्राणी किती बुद्धिमंत आहे हे सांगायलाच नको. माणूस हा एक नाटकी प्राणी आहे असं कित्येक विचारवंतांनी सांगितलं आहे. आपण प्रत्यक्ष परमेश्वराचे आवतार आहोत, लोकांना दुःखमुक्त करण्यासाठी डायरेक्ट कैलासावरून या पृथ्वीवर आलो आहोत असं सांगणारे एक 'महाराज' आध्यात्मिक प्रवचन संपल्यावर आपल्या सर्वप्रकारच्या शारीरिक क्षुधा आणि तृष्णा भागवण्यासाठी आपल्या एअरकंडिशड् 'पवित्र आश्रमात' अनेक 'आश्रमहरिणींच्या' समवेत अध्यात्मसाधना करीत असत. कुणीतरी भक्ताने हे पाहिले. त्याला धक्काच बसला. थोडावेळ आपण काय पहात आहोत हेच त्याला कळेना. दयाळू महाराज मनातून अत्यंत प्रक्षुब्ध झाले. पण बाह्यतः तसं न दाखवता आपल्या धीरगंभीर स्वरात म्हणाले, 'वत्सा, ही परमेश्वरी लीला आहे. हिचं मर्म मर्त्य मानवाला कळणं शक्य नाही. आम्ही साक्षात् ईश्वररूप असल्यामुळं कोणत्याही कर्माचा लेप आम्हाला लागत नाही. तुम्ही भक्तांनी भक्तिभावानं आमच्या लीला पाहाव्यात. त्याचं अनुकरण करू नये.' महाराजांची पावन वाणी भक्तानं शिरोधार्य मानली. धूर्तानं मूर्खाला फसवावं. सत्ताधाऱ्यानं जनतेचं शोषण करावं आणि स्वतःचं पोषण करावं हा मानवी व्यवहार, अज्ञानी लोक दैवी स्वरूपाचा मानतात, माणसाचे किती खेळ वर्णावेत ?

संपूर्ण माणूस असा दांभिक, विश्वासघातकी, स्वार्थपरायण आणि अन्यायी आहे हे मत मात्र पक्षपाती आहे. एकांगी आहे. अतिरेकी आहे. माणसाच्या एकाच बाजूवर प्रकाशझोत टाकून माणूस नीट समजणार नाही. संस्कृतीच्या इतिहासाची पानं चाळताना माणसाच्या पराक्रमाचा, प्रतिभेचा, ध्येयवादाचा सुगंध मधूनमधून दरवळत राहातो. राम, कृष्ण, महावीर, बुद्ध, बसवेश्वर, ज्ञानेश्वर यासारखे श्रेष्ठतम धर्मपुरुष आणि मार्गदर्शक याच माणसांतून निर्माण झाले आणि त्यांनी माणुसकीला आकार दिला. एकापेक्षा एक रणधुरंधर राजांच्या शौर्याची नोंद इतिहासात आढळते. सिकंदरासारखा जगज्जेता पंचविशीच्या आतच आपल्या शौर्याची पताका जगभर फडकवू शकला ही सामान्य घटना नव्हे. छत्रपती शिवाजी राजाच्या समशेरीला संतांच्या वाणीचं पाणी मिळालं होतं म्हणूनच ती समशेर स्वातंत्र्य आणि न्याय याचं दर्शन घडवू शकली. कवी, शास्त्रज्ञ, तत्त्ववेत्ते, गणिती, समाजसुधारक यांनी दिलेल्या प्रकाशातून माणूस अधिक सबळ आणि सुसंस्कृत होत गेला. माणूस नावाचं सृष्टीनं तयार केलेलं रसायन चमत्कारिक असेल पण ते सर्वस्वी कडवट नाही. त्यात मधुरतेचेही अनेक प्रकार आहेत.

अखेर इतकंच सांगतो की सृष्टिजीवनाच्या वेलीवर उमललेलं माणूस नावाचं चित्रविचित्र रंगाचं हे फूल एक आगळा सुगंध देतं. काटे वगळून ते स्वीकारता येत नाही, काट्यासकट याची गंधवेदना घ्यावी लागते. चांदणं आणि निखारे यांच्या संगमातून तयार झालेला हा माणूस परमेश्वराला आव्हान देत चंद्र-मंगळावर चढाई करीत आहे. हे दृश्य सुखकारक आहे पण आकाशातले ग्रह जिंकण्याच्या नादात त्यानं स्वतःला नीट ओळखावं इतकंच म्हटलं पाहिजे. जग जिंकण्याच्या ध्यासात माणूस हरत आहे ही त्याची शोककथा अनेकांनी सांगितली आहे. माणसानं सर्वकाही व्हावं, सर्वकाही जिंकावं पण त्यानं 'माणूसच' राहावं !

■■■

# पुन्हा भेटू, जय हिंद !

कारगीलमध्ये वीरमरण आलेल्या एका सैनिकाच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार केला जात होता. चिता पेटवताना सैनिकाच्या वृद्ध पित्याच्या डोळ्यांत अश्रू नव्हते. ज्वलंत अभिमानाने त्याचे डोळे चमकत होते. थरथरत्या हाताने त्याने चिता पेटवली. ज्वाला भडकू लागल्या. बिगुलातून शोकसंगीताचे सूर उमटू लागले. हजारो स्त्री-पुरुषांचे डोळे भरून आले. आपल्या गावाच्या मातीत खेळलेला, वाढलेला आणि एक महिन्यापूर्वीच विवाहित झालेला एक तरणाबांड सैनिक देशाचं रक्षण करताना धारातीर्थी पडला होता. सारं गाव त्याच्यासाठी अश्रू ढाळत होतं. पण वृद्ध पिता मात्र रडत नव्हता. तो उंच स्वरात म्हणाला, 'लढता लढता माझा मुलगा शत्रूच्या गोळ्यांना बळी पडला. मातृभूमीसाठी मरण पत्करलेले शूर सैनिक कधीच मरत नाहीत. माझ्या मुलाच्या बलिदानाचा मला अभिमान वाटतो. हे दुःखाचं मरण नाही. देशासाठी प्राण देण्याचं भाग्य माझ्या मुलाला लाभलं. माझं घराणं धन्य झालं. बोला, जयहिंद ! भारतमाताकी जय !'

जमलेल्या हजारो लोकांच्या हृदयाचा बांध फुटला. कित्येकांना हुंदके अनावर झाले. अंथरूणावर पडून पिचत मरण्यापेक्षा शत्रूला मारता मारता मरून जाणे भाग्याचे नव्हे काय ? जिवाच्या भीतीने दडून बसणाऱ्या नेभळटांना सुद्धा एक दिवस मरावेच लागते. असल्या क्षुद्र मरणापेक्षा मृत्यूच्या सान्निध्यात बेदरकारपणे राहाणाऱ्या सैनिकांचे राष्ट्रासाठी झालेले वीरमरण कितीतरी अभिमानास्पद असते. वेलीवर उगवलेले एक सुगंधी फूल म्हणाले, ''मला एखाद्या देवमूर्तीवर वाहू नका. एखाद्या हारातही गुंफू नका. देशासाठी प्राणार्पण केलेल्या एकाद्या वीराच्या अंत्यायात्रेच्या वाटेवर मला टाका म्हणजे मी त्या देशभक्ताला वंदन करीन. माझं जीवन सफल होईल.'' कुठल्याशा कवितेत आलेली ही कल्पना रोमांचित करणारी आहे. त्या मृत सैनिकाच्या पार्थिवावर हजारो फुले जनतेने उधळली होती. सैनिकाच्या अंगाची गोळ्यांनी चाळण झाली होती. पण अखेरचा श्वास सोडण्यापूर्वी त्याने अनेक शत्रूसैनिकांना ठार केले होते. राष्ट्रदेवतेच्या चरणांवर आपल्या प्राणांची आहुती देणारे तिचे भक्त हेच खरा इतिहास घडवीत असतात.

आपल्या देहाचा आणि समग्र जीवनाचा अर्घ्य देऊन त्यांनी केलेली राष्ट्रपूजा हा खरे तर महाकाव्याचा विषय आहे. कवींनी आपल्या प्रतिभेची आरती अशा महावीरांभोवती ओवाळली पाहिजे. रंडागीते गाण्यापेक्षा रणगीताचे शब्द आणि सूर कवितेतून उमटले पाहिजेत. मरण्यासाठी सिद्ध असलेले शूरवीर राष्ट्र जिवंत ठेवू शकतात. त्या हुतात्म्याचा हजारो लोकांनी जयघोष केला. उंच जाणाऱ्या ज्वालांच्या पायऱ्या चढत त्याने आता स्वर्गात प्रवेश केला होता.

शेक्सपिअरचं एक अर्थपूर्ण वचन मला यावेळी आठवतं. एका नाटकात त्यानं म्हटलं आहे, 'भेकड माणसे आपल्या मरणापूर्वीच कित्येकवेळा मरून जातात. पण वीर मात्र एकदाच मरतो. खऱ्या अर्थानं तो मरतच नाही.' एक विलक्षण सत्य त्यानं यातून सांगितलं आहे. एका स्वातंत्र्य भक्ताला साम्राज्यशाहीविरुद्ध बंड केल्याच्या आरोपावरून फाशीची शिक्षा ठोठावली होती. शिक्षा ऐकताना त्याच्या मुद्रेवर प्रसन्न स्मित होतं. ज्या कोठडीत त्याला डांबण्यात आलं होतं तिथल्या काळोखात तो उजेडाची गीतं उच्च स्वरात गात होता. पायातल्या बेड्यांचा खळखळाट त्याला संगीताच्या सुरांसारखा कर्णमधुर वाटायचा. कोठडीच्या भिंतीवर आपल्या नखांनी तो भारताच्या जयजयकाराची कविता लिहायचा. फाशीचा दिवस उजाडला तेव्हा उत्साही पाउले टाकीत तो फासाच्या फळीकडे निघाला. जणू तो आपल्या गळ्यात वरमाला घातली जाणार आहे या भावनेने लग्नमंडपाकडे चालला होता. त्याच्या चेहऱ्यावर हास्य होते. दृष्टीत तेज होते, बोलण्यात ओज होते. चालण्यात रग होती. त्याच्या मनात स्वातंत्र्यभावनेची धग होती. फाशी द्यायला निघालेले भाडोत्री शिपाई खाली मान घालून मरगळल्यासारखे चालत होते. ताठ मानेने निघालेला हा स्वातंत्र्यवीर मात्र मातृभूमीचा जयघोष करीत होता. भयाचे आणि दुःखाचे लेशमात्रही दर्शन त्याच्या मुखावर होत नव्हते. आता हा माणूस मरणार होता असे म्हणता येईल का ? तो चिरंजीव होणार होता आणि त्याला फासावर चढवणारे मात्र मरून जाणार होते. फाशी जाणाऱ्याचे नाव लक्ष लक्ष अंतःकरणावर कोरले जाणार होते. फाशी देणाऱ्या क्षुद्रांना कोण ओळखणार होते?

मृत्यू शूरवीरांना, ध्येयवाद्यांना पुसून टाकू शकत नाही. मरणाला जिंकणारे पराक्रम आमच्या सैनिकांनी, देशभक्तांनी केले आहेत. आपल्या रक्ताच्या अक्षरांनी राष्ट्रगौरवाचा इतिहास लिहिणारे वीर जोपर्यंत या देशात आहेत तोपर्यंत कोणत्या मायेचा पूत या देशाकडे वाकड्या नजरेने पाहणार आहे ?

देशरक्षणासाठी शस्त्रबळ आवश्यक असते. विमाने, रणगाडे, क्षेपणास्त्रे, अण्वस्त्रे, तोफा आणि बंदुका, लढाऊ पाणबुड्या आणि सर्वप्रकारची अद्ययावत् साधने मिळवून सुसज्ज झाले पाहिजे. आम्ही सज्जन असलो तरी दुर्जनांवर विश्वास टाकण्याचा सज्जनपणा अत्यंत आत्मघातकी ठरतो हे इतिहासाने अनेकवेळा सिद्ध केले आहे. स्नेहभेटीसाठी मैत्रीचे नाटक करीत येणारे अफझुलखान अनेक असतात. त्यांचा कोथळा बाहेर काढणारी वाघनखे आणि व्याघ्रवृत्ती असणारे शिवाजी यशस्वी होतात. शत्रूच्या नाटकाला बळी पडण्याचा भोळेपणा राज्यकर्त्याकडे असून चालणार नाही. यादृष्टीने विचार करू लागल्यावर गेल्या काही शतकांत शिवाजी महाराजांसारखा धीरवीर, मुत्सद्दी, चाणाक्ष आणि शत्रूच्या मनातले रंग आणि ढंग न्याहाळू शकणारा धूर्त राज्यकर्ता दुसरा झाला नाही असे विधान करता येते. अफझुलखानासारखा बलदंड शत्रू एकोणतीस वर्षांच्या या अननुभवी तरुणाने पाहता पाहता लोळवला. ही घटना आजही अद्‌भूत वाटते. सहा-साडेसहा फूट उंचीचा तो बलाढ्य आणि मुरलेला सेनापती. जेमतेम साडेपाच फूट उंचीच्या पोराने गारद करावा हा खरोखरच चमत्कार आहे. मस्तक तुटून पडले तरी नुसत्या धडाने तलवार फिरवीत शत्रूंना अस्मान दाखवणारा बाजीप्रभू हाही चमत्कार नव्हे का ? शस्त्रबळापेक्षा इथे मनोबळ हेच अधिक उपयुक्त ठरते.

अर्जुनाच्या शौर्याला तोड नव्हती. त्याचे धनुष्य आणि बाण तेजस्वी होते. पण रणांगणात आल्यावर अर्जुनाची वीरश्री गळून पडली. मनाने मवाळ बनलेला तो वीर रणातून निघून जाण्याची शेळपट भाषा बोलू लागला. पण कृष्णवाणीने त्याच्या पौरुषाची ज्योत पुन्हा धडाडून पेटली. म्हणूनच पांडवांचा विजय झाला.

शस्त्रांना धार असते पण सैनिकाच्या मनोवृत्तीला धार नसेल तर शस्त्रसुद्धा निरुपयोगी ठरते. भारताचे सैनिक कारगिलमध्ये जिवाच्या निर्धाराने लढले. पाकिस्तानी शिपायाप्रमाणे ते भाडोत्री घूसखोर नव्हते. त्यांच्या दिमतीला अत्याधुनिक शस्त्रास्त्रे होती. पण भारतीय सैन्याचा मारा सुरू झाल्याबरोबर त्यांची दाणादाण उडाली. लढण्यामागे उच्च प्रतीची प्रामाणिक देशभक्ती असावी लागते. छातीवर घाव झेलण्याची छाती असावी लागते. प्राण फेकण्याची हिम्मत असेल तरच रणवऱ्यांच्या गळ्यात विजयश्री वरमाला घालते.

राष्ट्राला देवता मानून तिची उपासना करावी या विचारावर प्रतिकूल टीकाटिप्पणी करणारे काही लोक आहेत. त्यांच्या मते राष्ट्र म्हणजे जमिनीचा एक

मोठा तुकडा. त्या तुकड्यासाठी त्याग केला पाहिजे, बलिदान दिलं पाहिजे ही कल्पनाच हास्यास्पद आहे. निर्जीव जमिनीला देवता मानण्यात भाबडी भावविवशता मात्र दिसते. ही विचारसरणी स्वीकारणारे विचारवंत राष्ट्रीय जाणीवेला पारखे झालेले असतात. देशावर प्रेम करणे हा वेडेपणा नसून एक उदात्त शहाणपणा आहे. ज्या भूभागात आपण जन्माला आलो, वाढलो आणि मृत्यूनंतर ज्या भूमीतच आपल्याला मिसळून जायचे आहे ती भूमी स्वर्गापेक्षाही श्रेष्ठ आणि सुंदर वाटली पाहिजे. राष्ट्र हा आपल्या श्रद्धेचा विषय असला पाहिजे. माझं घर म्हणजे दगड, माती आणि सिमेंट नव्हे. माझं घर म्हणजे केवळ मुक्कामाचं आणि निवाऱ्याचं ठिकाण नव्हे. घराशी आपल्या मनाचे धागे जुळलेले असतात. राजमहाल कितीही सुंदर असला तरी माझ्या घराचं सुंदरपण मला अधिक श्रेष्ठ वाटतं. राष्ट्रीय जाणीव अशीच असते. 'बहु असोत सुंदर संपन्न की महा, प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा', 'सारे जहाँसे अच्छा हिन्दोसिताँ हमारा' ही भावना भाबडेपणाची नाही. मातेइतकीच मातृभूमी पवित्र आणि वंदनीय असते. कोरड्या बुद्धिवादाच्या निकषावर ही भावना तपासून घेण्याचा प्रयत्न मूर्खपणाचा आहे. 'माझ्या देशाला आणि माझ्या संस्कृतीला शिव्या देशील तर तुला उचलून समुद्रात फेकून देईन.' असे एका परदेशी टवाळखोराला स्वामी विवेकानंदांनी जहाजातून प्रवास करताना धमकावले होते. जन्मभूमीच्या पावित्र्य रक्षणासाठी रक्त सांडणारे आणि प्राणार्पण करणारे वीर आमच्या गाढ अभिमानाचे विषय आहेत, 'क्रांतीचा जयजयकार' या कुसुमाग्रजांच्या कवितेतल्या काही ओळी मनाला त्यातल्या उत्कट आणि उदात्त भावनेने झपाटून टाकतात.

कशास आई रडविसी डोळे, उजळ तुझे भाल
रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उषःकाल

राष्ट्रमातेच्या अस्मितेसाठी आपले प्राण सहजपणे फेकून देण्याची सिद्धता असलेले असंख्य तरुण ज्या देशात असतात तो देश कधीच परतंत्र होणे शक्य नाही. स्वातंत्र्याची महती गाताना सावरकरांनी स्वातंत्र्यदेवतेचेच स्तवन केले आहे. राष्ट्र म्हणजे केवळ जमीन नव्हे. आमच्या देशातून वाहाणाऱ्या नद्या, उचंबळणारा सागर, डोंगर आणि पर्वत, हिरवीगार शेते, झाडं झुडपं आणि कोटी कोटी माणसं - मिळून तयार झालेल्या एका विशाल आणि सुंदर आकाराला मी राष्ट्र म्हणतो. युद्धाचे प्रसंग पुन्हा पुन्हा येतच राहाणार. अशा प्रसंगी राष्ट्रशक्ती उभी राहिली

म्हणजे आक्रमण करणाऱ्या परकीय शक्ती नष्ट झाल्याशिवाय राहात नाहीत. भारतीय राष्ट्र म्हणजे भारताच्या कसदार मातीतून उगवलेली पीळदार मनाची बळकट माणसं हे समीकरण रूढ झाले पाहिजे.

शेक्स्पिअरनं संतप्त होऊन एक सवाल विचारला आहे, 'हू इज हियर सो व्हाइल दॅट विल् नॉट लव्ह हिज कंट्री.' 'स्वदेशावर प्रेम न करणारा कोणी दुरात्मा आहे का ?' स्कॉट नावाच्या कवीनेही म्हटले आहे, 'असा कोणी आत्मा मेलेला माणूस दाखवता येईल का की जो हाच माझा देश असं अभिमानानं म्हणाला नाही ?' राष्ट्रप्रेम आणि ईश्वरप्रेम यात मी भेद मानत नाही. राष्ट्रपूजा हीच माझ्या दृष्टीने देवपूजा, असे उद्‌गार एका वृद्ध देशभक्ताने काढले होते. राष्ट्रभक्ती ही एक मूलभूत भावना आहे असे म्हणायला हरकत नाही.

एकदा संरक्षण खात्यातला एक अधिकारी शत्रूराष्ट्राला आपल्या देशासंबंधीच्या गुप्त माहितीची चोरून कल्पना देत होता. शत्रूराष्ट्राने त्या मोबदल्यात त्याला भरपूर संपत्ती आणि सुखसाधने दिली. आपल्या देशाची गुपिते शत्रूला पुरविण्याचे काम त्याने 'इमाने-इतबारे' चालवले होते. आपल्या कृत्याबद्दल त्याला कधीच खंत वाटली नाही. निवृत्तीनंतर शत्रूराष्ट्रात स्थायिक होण्याच्या कल्पनेने तेथील अधिकाऱ्यांना तो भेटला. त्या अधिकाऱ्याला याच्या 'कर्तृत्वाची' माहिती होती. समोर एखादे लूत भरलेले कुत्रे दिसल्यावर माणसाचा जसा चेहरा होईल तशा घृणेने तो अधिकारी त्याच्यावर कडाडला.

'प्रथम खुर्चीवरून उठ. तुझ्यासारख्या कृतघ्न देशद्रोही माणसाला आमच्या देशात राहायलाच काय पण जाळायला किंवा पुरायला देखील आम्ही जागा देणार नाही. चार दारुच्या बाटल्या आणि लाख दोन लाख रुपयांच्या मोबदल्यात स्वतःचा देश गहाण टाकणारा तू हरामखोर मात्रागमनी आहेस. या देशात येण्याचा पासपोर्ट तुला मिळाला तरी कसा ? क्षुद्र स्वार्थासाठी जो राष्ट्राशी बेइमानी करतो तो उद्या आपल्या आईला देखील गहाण ठेवल्याशिवाय राहाणार नाही. याला धक्के मारून ऑफिसच्या बाहेरच नव्हे तर देशाबाहेर घालवा.' त्या अधिकाऱ्याने यापेक्षाही कित्येक भयानक शिव्या हासडल्या. खाली मान घालून हा गृहस्थ 'आपल्या' देशात परतला. त्याच्या अंत्ययात्रेला देखील कोणी जाईल किंवा काय याची शंका वाटते. पण कारगिलमध्ये वीरमरण आलेल्या त्या जवानांसाठी सारा गाव नव्हे तर सारा देश अश्रू गाळीत होता. लक्षावधी लोकांच्या डोळ्यातल्या अश्रूंची माळ

त्याच्या गळ्यात पडत होती. त्याचा जयघोष चालू होता. 'हिंदुस्थान झिंदाबाद ! जयहिंद !' या घोषणा निनादत होत्या. वीरगती प्राप्त झालेल्या सैनिकाच्या पार्थिवासमोर सारी जनता कृतज्ञ भावाने मान झुकवून उभी होती. इतकं श्रीमंत आणि ऐश्वर्यशाली मरण त्याला लाभलं होतं. कारण तो देशासाठी मरणाला बेदरकारपणे सामोरा गेला होता. त्याला विचारलं असतं तर जळत्या चितेतून उभा राहून तो म्हणाला असता,

'बंधू-भगिनींनो, माझ्या देशासाठी माझ्याजवळ गमवायला फक्त एकच जन्म आहे याचं मला दुःख होतं, पुढचा जन्मही याच देशाच्या कुशीत मिळावा हीच इच्छा. पुन्हा भेटू, जय हिंद !'

■■■

# अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य

राजसत्तेला लेखक कवींचे आणि बंडखोर विचारवंतांचे नेहमीच भय वाटत असते असा इतिहास आहे. सॉक्रेटिसाला अथेन्सच्या सत्तेने मृत्यूदंडाची शिक्षा ठोठावली कारण हा विचारवंत तरुण पिढीला बंडखोरी शिकवीत होता. मुक्तपणाने विचार करा आणि अंतःकरणप्रवृत्तीला पटेल त्याप्रमाणे आचार करा. कोणत्याही शक्तीला भिऊ नका. जगातल्या सर्व शक्तीपेक्षा सत्याची शक्ती अधिक प्रभावी असते. कोणतीही राजशक्ती सत्याला दडपू शकत नाही हा विचार सॉक्रेटिस निर्भयपणे सांगत होता. राजशक्तीपेक्षा सत्याला अधिक महत्त्व असते हा विचार सिंहासनावर बसलेल्या सत्ताधाऱ्यांना धोकादायक वाटत होता.

खरे तर सत्ताधीशांइतके भित्रे लोक जगात कुणीच नसतील. मस्तकावर छत्रचामरे, बसायला सिंहासन, आजूबाजूला अनेक अंगरक्षक आणि समोर हात जोडून उभे असलेले लाचार सरदार व दरकदार. अशी परिस्थिती असताना देखील सिंहासनावरचा स्वतःला सम्राट म्हणवूनघेणाग मनातून घाबरलेला असतो. आपल्या पार्श्वभागाखालचे सत्तेचे आसन केव्हा निसटून जाईल या धास्तीने तो नेहमीच भ्यालेला असतो. म्हणूनच कोणी स्वातंत्र्याची भाषा बोलू लागला की याची घाबरगुंडी उडते. कारण स्वातंत्र्याचा विचार प्रथम राजसत्तेला आव्हान देतो.

आपल्या प्रजेने विचारच करू नये म्हणून ज्ञानाच्या आणि विचारमंथनाच्या साऱ्या खिडक्या पक्क्या बंद करण्याची व्यवस्था सत्ताधीश करीत असतात. कोणत्याही फटीतून स्वतंत्र विचाराचा एखादाही किरण येऊ नये याची ते दक्षता घेतात. मग लेखक-कवींना अनुदाने वाटली जातात. पत्रकारांना राहाण्यासाठी शासकीय कोट्यातील घरे दिली जातात. कोणी विरोधी विचार व्यक्त करीत आहे असे दिसल्याबरोबर त्याचा मुखलेप करण्यात येतो. मृदंगाचा मधुर ध्वनी मुखलेप केल्याशिवाय बाहेर पडत नाही याची सत्ताधाऱ्यांना कल्पना असते. पण सॉक्रेटिसासारखे विचारवंत कुठल्याच प्रलोभनाला बळी पडत नाहीत. हा ज्ञानवंत सत्याचा उपासक होता. सत्तेशी संघर्ष करताना सत्यासाठी प्राण द्यावे लागले तरी त्याची त्याला क्षिती नव्हती. तो तरुणांच्या मनात क्रांतिकारक विचारांच्या ठिणग्या

टाकीत होता. त्यांची मने पेटवीत होता. पेटलेली माणसे राजसत्तेला चालत नाहीत. विझलेली माणसे, थंड गोळा झालेली माणसे, विचार हरवून गेलेली माणसे सत्ताधाऱ्यांना आवडतात. सॉक्रेटिसासारखा माणूस आपल्या ज्ञानाच्या मशालीने आसमंत पेटवीत असेल तर त्यालाच प्रथम भ्रष्ट करावे आणि तो भ्रष्ट होत नसेल तर त्याला नष्ट करावे असे प्रयत्न सुरू झाले अखेर अथेन्सच्या न्यायालयाने त्याला मरणाची शिक्षा ठोठावली. सत्य सांगण्याचा महाभयंकर गुन्हा हा तत्त्वज्ञ करीत होता. न्यायालयाने प्रथम न्यायाचा आणि नंतर सॉक्रेटिसाचा खून केला.

ही गोष्ट आता जुनी झाली असे कोणी म्हणेल, पण ही गोष्ट जितकी कालची आहे तितकीच आजचीही आहे. काल हस्तिनापूरच्या दरबारात द्रौपदीला विवस्त्र करण्यासाठी दुःशासनाचे हात प्रयत्नशील होते. धृतराष्ट्राच्या रूपाने बसलेली राजसत्ता खरोखरच आंधळी होती आणि भीष्म, द्रोण, कृप ही आचार्यमंडळी डोळे झाकून बसली होती. पण डोळे झाकून घेतले म्हणून अत्याचार कसा थांबणार ? अशावेळी विचारवंतांनी या निर्लज्ज कृत्याविरुद्ध आपला आवाज भर दरबारात बुलंदपणे उठवणे आवश्यक होते. पण आचार्य मंडळी सत्तेच्या उबदार सहवासात सुखाचे तुकडे चघळीत बसली होती. तोंड उघडले तर सत्तेला ते मुकले असते. सत्ता की सत्य ? या प्रश्नाचे त्यांचे उत्तर 'सत्ता' हेच होते. 'अर्थस्य पुरुषो दासः' ही लाजिरवाणी कबुली आचार्यांनी दिली आणि द्रौपदीवस्त्रहरणाचा एका शब्दानेही निषेध केला नाही.

सत्ता मोहक असते. सत्य मात्र दाहक असते. सत्तेची वरमाला तोंड न उघडता गळ्यात पडणार असेल तर खरे बोलण्याचा मूर्खपणा कशासाठी करायचा ? पिंजऱ्यातल्या पोपटाला डाळिंबाचे दाणे मिळतात. झाडावर बसलेल्या स्वतंत्र पोपटाला थंडीवाऱ्यात, उन्हा-पावसात कष्ट सोसावे लागतात. कधी कधी उपवासही घडतो. त्यापेक्षा डाळिंबाचे दाणे सुखेनैव खाण्यात व्यवहारी शहाणपणा नाही काय ? पिंजरा असला तरी तो सोन्याचा आहे. तो गोड करून घेतलाच पाहिजे. असे मानणारे विचारवंत नवा इतिहास मात्र घडवू शकत नाहीत. लोचट आणि पोचट माणसे लाचारीच्या गाळात रुतून बसतात. तेथेच त्यांची अखेर होते. पण अन्यायाच्या सिंहासनाला सुरुंग लावण्याची धडपड करणारा मनस्वी वृत्तीचा सत्याचा उपासक मात्र इतिहासावर आपली नाममुद्रा ठोकू शकतो. पण असे स्वाभिमानी, बाणेदार, बंडखोर विचारांचे साहसी लोक आहेत कुठे ? लव्हाळ्यासारखे वाकणारे आणि मेंढरासारखे - ब्यँ ब्यँ करणारे लोक सत्तेच्या

भोवती आशाळभूतपणे उभे आहेत. हे चित्र जितके कालचे होते, तितकेच ते आजचे आणि उद्याचेही आहे. आजही मंत्र्यांच्या कृपाकटाक्षासाठी तळमळणारे कित्येक साहित्यिक मंत्रालयाभोवती भक्तिभावाने प्रदक्षिणा घालताना दिसतात. आपली कुठेतरी 'वर्णी' लागावी या हेतूने आमदारांपुढे लांगूल चालन करतात. 'माझ्या पुस्तकाला पारितोषिक द्या किंवा त्याला अनुदान द्या' अशी नम्र स्वरात प्रार्थना करतात. असे साहित्यिक आणि कलावंत समाजाचे काय प्रबोधन करणार ? पण या पठडीतले काही लेखक असतात हे खरे आहे. त्यामुळे साहित्यिक विकत मिळू शकतात हा समज सत्ताधीशांचा होऊ शकतो.

आणीबाणीच्या काळात किती लेखकांनी आणीबाणीचा धैर्याने निषेध केला ? काही अपवाद आहेत. पण हुकुमशाही वृत्तीला विरोध करण्यासाठी लेखकांच्या लेखणीतून त्यावेळी ज्वाळा बाहेर पडल्या नाहीत. शासनाने केलेली मुस्कटदाबी बहुतेक संपादकांनी, लेखकांनी आणि कलावंतांनी सहन केली अशी इतिहासाची साक्ष आहे. जे पत्रकार व लेखक अन्यायाविरुद्ध त्या काळात झगडले त्यांच्याविषयी कुणालाही आदर वाटेल. पण विचारस्वातंत्र्याची व लेखनस्वातंत्र्याची गळचेपी सहन करणारे लोक अधिकाशांने होते. हुकुमशाहीला हजार हत्तींचे बळ असते. तिच्यासमोर हाताच्या बोटावर मोजण्याइतके साहित्यिक दंड थोपटून उभे राहिले तरी त्यांचा आवाज दडपून टाकण्याचे सामर्थ्य हुकुमशाहीत असते. ही हुकुमशाही केवळ राजकीय स्वरूपाचीच असते असं नव्हे. ती धार्मिक आणि सांस्कृतिक चेहऱ्याचीही असते.

सलमान रश्दी, तस्लीमा नसरीन या साहित्यिकांची अवस्था काय झाली ? रश्दीला ठार मारण्यासाठी प्रचंड रकमेचे बक्षीस धार्मिक क्षेत्रातल्या सत्ताधीशांनी जाहीर केले होते. नसरीनला देखील आपला देश सोडून परागंदा व्हावे लागले. अजूनही हे कलावंत भीतीच्या छायेत चोरटेपणाने वावरत आहेत. चीन आणि रशिया यासारख्या हुकुमशाही राष्ट्रांत कित्येक लेखक-कवींवर बंधने घातली जातात. जे राज्यकर्त्यांची तळी उचलून धरीत नाहीत त्या साहित्यिकांचा छळ होत राहातो. अनेक देशात राजसत्तेने 'आम्ही सांगू तसे लिहा, जे आम्हाला योग्य वाटते तेच तुम्ही लिहिले पाहिजे' असे फर्मावले जाते. साहित्यिक आणि कलावंत हा अखेर माणूसच आहे. तो सॉक्रेटिसासारखा शूर आणि ध्येयनिष्ठ असेलच असे नाही. हुकुमशाहीकडे आपली लेखणी गहाण टाकून त्यांना जगणे भाग पडते. इंग्रजांच्या काळात म्हणजे मूर्तिमंत पारतंत्र्यात 'वंदेमातरम्'चा उच्चारदेखील करायची सोय

नव्हती. उदारमतवादी समजल्या जाणाऱ्या इंग्रज राज्यकर्त्यांनी कितीतरी पुस्तके जप्त केली. अनेक पत्रकारांना तुरुंगाच्या कोठडीत डांबण्यात आले. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे साहित्य वर्षानुवर्षे बंदीत पडले होते. साहित्यिकांची लेखणी कधी कधी सत्ताधीशांची सिंहासने उलथवून टाकते. राज्यक्रांतीच्या मुळाशी क्रांतिवादी, जळजळीत विचारांनी भरलेले स्फोटक साहित्य असते. नेपोलियन म्हणाला होता, 'एका विरोधी वर्तमानपत्राची शक्ती कित्येक बटालियन्सपेक्षा अधिक असते.' वृत्तपत्र आणि साहित्य यातून निघणाऱ्या ठिणग्या आपली सत्ता भस्मसात करू शकतील याची धूर्त राज्यकर्त्यांना कल्पना असते. साहित्य केवळ रंजनाचं साधन नव्हे. ते प्रस्थापित सत्तेचे भंजन करणारे शस्त्र असू शकते.

आता आपण लोकशाहीच्या-स्वातंत्र्याच्या काळात वावरत असलो तरी अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर मधून मधून हल्ले होत असतातच. कलेची अभिव्यक्ती समर्थपणे व्हायची असेल तर तिच्या संचारावर अनैसर्गिक बंधने घालण्याचा वेडेपणा करू नये. पण त्याबरोबरच लेखक-कवींनी, चित्रकारांनी व अन्य कलावंतांनी स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे हे लक्षात घेतले पाहिजे. समाजमनाला परंपरेनं जे प्रिय आणि पवित्रतम वाटत असेल अशा गोष्टींची कुणी कलावंत विकृत मनोवृत्तीने निंदानालस्ती करीत असेल तर त्याने स्वातंत्र्याचीच विटंबना केली असा अर्थ होईल. पूज्य देवदेवतांची मुद्दामच नागडी-उघडी चित्रे रेखाटण्यात कसली कपाळाची कला आहे ? घाणेरड्या मनोविकारांचे हे गलिच्छ प्रदर्शन नव्हे काय ?

सध्या 'फायर' या चित्रपटाची चर्चा ऐकू येते. प्रक्षुब्ध झालेल्या काही लोकांनी थिएटरची नासधूस करणे चुकीचेच आहे, त्याचे मी समर्थन करीत नाही. पण या चित्रपटात समलिंगी संबंधाचे काही बीभत्स व किळसवाणे तपशील चित्रित करण्यात आले आहेत. अनैसर्गिक स्वरूपाच्या घृणास्पद लैंगिक व्यवहाराचे प्रदर्शन मांडण्यात व त्या व्यवहारातील बारीक सारीक तपशील दाखवण्यात नेमकी कोणती कला आहे ? 'आम्ही केवळ वास्तव दाखवतो.' असे म्हणून या अभिरुचीशून्य चित्रपटाचे समर्थन करणे हास्यास्पद आहे.

वास्तव जीवनात पुष्कळ गोष्टी विकृत आणि असभ्य असतात. कोणी वेडा माणूस कमरेचे सोडून भर रस्त्यावर नाचू लागला आणि चमत्कारिक अंगविक्षेप करू लागला तर त्या वास्तवाचे कौतुक करणाऱ्या व्यक्तीचा मेंदू किती किडलेला आहे हे स्पष्ट होईल. साहित्यातले किंवा कलेतले बंड अथवा त्यातला विद्रोह साचेबंदपणाची चौकट मोडून जीवनाच्या अधिक अर्थपूर्ण दर्शनाकडे घेऊन जातो.

प्रत्येक कलेत या प्रकारची बंडखोरी घडत आली आहे. मराठी साहित्यापुरते बोलायचे झाल्यास महानुभाव आणि ज्ञानेश्वर यांनी परंपरेची चौकट मोडून बंडखोरी केली. तुकारामांची बंडखोरी अशीच महत्त्वपूर्ण आहे. पुढे केशवसुत, लोकहितवादी, आगरकर, महात्मा फुले यांनीही आपल्या बंडखोरीतून समाजमन घडवले. रुढीच्या दासानुदासांनी या बंडखोर लेखकांवर त्यावेळी आग पाखडली. त्यांचा उपहास केला. पण आपल्या विचारांवर निष्ठा ठेवून हे लेखक झगडत राहिले. साहित्य आणि समाज यांची प्रगती त्यातून होत राहिली.

काही वर्षांपूर्वी अशोक शहाणे नावाचा एक लेखक होता. (अजूनही तो आहे) या शहाण्याने 'मनोहर' मासिकात एक लेख लिहून खळबळ माजवली होती. केवळ खळबळ माजवण्याच्या आणि प्रसिद्धी मिळवण्याच्या 'उदात्त' हेतूने त्याने हा स्टंट केला होता. चिपळूणकर, टिळक आणि आगरकर, खांडेकर आणि फडके यांची यथेच्छ निंदानालस्ती त्याने केली होती. या सर्व लेखकांनी किराणा मालाची दुकाने काढायला हवी होती. हे सगळे रद्दीचे व्यापारी होते. यांना लेखन कशाशी खातात हेच कळले नव्हते, असे 'मौलिक' विचार या अतिशहाण्याने व्यक्त केले होते. त्या लेखात कसलीही वाङ्मयीन चर्चा नव्हती. मोठ्या व्यक्तींवर शिव्यांची लाखोली वाहिली म्हणजे आपोआपच भरपूर प्रसिद्धी मिळू शकते अशा व्यापारी हिशेबाने त्याने शिव्यांची सरबत्ती केली होती. प्रत्येकाला भाषण स्वातंत्र्य आहे. पण शिव्या देण्याचे स्वातंत्र्य नाही. वाहन चालवण्याचे स्वातंत्र्य आहे पण रहदारीचे नियम मोडण्याचे स्वातंत्र्य मुळीच नाही. आपल्या स्वातंत्र्याचा आविष्कार करताना दुसऱ्याच्या स्वातंत्र्यावर आक्रमण करण्याचा अधिकार आपल्याला असू शकत नाही ही मूलभूत महत्त्वाची गोष्ट ज्याला समजू शकत नाही त्याला काय म्हणावे किंवा त्याची पूजा कशी करावी याचे स्वातंत्र्य प्रत्येकाला आहे. संत तुकोबा म्हणाले होते, 'तुका म्हणे ऐशा नरा, मोजूनि माराव्या पैजारा'

समारोप करताना मी इतकेच म्हणेन की अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य नाकारून लेखकांना आणि कलावंतांना 'सत्तेचे गुलाम' बनवण्याचा प्रयत्न सत्ताधीश करीत असतात. स्वातंत्र्य आणि स्वाभिमान यांचा बळी देण्याचे पातक लेखकांनी करू नये. पण स्वातंत्र्याला काळिमा फासणारा अविचार, उतावळेपणाही घडू नये. लेखणी आणि वाणी ही शक्तीची रूपे आहेत. ती सुंदर व समर्थ राहिली पाहिजेत.

■■■

# माझिये जातीचा मज भेटो .....

उन्हाळ्याचे दिवस. भ. गौतम बुद्ध एका वनातून प्रवास करीत होते. त्यांना थकवा आला होता. तहानेने घसा कोरडा पडला होता. त्या निर्जन वनात एखादा लहानसा झरा देखील त्यांना आढळला नाही. ते तसेच पुढे चालत राहिले. दूरवर एक झोपडी दिसली. झोपडीतून धूर निघत असल्याचे पाहून तेथे कोणीतरी राहात असले पाहिजे, तेथे आपल्याला पाणी मिळू शकेल या विचाराने त्यांची पाउले वेगात पडू लागली. झोपडीत कोणी तरी स्त्री स्वयंपाक करीत असावी. बुद्धांनी तिला म्हटले. 'भद्रे, मला तहान लागली आहे. प्यायला पाणी देशील का ?'

ती स्त्री लगबगीने उठून उभी राहिली. पण पाणी देण्यासाठी तिने काहीच हालचाल केली नाही.

म्हणून बुद्ध पुन्हा म्हणाले, 'मला पाणी पाहिजे आहे. तहानेने मी व्याकुळ झालो आहे.'

ती स्त्री खेदपूर्वक म्हणाली, 'भन्ते, मी हलक्या जातीची आहे. मी तुम्हाला पाणी कसे देऊ ?

बुद्ध हसले आणि म्हणाले, 'भद्रे, मी तुला पाणी मागितले. जात नव्हे. पाणी हे सत्य आहे. जात मात्र काल्पनिक असते. पाणी हे जीवन आहे. जात आणि वर्ण हे केवळ कल्पनेचे खेळ आहेत. माणूस हलकाही नसतो आणि भारीही नसतो. माणूस हा केवळ माणूस असतो. भद्रे, तू माणूस आहेस. हेच तुझ्या उच्चतेचे लक्षण आहे.'

त्या स्त्रीच्या डोळ्यांतून आनंदाश्रू आले. तिने बुद्धांच्या चरणांवर आपले मस्तक ठेवले. तिला अपूर्व आनंद झाला होता. स्वच्छ पाण्याचे पात्र तिने आपल्या अतिथीसमोर ठेवले. आणि ती म्हणाली, 'प्रभो, आपल्या शब्दांनी माझ्या पायातल्या बेड्या गळून पडल्या. आपल्या दर्शनाने मी पावन झाले.'

बुद्धांनी तिला आशीर्वाद दिला. आणि त्यांचा प्रवास पुढे चालू झाला.

ही गोष्ट जेव्हा जेव्हा मला आठवते तेव्हा प्रत्येक वेळी मी रोमांचित होतो. अडीच हजार वर्षांपूर्वी माणसाच्या माणूसपणाची घोषणा करणारे बुद्ध आज

आमच्या देशात पुन्हा अवतीर्ण झाले तर त्यांना कोणते दृश्य दिसेल बरे ? बुद्ध जिथे जन्मले त्याच प्रदेशात म्हणजे बिहारमध्ये पंचवीस शतकांपूर्वी भ. महावीरही जन्मले. या दोन्ही धर्मपुरुषांनी त्या प्रदेशात लोकजागृती करण्यासाठी सतत विहार केला. बिहार हेच त्या प्रदेशाचे नाव पडले. आजच्या बिहारमध्ये आणि साऱ्या भारतदेशात बुद्धाची व महावीरांची पूजा होते. त्यांची भव्य मंदिरं इथे आहेत. पण या धर्मनेत्यांच्या स्वप्नातला भारत पंचवीसशे वर्षानंतरसुद्धा अस्तित्वात येऊ शकला नाही. मूर्ती घडवता येतात कारण त्या पाषाणाच्या असतात. पण माणूस घडवणे, देश घडवणे मात्र अत्यंत कठीण आहे.

बाबू जगजीवनराम खरे तर या देशाचे पंतप्रधान होऊ शकले असते. पण त्यांची जात आडवी आली. त्यांनी पं. मदनमोहन मालवीयांच्या पुतळ्याचे वाराणशीत आनावरण केले होते. पण दुसऱ्याच दिवशी वाराणसीमधल्या काही तरुणांनी अस्पृश्याचा स्पर्श झाल्यामुळे विटाळलेल्या त्या पुतळ्यावर गंगानदीचे पाणी ओतून तो पुतळा पुन्हा शुद्ध करून घेतला. जिवंत माणसाच्या स्पर्शाने निर्जीव पुतळा अशुद्ध आणि अपवित्र होऊ शकतो असे मानणाऱ्या लोकांच्या मेंदूचे ऑपरेशन करून त्या मेंदूत कोणत्या मूर्ख विचारांचा पेंढा भरला आहे याचे संशोधन केले पाहिजे. बाबू जगजीवनराम ही घटना घडली तेव्हा आपल्या देशाचे उपपंतप्रधान होते. प्रश्न त्यांच्या राजकीय अधिकाराचा अथवा सत्तेचा नाही. माणूस म्हणून त्यांना जी जन्मजात सत्ता मिळाली आहे तिचा आहे.

आपण सारेच जन्मजात माणसे आहोत. पंथ, जात आणि वर्ण ही खरे तर अत्यंत निरुपयोगी अशी काल्पनिक टरफले आहेत. पण तरीही फळाच्या आतला रसमय गाभा फेकून देऊन वरवरची साल मात्र आपण प्रतिष्ठितपणाची मानतो ही खरोखरच एक दारुण शोकांतिका आहे. आपल्याला बांधून टाकणाऱ्या या साखळदंडांना आपण अंगावरचे अलंकार मानीत आहोत. यापेक्षा आणखी भयानक अधःपात दुसरा कोणता असेल ?

जातीयवाद आणि विषमता समूळ नष्ट झाली पाहिजे याबद्दल सर्वांचे एकमत आहे. प्रत्येक राजकीय पक्ष आणि त्या पक्षातले सगळे लहानमोठे पुढारी 'आपण समतेचे पुरस्कर्ते आहोत, जात आणि धर्म निरपेक्ष आहोत, विषमतेचे नंबर एकचे शत्रू आहोत' अशा घोषणांचे ढोल रात्रंदिवस वाजवीत असतात. प्रत्येक पक्षाच्या जाहीरनाम्यात सामाजिक समतेचा उद्घोष केलेला असतो. पण प्रत्येक राजकीय

पक्ष जात, पंथ आणि धर्म यांच्या फांद्या घट्ट पकडून बसलेला असतो. या पक्षोपपक्षांना जातीयता नष्ट व्हावी असे प्रामाणिकपणे वाटते काय ? 'ब्राह्मण नाही, हिंदुही नाही, न मी एक पंथाचा' ही केशवसुतांची काव्यपंक्ती व्यासपीठावरून अभिनिवेशाने उच्चारणारे काव्यरसिकसुद्धा जातीयतेच्या वर्तुळातून बाहेर पडलेले नसतात. साहित्याच्या व्यासपीठावरही जात आणि पंथ यांना महत्त्व असते. शिक्षणाच्या क्षेत्रात जातिधर्माला महत्त्वाचे स्थान आहे. शिक्षणसंस्था देखील विशिष्ट जातीच्या आणि पंथाच्याच असतात. बुद्ध, महावीर आणि बसवेश्वर यांना अभिप्रेत असलेला केवळ 'माणूस' कुठेच दृष्टीला पडत नाही याचा अर्थ आम्ही आमच्या धर्मपुरुषांचा आणि त्यांच्या विचारसरणीचा प्रचंड पराभव केला आहे. आम्हाला फक्त दैनंदिन पूजेसाठी देव पाहिजे होते. त्यांच्या मूर्ती बनवल्या, देवळे उभी केली, पूजा, अभिषेक इत्यादी कर्मकांड सुरू झाले. मंत्र हरवून गेला. तंत्र मात्र जपून ठेवले. कोणतीही देवमूर्ती कसलीही तक्रार न करता अत्यंत शांतपणे पूजाअर्चा स्वीकारते ही सोयीची गोष्ट आहे. कधी कधी गणपतीही दूध पितो. आपल्या भक्तांना प्रसन्न ठेवणे हाच देवांचा हेतू असतो. स्वार्थी आणि दांभिक माणसांच्या हातात ही देवमंडळी सापडली आहे. या परिस्थितीत देवांचे संरक्षण कसे होणार हेच कळत नाही. देवांचे रक्षण करणारा देव निर्माण व्हावा हीच समस्त देवांची प्रार्थना आहे. देव बिचारे देवासारखे गप्प बसून राहातात. त्यामुळे माणसांनी देवांना देवळात पुजाऱ्यांच्या नजरकैदेत बंदिस्त करून ठेवले आहे.

ज्ञानेश्वर म्हणाले, 'हे विश्वचि माझे घर' तुकोबांनी गर्जून सांगितले, 'भेदाभेदभ्रम अमंगळ' संतांच्या साहित्याचे पारायण करणारे भाविक सुद्धा जातिभेद आणि पंथभेद यांची कुंपणे बांधून त्यात सुरक्षित राहिले आहेत. माझ्या माहितीतल्या एका तडफदार तरुणाला विधानसभेच्या निवडणुकीला उभे रहायचे होते. आपल्या पक्षप्रमुखांना भेटून त्याने उमेदवारीसाठी तिकीट द्यावे अशी विनंती केली. तो डबल् ग्रॅज्युएट होता. जनतेचे प्रबोधन करण्यासाठी खेड्यापाड्यात जाऊन तेथे त्याने व्याख्याने दिली. लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. गरीब रुग्णांना मोफत औषधांचा तो पुरवठा करीत असे. त्याच्या सेवाभावी वृत्तीबद्दल शंका घ्यायला तिळमात्रही जागा नव्हती. विधानसभेत लोकप्रतिनिधी म्हणून त्याने विधायक कार्य उत्तम रीतीने केले असते. पण या लोकसेवकाला तिकीट देण्याइतके पक्षपुढारी वेडे नव्हते. ते म्हणाले,

'माणूस चांगला असेल. पण तो ज्या जातीचा घटक आहे त्या जातीचे मतदार दोन टक्के सुद्धा नाहीत. या मतदारसंघात बहुसंख्य लोक अमुक जातीचे असताना याला मते कशी मिळणार ? आमच्या पक्षाला सुद्धा या तरुणाइतके प्रामाणिक लोक चालत नाहीत. अहो, आम्हाला राज्य करायचं आहे. राज्य चालवण्यासाठी चारित्र्यसंपन्न, विद्वान आणि निःस्वार्थी लोक मुळीच चालत नाहीत. या सेवाभावी तरुणाला आयुष्यात चार पैसे खाण्याइतकी कर्तबगारी दाखवता आली नाही. कधी त्याने गुंडगिरी केली नाही. खंडणी वसूल करण्याची त्याला अक्कल नाही. आणि जात पहावी तर अल्पसंख्याकांतही अल्प असलेली. याला तिकीट देण्यात शहाणपणा नाही. ज्याला राजकारणात उतरायचे आहे त्याच्या ठिकाणी किमान लोचटपणा, निगरगट्टपणा हे 'सद्‌गुण' अत्यावश्यक असतात. याच्याजवळ काय आहे ? पैसा नाही, जातही नाही, आणि गुंडगिरीही नाही. असल्या अनक्वालिफाइड उमेदवारांचे काय लोणचे घालायचे आहे ?'

तो तरुण लोकसेवक निराश झाला. मी त्याला दुसऱ्या पक्षाकडे तिकीट मागण्याचा सल्ला दिला. दुसऱ्या पक्षाचे वरिष्ठ नेते त्याला हसत हसत म्हणाले, 'तुम्ही मिसूफिट् आहात. तुम्ही जात मानीत नाही. जातीच्या नावावर मी मतं मागणार नाही ही तुमची भूमिका व्यवहाराच्या दृष्टीने आमच्या पक्षाला अडचणीत टाकणारी आहे.' त्या तरुणाने वरिष्ठ नेत्याला विचारले, 'पण आपला पक्ष तर पूर्णपणे जात, वर्ण आणि धर्म निरपेक्ष आहे. आम्ही भारताचं वातावरण समतेच्या आणि एकतेच्या विचारानं भारून टाकणार आहोत. हिंदू, मुसलमान, शीख आणि बौद्ध वगैरे सगळे भेद अरबी समुद्रात बुडवून टाकले पाहिजेत ही तर तुमची नेहमीची घोषणा आहे. मी याच विचारांचा निष्ठावंत पुरस्कर्ता आहे. हे विचार समाजात खोलवर रुजावेत म्हणून मी कितीतरी शिबिरे घेतली. आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह घडवून आणले. शाळा कॉलेजातल्या विद्यार्थ्यांसमोर समतेचा विचार ठेवण्यासाठी नेहमी प्रयत्नशील राहिलो . लोकप्रतिनिधी होण्यासाठी मी अपात्र आहे असं तुम्ही मानता काय ?'

तो वरिष्ठ पक्षनेता खळखळून हसला. हसणं ओसरल्यावर बोलू लागला. 'तुम्हाला राजकारण कळत नाही. राजनीती चतुर गणिकेसारखी असते आणि असावी. ती एकाकडे पाहून हसेल दुसऱ्याकडे नेत्रकटाक्ष टाकील आणि तिसऱ्याचा विचार मनात करीत असेल. ही कुटिलता म्हणजेच राजकारण. तुम्ही या भानगडीत

पडू नका. जातीय विषमतेवर आम्ही देखील वरवर टीका करतो. पण एक जात दुसऱ्या जातीविरुद्ध झुंजत ठेवायची आणि जातीच्या शिडीवरूनच सत्तेच्या सिंहासनापर्यंत पोचायचे, हे आमचे उद्दिष्ट आहे. आम्ही जाहीरनाम्यात काय म्हणतो याला अर्थ नसतो. जाहीरनाम्याची पाने जनतेच्या तोंडाला पुसायची असतात. त्यात सांगितलेल्या गोष्टी तुम्ही वेडे लोक गंभीरपणाने घेता, त्याला आम्ही काय करणार ?'

त्या तरुण कार्यकर्त्याचा भ्रमनिरास झाला. कोणताही राजकीय पक्ष जातीपातींची कुंपणे मोडण्याचा कार्यक्रम प्रामाणिकपणे राबवीत नाही ही माझी तक्रार आहे. निवडणुकीत तिकिटांचे वाटप करताना, मंत्रीमंडळाची रचना करताना, अधिकाराच्या जागा वाटून देताना, 'जात' हाच सर्वात महत्त्वाचा एकमेव घटक असतो. जातीत देखील पोटजात कोणती हा विचारही लक्षात घेतला जातो. सारे राजकारण किंबहुना सारे जीवन जात आणि पंथ यांच्या भेदांनी बुजबुजलेले आहे. उदारमतवादी समजले जाणारे एक बडे मंत्री जातीय प्रवृत्तीवर एका सभेत आवेशाने तुटून पडले. साधुसंतांची नावे त्यांनी भक्तिभावाने उच्चारली. सभा संपल्यानंतर ते डाकबंगल्यात मुक्कामासाठी आले. चार राजकारणी मंडळीबरोबर त्यांची खलबते सुरू झाली. विद्यापीठाचा कुलगुरू कोणाला नेमावे हा प्रश्न चर्चेला आला. विद्वत्ता, संशोधन आणि लेखन, शैक्षणिक विचारसरणी, चारित्र्य असले निरुपयोगी निकष त्यांनी प्रथम उडवून लावले. अखेर 'जात' या एकमेव निकषावर निवड ठरली.ते म्हणाले, 'विद्यापीठात विद्वान पुष्कळ असतात. कुलगुरू आपल्या जातीचा असावा. येथे पाहिजे जातीचे, येरागबाळाचे काम नोहे.' तुकारामाच्या अभंगाचा इतका दुरुपयोग कुणी केला नसेल. सुदैव त्या मंत्र्याचे की हे संत तुकोबांना कळणे शक्य नव्हते. पण जर कळले तर तुकोबा गरजतील.

तुका म्हणे ऐशा नरा। मोजूनी माराव्या .....

■■■

# माझं बरं चाललं आहे !

प्रा. देशपांडे यांनी वर्गात प्रवेश केला. त्याबरोबर पाठीमागच्या बाकावर बसलेली चारसहा वात्रट पोरे खिंकाळली. कोणी गाढवाचा आवाज बरोबर काढला. कोणी मांजराच्या आवाजात ओरडण्याचा प्रयत्न केला. इतर पोरांनी बाक वाजवले. वर्गातल्या पोरी तोंडाला हातरुमाल लावून फिसफिसल्या. स्वतःला युवकांचा नेता म्हणवणारा एक विद्यार्थी उठून उभा राहिला आणि म्हणाला,

'सर, आजचा पिरियड घेऊ नका. आज आमचा मूड लागत नाही.' सर्व विद्यार्थ्यांनी नेत्याच्या शब्दाला अनुमोदन दिले. पण प्राध्यापकांनी पिरियड सोडून द्यायला ठामपणानं नकार दिल्यावर 'देशपांडे हटाव', 'देशपांडे सर निघून जा.' अशा घोषणा निनादू लागल्या. आपला मूड नसताना प्राध्यापक वर्ग घेणार हा अन्याय त्या स्वाभिमानी विद्यार्थ्यांना सहन झाला नाही. इच्छा नसताना आपल्यावर जबरदस्तीने अभ्यास लादण्यात यावा ही हुकुमशाही सहन करण्याइतके आजचे विद्यार्थी लेचेपेचे आहेत काय ? विद्यार्थ्यांच्या मर्जीने प्राध्यापकांनी बेतशीर शिकवावे. शक्यतो परीक्षेत जे प्रश्न येऊ शकतील त्यांचीच थोडीफार चर्चा करावी. उत्तरे लिहून द्यावीत. हे सोडून काही प्राध्यापक अभ्यासपूर्ण व्याख्याने देतात. कोणत्या ग्रंथात काय म्हटले आहे, कोणत्या विचारवंताने कोणती विचारसरणी मांडली आहे, ती कितपत सयुक्तिक आहे यावर निष्कारण भाषण देत बसतात. विद्यार्थ्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहतात. अशा ज्ञानी प्राध्यापकाविरुद्ध बंडाचा झेंडा उभारलाच पाहिजे. शाळा आणि कॉलेज आणि विद्यापीठ आम्हा विद्यार्थ्यांसाठी असतात. आमच्या इच्छेला प्राधान्य दिले पाहिजे. एका प्राध्यापकानं वर्गातल्या शंभर विद्यार्थ्यांना वेठीला धरून त्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांना शिकवत बसावे हा अन्याय स्वातंत्र्यप्रिय विद्यार्थ्यांनी का सहन करावा ? विद्यार्थ्यांचा आरडाओरडा वाढल्यावर प्रा. देशपांडे त्रासिक मुद्रेने वर्गातून निघून गेले. त्यांनी दंगेखोर विद्यार्थ्यांना शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी प्राचार्यांकडे केली. प्राचार्य म्हणाले,

'प्रोफेसर देशपांडे, तुम्ही व्यासंगी विद्वान आहात. विद्यार्थ्यांची सायकॉलॉजी तुम्हाला कळली पाहिजे. त्यांच्या कलानं तुम्ही वागलात तर अधिक बरं होईल. तुमच्या वर्गातला विद्यार्थीनेता हा एका खासदाराचा मुलगा आहे. त्याचा मोठा भाऊ नगराध्यक्ष आहे. हे ओळखून तुम्ही त्याची मागणी मान्य करायला हवी होती. तुम्ही प्रोफेसर मंडळी ज्ञानवंत असता, व्याख्यानं देता, पुस्तकं लिहिता पण तुम्हाला व्यवहार मात्र कळत नाही.' प्रा. देशपांडे आश्चर्यचकित झाले. प्राचार्य विद्यार्थ्यांच्या गुंडगिरीसमोर अशी शरणागती पत्करतील याची त्यांना कल्पना नव्हती. ते सात्विक संतापाने म्हणाले, 'सर, मी तुमच्याकडून ही अपेक्षा केली नव्हती. स्वतःला पुढारी समजणारा तो विद्यार्थी पंतप्रधानाचा मुलगा असला तरी शिस्तभंगाबद्दल त्याला नियमानुसार शिक्षा झाली पाहिजे. तो विद्यार्थी विद्यार्थिनींशी असंस्कृतपणे वागतो. जुन्या नामवंत प्राध्यापकांचा अपमान करतो. त्याच्या गुंडगिरीमुळं कॉलेजातलं वातावरण बिघडत चाललं आहे. आणि तुम्ही मात्र मला व्यवहारज्ञान नाही असा आरोप करीत आहात.'

हे चित्र आजच्या कोणत्याही महाविद्यालयात थोड्याफार प्रमाणात दिसेल. कित्येक प्राचार्य बोटचेपे असतात. आपले पद सांभाळण्यासाठी वरिष्ठांसमोर लांगूलचालन करण्याची वृत्ती अनेकांच्या ठायी असते. आता हे खरे की, सारेच प्राचार्य नेभळे किंवा कर्तृत्वहीन नसतात. ते स्वतः ज्ञाननिष्ठ आणि विद्यार्थ्यांवर आपल्या व्यक्तिमत्वाचा, शिकवण्याचा प्रभाव पाडीत असतात. त्यांना कोणासमोर लोटांगण घेण्याची जरूर नसते. आणि ती त्यांची प्रवृत्तीही नसते. पण आजच्या शैक्षणिक वातावरणात शिक्षणबाह्य गोष्टींना महत्त्व आले आहे. काही प्राध्यापकांनाही ज्ञान आणि तपस्या यांचे महत्त्व कळलेले नसते असे खेदपूर्वक म्हणावेसे वाटते.

कित्येक विद्यापीठांतही कर्तव्यनिष्ठ कुलगुरू त्यांच्या कार्यक्षमतेमुळेच अप्रिय होतात. विद्यापीठांचा कारभार नीटनेटका चालू नये यासाठी तेथील काही शक्ती कार्यरत असतात. हे केवळ महाविद्यालयांतील आणि विद्यापीठांतील वातावरणाबद्दलच मी लिहीत आहे असं नव्हे. प्राथमिक शाळेपासून विद्यापीठापर्यंतच्या शिक्षणव्यवस्थेला तडे पडले आहेत. बुद्धिजीवी वर्ग उत्तरोत्तर उदासीन आणि निष्क्रिय बनत आहे. ढासळत चाललेली शिक्षणव्यवस्था सावरून धरण्याचे त्राण त्यांच्यात उरलेले नाही. नवनवीन शिक्षणसंस्था उदयाला येत आहेत.

पण त्यांचा हेतू शैक्षणिक असण्यापेक्षा एक नवी दुकानदारी प्रचलित आणि प्रतिष्ठित करण्याचा आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. नामांकित समजल्या जाणाऱ्या शाळेत आपल्या मुलाला प्रवेश मिळावा म्हणून पालक धडपड करतात. मुलांची मुलाखत घेण्याचं नाटक मुख्याध्यापक आणि संस्थाचालक करतात. वीस-पंचवीस हजारांची देणगी देऊ शकणाऱ्या पालकांच्या मुलांची त्यातून निवड होते. टिळक, आगरकर, फुले आणि भाऊराव पाटील हे शिक्षण क्षेत्रातले महनीय तपस्वी एकेकाळी तुमचे आमचे आदर्श होते. शाळा-कॉलेजात त्यांचे फोटो कार्यालयात भिंतीवर अग्रभागी लावलेले असतात. संस्थाचालक नोकरी मागण्यासाठी आलेल्या एका शिक्षकाला सांगत होते,

'तुमची सर्टिफिकिटं पाहिली. बी. ए. आणि बी. एड्. दोन्ही ठिकाणी तुम्हाला फर्स्ट क्लास आहे. शिक्षक म्हणून आम्ही तुमची नेमणूक करतो. एक लाख पंचवीस हजार रुपयांची संस्थेला तुम्ही देणगी द्यावी. गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आम्ही स्वार्थत्यागपूर्वक संस्था चालवतो. त्यासाठी तुम्ही या कार्यात खारीचा वाटा उचलला पाहिजे. अहो, आजकाल प्रामाणिकपणानं सामाजिक कार्य करणं किती कठीण व्हायला लागलं आहे हे तुमच्यासारख्या ग्रॅज्युएट माणसाला माहीतच आहे. आमच्या संस्थेलाही चांगल्या शिक्षकाची जरूर आहे. म्हणून तुम्हाला संधी देतो. बाकीच्या सर्व गोष्टी आमचा हेडक्लार्क तुम्हाला समजावून सांगेलच. ध्येयवाद आणि व्यवहार यांची सांगड घालावी लागते. आम्ही टिळक आणि फुले यांचे अनुयायी आहोत. शिक्षणातूनच परिवर्तन होईल म्हणून तर ही संस्था आम्ही उभी केली. संध्याकाळपर्यंत तुम्ही संमतिपत्रावर सही करा. बाकी सर्व आम्ही पाहून घेतो.' हे संस्थाचालक शिक्षण आणि संस्कृती या विषयावर उत्तम प्रवचने करीत असत. गांधी आणि विनोबा यांचे आपण निष्ठावंत भक्त आहोत असे ते सांगत असत. शिक्षणाविषयीची त्यांची तळमळ किती प्रशंसनीय होती याची कल्पना नोकरी मागायला गेलेल्या त्या भावी शिक्षकाला यथार्थतेनं आली असेल. नैतिक मूल्ये फक्त पुस्तकातच सापडतात. आणि त्या मूल्यांचा उच्चार फक्त सभासंमेलनातच गहिवरलेल्या आवाजात करायचा असतो. टिळक-गांधी-विवेकानंद आणि कर्मवीर भाऊराव पाटील ही नावे मधून मधून उच्चारली म्हणजे हमखास टाळ्या मिळतात. नाही तरी या व्यक्ती आता टाळ्यांचे आणि पुतळ्यांचे विषय झाले आहेत. खरे तर या नावांचा नुसता उच्चार करायला सुद्धा नैतिक

अधिकार लागतो. भ्रष्टाचाराच्या उघड्या बाजारात ही नावे घेतली जातात. विसंगती आणि निर्लज्जपणा हे आजच्या जीवनाचे मुख्य विशेष बनले आहेत. शिक्षक होऊ इच्छिणारा तो तरुण काही स्वप्ने उराशी बाळगून निरनिराळ्या शिक्षणसम्राटांना भेटला तेव्हा त्याचा किती दारुण भ्रमनिरास झाला असेल. विद्यालयाच्या अंगणातच भ्रष्टाचाराचं पीक फोफावलेलं आहे. बाकीच्या क्षेत्रांबद्दल काय बोलावं ? एका संस्थाचालकाला याबाबतीत विचारल्यावर तो म्हणाला,

'अहो, शाळेचा एखादा वर्ग वाढवायचा असेल तर शिक्षण संचालनालयात आम्ही शेकडो हेलपाटे घालतो. चपराशापासून अधिकाऱ्यांपर्यंत आणि त्यांच्याही वरिष्ठांपर्यंत अनेकांचे पाय धरावे लागतात. 'अडला हरी गाढवाचे पाय धरी' हा वाक्प्रचार किती बरोबर आहे याचा आम्हाला अनुभव येतो. संबंधितांना भरपूर खंडणी द्यावी लागते. अधिकाऱ्यांना स्कॉच आणि कोंबडी आणि वर दक्षिणा देऊन त्यांना खूष करावं लागतं. अशा परिस्थितीत संस्था चालवायची असेल तर देणग्या घेण्याशिवाय आम्हाला दुसरा मार्ग आहे का ते सांगा.'

'एकमेकां करू सहाय्य। अवघे धरू सुपंथ॥' या संतवचनाप्रमाणे खालून वरपर्यंत एक पक्की साखळी या क्षेत्रांत देखील तयार झालेली आहे. सरस्वतीपूजेचे खरे विरोधक आम्हीच नव्हे काय ? 'माणूस घडवणारे शिक्षण' हे विवेकानंदांचे उद्‌गार आठवतात. आजचे शिक्षण माकड बनवणारे, धूर्त लांडगे बनवणारे बनले आहे, अशी जळजळीत टीका एका पालकाने माझ्याजवळ केली तेव्हा मला काहीही बोलता आले नाही. शिक्षण आणि प्राध्यापक यांच्याबद्दल देखील समाजात आदराचा लवलेशही उरलेला नाही. याची जबाबदारी शिक्षकांवरच येऊन पडते. पण लक्षात कोण घेतो ? शिकवणाऱ्या अध्यापकाला शिकत राहिले पाहिजे. त्याच्यात ज्ञानग्रहण करण्याची आणि त्यासाठी कष्ट करण्याची तयारी नसेल तर तो टिपणे लिहून देणारा, वेळ मारून नेणारा, केवळ पगारासाठी धडपडणारा शिक्षणक्षेत्रातला एक सामान्य हमाल बनतो. 'गुरु हा ब्रह्मा, विष्णु आणि महेश आहे म्हणून त्याला वंदन केले पाहिजे.' अशा अर्थाचा श्लोक सभेत ऐकला की माझी तरी करमणूक होते. याचा अर्थ सर्व अध्यापक कर्तव्यभ्रष्ट झाले असं मात्र माझं मत नाही. राजकारणाच्या भांगेत देखील एखादी तुळस कधी कधी आढळते. त्याप्रमाणं विद्येच्या बाजारातही अजून कुठेतरी काही तपस्वी दिसतात. आणि मनाला आनंद होतो.

एक शिक्षक मला भेटले. त्यांच्या घरात उत्तमोत्तम ग्रंथ होते. प्रत्येक ग्रंथावर त्यांनी टिपणं काढली होती. वेगवेगळ्या विषयांवरील ग्रंथांचा त्यांनी केलेला संग्रह पाहून मी चकित झालो. साहित्य, समाज, धर्म, शिक्षण, राज्य इत्यादी विषयांवरचे निवडक ग्रंथ त्यांनी वाचले होते. हे शिक्षक तालुक्याच्या एका शाळेत नववी-दहावीला शिकवीत होते. पण शाळेच्या वेळांव्यतिरिक्त ते आपल्या ज्ञानसाधनेत रममाण व्हायचे: हा तपस्वी होता. त्याची तपश्चर्या खरोखरच आदर्श होती. तो म्हणाला,

'दर महिन्याच्या पगारात मी किमान दोन तीन पुस्तकं विकत घेतो. तेवढी रक्कम बाजूला काढून ठेवलेली असते. दारूच्या बाटल्यांवर पैसे उडवणारे या क्षेत्रातले लोक मला माहीत आहेत. दारूची नशा फार लवकर संपून जाते. पण अधिकारी विद्वानांनी आणि कवी लेखकांनी लिहिलेल्या पुस्तकांतून मला जी नशा मिळते ती वर्षानुवर्षे कमी होत नाही. नवे विचार आणि नवं ज्ञान यासारखं नशा आणणारं द्रव्य दुसरं कुठलं असेल असं मला वाटत नाही. सगळ्या क्षेत्रांत घाणेरडे खेळ चालू आहेत. आपण ही त्यात मिसळण्यापेक्षा मला माझं एक वेगळं जग निर्माण करायचं आहे. मी कवींच्या, नाटककारांच्या आणि विचारवंतांच्या विचारसृष्टीत दररोज फेरफटका मारतो. तिथला ऑक्सिजन छातीत भरून घेतो. हे माझं साधं सरळ जीवनाचं तत्त्वज्ञान आहे. परवा संस्थाचालक मला म्हणाले, - 'तुम्ही मुख्याध्यापक व्हा. तुमच्या हातात सत्ता येईल. चार पैसे अधिक मिळतील.' मी त्यांना म्हणालो,

'आहे याच परिस्थितीत मला जगता येईल. मुख्याध्यापक होऊन न पटणाऱ्या तडजोडी करीत बसण्यापेक्षा आणि स्वतःला दुःखी करून घेण्यापेक्षा मला माझ्या पद्धतीनं जगू द्या. त्यांनी खूप आग्रह केला. पण मी बळी पडलो नाही. व्यावहारिक दृष्ट्या मी चुकलो असेन. इतर शिक्षकांनी मला वेड्यात काढलं. पण माझं वेड मी शहाणपणानं जपलं आहे. तुम्हाला काय वाटतं ?'

'आचार्य देवो भव' हे ज्याच्या बाबतीत निःशंकपणानं म्हणता येईल असा एक आचार्य मला भेटला त्याचं समाधान वाटलं. पण ही अपवादात्मक घटना आहे. कोणे एकेकाळी अभ्यासू, ज्ञाननिष्ठ अध्यापक थोडेफार भेटत होते. आता मात्र...! परवा एक अध्यापक मला म्हणाले, 'एक लाख रुपये देऊन मी नौकरी विकत घेतली आहे. आता मला चिंतेचं कारण नाही. मस्टरवर सही करतो आणि

माझ्या शेताची देखभाल करण्यासाठी शेताकडं जातो. मला विचारण्याची मुख्याध्यापकाचीही हिंमत नाही. पोरं काय शिकवण्याच्या क्लासला जातात. वर्गात फारच थोडे विद्यार्थी येतात. त्यांनाही बऱ्याच वेळा सुट्टी देऊन टाकतो. शिक्षणाचं क्षेत्र चांगलं असतं बघा. काम न करता पगार मिळतो. माझं आता बरं चाललं आहे.'

मी मनात म्हणालो, 'हे काही बरं चाललं नाही. पण असंच किती दिवस चालणार ?'

■■■

# धरिला पंढरीचा चोर

पंढरीचा विठ्ठल, हा एक चमत्कार आहे. कटीवर हात ठेऊन शतकानुशतके विटेवर उभा असलेला हा पांडुरंग म्हणजे प्रेरणाशक्तीचा एक अखंड प्रवाह आहे. याच्या चरणांवर आजपर्यंत कोटी कोटी भक्तांनी आपली मस्तके टेकली आहेत. लावण्याचा हा राजस पुतळा अब्जावधी लोकांनी आपल्या डोळ्यांत आणि हृदयात भरून घेतला आहे. त्याला पाहाताच भक्तीच्या गहिवराने आणि मनाच्या तृप्तीने भक्तजनांचे डोळे पाझरू लागतात. त्यांच्या ओठातून शब्द फुटतात, 'हे विठुराया, भक्तांच्या आयुष्यावर मायेची सावली घालणाऱ्या हे जगदीशा, असंख्य भाविकांच्या हृदयात प्रेमभक्तीचे नंदादीप पेटवणाऱ्या हे जनजीवना, तुझ्या दर्शनाने डोळे निवतात. मन मोहरून येते. भान गळून जाते. जीव विसावतो. आयुष्य कृतार्थ होते. आधी-व्याधी मिटून जातात. साऱ्या शंका फिटून जातात. दुःख आणि दैन्य वठून जाते. वासनेचे ओहोळ आटून जातात. तू इथे उभा आहेस आमचे त्रिविध ताप हरण करण्यासाठी. तू आहेस मंगलतेचे माहेर. तुझ्या सहवासात जन्मजन्मांतरीची दुःखे हरपतात. तुझे वर्णन करायला आमच्याजवळ शब्द नाहीत. डोळ्यांतून झरणारे भक्तीचे हे अश्रू तुला अर्पण करीत आहे. कारण तुला देण्यासारखे माझ्याजवळ अश्रूंशिवाय दुसरे काहीच नाही.'

विठ्ठल हे महाराष्ट्राचे दैवत. खरे तर त्याच्यावर एखाद्या प्रदेशाने आपला अधिकार सांगणे चुकीचेच आहे. कर्नाटक आणि महाराष्ट्र यांना भावभक्तीच्या धाग्याने जोडणारे हे दैवत साऱ्या मानवतेचे आहे. 'विठ्ठल तो कानडा, दैवत ते कर्नाटकु' असे ज्ञानेश्वरांनी म्हटले. पण हे दैवत यच्चयावत् भक्तांच्या मालकीचे बनले आहे. मग तो भक्त कोणत्याही जातीचा किंवा कोणत्याही प्रांताचा असो, देवाला कोठे जात असते का ? देवाचे कुळ कोणते ? देवाचा वंश आणि वर्ण कोणता ? त्याचा जन्म कधी झाला ? या प्रश्नांना कोणतेही उत्तर नाही. देवदेखील उत्तर देऊ शकणार नाही. तो अजन्मा आहे. म्हणूनच त्याला मृत्यू नाही. त्याला वार्धक्य नाही. तो अजर आहे. निरामय आहे. आकार नसूनही तो साकार आहे. दिसत नसूनही तो जगात सर्वत्र आहे. तो वाऱ्याच्या झुळकीत आहे. ताऱ्याच्या

तेजात आहे. पाण्याच्या थेंबात आहे. प्रकाशाच्या किरणात आहे. बालकाच्या हास्यात आहे. आईच्या वात्सल्यात आहे. बासरीतून निघणाऱ्या स्वरात आहे. पाखरांच्या पंखात आहे. आकाशाच्या निळाईत आहे. राधेच्या डोळ्यांत आहे. कृष्णाच्या सुदर्शनचक्रात आहे. जेथे काही नाही तेथेही तो आहे ही भाविकांची अतूट श्रद्धा आहे. त्याचेच एक मोहन रूप विठ्ठल म्हणून पंढरीत युगानुयुगे उभे आहे. चंद्रभागेला खंड नाही. विठ्ठलाच्या अस्तित्वालाही बंध नाही. म्हणून म्हणतो हा पंढरीचा विठ्ठल एक चमत्कार आहे.

विठ्ठलाच्या चरणांवर ज्ञानेश्वरांनी आपले मस्तक टेकले. नामदेव-तुकारामांनी ज्ञानेश्वरांचेच अनुकरण केले. संत कवींच्या हातातल्या एकतारीतून विठ्ठलभक्तीचे सूर झंकारत राहिले. त्या मधुर सुरांनी मराठी सारस्वत बहरून गेले. विठ्ठलभक्तीची कविता - 'इये मराठीचिये नगरी' दुथडी भरून वाहू लागली. चंद्रभागाही तिच्या वेगापुढे स्तंभित झाली. पंढरीचा पांडुरंग नामदेवांच्या कीर्तनात नाचू लागला. गाऊ लागला. हा विठ्ठल गोरा-कुंभाराच्या समवेत चिखल तुडवू लागला. मडकी घडवू लागला. सावता माळ्याच्या मळ्यात तो रोपे लावू लागला. ज्ञानेश्वरांच्या प्रवचनात रंगून जाऊ लागला. चोखामेळ्याबरोबर बांधकाम करू लागला. त्याच्या झोपडीत राहू लागला. ज्ञानाच्या अहंकाराने उन्मत्त झालेल्या ब्राह्मणांना तो सापडला नाही. पण चोखामेळ्याच्या झोपडीत मात्र सोयराबाईच्या हातून दहीभात खाऊ लागला. कान्होपात्रेला त्याने धीर दिला. जनाबाईबरोबर दळण-कांडण करण्यात तो रंगून गेला. ज्ञानवंतांना आणि धनवंतांना न भेटणारा हा पांडुरंग दीनाघरी मात्र धावत गेला. खरोरच हा चमत्कार नव्हे काय ? या विठ्ठलाच्या दर्शनासाठी लक्षलक्ष भक्तगण वाऱ्यावादळात आणि पावसापाण्यात, उन्हातान्हात दूरदूर अंतरावरून नामाचा गजर करीत, दिवसचे दिवस प्रवास करीत पंढरीला येतो. हे सावळे परब्रह्म पाहिले की त्यांचे सारे परिश्रम सार्थकी लागतात. विठ्ठलाची भेट म्हणजे आनंदाची दिवाळी. दर्शनसुखाची पर्वणी. संतांनी या सावळ्या विठूबद्दल आपल्या भावना किती उत्कटतेने व्यक्त केल्या आहेत. संत चोखामेळा म्हणतो,

लावण्याचा गाभा त्रैलोक्याची शोभा । विटेवरी उभा पंढरीये ॥
पाउले गोजिरी श्रीमुख शोभले । ध्यान मिरवले भिमातीरी ॥
वैजयंती माळा किरीट कुंडले । परिधान केले पीत वस्त्र ॥
चोखा म्हणे ऐसा लावण्यपुतळा । तो आम्ही देखिला दृष्टिभरी ॥

संत चोखामेळ्याच्या दृष्टीला विठ्ठल म्हणजे 'लावण्याचा गाभा' आहे. त्याची पाउले गोजिरी आहेत. त्याने वैजयंती माळा आणि किरीटकुंडले धारण केली आहेत. सुंदरतेचा हा पुतळा मी डोळांभरून पाहिला. असे त्याचे आनंदोद्‌गार आहेत. भक्तीने आणि प्रीतीने पाहिला तर तोच श्यामल विठू सौंदर्याने परिपूर्ण असलेला दिसू शकतो. चोखामेळ्याला मंदिरात प्रवेश नव्हता. पण आपल्या कल्पनेने भावनेने आणि समरसतेने तो विठ्ठलाला पाहू शकला. भक्ती असेल तरच पाहाण्याची शक्ती येते. नुसती शक्ती उपयोगी पडत नाही. 'जेथे भाव तेथे देव' चोखामेळा काही ज्ञानयोगी नव्हता. तपस्वी नव्हता. बांधकाम करणारा तो एक सामान्य कामकरी होता. अस्पृश्यतेच्या शापामुळे जळत होता. 'ऊस असे डोंगा, परि रस नसे डोंगा; काय भुललासि, वरलिया रंगा' हा प्रश्न त्याने कर्मठ पोथीपंडितांसमोर आर्ततेने मांडला. पण पंडितांनी पोथ्यांची पाने चाळली, चोखोबाचे मन पाहिलेच नाही. म्हणून बडव्यांच्या बंदोबस्तात देवळात उभा असलेला पांडुरंग चोखामेळ्याला भेटायला त्याच्या खोपटात गेला. आणि मग त्या झोपडीत स्वर्गलोकीचा प्रकाश पसरला. हा भक्तीचा महिमा. ही विठ्ठलाची थोरवी. वर्णभेदांमुळे उपेक्षित राहिलेला चोखोबा विठ्ठलाने आपल्या हृदयाशी धरला. हा विठ्ठल 'लावण्याचा गाभा' आहे असे त्याला का वाटू नये ? भक्तीने भिजलेल्या अभंगांत चोखोबांचे अश्रूही मिसळले आहेत. त्यामुळे त्याच्या अभंगातले कारुण्य आणि भक्तीचे सामर्थ्य कोणी नाकारू शकत नाही. संत चोखोबांच्या जीवनात संत नामदेवांनी क्रांती घडवून आणली. नामदेव भेटले आणि त्यांनी हृदयाशी धरले म्हणून चोखोबा तरले.

संत नामदेवांना विठोबा माऊलीसारखा दिसत होता. म्हणून तर बालकासारखा हट्ट धरून त्याच्या दारात नामदेव तास न् तास बसून राहायचे. आपल्या ताटातला घास विठ्ठलाने खाल्लाच पाहिजे हा नामदेवांचा लाडिक आग्रह 'माऊलीला' पुरवण्याशिवाय गत्यंतर नव्हते. विठ्ठलाचे साऱ्यांवर प्रेम. पण नामदेवावर कांकणभर अधिकच होते. देवदेखील प्रेमाचा भुकेला असतो. संगमरवरी मंदिरात हिऱ्यामोत्यांचे अलंकार लेवून आपली यथासांग पूजा करून घेण्यात त्याला धन्यता वाटत नाही. तो मंदिरातून बाहेर पडतो. आपल्या फाटक्या वस्त्रावर एक कांबळे टाकतो. आणि नामदेवांच्या रंगलेल्या कीर्तनरंगात नाचत राहातो. भक्त गात आहे आणि परमेश्वर नाचत आहे. हा भक्तिप्रेमाचा सोहळा स्वर्गीचे देवसुद्धा

कौतुकाने पाहात आहेत. संत नामदेव म्हणतात,

सुखाचे हे सुख श्रीहरी मुख । पाहताही भूक ताहान गेली ॥
भेटली भेटली विठाई माऊली । वासना निवाली जीवातील ॥
चंद्रासी चकोर मेघासी मयूर । वाटे तैसा भर आनंदाचा ॥
नामा म्हणे पाप आणि ताप दुःख । गेले, झाले सुख बोलवेना ॥

श्रीहरीचे मुख पाहिल्याबरोबर तहानभूक हरपली. 'सुखरूप' झाल्यावर तहानभूक कसली ? अपार आनंदाने मन भरल्यावर पोटाची काय मातब्बरी ? वासना नाहीशा करण्याची शक्ती विठ्ठलदर्शनात आहे. 'देवाचिये द्वारी' आल्यावर बाकी साऱ्या क्षुद्र आशा-आकांक्षांची दारे आपोआप बंद होतात. नामदेवांच्या वाणीत कोमलता आहे. त्यांच्या वृत्तीत निरागसता आहे. डोळ्यांत विठ्ठलमूर्ती आहे. मनात भक्ती आहे. विठ्ठल दिसला की सकळ स्वप्नांची पूर्ती होत आहे. आता तहान लागणे शक्य नाही. भुकेचाही प्रश्न नाही. सर्वच संतांच्या अभंगांतून विठ्ठलाचे चित्र सर्व रंगांतून साकार झालेले दिसते. नामदेवाच्या घरात वाढलेली दासी म्हणजे 'नामयाची जनी.' ही जनाबाई घरातली सारी कामे धामे रात्रंदिवस करायची. गोवऱ्या थापण्यापासून धुणी धुणे, दळण-कांडण करणे यासारखी कष्टाची कामे करताना विठ्ठलाची गीते ती तन्मयतेने गायची. ती म्हणते,

काम धाम माझे विठोबाचे पाय । दिवसनिशी पाहे हारपली ।
माझ्या वडिलांचे दैवत तो हा पंढरीनाथ । तेणे माझा अर्थ पुरविला ॥

'हृदयी बिंबला पांडुरंग' अशा अवस्थेत 'द्वारी विठ्ठल उभा आहे' ही जाणीव झाली तर त्यात आश्चर्य कसले ? या जनाबाईला लिहिता वाचता येत होते की नाही याची जाण इतिहासाला नाही. लिहिता वाचता न येणाऱ्या, अज्ञानी समजल्या जाणाऱ्या भाविकांनी अशी कविता लिहिली आहे की काव्यशास्त्राचे घोकून घोकून पीठ पाडलेल्या शास्त्री-पंडितांनाही तशी कविता करणे शक्य झाले नाही. आम्हाला वामनपंडित माहीत नाही. जनाबाईची रसभरित, भक्तिसंपन्न कविता आम्हाला आजही फुलवू शकते. कविता फुलायला व्याकरण लागत नाही. अंतःकरण मात्र आवश्यक असते. विठ्ठलभक्तीची झुळुक आली की जनाबाईच्या कवित्वाची कळी उमलून येते. निरक्षराला कविता प्रसन्न होते. आणि विद्वानाकडे मात्र पाठ फिरवते हा काय चमत्कार आहे ? हा चमत्कार त्या पंढरीच्या विठ्ठलाने केला. विठू माझा आहे ही भावना भक्तांच्या मनात रुजून बसली आहे. विठ्ठल हे प्रेमाचे दैवत आहे.

ते श्रीकृष्णाचे बालरूप आहे. यशोदेच्या घरी वाढलेला, दह्यादुधाची चोरी करणारा, गोपिकांचा गोड छळ करणारा तो खेळकर, खट्याळ कृष्ण बालरूपात पंढरीत उभा आहे. त्याला विठू किंवा विठ्या अशी प्रेमाने साद घातली की तो प्रतिसाद देतो आणि भक्तांच्या हृदयात आपल्या बासरीतून आनंदाची स्वरकंपने उत्पन्न करतो. त्या मुरलीधराची ही करामत आहे. त्याने उपेक्षितांना प्रेम दिले. भक्तांमुळेच तो श्रीमंत झाला. हा गवळ्याचा पोर चंद्रभागेच्या तीरी पंढरीला आला. आणि लक्षावधी भक्तांच्या भक्तीने श्रीमंत होऊन गेला. भक्त त्याच्याशी खेळतात. कधीकधी प्रेमभराने त्याला शिव्याही देतात. शिवीचे वाटणारे शब्द ओवीरूप होऊन जातात. शिवी ऐकली तरी विठ्ठल मात्र हसत असतो. आपल्या हसण्याने तो भक्ताला खुलवतो आणि झुलवतो. तो चोरटाही आहे, खोटारडाही आहे पण त्याच्याकडे जाण्याची ओढ मात्र बलवत्तर आहे. चोराची ओढ लागावी हा देखील एक चमत्कार आहे. हा चोर पकडण्याचा प्रयत्न सारखा चालू आहे. सापडल्यासारखा वाटतो आणि निसटून जातो. भक्त एक खोडकर तर देव दसपट खोडकर. पण प्रेमाच्या दोन शब्दांनी हा चोर भक्ताच्या मनात कायमचा बंदिवान होतो. होमहवन करूनही तो सापडत नाही. जपजाप्यातही गवसत नाही. तीर्थयात्रा केली तरी हाती लागत नाही. व्रत-वैकल्यांनाही वश होत नाही. पण भक्तीचा सूर ऐकला की हा जाळ्यात सापडल्याशिवाय राहात नाही.

संत जनाबाईला तो सापडल्याबरोबर तिने त्याला जन्मठेपेची शिक्षा दिली. सरळ त्याच्या पायात बेडी घातली. आता जन्मभर सुटका नाही. तो हाती लागल्याबरोबर जनाबाई आनंदाने टाळ्या पिटीत गाऊ लागली,

धरिला पंढरीचा चोर। गळां बांधोनियां दोर॥
हृदय बंदिखाना केला। आत विठ्ठल कोंडिला॥
शब्दे केली जवाजुडी। विठ्ठलपायी घातली बेडी॥
मोह शब्दाचा मारा केला। विठ्ठल काकुलती आला॥
जनी म्हणे बा विठ्ठला। जीवे सोडीन मी तुला॥

काकुळतीला आलेल्या विठ्ठलाची फजिती जनाबाईने हर्षातिशयाने वर्णन केली आहे. ते भक्त धन्य आहेत. 'धरिला पंढरीचा चोर' असे ज्यांना तृप्त मनाने म्हणता येते त्यांचे आयुष्य सफल होते. हा 'पंढरीचा चोर' हृदयचोर आहे. जन्मभर या चोराच्या तावडीतून मुक्तता होऊ शकत नाही. चोरालाही त्यात आनंद वाटतो.

आणि त्याला धरणाऱ्यालाही परमानंद होतो.

हे पंढरीच्या विठ्ठला, तू आता पंढरीतच ठाण मांडून उभा राहू नकोस. आता तू आमच्या आयुष्याच्या पंढरीत राहायला ये. तुझ्याशिवाय आमच्या जीवनाची पंढरी उजाड आहे. तू कसाही ये. वाऱ्यासारखा ये किंवा चोरासारखा ये. तू ज्या दिवशी आमच्या मनाची चोरी करशील त्यादिवशी आम्ही जन्माचे श्रीमंत होऊ. कुबेरापेक्षाही वैभवसंपन्न होऊ. हे पंढरीच्या चोरा, तू ज्याला चोरतोस त्याचे सर्वकाळ कल्याण होते. तुझ्यासारख्या चोराचे स्वागत करायला आम्ही उत्सुक आहोत. आयुष्याचे दार सताड उघडे ठेवले आहे. केव्हाही ये. चोरांपासून सावध रहा असा फलक आम्ही दारावर लावला नाही. 'चोराचे स्वागत असो' अशी अक्षरं मात्र लिहून ठेवली आहेत. तुझ्या वाटेकडे डोळे लावून बसलो आहोत. लवकर ये.

■■■

# माझा देश - माझी मायभूमी !

स्वातंत्र्यवीर सावरकरांची 'माझी जन्मठेप' ही आत्मकथा मी माझ्या शालेय वयातच वाचली होती. हे आत्मचरित्र कोणाही वाचकाच्या सर्वांगात देशप्रेमाच्या विद्युल्लहरी खेळवणारं आहे. एका देशभक्ताच्या जिवंत आणि धगधगीत त्यागाची संघर्षपूर्ण कहाणी या ग्रंथात आली आहे. आजही माझ्या आठवणीत जी पुस्तकं राहिली आहेत त्यात 'माझी जन्मठेप' या ग्रंथाला महत्त्वाचं स्थान आहे. त्यातले तरुण सावरकरांचे उद्‌गार आठवतात. कैद्याच्या वेषात असलेल्या या स्वातंत्र्यवीराच्या पायात बेड्या घालण्यात आल्या होत्या. भेटायला आलेल्या पत्नीला हा तरुण म्हणाला,

'चार काटक्या एकत्र करून घरटं बांधणं आणि त्यात मुलाबाळांची वीण वाढवणं याला जर संसार म्हणत असतील तर असला संसार कावळे आणि चिमण्या सुद्धा करतात. या क्षुद्र संसारात काय अर्थ आहे ? इतरांच्या चुलीतून सोन्याचा धूर निघावा म्हणून आपल्या चुलीवरची चार गाडगी मडकी फोडून टाकली पाहिजेत. संसाराचा भव्यतर अर्थ आपण घेतला पाहिजे. कधीकाळी क्षुद्र संसाराचा मोह पडला तर माझे हे शब्द लक्षात ठेवा.'

हा अठ्ठावीस वर्षांचा तरुण स्वातंत्र्यभावनेनं उद्दीपित झाला होता.त्याच्या नसानसातून राष्ट्रभक्ती सळसळत होती. पन्नास वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा त्याला ठोठावण्यात आली. कारण त्यानं आपल्या देशावर उत्कट प्रेम करण्याचा अपराध केला होता. पारतंत्र्याचा धिःक्कार केला होता. मातृभूमीसाठी सर्वस्वाचं समर्पण करण्याची त्याची तयारी होती.

'माझी जन्मठेप' मधला हा प्रसंग वाचल्यानंतर अनेक देशभक्तांनी स्वातंत्र्यासाठी केलेलं दिव्य बलिदान आठवलं. त्यागाची, पराक्रमाची, आत्माहुतीची एकेक दिव्य प्रकरणं आठवत राहिली. 'माझी जन्मठेप' हे एकट्या सावरकरांचं आत्मकथन नसून ते साऱ्याच राष्ट्रभक्तांच्या भावनांचं आविष्करण आहे असं मला वाटतं.

कशासाठी या देशावर प्रेम करायचं ? देश किंवा राष्ट्र ही केवळ एक कल्पना आहे. भावनावश दुबळेपणाचा तो एक प्रकार आहे. अशाही अर्थाची टीका मी ऐकली आहे. जननी आणि जन्मभूमी हे उगीचच भावनातिरेकाचे विषय करून ठेवले आहेत. जननीचं प्रेम एकवेळ समजण्यासारखं आहे. पण आपल्या जन्मभूमीला, देशाला महत्त्व देण्याचं कारण काय आहे ? जमिनीच्या एका प्रचंड तुकड्याला माता किंवा देवता समजून त्यासाठी आपलं रक्त सांडण्यात किंवा प्राण वेचण्यात काही अर्थ आहे का ? हे प्रश्न विचारणाऱ्या माणसांचा मला राग येत नाही. त्यांच्या मनोवृत्तीची दया येते.

आपला देश म्हणजे जमिनीचा एक भाग हे म्हणणं वास्तव असलं तरी ते करंटेपणाचं आहे, आई म्हणजे रक्तामांसाची एक बाई जिनं मला जन्म दिला आणि आपलं नैसर्गिक कर्तव्य केलं तिला 'मातृदेवो भव' म्हणून तिची गौरवगीतं गाण्याचं काय कारण आहे ? पशुपक्षी देखील आपल्या पिलांना अपरिहार्यपणे जन्म देतात. मातृत्वाचा इतका गौरव करण्यात काहीही स्वारस्य नाही, अर्थ नाही. असं म्हणणाऱ्या माणसाला माणूस म्हणणं हे देखील माणुसकीची विटंबना केल्यासारखं होईल. मातेच्या जीवनशक्तीचा वारसा आपल्याला मिळालेला असतो. त्याबद्दल कृतज्ञतेचा कोणताही शब्द अपुरा पडेल. आईची महती ज्याला कळू शकत नाही अशा क्षुद्र कीटकाला कोणत्या शब्दांनी संबोधावं हे कळत नाही. आपली जन्मभूमी ही वाच्यार्थानं नव्हे तर परमार्थानं आपली माता असते.

'नभि नक्षत्रे बहुत एक परि प्यारा
मज भरतभूमीचा तारा'

राजप्रासादापेक्षाही मला आईची झोपडी अधिक मोलाची वाटते. हे सावरकरांचेच उद्‍गार आहेत. ते कठोर बुद्धिवादी होते. पण या जन्मभूमीवर, आपल्या देशावर त्यांनी विलक्षण प्रेम केलं, भक्ती आणि प्रेम या भावना कोरड्या बुद्धीला समजण्यासारख्या नाहीत. देशभक्तीची भावना जगात सर्वत्र आढळते. राष्ट्र हे देवतास्वरूपच मानलं गेलं. 'ज्यानं आपल्या उभ्या आयुष्यात हा माझा देश, ही माझी मातृभूमी असा भावनिक उद्‍गार काढला नसेल असा कोणी कर्मदरिद्री माणूस या जगात असेल का ?' अशा आशयाचे उद्‍गार एका कवीनं - स्कॉटनं काढले आहेत. शेक्सपिअरनंही प्रश्न विचारला आहे, 'हू इज हिअर सो व्हाइल दॅट वुईल नॉट लव्ह हिज कंट्री.' 'आपल्या देशावर प्रेम न करणारा कुणी दुरात्मा

आहे का ?' देशभक्ती म्हणजे इथल्या भूमीवर, रानावनावर, नद्या-सागरावर, डोंगर-पर्वतांवर आणि झाडा-झुडुपांवर प्रेम असणं. ज्ञानेश्वर-तुकारामांसारख्या संत कवींनाही मातृभूमीबद्दल आत्यंतिक जिव्हाळा होता. संत साऱ्या मानवतेचे असतात पण आपल्या भूमीबद्दल त्यांच्या मनात आपुलकीचा एक कोपरा असतो. गडकरी आणि कोल्हटकरांनी महाराष्ट्रगीतं लिहिली. 'प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा' ही कोल्हटकरांची भावना आणि 'मंगल देशा, पवित्र देशा, प्रणाम घ्यावा माझा हा श्री महाराष्ट्र देशा' ही गडकऱ्यांची भावना तुमची आमची सर्वांचीच आहे. आपल्या देशाच्या मातीतून आपण उगवलो. या देशाचं अन्न आणि पाणी यांनी आपल्याला जोपासलं. या देशाच्या संस्कृतीनं आपल्याला फुलवलं. आपलं व्यक्तिमत्त्व इथंच विकसित झालं. परवा एक फॉरेन रिटर्न्ड् गृहस्थ मला म्हणाले,

'आहे काय या भिकार इंडियात ? अमेरिकेसारखा देश नाही. यथेच्छ खायला आणि प्यायला मिळतं. तिथं ....'

त्याला मध्येच अडवून मी म्हणालो, 'खरंच, पिण्याच्या बाबतीत तुझी इंडियात थोडी उपासमार होते याबद्दल वाद नाही.' माझ्या टोमण्याकडे दुर्लक्ष करून तो म्हणाला, 'मी ॲटमॉसफिअरबद्दल बोलतो. इंडिया इज ए डर्टी कंट्री. अमेरिका केवढी पॉश आहे ! एखाद्या उत्साही, सुंदर आकर्षक तरुणीसारखी. इंडियातलं वातावरण मरगळलेलं आहे. इथली हॉटेल चांगली नाहीत. इथं तिथल्यासारखे नाइट क्लब्ज् आणि विलासगृहं नाहीत. हा केवळ मंदिरांचा आणि जुन्या-पुराण्या तीर्थक्षेत्रांचा देश आहे. या सोलापुरात तर घामट चेहऱ्याची माणसं वावरत असतात. इथल्या बायका तर जुनाट पद्धतीचा पेहराव करतात. अमेरिकेत कसं मॉडर्न वातावरण आहे !' मी म्हणालो, 'अमेरिकन बायका - चुकलो-अमेरिकन लेडीज्चा पेहराव इंडियन क्लायमेट आणि ॲटमॉसफिअरमध्ये चालत नाही. चार दिवस अमेरिकेत गेलास तर तिथल्या दर्शनाला तू इतका भाळलास याचं मला आश्चर्य वाटतं. तो एक सुधारलेला आणि समृद्धी असलेला उद्योगप्रिय देश आहे याबद्दल शंका नाही. विज्ञानाची उपासना केल्यामुळं तो देश भरभराटीला आला. त्यांच्याकडून देशप्रेमाचं आणि ज्ञानोपासनेचं 'स्पिरिट' घेण्याचं सोडून स्कॉच व्हिस्कीच्या बाटल्या मात्र येताना घेऊन आलास. तुझ्यातलं हे 'स्पिरिट' वेगळं आहे. आमचा देश गरीब आहे. वैज्ञानिक प्रगतीच्या बाबतीत भारत अद्यापी युरोपियनांच्या आणि अमेरिकनांच्या तुलनेत बराच मागे आहे हे खरं आहे. पण

याच्या प्रगतीसाठी धडपडण्याच्या ऐवजी परदेशांची भलावण करीत स्वदेशाची मात्र निंदा-नालस्ती करणारे तुमच्यासारखे लोक मला सुसंस्कृत वाटत नाहीत. तुझ्या दृष्टीनं अमेरिका म्हणजे स्वर्ग असेल तर तू 'स्वर्गवासी' व्हायला आमची हरकत नाही. आमच्यासमोर या आमच्या जन्मभूमीला अनेक अंगांनी समृद्ध कसं करायचं हे आव्हान आहे. या देशातली जनता आर्थिक आणि शैक्षणिक बाबतीत कशी प्रगत होईल याचा विचार आम्ही केला पाहिजे. नाइट क्लबमध्ये दोनचार प्याले झोकून तुम्ही खुशालचेंडू इंडियन्स् एखाद्या गौरांगीबरोबर नाचता आणि त्या झगमगाटात तुमचे डोळे दिपतात. तुम्ही भव्य आखीव रस्ते पाहाता - उत्तुंग इमारती पाहाता, तिथली श्रीमंती पाहाता आणि 'इंडिया इज ए डर्टी कंट्री' असे शेरे मारता. तुमच्यामुळं अमेरिका श्रीमंत झाली नाही. पण तुमच्या क्षुद्र करंट्या वृत्तीमुळं भारत मात्र दरिद्री होत चालला आहे याची मला खंत वाटते. कधीतरी या देशाच्या प्रगतीचा विचार तुम्हा उच्चशिक्षितांच्या डोक्यात आला का ?'

'हा देश कधीच सुधारणार नाही. अंधःश्रद्धांनी आणि मूर्ख रूढींनी बुजबुजलेल्या या देशात कसली प्रगती होणार ? इथं गायी-बैलांची पूजा होते. इथं झाडांचीही पूजा केली जाते.' त्याने उपहासाच्या स्वरात हे म्हटले. खरं तर कृषिप्रधान देशात गाई-बैलांना कृतज्ञतेनं देवत्व दिलं गेलं तर त्याबद्दल इतकी उपहासात्मक भूमिका घेण्याचं कारण नाही. 'सर्वभूती' परमेश्वर पाहाणारी उदात्त संस्कृती आमच्या देशानं जोपासली. पशूपक्ष्यांनाही सन्मान देणं हे सांस्कृतिक उदारतेचं द्योतक आहे. पण स्वतःला बुद्धिवादी समजणारी आणि डबल ग्रॅज्युएट असणारी सुशिक्षित माणसं देखील या मागची वैचारिक भूमिका समजून घेऊ शकत नाहीत.एखाद्या अशिक्षिताला आणि खेडुताला ती समजू शकते. 'अतिथी देवो भव' ही वामन चोरघडे यांची कथा मला आठवते. आपल्या बैलांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा सण एक दिवस खेडुत मंडळी विशेषतः शेतकरी निष्ठेनं पाळतात. आपली बैलजोडी घेऊन एक शेतकरी एका डॉक्टराच्या बंगल्याच्या दारात पोहोचतो. बैलांना ओवाळणी घाला अशी साद घालतो. डॉक्टरीणबाई फाटकात येतात आणि शेतकऱ्याला म्हणतात,

'कसले रे अडाणी लोक तुम्ही ! बैलांना कसली ओवाळणी घालायची. काहीतरी गावंढळपणा आहे. तुला आम्ही ओळखतो. तुझ्या बैलांशी आम्हाला काय करायचं ? पण घे हे दोन रुपये. या मूर्ख चालीरीती आता बस्स् झाल्या.'

तुच्छतेनं हातावर ठेवलेल्या त्या नोटेकडं पाहून शेतकऱ्याची बायको म्हणाली, 'आपले बैल आज पाहुणे आहेत. पाहुण्यांचा अपमान ह्या बयेनं केला. असले पैसे आपल्याला नको.' तिनं बैलांच्या पाठीवरून हात फिरवला. आणि दोन रुपयांची नोट घरी गेल्यावर चुलीत टाकून दिली. अडाणी समजल्या जाणाऱ्या त्या शेतकरणीला जेवढी संस्कृती कळाली होती त्याच्या शतांशही सांस्कृतिक ज्ञान त्या डॉक्टरणीपाशी नव्हतं. तिचं रिस्टवॉच इम्पोर्टेड होतं. ओठांना लावलेली लिप्स्टिक कदाचित तिनं पॅरिसच्या अल्ट्रा मॉडर्न स्टोअर्समधून खरेदी केलेली असेल पण ज्या जमिनीतून ती जन्मली होती. ती भारताची जमीन आणि भारतीय संस्कृतीच्या धारा तिला माहीत नव्हत्या. या कथेवर मी नागपूरच्या एका सभेत वामन चोरघडे यांच्या उपस्थितीत हे भाष्य केलं होतं. चोरघड्यांना ते आवडलं. ते म्हणाले, 'आमची सुशिक्षित माणसं या देशात राहातात. पण परदेशाची माळ जपत बसतात.'

अखेर देश म्हणजे नुसती भूमी नव्हे. देशातल्या जनतेनं जोपासलेल्या धर्मविषयक, राष्ट्रविषयक आणि साहित्य, संस्कृती यांच्यासंबंधीच्या जाणीवा आणि संकल्पना म्हणजे देश. देश म्हणजे जनतेची जीवनपद्धती. देश म्हणजे एका विशाल भूमीवरच्या जनतेचं सहजीवन, तिची स्वप्नं, तिच्या आकांक्षा, सुखदुःखं, देवदेवता, इतिहासातली अभिमानाची ठिकाणं, मंदिरं, मशिदी, गुरुद्वारा, चर्चेस्, इथल्या कलाकृती आणि आपण सारे मिळून एक आहोत ही जाणीव म्हणजे देश. यातूनच देश बांधला जातो. राष्ट्रीयता म्हणतात ती हीच. पण माझ्याशी वाद करणारा तो सुशिक्षित मात्र 'इंडिया इज ए डर्टी कंट्री' असं म्हणत होता. मी मनात म्हणालो, डर्टी मॅन ! पुअर चॅप ! ज्याला कधी देशाभिमानानं स्फुरण दिलं नाही, देशावरच्या गलिच्छ टीकेनं आणि आक्रमणानं ज्याचं रक्त कधी गरम झालं नाही, त्याला पशू म्हणून पशूचा अपमान मी तरी करू शकत नाही. लेट देम् गो टू हेल. मातृभाषेतून शाप देण्यापेक्षा अशा लोकांना आवडणाऱ्या आंग्ल भाषेतून त्यांना शिवी देणं अधिक श्रेयस्कर. देश हा प्रयत्नपूर्वक घडवावा लागतो. जनतेचं जीवनमान उंचावण्यासाठी शेती, उद्योगधंदे यांचा शास्त्रीय दृष्टीनं विकास करावा लागतो. याबाबतीत इस्राइलचं उदाहरण दृष्टीसमोर ठेवणं आवश्यक आहे. ज्यू लोकांनी अपार कष्ट करून आपलं राष्ट्र उभारलं. आज आजूबाजूच्या देशाहून इस्रायल अधिक प्रगत आणि शक्तिमान देश बनला. आमच्या भारतातले लोक पैसा मिळवण्यासाठी किंवा अन्य कारणांसाठी परदेशात जातात आणि तिथंच कायमचं वास्तव्य करण्याची

धडपड करतात. युरोप अमेरिकेतील विद्यापीठांत अवश्य शिक्षण घ्यावं. पण तिथं मिळालेल्या ज्ञानाचा लाभ स्वदेशाला करून द्यावा ही भूमिका मात्र घेतली जात नाही. परदेशात वास्तव्य करताना आपण भारतीय संस्कृतीपासून तुटू नये. तो सांस्कृतिक धागा जिवाच्या मोलानं जतन करून ठेवावा. ही जाणीव मात्र त्यांच्यात फारशी राहात नाही. परदेशात ते धड भारतीयही नसतात आणि त्या देशाचेही नसतात ही शोकांतिका आहे.

परकीय आक्रमकांनी दीर्घकाळ भारताला आपल्या पोलादी पंजात पकडून ठेवलं होतं. या अन्यायी सत्तेला उखडून टाकण्यासाठी हजारो तरुणांनी आपल्या आयुष्याची मशाल पेटवली. वैयक्तिक सुखाची होळी केली. अनेकांनी फाशीचे दोर वरमालेप्रमाणं आपल्या गळ्यात मिरवले. कित्येकांचं संपूर्ण जीवन तुरुंगाच्या अंधारकोठडीतच संपून गेले. जालियनवाला बागेसारखी हत्याकांडं होऊन निरपराध लोकांच्या रक्ताचे पाट या देशातून वाहिले. स्वातंत्र्याची पुरेपूर किंमत आपण दिलेली आहे. आता देश स्वतंत्र झाल्यानंतर मानसिक गुलामगिरीच्या साखळदंडात आपण अडकून पडू नये. ज्या देशाला भगतसिंग, सुभाषचंद्र यांच्यासारखे क्रांतिवादी नेते लाभले, गांधी-नेहरूंसारख्या ध्येयनिष्ठ नेत्यांनी ज्या देशासाठी आपलं सर्वस्व वेचलं त्या देशाला आमचेच लोक जेव्हा 'डर्टी कंट्री' म्हणून संबोधतात तेव्हा या 'डर्टी' लोकांनाच 'क्विट इंडिया' असं म्हणून खेचून बाहेर काढावं म्हणजे 'क्लीन इंडिया' निर्माण होईल. राष्ट्राचा अभिमान हे माझ्या मते सुसंस्कृत वृत्तीचं आणि प्रगल्भ मनाचं दर्शन आहे. खरा राष्ट्रवादी आपल्या राष्ट्रावर अंतःकरणाच्या गाभ्यापासून प्रेम करील आणि त्याबरोबरच दुसऱ्या राष्ट्रासंबंधीही आदर ठेवील. राष्ट्रवादी विचार हा मानवतावादाला विरोध करणारा विचार नव्हे, हे मात्र टीकाकारांनी लक्षात ठेवलं पाहिजे. मातेप्रमाणेच मातृभूमीविषयीचा आत्मीय भाव आणि अभिमान प्रत्येकाच्या मनात रसरसत असला पाहिजे. जो मातृभूमीची उपेक्षा करतो, जो आपल्या देशाला आणि देशवासीयांना विसरतो त्याला एखादी समर्पक शिवी अद्यापी निर्माण झाली नाही. सावरकरांनी आपल्या एका कवितेत म्हटले आहे,

'हे मायभूमी, मी माझं मन आणि जीवन तुला वाहिलं आहे. माझी प्रतिभा, वक्तृत्व तुलाच अर्पण केलं आहे. तूच माझ्या लेखनाचा आणि चिंतनाचा अनन्य विषय आहे.'

जगातल्या साऱ्याच कवींनी, तत्त्ववेत्त्यांनी राष्ट्रविषयक प्रेम आपल्या उत्कट शब्दांतून व्यक्त केलं आहे. रामप्रसाद बिस्मिल या क्रांतिकारक कवीला ब्रिटिश साम्राज्यशाहीनं फासावर चढवलं. १९२९ साली लिहिलेल्या आपल्या एका कवितेत तो आवेशानं म्हणतो,

सरफरोशी की तमन्ना अब हमारे दिलमे है
देखना है जोर कितना बाजूए कातिलमे है
ऐ शहीदे मुल्को मिल्लत तेरे जज्बोंके निसार
तेरी कुर्बानी का चर्चा गैर की महफिल मे है

'आता आमच्या अंतःकरणात शिरच्छेद करून घेण्याची इच्छा लहरत आहे. शत्रूच्या बाहूत किती बळ आहे हेच आम्हाला पाहायचं आहे. देशाच्या हे हुतात्म्या, तुझ्या राष्ट्रभक्तीच्या भावनेला आम्ही समर्पित आहोत. तुझ्या आत्माहुतीची चर्चा सर्वत्र आहे.'

आज वंदेमातरम्ला विरोध करणारी एक प्रवृत्ती आढळते. पण कवी महंमद इकबाल म्हणतात,

छीन सकता है नही सरकार वंदेमातरम्
हम गरीबोंके गलेका हार वंदेमातरम्

आम्हा गरीबांच्या कंठातला हार असलेले हे 'वंदेमारतरम्' गीत सरकार हिसकावून घेऊ शकणार नाही. तुरुंगातला कैदी चक्की पिसताना आणि भुकेने मरतानाही 'वंदेमातरम्' असंच म्हणेल. राष्ट्र हा भक्तीचा आणि प्रीतीचा विषय आहे. माझा देश, माझी मातृभूमी या शब्दांत हेलावणाऱ्या भावनेचं वर्णन कसं करता येईल ?

■■■

# माझ्या व्याख्यानाचे आख्यान

व्याख्यात्याला व्याख्यानांच्या निमित्तानं अनेक प्रकारचे श्रोते भेटतात. व्याख्यान झाल्यावर काही श्रोते वक्त्याशी आदरानं बोलतात. एखाद दुसरा वक्त्यानं केलेल्या विधानाबद्दल त्याच्याशी वितंडवाद करीत राहतो. सभेत तरुण विद्यार्थी आणि विद्यार्थिनी असले तर आपापल्या वह्या, डायऱ्या घेऊन वक्त्याला घेराव घालतात आणि स्वाक्षरीची मागणी करतात. चार-सहा विद्यार्थ्यांना स्वाक्षरी देताना उत्साह वाटतो. पण चाळीस-पन्नास मुलं-मुली आग्रहानं आपापल्या वह्या पुढं सरसावू लागले म्हणजे तो वक्ता त्रासून जातो. अशावेळी मी काहीतरी सबब सांगून त्या गर्दीतून पळ काढतो. काहीजण तर कागदाच्या चिटोऱ्यावर स्वाक्षरी करण्याची विनंती करतात. त्या चिटोऱ्यांचं पुढं काय होतं कुणास ठाऊक ? माझे एक मित्र प्रसिद्ध वक्ते आहेत. आपण आज किती जणांना सभा संपल्यावर स्वाक्षऱ्या दिल्या हे ते बरोबर सांगतात. कोणत्या गावात, कोणत्या संस्थेनं आपल्याला व्याख्यानासाठी आमंत्रित केलं होतं आणि तिथं आपण कोणत्या विषयावर बोललो याची तपशीलवार नोंद त्या वक्त्यानं आपल्या डायरीत केलेली आहे. मी त्याला म्हणालो,

'ही नसती कारकुनी कशासाठी करतोस ? त्यापेक्षा आपलं व्याख्यान अधिक श्रवणीय आणि अभ्यासपूर्ण व्हावं यासाठी थोडा अभ्यास करीत जा. व्याख्यानाला काहीतरी वैचारिक अधिष्ठान असलं पाहिजे.' तो हसून म्हणाला, 'ते अभ्यासपूर्ण वगैरे मला काही कळत नाही, मी समोरचे श्रोते पाहतो. एक-दोन मनोरंजक गोष्टी सांगतो. ठरलेले दोन-चार विनोद करतो आणि मानधनाचं पाकीट खिशात टाकून परत येतो. मानधन हेच माझ्या व्याख्यानाचं वैचारिक अधिष्ठान आहे. मला माहीत आहे, मी वैचारिक व्याख्यान देऊ शकत नाही. त्यासाठी लागणारा व्यासंग मी कधी केला नाही. पण श्रोत्यांना माझी भाषणं आवडतात.' आता त्याला मी काय सांगणार ? श्रोते देखील केवळ 'घटकाभर मनोरंजन' या दृष्टीनं व्याख्यानाला येत असतील तर त्यांच्यासमोर अभ्यासपूर्ण व्याख्यान देणं चुकीचंच ठरणार आहे. त्या दृष्टीनं माझ्या मित्राचं व्यवहारकौशल्य योग्यच आहे.

एकदा मला मराठवाड्यातल्या एका तालुकेवजा गावात व्याख्यानासाठी बोलावलं होतं. ते आमंत्रण स्वीकारायला मी फारसा उत्सुक नव्हतो. पण गावच्या नगराध्यक्षांनी फार आग्रहानं मला शिवाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्वावर बोलायला सांगितलं. स्वतः दोन वेळा ते घरी येऊन गेल्यामुळे मी त्यांचे आमंत्रण स्वीकारले. सभास्थानी मोठा मंडप घातला होता. विजेच्या दिव्यांचा लखलखाट होता. व्यासपीठावर गुलाबाच्या फुलांची उधळण केली होती. बँड वाजत होता. मला सन्मानपूर्वक व्यासपीठावर नेण्यात आलं. आणि सूत्रसंचालन करणाऱ्या एका शिक्षिकेनं 'आजचे आपले महनीय वक्ते शिवाजीराव हुच्चे-पाटील यांच्या पन्नासाव्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या कार्यावर भाषण करतील.' असं जाहीर केलं. मी अवाक् झालो. शिवाजी महाराजांच्या संदर्भात बोलायचे म्हणून दोन-तीन इतिहास ग्रंथातून मी संदर्भ आणले होते. टिपणं काढली होती. शिवाजी महाराज आणि औरंगजेब यांच्यातल्या संघर्षाची कारणमीमांसा मी करणार होतो. छत्रपति शिवाजी हे देशभक्तीचं आणि खऱ्या धार्मिकतेचं, शूरत्वाचं कसं तेजस्वी प्रतीक होते हे सांगणार होतो आणि आता ही निवेदिका मला 'शिवाजीराव हुच्चे-पाटलांवर भाषण करण्याची लाडकी विनंती करीत होती.' मी नगराध्यक्षांना विचारलं, 'कोण हे हुच्चे-पाटील?' ते मिशीतल्या मिशीत हसत म्हणाले, 'अवो, आमीच खुद्द हुच्चे-पाटील. आज आमचा वाढदिवस हाय. आमच्याबद्दल होऊ द्या की भाषण !'

माझ्या डोळ्यापुढं काजवेच चमकले. कुठं शिवाजी महाराज आणि कुठं हा स्वतःला शिवाजी म्हणवून घेणारा हुच्चे-पाटील ! पाटलानं मला घोटाळ्यात टाकलं. सदर इसमाची मला कसलीही माहिती नव्हती. तो नगराध्यक्ष आहे एवढ्या माहितीच्या आधारावर काय बोलायचं? आता बोलत नाही असंही मी म्हणू शकत नव्हतो. कारण मंडपात तीन-चारशे गावकरी हुच्चे पाटलानं जमा केले होते. प्रसंगावधान राखून वाढदिवसाचं महत्त्व काय असतं, वाढदिवस आपण का साजरे करतो यावर पंधरा-वीस मिनिटं काहीतरी बडबडलो आणि शेवटी हुच्चे पाटलांच्या नावातच शिवाजी आहे. आता त्यांच्या कृतीत तुम्हा आम्हाला शिवाजी दिसावा. असं म्हणून मी त्यांचं अभिनंदन करून खाली बसलो. त्यांनतर हुच्चे पाटील बोलायला उठले. तेव्हा त्यांच्या हुजऱ्यांनी शिवाजीराव 'झिंदाबाद' अशा घोषणा दिल्या. त्यांना फेटा बांधण्यात आला. 'गाड्याबरोबर नळ्याची यात्रा' म्हणून मलाही फेटा दिला. तो मी बांधलाच पाहिजे असा श्रोत्यांनी आग्रह धरला. तीन-चार

उत्साही लोक व्यासपीठावर आले आणि माझं डोकं पूर्णपणे आपल्या ताब्यात घेऊन फेटा गुंडाळू लागले. डोक्याला करकचून आवळलेला तो फेटा कितीवेळ डोक्यावर ठेवायचा या कल्पनेनं मी भारावून गेलो. हुच्चे पाटलांच्या आमंत्रणाचा स्वीकार केल्याची चूक माझ्या माथी अशी मारली जाईल हे मला माहीत नव्हतं. पंधरा-वीस हार शिवाजीरावांच्या गळ्यात पडले. आपल्या कारकुनाला व्यासपीठावर बोलावून घेऊन माझ्या देखत हुच्चे पाटील त्याच्यावर गुरगुरले.

'आरं तीस हाराचं पैसं तू माझ्याकडून घेतलं. अन् पंदराच हार गळ्यात घातलं. बाकीचं पैसं खाल्लं काय ? बघून घेतो.' इतक्यात निवेदिकेनं शिवाजीराव सत्काराला उत्तर देणार असं जाहीर केलं. नगराध्यक्ष ऐटीत उठले. आपण तालुक्यासाठी केवढं कार्य केलं याचा पाढा ते वाचू लागले. यावर्षी पाऊस चांगला झाला याचं श्रेय त्यांनी आपल्याकडं घेतलं. गावात विकासकामं काढली, गावाची लोकसंख्या वाढली वगैरेचे श्रेयही हुच्चे पाटलांनी आपल्याकडं घेतलं. माझ्याकडं बोट करून ते म्हणाले, ' हे विद्वान प्रोफेसर आमचं चरित्र लवकर लिहिणार आहेत. त्यांनी सुपारी घेतली आहे. शिवाजी महाराजानंतर आमीच दुसरे शिवाजी झालो असं प्रोफेसर साहेबांचं म्हणणं आहे. आता येवढ्या मोठ्या माणसाचं म्हणणं खोटं कसं म्हणायचं ?'मी तर त्यांच्या या विधानांनी हादरून गेलो. फक्त यांच्याहि नावात शिवाजी आहे एवढंच माझं विधान होतं. पण अशा सभेत खुलासा करण्यात अर्थ नव्हता. कुणीतरी एक गावातले प्रथितयश कवि गंगूरमण ऊर्फ धोंडोपंत इंदूरकर मास्तर यांनी 'हुच्चे पाटील हायती सच्चे पाटील' या नावाचा पोवाडा रचला होता. तो ऐकताना माझे कान फाटून जातात की काय अशी मला भीति वाटत होती. पण फेटा कानांवरून बांधला असल्यामुळं सुदैवानं वाचलो. पाटलांच्या जयजयकारात सभेचा समारोप झाला. सुटलो एकदाचे असं स्वतःशी म्हणत मी डोक्यावरचं ओझं खाली उतरवलं. फेट्याच्या आणि पाटलांच्या ताब्यातून मस्तक मोकळं झालं. शिवाजीरावांनी मला प्रेमानं सूचना केली.

'प्रोफेसर साहेब, जेवना आदी घोटभर घ्यायची का ? इंग्लिश आणलीय. न्हाई म्हणू नका.' त्यांच्या 'प्रेमळ' सूचनेला मी नम्रपणे नकार दिल्यावर ते म्हणाले, 'अवो आमच्या शाळेचा हेडमास्तर तर दिवसभर नशेत असतो. त्यामुळं शाळा येवस्तित चाललीय, सगळी मास्तरं घेत्यात. तुमीच कसे एवढे सोवळे!' ' या बाबतीत मी बराच मागासलेला आहे.' ही कबुली मी दिली. पार्टी रंगात येऊ

लागली. लिमकाचे घोट घेत मी निरीक्षण करीत होतो. एक शिक्षक म्हणाले, 'प्रोफेसर साहेब, तुमची वरपर्यंत वळख हाय. आमच्या शिवाजीरावांना 'पद्मश्री' मिळवून द्या की. येवढी शाळा काढली, शिक्षणाचं काम केलं, शाळेत शिक्षिकांना नेमून स्त्रियांना स्वावलंबी केलं. सगळ्या शिक्षिकांशी आमच्या साह्यबांचे चांगले संबंध आहेत. आम्हा सगळ्यांशी मोकळेपणानं वागतात. आम्ही तर त्यांना 'शिक्षणमहर्षि' म्हणतो. पुराणातले ऋषी मुनी होते ना तसं यांचं काम आहे.'

हुच्चे पाटील मिशांवर ताव मारीत आपली स्तुती ऐकत होते. घोट घोट भर घेऊ म्हणणाऱ्या पाटील साहेबांनी आता तीन ग्लास संपवले होते. पार्टीची गंमत वाढत होती. मी अस्वस्थ होत होतो. देवाच्या आळंदीला जायचं म्हणून आलो आणि चोराच्या आळंदीत पोहोचलो होतो. हुच्चे पाटलांच्या मर्जीतले गावातले वार्ताहर माझ्या भाषणाचं वृत्त कोणत्या रीतीनं प्रसिद्ध करणार याची मला चिंता वाटत होती. दुसऱ्या दिवशीच्या वृत्तपत्रात 'हुच्चे पाटील' छत्रपती शिवाजी महाराजांचे अवतार' असे उद्‌गार माझ्या तोंडी घालून माझं भाषण (फेटा आणि फोटोसहित) प्रसिद्ध झालं. त्या दिवशी मी घरातून बाहेर पडलो नाही. व्याख्यानाचं आमंत्रण स्वीकारताना नीट चौकशी करून आणि साधकबाधक विचार करूनच ते स्वीकारायचं. नाहीतर 'माझी प्रकृती बरी नाही' किंवा त्यादिवशी 'मी परगावी जाणार आहे' असं सांगून आपली 'सुटका' करून घ्यायची असा मी निश्चय करून टाकला.

काही ठिकाणी वक्त्याचा परिचय करून देण्यापूर्वी अवघी पाच मिनिटं 'तुमची थोडी माहिती सांगा. मी परिचय करून देणार आहे.' असं कार्यकर्ता विचारतो. आता त्याला कसली माहिती द्यायची, कपाळ ? तरीदेखील कार्यकर्ता चिवटपणानं विचारीत राहतो. एकदा एका परिचय करून देणाऱ्या निवेदकानं माझ्याविषयी जी माहिती सांगितली ती ऐकून मी शुद्धीवर कसा राहिलो याचंच मला आश्चर्य वाटलं. तो म्हणाला होता :

आपले आजचे पाहुणे-त्यांना ओळखत नाही असा या देशात कुणी असेल असं वाटत नाही. यांचं नाव असं म्हणून तो अडखळला आणि म्हणाला, व्याख्यानाच्या वेळी ते आपलं नाव सांगतीलच. ते एक मोठे कवी आहेत. आचार्य अत्रे एकदा म्हणाले होते, 'गेल्या दहा हजार वर्षांत यांच्यासारखा कवी झाला नाही. कालिदासानंतर यांचाच नंबर लागेल. (मी खाली मान घालून बसलो होतो.

कालिदासाच्या आत्म्याला या विधानामुळं किती यातना झाल्या असतील याची कल्पनाही करवत नाही. तरी बरं मी आयुष्यात कवितेची एक ओळही लिहिली नाही.) संत तुकारामाप्रमाणं यांची काव्यवाणी श्रेष्ठ आहे. ( हरे राम ! तुकोबांना हे समजलं तर परिचय करून देणाऱ्याची धडगत नाही.) मी स्थितप्रज्ञाप्रमाणं माझ्यावरचे आरोप तटस्थपणानं ऐकून घेत होतो. मी कवी आहे. मी एकापेक्षा एक नाटकं लिहिली, असाही शोध मला त्या दिवशी लागला. माझ्या साहित्याला 'नोबेल प्राइज्' मिळावं इतकी त्याची योग्यता आहे, असंही त्यानं ठामपणानं जाहीर करून टाकलं आणि शेवटी तो म्हणाला, पाहुण्यांनी आपलं नाव श्रोत्यांना सांगून भाषणाला सुरुवात करावी अशी मी त्यांना विनंती करतो.

असे चमत्कारिक अनुभव काही ठिकाणी येतात. असेच एकदा माझ्या भाषणापूर्वी प्रास्ताविक बोलण्यासाठी सभेचे संयोजक उठले आणि त्यांनी तब्बल पन्नास मिनिटं आपलं प्रास्ताविक भाषण राणा भीमदेवी थाटात केलं. ते नेमक्या कोणत्या विषयावर बोलले हा एक स्वतंत्र संशोधनाचाच विषय होऊ शकेल. प्रास्ताविक भाषण करताना माझं स्वागत आणि व्याख्यानाचा विषय येवढंच बोलणं आवश्यक होतं, पण पन्नास मिनिटांच्या वक्तव्यात त्यांनी नुकतीच झालेली सहकारी सोसायटीची निवडणूक, गायी-गुरांची वैरण महाग झाली, काश्मीरमधील अतिरेक्यांचा बंदोबस्त व्हावा, लोकांनी संतती नियमन करावं आणि शेतीसाठी कोणती खतं वापरावीत ? इत्यादि विषयांवर मौलिक मतप्रदर्शन केलं. माझ्या भाषणाचा विषय 'कवी बोरकरांची कविता' हा होता. त्यासाठी शेतीची खतं, काश्मीर प्रश्न आणि गायीगुरांची वैरण हे मुद्दे या भाषणात कोठून आले हे मला समजेना. श्रोते उठून जात होते. मध्येच एकदा दिवे गेले. दोन मिनिटांनी दिवे आल्यावर पाहिलं तर सभागृहात दोन-चार कार्यकर्ते समोरच्या सतरंजीवर झोपी गेलेले आढळले. सुदैवी होते बिचारे ! अध्यक्ष महाराजांनी प्रास्ताविक भाषण दहा मिनिटं ऐकल्यावर आपल्या कानातलं यंत्र काढून ठेवलं. त्यांच्या भाग्याचा मला हेवा वाटला. 'आता महाराष्ट्रातले नामवंत वक्ते कवी केरकरांच्या काव्यावर भाषण करतील.' असं घोषित करण्यात आलं. घोषणा करणाऱ्याला बोरकर माहीत नव्हते. त्याला बोरकर काय आणि केरकर काय सारे सारखेच होते. कुरुक्षेत्रावर अर्जुनाला सगळेच 'स्वकीय' कौरवपक्षात पाहायला मिळाले. त्यामुळं तो कृष्णाला म्हणाला, 'माझे हात-पाय कापत आहेत. घसा कोरडा झाला आहे.' इथं मला कोणीही

'स्वकीय' दिसेना. अध्यक्षांना ऐकू येत नाही. आणि समोर झोपलेले काही कार्यकर्ते अशा प्रचंड सभेत मी बोलायला उभा राहिलो. बोलणं भागच होतं. कारण बोलल्याशिवाय मानधन आणि प्रवासखर्च मिळाला नसता. बोरकरांच्या कवितेवरचं माझं हे भाषण अक्षरशः 'पिनड्रॉप सायलेन्स' या स्वरूपाचं झालं. सभेत प्रास्ताविक करून देणारा आणि परिचय करून देणारा भयानक प्राणी असला म्हणजे तो वक्त्यासकट सारी सभा कशी खाऊन टाकतो, याचा अनुभव मी घेतला. त्यामुळं अलीकडं कुठलेही प्रास्ताविक पाच मिनिटांपेक्षा अधिक लांबले की, त्याक्षणी मी माईकचा ताबा घेऊन माझं भाषण करू लागतो. प्रास्ताविक भाषण शेवटी होईल असंही मी जाहीर करतो.

एकदा एका सभेत मला सामाजिक परिवर्तनाची चळवळ आणि तिचे महाराष्ट्रावरील इष्टानिष्ट परिणाम अशा विद्वत्ताप्रचुर विषयावर बोलायचं होतं. संयोजकांना अशा महत्त्वाच्या विषयावर माझ्यासारख्या अभ्यासकाचे विचार ऐकायचे होते, याची मला धन्यता वाटली. आपल्यासारख्या विचारवंताकडून 'सामाजिक परिवर्तनावर' आम्हाला मार्गदर्शनपर शब्द ऐकायचे आहेत, असं आमंत्रण देताना संयोजक म्हणाले होते. विचारवंत या विशेषणानं मी सुखावलो होतो. महाराष्ट्रात आपल्यासारखे विचारवंत वक्ते फारच थोडे असतील असा विचार करून मी संमती दिली. चार दिवस अभ्यास केला. व्याख्यानाचं टाचण सुवाच्य अक्षरात लिहून काढलं. सभास्थानी गेलो आणि परम आश्चर्याचा आनंदाचा धक्काच बसला. सारं सभागृह तुडुंब भरलं होतं. शेकडो लोक बसायला जागा नसल्यामुळं उभे होते. माझ्या लोकप्रियतेचा मला अभिमान वाटला. सामाजिक परिवर्तनाचा विचार ऐकण्यासाठी इतक्या संख्येने श्रोते यावेत याचा अर्थ हे गाव वैचारिक दृष्ट्या प्रगत आणि सुसंस्कृत लोकांचं गाव आहे यात शंका नाही. मी मोठ्या आनंदानं आणि कौतुकानं श्रोत्यांकडं पाहात होतो. निवेदकानं घोषणा केली 'मित्रहो, आपले आवडते कलावंत दादा फोंडके यांच्या नकलांचा कार्यक्रम दहाच मिनिटांत सुरू होईल. फोंडके दहा मिनिटातच सभास्थळी पोहोचतील. तोपर्यंत महान विचारवंत अशा प्रोफेसरसाहेबांचं सात-आठ मिनिटं व्याख्यान होईल. त्यांच्या व्याख्यानाचा विषय---- '

सामाजिक परिवर्तनासारख्या विषयावर सात मिनिटात मी काय सांगणार ? दोन घोट पाणी पिऊन बोलायला उभा राहिलो. इतक्यात सभागृहात परिवर्तन झालं.

'आले ! आले !! दादा फोंडके आले !!!' अशा आरोळ्या उठल्या. दादा फोंडके एका नटीच्या गळ्यात हात घालून मोटारीतून उतरत होता आणि शेकडो लोक टाळ्या वाजवून त्याचं स्वागत करीत होते. त्याच्याशी हस्तांदोलन करायला ते धडपडत होते. सभागृहात गोंधळ चालू होता. संयोजक मला भाषण सुरू करण्याबद्दल सूचना करीत होते. मी 'बंधू- भगिनींनो' असं म्हणून सुरुवात करणार इतक्यात तमाशा-चित्रपटातला तो कलावंत आपल्या आवडत्या नायिकेबरोबर व्यासपीठावर दाखल झाला. श्रोत्यांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला. त्या नटीनं कमरेत लचकून श्रोत्यांना नखरेलपणानं नमस्कार केला. श्रोतेही चेकाळले, 'एक लावणी होऊन जाऊ द्या !' एकानं फर्माइश केली. ती नटी पार्श्वभाग हालवीत नाचू लागली. त्यामुळं जे 'सामाजिक परिवर्तन' झालं ते मी पाहात होतो. कोणी शीळ घालीत होता. अनेकांनी ताल धरला होता. दादा फोंडके आणि त्यांची मैत्रीण हातातं हात घालून नाचत होते. 'एक महान विचारवंत' मात्र मुकाट्यानं आपल्या खुर्चीत बसून राहिला. परिवर्तनाच्या या प्रचंड लाटेसमोर त्याला तोंड उघडणंही शक्य नव्हतं. माझं भाषण आणि दादा फोंडके यांच्या नकला यांची सांगड घालणारे संयोजक फारच कल्पक होते, यात शंका नाही.

असाच प्रसंग एका कॉलेजच्या स्नेहसंमेलनप्रसंगी माझ्यावर आला. रुपेरी पडद्यावरची एक 'थर्डरेट नटी' विद्यार्थ्यांना बक्षिसं देणार होती आणि मी भाषण करणार होतो. कॉलेजचा प्रिन्सिपल माझा वर्गमित्र असल्यामुळं केवळ त्याच्यासाठी मी भीत भीत हे आमंत्रण स्वीकारलं होतं. ती तिय्यम दर्जाची नटी बक्षिसाचं वाटप करीत होती. तोपर्यंत वातावरण जिवंत होतं. बक्षिसं वाटून झाल्यावर त्या नटीनं श्रोतृवर्गाकडं पाहून आपलं ठेवणीतलं एक गोड कृत्रिम हास्य केलं. विद्यार्थीवर्ग भलताच खूष झाला. मी व्याख्यानाला सुरुवात केली तेव्हा माझ्या लक्षात आलं की, सर्वांचे डोळे त्या नटीवर खिळलेले आहेत. माझ्याकडं कुणीही पाहायला तयार नव्हतं. फोटोग्राफर्स गर्दी करून स्टेजसमोर उभे होते. ते माझं भाषण चालू असताना नटीचे फोटो काढून घेत होते. तिच्याबरोबर आपला फोटो यावा म्हणून काही प्रोफेसर्स धडपडत होते. नटीही त्यांच्याशी 'अतिरेकी खेळकरणानं' वागत होती. माझ्या भाषणाचा 'खेळखंडोबा' होत होता. यापुढं नट-नट्या, नकलाकार आणि दीर्घ भाषण करणारे प्रास्ताविककार असतील, तर अशा सभेकडं आपण मुळीचं फिरकायचं नाही, असा मी 'पण' केला.

सभेच्या शेवटी आभारप्रदर्शनाचं शेवटचं 'गोड काम' करणारे काही महाभाग आपल्या अकलेचे तारे कसे तोडतात. तेही मी अनुभवलं आहे. आभार मानताना एक महाशय म्हणाले,

'आजच्या वक्त्याचं भाषण उत्तम झालं. या 'विनामूल्य' भाषणाबद्दल त्यांचे आभार मानतो. (आता माझ्या मानधनाचं काय होणार ?) वक्त्यांना मी स्त्रीफल अर्पण करीत आहे. (देवा ! आता मला वाचव !) आपण सर्वांनी पाहुण्यांचं भाषण फारसा गोंधळ न करता ऐकून घेतलंत याबद्दल आपलेही आभार मानतो. वस्तुतः अनेक सदस्यांनी हे वक्ते 'नकोत' असं म्हणून विरोध दर्शवला होता. पण त्यांनीही भाषण ऐकून घेतलं. श्रेष्ठ वक्ते मिळाले नाहीत म्हणून निरुपायानं या पाहुण्यांना आमंत्रित करणं भाग पडलं. दुधाची तहान ताकावर कशीबशी भागवून घेतली. अगदी कमी मानधनात हे पाहुणे येतो म्हणाले. याबद्दल त्यांचे आभार मानावेच लागतील.' आता हे 'शेवटचं गोड काम' पाहून माझं मात्र तोंड कडवट झालं.

आभार मानताना काही लोक वक्त्याच्या भाषणावर तोंडसुख घेतात. हास्यास्पद टीका करतात. वक्ता त्यानंतर काही बोलू शकत नाही. अशावेळी आपल्याच मूर्खपणाला दोष देत मनगट चावत बसण्यापलीकडे काही करता येत नाही.

त्यामुळं यापुढं मी कधी व्याख्यानाचं आमंत्रण स्वीकारायचं नाही असा निश्चय करून टाकतो. पण हे व्याख्यान-वैराग्य दोन दिवस टिकतं. तिसऱ्या दिवशी कोणातरी महिलेचा मंजुळ आवाजात फोन येतो.

'बरं का सर, आमच्या महिला मंडळानं एकमतानं ठरवलंय, आपल्यासारख्या सुप्रसिद्ध विचारवंताचं भाषण झालंच पाहिजे. नाही म्हणू नका. नाही तर आम्हाला तुमच्या घरी येउन धरणं धरावं लागेल. मग येणार ना व्याख्यानाला ?' शेवटचं वाक्य इतक्या लाडात उच्चारलेलं असतं की, नकार देणं माझ्या हातात उरत नाही. त्या महिलेला एका गाफील क्षणी मी होकार देऊन बसतो. दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रात महिला मंडळाच्या नियोजित कार्यक्रमाचं वृत्त प्रसिद्ध होतं. कोणी हंसा वानवडीकर या बाईच्या अध्यक्षतेखाली माझं व्याख्यान 'स्त्रियांचे व्यायाम' या विषयावर होणार अशी ही बातमी वाचल्यावर मी कपाळावर हात मारून घेतला. स्त्रियांच्या व्यायामावर मी काय बोलणार ? दोन-तीन लोकांचे मला फोन आले. चेष्टेच्या सुरात फोनवर ते अपरिचित लोक बोलत होते.

'प्रोफेसरसाहेब स्त्रियांच्या व्यायामासंबंधी आपण अधिकारवाणीनं बोलणार आहात; तेव्हा या विषयावरचं आपलं संशोधन काय आहे हे ऐकण्याची इच्छा आहे. सभेला फक्त महिलांनाच परवानगी आहे. मग आपल्याला का परवानगी देण्यात आली? बाकी नवनवीन विषयांवर या वयात देखील आपला अभ्यास चालू आहे याबद्दल अभिनंदन. स्त्री जीवनाचा आपण सर्वांगीण अभ्यास करीत आहात याचा आनंद वाटतो.' आता या खोडसाळ लोकांना मी काय उत्तर देणार ? फोन खाली आदळला आणि महिलेच्या लाडिक आमंत्रणाला बळी पडलो याचा पश्चात्ताप झाला. स्त्रियांचे व्यायाम हा विषय तिनं सांगितला नव्हता. मी 'स्त्री स्वातंत्र्याची संकल्पना' या विषयावर बोलणार होतो. अखेर मंडळाला फोन करून प्रकृति अस्वास्थ्यामुळं माझं भाषण रहित करावं.' असं त्या लाडिक आवाजाच्या सेक्रेटरीला कळवलं. ती म्हणाली, 'काहीही करा पण व्याख्यानाला या, आम्ही आमंत्रणपत्रिका छापल्या आहेत.' आता आयत्यावेळी स्त्रियांच्या व्यायामावर तुमच्यासारखा विचारवंत....' फोनवरचा सूर अधिकच लाडिक होऊ लागला. मी निर्धारानं फोन खाली ठेवला.

कुठलाही विषय कार्यकर्ते जाहीर करून टाकतात. एकदा एका प्राथमिक शाळेत 'भारतीय शेतीची समस्या' या विषयावर मी बोलावं असं मुख्याध्यापकानं सुचवलं. कारण त्याची गावाजवळच शेती होती. एकदा एका प्रसूतिगृहाच्या उद्घाटनासाठी मला नेण्यात आलं. मी म्हटलं 'इथं उद्घाटन करायचं म्हणजे काय करायचं ? ही कामं मंत्र्यांची आहेत. फिती कापण्याशिवाय त्यांना उद्योग नाही. पण शेवटी तिथली फीत मला कापावीच लागली.'

आता मात्र मी बराचसा सावध झालो आहे. व्याख्यान म्हटलं की, ठाम नकार देतो. व्याख्यानाचे इतके अनुभव माझ्या गाठी आहेत की, त्यांच्या आख्यानाचं एक स्वतंत्र पुस्तक होऊ शकेल. 'नाही मी बोलत आता' या वाक्यानं या लेखाचा समारोप करतो.

■■■

# हसत हसत जगा

हास्यविनोदाशिवाय आपले आयुष्य अगदी नीरस आणि बेचव झाले असते यात शंका नाही. माणसे मनमोकळेपणाने हसतात. विनोद करतात, म्हणून बरे आहे. दुःखे विसरायला हास्य विनोदातून सामर्थ्य मिळते. अनेक दुःखांनी पछाडलेला दुर्दैवी माणूस सुद्धा हसतो. विनोद करतो, विनोदाचा आस्वाद घेतो म्हणून त्याला आपले दुःख काही प्रमाणात सुसह्य होते. हास्य नावाची शक्ती माणसाला मिळालीच नसती तर त्याचे काय झाले असते याची मी कल्पनाच करू शकत नाही. पशूपक्ष्यांना हसता येत नाही. विनोदाशी त्यांचा संबंध नाही. त्यामुळे त्यांचे जगणे अत्यंत सांकेतिक झालेले असते. त्यांची सुखदुःखे देखील ढोबळ असतात. त्यांच्या तुलनेत माणूस नावाचा प्राणी कितीतरी भाग्यवान म्हणावा लागेल. हास्य आणि विनोद हे मानवी जीवनाचे व संस्कृतीचे संपन्न आविष्कार आहेत. हास्यविनोदाशी बुद्धीचा व संस्कृतीचा संबंध असतो. सर्व प्राण्यात मनुष्य बुद्धिमान असल्यामुळे तो आपले जीवन सुंदर, समर्थ बनवू शकला. हास्यविनोद हे जीवनसौंदर्याचेच एक अंग आहे.

एकदा एका आजारी लेखकाला भेटायला रुग्णालयात गेलो. त्याच्यावर औषधोपचार चालू होते. आजाराने त्याचा चेहरा काळवंडलेला होता. मला पाहिल्यावर त्याने स्मितहास्य केले. आपल्या प्रकृतीबद्दल तो म्हणाला, 'अजून माझं तिकीट कन्फर्म झालेलं दिसत नाही. मी अजून वेटिंगलिस्टवरच आहे. खरं तर बेडिंग बांधून तयार आहे. केव्हाही कॉल आला की गाडीत बसायला तयार आहे. पण परमेश्वराचा डिसिजन अजून होत नाही. आपले एक पंतप्रधान लवकर निर्णय घ्यायचे नाहीत. परमेश्वराला त्यांची बाधा झाली असावी. डॉक्टर मला सोडायला तयार नाहीत. परमेश्वर स्वीकारायला तयार नाही. मी तर सगळी तयारी करून बसलोय. बहुतेक आमचं जाणं लांबणीवर पडणार असं दिसतंय. स्वर्गात सुद्धा जागा पाहिजे ना? तिथेही वशिलेबाजी असणारच. मग आमचा नंबर लवकर लागणं शक्य नाही', असे म्हणून ते खळखळून हसले. त्यांना तपासायला आलेले डॉक्टरही हसले. रुग्णाच्या खोलीत इतका प्रसन्न हास्यविनोद क्वचितच घडत असेल.

स्वतः आजारी व्यक्तीनेच तो विनोद केला होता. खोलीतल्या वातावरणात त्या हास्यविनोदाने जणू आनंदाचे कोवळे किरण पसरले. डॉक्टर हसले, नर्स हसली. मीही त्या विनोदलहरींनी प्रफुल्लित झालो. तो आजारी लेखक तर काही वेळ आपली व्यथा पार विसरला होता. डॉक्टर म्हणाले, 'तुमची विनोदबुद्धी जिवंत आहे तोपर्यंत तुम्हाला कसलीच भीती नाही. हसण्यासारखे दुसरे टॉनिक नाही. तुमच्या विनोदाने मलाही केवढी तरतरी आली. हास्याचा एक डोस अनेक रोग दूर पळवू शकतो. माणूस दररोज एकदा जरी खळखळून हसला तरी कोणताही रोग त्याच्या वाटेला जाऊ शकणार नाही.'

हास्य आणि विनोद यांचे भांडवल ज्याच्याजवळ आहे त्याचा जीवनव्यापार नेहमीच फायदेशीर होईल. विनोद करण्याऐवजी त्या आजारी माणसाने जर रडत रडत आणि कण्हत कण्हत आपल्या आजारपणाची कहाणी सांगितली असती तर सर्वांच्याच मनावर दुःखनिराशेचे दडपण आले असते. आमचे एक मित्र निराशावादी आहेत. कोणत्याही घटनेची वाईट बाजू ते प्रथम पाहातात. त्यांच्या आजारपणात भेटायला आलेल्या प्रत्येक माणसाला ते दुःखी मुद्रेने सांगत असत, 'आता काही खरे नाही. बहुतेक हीच आपली शेवटची भेट.' असे म्हणून आढ्याकडे डोळे लावून निपचित पडून राहायचे. त्यांच्याशी काही संवाद करणे अशक्य व्हायचे. कोणी फुलांचा गुच्छ दिला तरी ते म्हणायचे 'कशाला आणलीत ही फुले ? थोड्याच वेळात ती सुकणारच आहेत. अहो, सुकून जाणे हा सृष्टीचा नियमच आहे.' पुष्पगुच्छ हाती घेतानाही त्यांच्या चेहऱ्यावर निराशेची सावली पडलेली असायची. ते आपल्या संबंध आयुष्यात फार थोड्या वेळां हसले असावेत. एकदा मोड देताना दुकानदाराने चुकून त्यांना दहा रुपयाची एक नोट अधिक दिली. त्यावेळी झालेल्या लाभाने ते हसले होते. कदाचित चुकून एखाद्या वेळी बायकोकडे पाहून ते मिशीतल्या मिशीत हसले असतील. बाकी हसण्याशी त्यांचा फारसा संबंध आला नाही. अशीही माणसे असू शकतात.

पण दररोजच्या स्नानाप्रमाणेच हास्यविनोदाचे दोन-चार फवारे अंगावर घेतले तर आपल्या जगण्याला सुंदर आधार मिळतो. ज्याच्या आयुष्याच्या वेलीवर हास्याची, काव्यविनोदाची, फुले फुलतात तोच जीवनातल्या सुखदुःखांचा रसिकपणे आस्वाद घेऊ शकतो. दुःख दैन्यात सुद्धा हास्य जपून ठेवले पाहिजे. कारण तेच तर खरे औषध आहे. प्रसिद्ध विनोदी लेखक स्विफ्ट म्हणतो,

'आय हेसन् टु लाफ ॲट एव्हरीथिंग फॉर फिअर ऑफ बीइंग ओब्लाइज्ड टू वीप' 'रडण्याची पाळी येऊ नये म्हणून मी तत्परतेने सर्व गोष्टींना हसत सुटतो.' त्यचे म्हणणे संयुक्तिकच आहे. लो. टिळकांना सहा वर्षांची कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली तेव्हा (अ) न्यायालयातील वातावरण अत्यंत गंभीर झाले होते. राष्ट्राच्या सर्वोच्च नेत्याला साम्राज्यवाद्यांनी केलेल्या या दुष्ट शिक्षेमुळे टिळकांचे मित्र, हितचिंतक आणि भक्त रडू लागले. दुःखी वातावरण गडद झाले. ते पाहून टिळक मोठ्याने हसत राहिले. आणि म्हणाले, 'अरे, रडायला काय झाले ? इंग्रज सरकारने मला सहा वर्षांची सुट्टी दिली आहे. आता भरपूर विश्रांती घेईन. सरकार केवढे दयाळू आहे !' त्यावेळी टिळक हसले नसते तर आजूबाजूच्या वातावरणातले दुःख अधिकच तीव्र झाले असते. आपल्याही मनातले दुःख टिळकांना विनोदामुळे लपवता आले.

चार्ली चॅप्लीनच्या विनोदी चित्रपटांची हीच गंमत आहे. तो नाना तऱ्हेचे विनोदी प्रसंग आपल्या चित्रपटात योजतो. विलक्षण परिणामकारक अभिनय करतो. प्रेक्षक पोट फुटेपर्यंत हसत असतात. पण त्याच्या विनोदाच्या मुळाशी जीवनातले कारुण्य आणि वैफल्य असते. एकीकडे प्रेक्षक हसत असतात तर दुसरीकडे त्यांच्या हृदयात कारुण्याची तार झंकारत असते. श्रेष्ठ प्रतीचा विनोद जीवनातल्या विसंगतीतूनच निर्माण होत असतो.

तसे पाहिले तर मनुष्याचे आयुष्य काट्याकुट्यांनी भरलेले आहे. पाय रक्ताळले तरी ओठावरचे हास्य जपत जपत जो प्रवास करतो त्यालाच जीवनाचा अर्थ कळतो. हताश होऊन रडत बसलेला माणूस जीवन समजून घेऊ शकत नाही. त्याचे आकलन होण्यासाठी विनोदबुद्धी, खोडकरपणा आणि खेळकरपणा असावा लागतो. जो मनापासून हसतो, विनोदावर प्रेम करतो, त्याचे आयुष्य यशस्वी झाले असेच म्हणावे लागेल. चिडण्यात आणि कुढण्यात, रडण्यात आणि त्रागा करण्यात काय अर्थ आहे बरे ?

आचार्य अत्रे यांनी म्हटल्याप्रमाणे, देवाच्या आळंदीकडे निघावे आणि चोरांच्या आळंदीला पोहोचावे असे आयुष्यात पुष्कळ वेळा घडते. आजच्या राजकारणात कितीतरी विनोद ठेचून भरला आहे. आमच्या लोकसभेत विनोदी पात्रे भरपूर आहेत. त्यांची भाषणे आणि विचार (विचार नसतातच !) मी वृत्तपत्रांतून वाचतो. टी.व्ही. वरून कधीकधी भाषणे ऐकतो. एकेकाचे युक्तिवाद ऐकताना

माझी चांगलीच करमणूक होते. विसंगत भाषणांचे व तर्कशून्य विचारांचे ते दर्शन आणि श्रवण म्हणजे विनोदाची मेजवानी असते. आपापल्या पक्षाचा पट्टा गळ्यात बांधून हे लोक लोकसभेत एकमेकांवर आवेशाने भुंकत असतात. काही लोक ते पाहून चिडतात. मी त्यांना सल्ला देतो, 'तुका म्हणे उगेचि राहावे । जे जे होईल ते ते पहावे ।' असले विनोद केवळ राजकारणाच्याच क्षेत्रात घडतात असे नव्हे. तर ते इतर क्षेत्रांतही घडत असतात. एकदा दोन वकील न्यायाधीशासमोर आपापली बाजू मांडताना भांडू लागले. एकजण दुसऱ्याला 'गाढव' म्हणाला. त्यानेही पहिल्याला गाढव म्हटले. रागावून आणि चिडून ते दोघे परस्परांना पुन्हा-पुन्हा 'गाढव'म्हणत होते. अखेर न्यायाधीश म्हणाले,' सदगृहस्थहो, मी इथे असताना तुम्ही एकमेकांना गाढव म्हणू नये.'

सर्वच क्षेत्रांत विसंगती आणि वैगुण्य असते. तेथे निरनिराळे गमतीदार, त्रासदायक, प्रसंग उद्भवत असतात. माणसाचे अज्ञान ही खरे तर दुःखदायक गोष्ट आहे. पण अशा गोष्टींकडे फार गंभीरपणे पाहू नये. काहीशा मिस्किलपणाने पाहिले म्हणजे हसू येते. हसण्याने मनावरचा ताण कमी होतो.

या बाबतीत अब्राहम लिंकनचे उदाहरण सदैव लक्षात ठेवावे. अनेक प्रकारच्या जबाबदाऱ्यांचे ओझे रात्रंदिवस मस्तकावर असतानाही लिंकनची विनोदबुद्धी कधीच क्षीण झाली नाही. विनोदामुळेच त्याची मानसिक शक्ती ताजी टवटवीत राहिली.

हसणारा आणि हसवणारा मनुष्य मनात कोणतेही किल्मिष ठेवू शकत नाही. दुःखाचे, चिंतेचे आणि अपसमजांचे रोगट जंतू हास्यविनोदाच्या ओघाबरोबर वाहून जातात. मानसिक निरोगीपणासाठी विनोदाचीच आवश्यकता असते. लहान मूल रडू लागले म्हणजे आपण त्याला हसवण्याचा प्रयत्न करतो. गमतीदार आवाज काढतो. त्याच्यासमोर वेडावाकडा चेहरा करून किंवा अंगविक्षेप करून त्याला हसवतो. मग एका क्षणी ते रडणारे बालक हसू लागते. त्याचा रुसवा संपतो. हीच गोष्ट प्रौढ माणसांच्या बाबतीतही लागू पडते. कधी मानभंग होतो, केव्हा प्रेमभंग होतो. व्यापारात नुकसान येते. परीक्षेत अपेक्षित यश मिळत नाही. एखाद्या प्रिय व्यक्तीच्या मृत्यूची वार्ता समजते. न्यायासाठी झगडताना अन्यायच पदरात पडतो एक का दोन ! नाना प्रकारच्या विवंचना मनुष्याला वेढा घालतात. अशा वेळी हास्यविनोदाशिवाय तरणोपाय नसतो. 'हसा आणि विसरा' हाच सल्ला योग्य आहे.

आयुष्य जसे त्रासदायक आहे तसेच ते गमतीदारही आहे. अनेक मजेदार घटना आपल्या आयुष्यात आणि सभोवतालच्या जीवनात घडत असतात. काहीशा अलिप्तपणाने त्यातली गंमत चाखता आली पाहिजे. कित्येक वेळा गडबडीत सभेला जाताना माझ्या शर्टाची बटणे मी अनवधानाने उलटी सुलटी लावलेली असतात. घरातून बाहेर पडताना कुणीतरी हसत हसत ते लक्षात आणून देतो. मीही माझ्या बावळटपणाला मनापासून हसतो. श्रोत्यांसमोर याच अवस्थेत उभा राहिलो असतो तर माझे गंभीर भाषणही त्यांना विनोदी वाटले असते. हे मनात येऊन स्वतःशीच हसतो.

एकदा सुप्रसिद्ध लेखक प्रा. न. र. फाटक आणि प्रा. दत्तो वामन पोतदार एका सभेवरून परत होते. रस्त्यात प्रा. पोतदार ऐटीत म्हणाले, 'फाटक, मी नेहमी छत्री विसरतो म्हणून तुम्ही माझ्यावर टीका करता. आज मी माझी छत्री विसरलो तर नाहीच पण तुम्ही बरोबर घेतलेली छत्री सभास्थानी विसरला होता तीही आठवणीनं बरोबर आणली आहे. आता बोला!' आपल्या कपाळावर हात मारून घेत प्रा. फाटक म्हणाले, 'दत्तोपंत', अहो, आज आपण छत्र्या नेल्याच नव्हत्या !'

अशा प्रकारचे अनेक गमतीदार प्रसंग दैनंदिन जीवनात घडत असतात. एकदा कॉलेजच्या स्नेहसंमेलनात आम्ही एक ऐतिहासिक नाटक सादर केले होते. पडदा वर जाण्यापूर्वी शिवाजीची भूमिका करणारा विद्यार्थी आपल्या नकलांवरून पुन्हा एका नजर फिरवीत होता. इतक्यात तिसरी घंटा झाली. पडदा वर गेला. शिवाजी महाराज सिंहासनावर बसलेले होते त्यांच्याकडे पाहून नाटकगृहात हास्याचा गदारोळ उसळला. खरे तर शिवाजी राजांना पाहून प्रेक्षकांनी टाळ्या वाजवायवा हव्या होत्या. पण प्रेक्षक पोट धरून हसत होते. महाराज गडबडले. आपल्या वेषभूषेत काही चूक झाली नाहीना हे पाहू लागले. त्यांनी आपला चोळणा नीट केला. मस्तकावरचा जिरेटोपही चाचपून पाहिला. सगळे ठीकठाक होते. पण प्रेक्षक सारखे हसत होते आणि शिवाजी महाराजांचा जयजयकार करीत होते. एक चूक महाराजांच्या लक्षात आली नाही. आपल्या नकलांवरून नजर फिरवताना त्यांनी चष्मा लावला होता. तो मात्र काढायला ते विसरले. हे कुणीतरी लक्षात आणून दिल्यावर त्यांनी शांतपणे चष्मा काढला. आणि शेजारीच उभ्या असलेल्या सेवकांच्या हातावर तो ठेवला. दुप्पट जोराने हास्याची लाट प्रेक्षकांत उसळली. एका वीररसपूर्ण ऐतिहासिक नाटकाचे आम्ही विनोदी प्रहसनात कसे रूपांतर केले

ते आजही मला आठवते. तो प्रसंग दृष्टीसमोर उभा राहातो. आणि मी स्वतःशीच हसत राहतो. एका अर्थाने असले हास्यविनोदाचे घडलेले प्रसंग कित्येक वर्षे आपल्याला सुखवीत असतात.

विनोद म्हणजे आयुष्याच्या वाळवंटातून वाहणारा थंडगार पाण्याचा आनंददायक झरा असतो. विनोदाचे काही द्वेष्टे असू शकतात. जो विनोदाचा द्वेष करतो, हसण्याला आणि हसवण्याला पोरकटपणा मानतो त्याची अभिरुची निरोगी नाही असाच निष्कर्ष काढावा लागतो. संतांच्या वाङ्मयात देखील हास्यविनोदाची, उपहास-उपरोधाची कित्येक स्थळे आढळतात. संत हे समाजसुधारणा करू इच्छिणारे प्रबोधनकार होते. ज्याला समाजाशी संवाद करायचा आहे त्याच्यापाशी समाजमनाचे रंजन करण्याची शक्ती असलीच पाहिजे. आंबट चेहऱ्याने आणि रूक्ष कंटाळवाण्या भाषणाने उपदेश करणाऱ्या माणसाचा-मग तो कितीही ज्ञानवंत असो- कंटाळा आल्याशिवाय राहात नाही. संतांना लोकांचे मानसशास्त्र कळत होते, त्यामुळेच विनोदाच्या माध्यमातूनही त्यांनी लोकशिक्षणाचे कार्य केले आहे.

संत एकनाथांच्या भारुडांत गंमतीदार, मार्मिक विनोद आढळतो. त्यांच्या विनोदात नाट्य आहे. लक्षवेधक शब्दरचना आणि प्रसंग आहेत. हास्याच्या वाटेने जात जात एकनाथ आपल्या श्रोत्यांना अध्यात्म आणि नीती यांची सहज शिकवण देतात. 'भवानी आई रोडगा वाहीन तुला', 'विंचू चावला' 'हिंदू-तुर्क संवाद' वगैरे अनेक भारूडांची बांधणी त्यांनी विनोदातून केली. याचा अर्थ समाजप्रबोधनासाठी हास्यविनोदाचा आधार प्रभावी ठरतो याची जाणीव संतांनाही होती. तुकारामांनी तर अनेक अभंग विनोद आणि विडंबनाच्या आवरणात गुंडाळून दांभिकांवर त्यामधून मार्मिक टीका केली. सोंग-ढोंगावर त्यांनी विनोदाच्या शस्त्राने प्रहार केले. विनोद नावाचे शस्त्र व्यक्तीला आणि प्रवृत्तीला जेवढे घायाळ करू शकते तेवढे सामर्थ्य संतप्त शब्दात किंवा शिव्यात नसते. काही वेळा समाज सुधारण्यासाठी शिवी अपरिहार्य ठरते. पण विनोद आणि विडंबन यांचे सामर्थ्य मधाने माखलेल्या धारदार सुरीसारखे असते.

एस.एस.सी. च्या परीक्षेत आपला मुलगा चारवेळा नापास झाल्यामुळे चिडलेल्या बापाने संतापापेक्षा उपरोधिक विनोदी शब्दांतून आपले दुःख व्यक्त केले. घरी आलेल्या मुलाला तो म्हणाला, 'यावे यावे चिरंजीव ! आपण केलेल्या पराक्रमाने आम्ही धन्य झालो. गेल्या बेचाळीस पिढ्यात असले बौद्धिक शौर्य

कुणीही दाखवले नाही.आपल्या अगाध विद्वत्तेची पताका आता  दीर्घकाळपर्यंत फडफडत राहील. थोडे थांबा. आपल्याला ओवाळण्यासाठी पंचारती घेऊन आपली आई येत आहे. वाहवा ! एका बुद्धिमान पुत्राचा पिता म्हणून माझे नाव आता अमर होईल.'

या शब्दांतला तीक्ष्ण उपहास मुलाच्या काळजाला अत्यंत भेदक वाटला असेल. तो दोनचार शिव्यांची अपेक्षा करीत होता. पण बाह्यतः विनोदी वाटणाऱ्या विडंबक शब्दांचा मार त्याला अधिक दुःसह वाटला असेल. संतांनी आणि समाजसुधारकांनी कधी कधी उपरोधपूर्ण, विडंबनपर विनोदी शैलीचा लोकप्रबोधनासाठी स्वीकार केलेला आहे. विनोदाचे आणखी एक वैशिष्टय असे की, हसत खेळत सांगितले गेले की ते मनाची चटकन पकड घेते. भूगोल आणि गणित यासारखे नीरस विषय एखादा विनोदप्रिय रसिक अध्यापक अशा विनोदी शैलीत शिकवतो की तो विषय अगदी सामान्य विद्यार्थ्याला सुद्धा सहज समजू शकतो. सर्व थरातल्या लोकांना विनोद आवडतो. म्हणूनच बालकांपासून वृद्धांपर्यत आणि अशिक्षितां पासून पंडितांपर्यत हास्यविनोदाला प्रतिसाद मिळतो.

'टवाळा आवडे विनोद' असे समर्थ रामदासांनी म्हटले आहे. विनोद म्हणजे टवाळकी आणि निंदा-नालस्ती व कुत्सित बुद्धीने केलेली चेष्टा असे जेव्हा मानले जाते तेव्हा असला हीन दर्जाचा विनोद असंस्कृत लोकांना आवडतो. हीन अभिरुचीचे अनेक विनोद सांगितले जातात. अशा विनोदांना मी 'कमरेखालचे विनोद' अशी संज्ञा देतो. माणसांच्या व्यक्तिगत निंदानालस्तीत रस घेणारी एक लहर बहुतेक लोकांत असते. हिला विनोदबुद्धीपेक्षा छिद्रान्वेषक दुष्ट प्रवृत्ती हेच नाव देता येईल. जो विनोद लज्जा निर्माण करतो, ऐकताना व वाचताना क्षणभर बरे वाटले तरी नंतर त्याची घृणा वाटू लागते. असल्या अश्लील व अभद्र शब्दांना विनोदाचा दर्जा  कधीच प्राप्त होत नाही. हास्य आणि विनोद हे सुंदर व निरोगी मनाचे प्रसन्न आविष्कार असावेत. उत्तम विनोदात सुसंस्कृत अभिरुचीचा रंग मिसळलेला असतो. एका खेळकर आणि खोडकर समीक्षा बुद्धीतून चांगला विनोद निर्माण होतो. चांगल्या विनोदाचे अनेक नमुने मी येथे  देऊ शकेन. पण लेखाचा विस्तार होऊ नये म्हणून तो मोह आवरतो. चांगला विनोद हे रसिक मनाचे अपत्य असते. विनोदातून आजूबाजूचे वातावरण प्रसन्न करता आले पाहिजे. आचार्य अत्रे आणि पु.ल.देशपांडे यांच्या व्याख्यानांतून विनोदाचे आणि हास्याचे जे फवारे

उडत असत त्यामुळे श्रोते गर्दी करीत असत. कोल्हटकर आणि गडकरी व चिं.वि.जोशी यांच्या साहित्यातूनही उत्कृष्ट विनोदाच्या लाटा उचंबळताना दिसतात. विनोदयुक्त संभाषण करणे ही एक कला आहे. ती अर्थातचा मनाच्या आणि बुद्धीच्या प्रगल्भतेवर, रसिकतेवर अवलंबून असते. विनोद ही जीवनाकडे पाहाण्याची एक दृष्टी आहे. म्हणूनच हास्यविनोदाचा आधार आपल्या जीवनाला देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एका विचारवंताने म्हटले आहे,

'लाफ् इफ् यू आर वाइज' शहाणे असाल तर हसायला विसरू नका. हास्य आणि विनोद दोन्ही एकमेकांशी पूर्णपणे संबांधित आहेत. विनोदातून हास्य निर्माण होते. आणि हास्यप्रवृत्ती विनोदाची निर्मिती करते. आंबलेले आणि बुरसटलेले, आक्रसलेले आणि उदासीन चेहरे घेऊन जगण्यात काय अर्थ आहे? हास्यविनोदाच्या मांडवात बसून जीवनाचा आस्वाद घेतला पाहिजे. हसणे, विनोदाचा आनंद घेणे ही प्रकृती आहे. विकृती नव्हे. म्हणून म्हणतो दुःखाच्या संगतीत सुद्धा हास्यविनोदाची साथ सोडू नका. हसत हसत जगा ! यापेक्षाही अधिक काय सांगणार ?

■■■

# हे पिकल्या पानांनो !

पिकलेले पान केव्हातरी गळून पडते. त्याचा विचारही करण्याचे कारण नाही. हिरवी पाने आपल्या हिरव्या तारुण्यात गुरफटलेली असतात. सळसळत असतात. वाऱ्याच्या झुळुकी बरोबर खेळत असतात. जीवनाच्या फांदीला घट्ट धरून असतात. रस चाखत असतात. गळणाऱ्या पिवळ्या पानांकडे त्यांनी लक्ष देऊ नये हे बरोबरच नाही का ? निसर्गाचा हा नियमच आहे. गळून गेलेल्या पिवळ्या पानांसाठी झाड काही दुःख करीत नाही. गळलेल्या पानाच्या ठिकाणी लालसर कोवळे पान उगवत असते. तेही हिरवे होते. तारुण्याची गाणी गाते. पावसाच्या धारा अंगावर घेऊन तजेलदार होते. हळूहळू पिवळेपणाकडे झुकते. एक दिवस कोणत्यातरी क्षणी फांदीपासून विलग होते. खाली पडलेल्या पाचोळ्यात मिसळून जाते. तुमच्या आमच्या जीवनाचे हेच चित्र आहे. एक मात्र खरे की पिवळ्या पानांनी झाडाला बिलगून राहाण्याचा अट्टाहास करू नये.

ऐंशी वर्षांचे एक गृहस्थ म्हणाले, 'मला मरणाची फार भीती वाटते. काय असेल ते असो, गेली ऐंशी वर्षं या जीवनाशी माझा संबंध आहे. तो तुटला तर माझे काय होईल ? माझ्या कुटुंबाचे आणि ज्या लोकांत मी वावरलो, ज्या समाजाचे मी पुढारीपण केले त्यांचे काय होईल ?' त्यांची विचारसरणी ऐकून मला हसू आले. आपण गेल्यानंतर या जगाचे काय होणार ? हा विचार अत्यंत हास्यास्पद आहे. एखाद्या क्षुद्र कीटकाने माझ्यानंतर या विश्वाचे काय होणार ? या चिंतेने व्याकुळ व्हावे याला काही अर्थ आहे का ? विश्वजीवनाचे जाते अखंड घरघरत आहे. कोणतातरी अगम्य असा एक बलदंड हात ते जाते अखंडपणे खुंट्याला धरून फिरवीत आहे. जात्यातले रडत आहेत आणि सुपातले हसत आहेत. पण सर्वच एक दिवस भरडले जाणार आहेत. मग जे अटळ आहे त्याला भिण्याचे काय कारण आहे ? मृत्यू भीतिदायक वाटतो यात शंका नाही. त्याची चाहूल लागली की सारे तत्त्वज्ञान पाला-पाचोळ्याप्रमाणे उडून जाते. दाराशी यम उभा राहिला आहे आणि तो खुणावत आहे हे पाहून भल्या भल्यांची बोबडी वळते. सामान्य माणसाची काय कथा ? पण आपण कुणीतरी अतिमहत्त्वाच्या व्यक्ती आहोत,

व्ही.आय्.पी. आहोत, आपण गेल्यावर जगाचे काय होणार ? असला विचार करणाऱ्या महाभागांना मी म्हणेन,

'अरे, तुम्ही कोण ? या महाप्रचंड विश्वाच्या व्यापारात तुम्हाला वाळूच्या एका कणाइतके तरी स्थान आहे का ? महासागरातल्या एखाद्या क्षुद्र बिंदूने मी गेल्यावर समुद्राचे कसे होईल ? ही चिंता करण्यासारखे आहे. बिंदूने सिंधूची चिंता करू नये. सागर नेहमी अखंड असतो, परिपूर्ण असतो. तुम्ही नव्हता तेव्हाही तो होता, त्याप्रमाणेच तुम्ही नसाल तेव्हाही हे जग असेच राहाणार आहे. राम-कृष्णासारखे युगपुरुष आले आणि गेले पण त्यांच्याशिवाय हे जग ओस पडले नाही. दहा लाख वर्षांपूर्वी सूर्य असाच उगवत होता. वारे वाहात होते. तारे आकाशात विहार करीत होते. दहा कोटी वर्षांनंतरही हीच परिस्थिती राहाणार आहे. तुम्ही स्वतःला कोण समजता ? जग जिंकणारे अनेक सिकंदर आपल्या नावाचा शिक्का जगावर उमटवून गेले. आज त्यांची काय निशाणी उरली आहे ? चक्रवर्ती आले, युगनिर्माते आले, महाकवीही आले. ते निघून गेल्यावरही जीवनाचा प्रवाह पूर्वीसारखाच वाहात आहे, पाने गळून पडतात. नवीन पाने उगवत राहतात.'

पण माणसाला हे कळत असूनही वळत नाही. नव्वद वर्षांचे वय झालेले. आणि स्वतःला राजकारण धुरंधर नेता समजणारे एक पुढारी दुसऱ्या एका सत्ताधारी असलेल्या पोरगेल्या नेत्यासमोर वाकून उभे होते, खरे तर त्यांना वाकण्याचे काहीच कारण नव्हते. भरपूर सत्ता त्यांनी उपभोगली होती. मिळेल त्या बऱ्या-वाईट मार्गाने प्रचंड पैसा त्यांनी खोऱ्याने ओढला होता. आपण किती निःस्वार्थी आहोत, गांधीजींच्या नंतर आपलाच नंबर महापुरुषांच्या मालिकेत कसा लागतो हे जाहीर भाषणातून ते सांगायचे. पण आज मात्र ते कळवळून त्या पोरगेल्या पुढाऱ्याला म्हणत होते, 'तुमचा वरपर्यंत दबदबा आहे. वरच्या लोकांना सांगून मला सात-आठ वरिष्ठ मंडळात सदस्य म्हणून घ्यायला लावा. माझ्यासाठी दिल्लीत एक ऑफीस काढून द्या. हातात सत्ता असली म्हणजे बरे वाटते. सत्ता गेल्यामुळे काही करमत नाही. लोक म्हणतात 'ज्ञानेश्वरी' वाचा. तुकारामाचे अभंग वाचा. ज्ञानेश्वर, तुकारामाला सत्ता कधी समजली होती का ? शिवाजी महाराजांनी पाठवलेली संपत्ती ज्या अव्यवहारी माणसाने परत पाठवली त्याचे अभंग वाचून आमची मानसिक शांती भंग पावेल. ते जाऊ द्या ! तुम्ही दिल्लीत माझ्यासाठी सत्तेची खुर्ची मिळवून द्या.'

नव्वद वर्षे उलटल्यानंतर देखील सत्तेच्या खुर्चीचा ध्यास घेऊन बसलेला हा म्हातारा कधीतरी मानसिक शांती मिळवू शकेल काय ? जीवनाचा अर्थ त्याला कसा कळणार ? खरे तर त्याने आपले बेडिंग गुंडाळून ठेवले पाहिजे. पैलतीर स्वच्छ दिसत असताना पुन्हा पुन्हा ऐलतीराकडे आशाळभूतपणे पाहाणारी ही मनोवृत्ती कदाचित कुणाला जीवनवादी आणि आशावादी वाटेल पण पोट भरले तरी ताटावरून न उठणाऱ्या अधाशी-खादाड माणसाची ही लोचट वृत्ती आहे. अशा लोचटांना जीवन खऱ्या अर्थाने कधीच कळत नाही. त्या सत्तालोलुप म्हाताऱ्याने परदेशी बँकांतदेखील पैसे भरून ठेवले. पण जीवनाचा आस्वाद कसा घ्यायचा हे बँक बॅलन्स भरपूर असलेल्या माणसालाही कधी समजत नाही.

याने कधी चंद्रोदय डोळे भरून पाहिला असेल काय ? कधी सागरकिनाऱ्यावर बसून लाटांचे तांडव पाहताना आपल्या कुटुंबातील बालकांबरोबर हा बालवृत्तीने खेळ खेळला असेल काय ? एखाद्या दुःखी पीडित माणसाच्या डोळ्यांतले अश्रू याने आपल्या हाताने कधी पुसले असतील काय ? याने कधी संगीताची मैफल कान भरून आणि मन भरून ऐकली असेल काय ? हे केले नसेल तर त्याचे आयुष्य फुकट गेले असेच म्हणावे लागेल. सत्तेच्या पाठीमागे धाव-धाव धावण्यात आणि वरिष्ठांच्यापुढे शेपटी हालविण्यात आणि दोन्ही हातांनी पैसा गोळा करण्यात आपले आयुष्य जर याने उधळले असेल तर तो खऱ्या अर्थाने जगलाच नाही असेच म्हणावे लागेल. या पिकल्या पानाने हिरव्या पानांवरून प्रेमाने हात फिरवून त्यांना पुढे आणले पाहिजे. आपली जागा सोडायची नाही हा निर्धार वेडेपणाचा ठरतो. निदान म्हातारपणी तर तो महामूर्खपणा ठरतो.

ज्ञानेश्वरांनी पंचविशीत येण्यापूर्वीच समाधी घेतली यावर काही लोक टीका करतात. मला देखील ज्ञानेश्वरांचा हा निर्णय त्यांच्या आणि जगाच्या दृष्टीने समर्थनीय वाटत नाही. कारण अपार प्रतिभाशक्ती लाभलेला हा संतश्रेष्ठ आणखी पंचवीस वर्षे जगला असता तर जगातले वारे अधिक सुगंधाने भरून वाहिले असते, पण आपले जीवितकार्य संपले आहे , आता आपला आत्मा परमात्म्याच्या स्वरूपात विलीन केला पाहिजे असे मानणाऱ्या या महान तत्त्वज्ञाने ऐहिक जीवनाला पूर्णविराम दिला. तसे करण्याचा त्यांना अधिकार होता. माणसे केवळ जगत राहिल्यामुळे त्यांचे वय वाढते. नुसत्या जगण्याच्या यांत्रिक आणि शारीरिक क्रियेला जीवन म्हणता येत नाही. ज्ञानेश्वर नावाचा एक मेघ बरसून गेला. आपल्या जीवनाचे सार्थक

करून गेला. पण वर उल्लेखिलेला नव्वद वर्षांचा म्हातारा मात्र दीर्घायुषी असला तरी त्याचा स्वतःला आणि जगाला काहीच उपयोग नव्हता. तो असला काय किंवा नसला काय कसलाच फरक पडणार नव्हता.

जीवनावर प्रेम करावे पण याचा अर्थ जळवाप्रमाणे जीवनाला अट्टाहासाने चिकटून बसावे असा मात्र नाही. मृत्यूची ओढ असू नये. त्याला आमंत्रणे देऊ नयेत. पण तो दाराशी उभा राहिला तर हास्यमुखाने त्याला म्हणावे, 'ये, मृत्यो ये. मी जीवनाची यथेच्छ चव घेतली. आता तुझ्या संगतीत राहायला माझी हरकत नाही. कुणी सांगावं ? जीवितापेक्षाही तुझ्या सहवासाची रुची अधिक उत्तम असू शकेल, माझा डाव माझ्या कल्पनेप्रमाणं मी खेळलो आहे. त्यामुळं तुझ्याबरोबर येताना मला खंत वाटत नाही. माझ्या पदरात जे सुखाचे आणि आनंदाचे थोडेफार क्षण पडले ते मी एकट्याने उपभोगले नाहीत. कुटुंबात आणि समाजात सर्वांना वाटून दिले. आनंदाचे वाटप करण्यात केवढा तरी आनंद आहे. दुसऱ्याचे दुःख हलके करण्यासाठी मला शक्य ते मी केले आहे. आता मला काहीच मागायचे नाही. चल, तुला दाराशी ताटकळत ठेवणार नाही. इतके दिवस जीवनाच्या गाण्यात रंगून गेलो होतो, आता तुझ्या व्यक्तित्त्वात मिसळून जायला मी सिद्ध आहे.'

पिकलेल्या पानांनी खळखळ न करता सहजपणाने गळून पडावे. कारण आपण संपल्याशिवाय दुसरे उगवत नाही. उगवण्याचा आणि मावळण्याचा सनातन खेळ कित्येक युगांपासून जगात चालू आहे. कोणी निघून गेला म्हणून जगाचे काही अडत नाही. म्हणूनच स्वतःच्या अस्तित्वाविषयी आणि सामर्थ्याविषयी गैरसमज करून घेऊ नयेत. जगण्या-मरण्याचे वास्तव भान ठेवले पाहिजे. निदान पिकलेल्या पानांना हे कळले पाहिजे. नुसतेच पिकण्यापेक्षा सारे समजावून घेत पिकत राहाणे चांगले असते. वार्धक्यही सुंदर असते.

सॉक्रेटिस या तत्त्ववेत्त्याने वार्धक्यातल्या आगळ्या सौंदर्याची महती गायिली आहे. सौंदर्यवादी आणि समंजस दृष्टिकोन असला म्हणजे जीवनातही कोणतीही अवस्था सुंदर व सुसह्य वाटू शकते. जुन्या गोष्टीलाही एक सुवास असतो. गोल्डस्मिथने म्हटले आहे, 'जे जे काही जुने आहे ते सर्व मला प्रिय आहे. जुने मित्र, जुना काळ, जुनी पुस्तके आणि जुने मद्य.' सारांश, पिकलेपणातही जीवनाची मुरलेली गोडी असू शकते. ती अनुभवायला आपण पिकत राहिले पाहिजे.

■■■

जीवनाच्या वाटेवर काटे पुष्कळ, फुलं थोडी. पण म्हणून जीवनाकडं पाठ फिरवणं वेडेपणाचं ठरतं. सुखाला रंग आणि गंध येतो तो दुःखाच्या स्पर्शानं. सुखदुःखांच्या ऊनपावसात आशावादी विचार देणारा निर्मलकुमार फडकुले यांचा हा ताजा टवटवीत लेखसंग्रह वाचकांच्या मनात आनंदोत्साहाचे तरंग निर्माण करील.

जीवनाचं दर्शन आणि त्याचं संवेध मनानं केलेलं चिंतन, त्यातून काढलेले आशावादी निष्कर्ष हे या लेखनाचं मध्यवर्ती वैशिष्ट्य. निर्मलकुमार फडकुले यांची शब्दकळा आणि विचारशैली काव्यात्म पातळीवर जाते. त्यांच्या मनाचं पाखरु सुखदुःखाचे क्षण असोशीचं टिपून घेते. कधी खोडकरपणानं तर कधी विनोद विडंबनाच्या वाटेनं या लेखकाची लेखणी चालत राहते. ती वाचकांना अस्वस्थही करते, आनंदही देते आणि अंतर्मुखही करते.

ललित साहित्याचं हे दर्शन वाचकांच्या चिंतनशीलतेला आवाहन करील यात संशय नाही.